## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

### आस्थापना विभाग

प्रस्ताव-

ज्या अर्थी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ किंवा मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० यांच्या व्यतिरिक्त एखाद्या शहरात नियत दिनांकाच्या लगतपुर्वी अमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा त्याखाली काढलेल्या व अशा दिनांकास उक्त शहरात अमलात असलेल्या कोणत्याही नियमामध्ये, आदेशामध्ये किंवा अधिसुचनेमध्ये कोणत्याही नावाने संबोधन्यात येणा-या कोणत्याही नगरपालिका किंवा इतर स्थानिक प्राधिकरणे याबाबतचे निर्देश, अन्य हेतू असल्याचे दिसून येत नसेल तर, यथास्थिती त्या शहरासंबंधीच्या किंवा उक्त शहराच्या महानगरपालिकेसंबंधीचे निर्देश असल्याप्रमाणे त्यांचा अन्वयार्थ लावण्यात येईल अशी अधिनियम, नियम, आदेश किंवा अधिसूचना उक्त शहरास किंवा महानगरपालिकेस लागू होईल अशी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे परिशिष्ट चार मध्ये तरतूद आहे.

आणि ज्या अर्थी, ज्या क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली आहे त्या क्षेत्राच्या नगरपालिकेचे किंवा अन्य कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे सर्व अधिकार हे, नियत दिवशी, उक्त क्षेत्रासाठी प्रस्थापित केलेल्या महानगरपालिकेमध्ये निहित होतील व अधिनियमातील कलम ६७ चा पोटकलम (३) नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या प्रयोजनार्थ संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल अशी तरतूद आहे.

आणि ज्या अर्थी, ज्या भागाची शहर म्हणून रचना करण्यात आली आहे त्या क्षेत्राच्या उक्त नगरपालिकेस किंवा स्थानिक प्राधिकरणास येणे असलेल्या सर्व रकमा मग त्या कोणत्याही कराबद्दल असोत किंवा अन्य कोणत्याही गोष्टीबद्दल असोत उक्त शहराच्या आयुक्तास वसूल करता येतील आणि अशा वसुलीच्या प्रयोजनासाठी जर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अमंलात आला नसता आणि उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली नसती, तर उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या प्राधिकाऱ्यास जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कार्यवाही दाखल करता आली असती ती उपाययोजना करण्यास किंवा ती कारवाई दाखल करण्यास आयुक्त सक्षम असेल.

आणि ज्या अर्थी, नियत दिवसाच्या निकटपूर्वी उक्त नगरपालिकेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्या वतीने, जी ऋणे व दायित्वे पत्करली असतील आणि ज्या संविदा केल्या



CamScanner

असतील आणि जी ऋणे दायित्वे व संविदा उक्त दिवशी अस्तित्वात असतील, अशी सर्व ऋणे, दायित्वे व संविदा उक्त शहराच्या आयुक्ताने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये त्यास देण्यास आलेल्या अधिकारांचा वापर करुन पत्करली आहेत आणि केल्या आहेत असे मानले जाईल आणि त्याप्रमाणे ती अमलात राहतील.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीन्वये आयुक्तापुढे दाखल करणे किंवा आयुक्ताने हाती घेणे आवश्यक असलेल्या ज्या कार्यवाहया उक्त दिवशी, उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिका-यापुढे प्रलंबित असतील अशा सर्व कार्यवाहया, आयुक्ताकडे हस्तांतरीत करण्यात आल्या पाहिजेत व त्याने त्या पुढे चालवल्या पाहिजेत आणि अशा अन्य सर्व कार्यवाहया, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये, त्या ज्या प्रधिकाऱ्यापुढे दाखल करावयाच्या असतील किंवा ज्या प्रधिकाऱ्याने हाती घ्यावयाच्या असतील त्या प्रधिकाऱ्याकडे शक्य असेल तेथवर, हस्तांतरित करण्यात आल्या पाहिजेत आणि त्याने त्या पुढे चालवल्या पाहिजेत.

आणि ज्या अर्थी, उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्रधिकाऱ्याने उक्त तारखेस प्रलंबित असलेली सर्व अपिले ज्या वेळी दाखल करण्यात आली त्या वेळी उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली होती असे समजून ती अपिले व्यवहार्य असेल तेथवर निकालात काढण्यात आली पाहिजेत.

आणि ज्या अर्थी, उक्त नगरपालिकेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्या वतीने दाखल केलेले उक्त तारखेस प्रलंबित असलेले सर्व खटले आणि उक्त नगरपालिकेने, स्थानिक प्राधिकरणाने किंवा उक्त नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्यांच्याविरुध्द दाखल केलेले व उक्त तारखेस प्रलंबित असलेले सर्व वाद व अन्य कायदेशीर कार्यवाहया या, असा खटला, वाद किंवा कार्यवाही ज्या वेळी दाखल करण्यात आली त्या वेळी उक्त क्षेत्राची शहर म्हणून रचना करण्यात आली होती असे समजून, यथास्थिती, शहराच्या आयुक्ताने किंवा महानगरपालिकेने किंवा आयुक्ताविरुध्द किंवा महानगरपालिकेविरुध्द चालू ठेवल्या पाहिजेत.

आणि ज्या अर्थी, शासनाने इचलकरंजी लहान नागरी क्षेत्राचे रूपांतर मोठे नागरी क्षेत्रात केले आहे म्हणजेच सदरचे क्षेत्र नगरपरिषद असल्याचे बंद होऊन महानगरपालिका झाल्याचे दिनांक २९ जून २०२२ च्या अधिसूचनेने जाहीर केले आहे.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (५९ चा १९४९) अधिनियमाच्या कलम ४५२A च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या अनुषंगाने सक्षम करणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने उक्त कायद्याच्या

अंतर्गत नवनिर्मित इचलकरंजी महानगरपालिकेची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी दि. २९ जून २०२२ पासून निम्न स्वाक्षरीकार यांची नियुक्ती केली आहे,

त्या अर्थी, इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामधील कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी आदेश निर्गमित करणे आवश्यक असलेने याबाबत निर्णयास्तव कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** 9 **दिनांक** 9/10/2022

कार्यालयीन प्रस्तावाच्या अनुषंगाने व इचलकरंजी महापालिकेची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी दिले अधिकारास अनुसरून खालीलप्रमाणे निर्देश / आदेश परीत करणेत यावेत.

१. इचलकरंजी महानगरपालिका स्थापित क्षेत्रात येणे असलेल्या सर्व रकमा मग त्या कोणत्याही कराबद्दल असोत किंवा कोणत्याही गोष्टीबददल असोत त्या यापुढे इचलकरंजी महानगरपालिकेच्या देय रकमा समजून वसुल करण्यात येतील आणि या रकमा वसुलीसाठी महानगरपालिका स्थापनेपूर्वी जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कार्य दाखल करता आली असती ती उपाययोजना करण्यात येईल, यापुढे हे कर व दर महानगरपालिका मुख्य कार्यालयात चलनानेही भरणा करता येईल.

२. नियत दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक २९ जून २०२२ पूर्वी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट क्षेत्रातील इचलकरंजी नगरपरिषद किंवा त्यांच्या वतीने जी ऋणे व दायित्वे पत्करली असतील आणि संविदा केल्या असतील आणि जी ऋणे, दायित्वे व संविदा त्या दिवशी अस्तित्वात असतील, अशी ऋणे, दायित्वे व संविदा महानगरपालिकेने केल्या आहेत असे मानले जाईल आणि त्याप्रमाणे अंमलात राहतील.

३. नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर केल्यामुळे समाविष्ट क्षेत्राबाबत संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असतील अशा सर्व कार्यवाहया महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्याचे मानले जाईल व त्या महानगरपालिका अधिनियमानुसार पुढे चालविल्या जातील.

४. महानगरपालिका हद्दीत समाविष्ट क्षेत्राशी संबंधित कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे दिनांक २९ जून २०२२ पूर्वी प्रलंबित सर्व अपीले ज्यावेळी दाखल करण्यात आली त्यावेळी सदर क्षेत्र महानगरपालिका हद्दीत होते असे समजून ती अपीले व्यवहार्य असेल तेथवर निकालात काढणेत येतील.

५. महानगरपालिका हद्दीत समाविष्ट क्षेत्राच्या बाबतीत संबंधित स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्या वतीने दिनांक २९ जून २०२२ रोजी प्रलंबित असलेले सर्व खटले आणि संबंधित स्थानिक



CamScanner

प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेले व या तारखेस प्रलंबित असलेले सर्व वाद व अन्य कायदेशिर कार्यवाहया वा, असा खटला, वाद, किंवा कार्यवाही ज्यावेळी दाखल करण्यात आली त्यावेळी हे क्षेत्र इचलकरंजी महानगरपालिकेचा भाग होती असे समजून, यथास्थिती महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार चालू ठेवल्या जातील.

६. दिनांक २९ जून २०२२ पूर्वी तात्कालीन इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्रात अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली अधिसूचना, नोटीस, आदेश, योजना, परवानगी, यथास्थिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये किंवा अन्य कोणत्याही कायद्यान्वये केलेल्या कोणत्याही नेमणूकीने, अधिसूचनेने, नोटीशीने, आदेशाने, योजनेने, लायसन्सने, परवानगीने, त्याचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतुदीशी विसंगत नसेल तेथवर अंमलात असल्याचे चालू राहील.

७. दिनांक २९ जून २०२२ पूर्वी इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्रासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाज, आकारण्या, मुल्यनिर्धारणे, मोजण्या आणि विभागण्या या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाशी सुसंगत असतील तेथवर महानगरपालिका अधिनियमान्वये केल्याचे मानले जाईल.

८. दिनांक २९ जून २०२२ तात्कालीन इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्रातील कामकाजासाठी त्या क्षेत्रास संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या नोकरीस असलेले अधिकारी व कर्मचारी हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार महानगरपालिकेने नेमलेले अधिकारी व कर्मचारी असतील आणि अन्य तरतूद करण्यात येईपर्यंत दिनांक २९ जून २०२२ पूर्वी त्यास जे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क होता आणि ते सेवेच्या ज्या शर्तीच्या अधिन होते तेच वेतन व भत्ते त्यास मिळतील आणि ते त्याच्या सेवेच्या अधिन असतील. तसेच या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दिनांक २९ जून २०२२ पूर्वी केलेली सेवा महानगरपालिकेच्या सेवेत असतांना केलेली सेवा मानले जाईल. या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा परिशिष्ट ४ मधील तरतूदीनुसार लाभ अथवा कारवाईस पात्र असतील.

९. दिनांक २९ जून २०२२ तात्कालीन इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्रातील कामकाजासाठी कार्यरत असलेले नगरपरिषद संचालनालय किंवा राज्यसंवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा पुढील आदेश होईपर्यंत महानगरपालिकेत कार्यरत राहतील. सदरच्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट होण्याची इच्छा असल्यास त्याबाबत सदरच्या कर्मचाऱ्याची गुणवत्ता पात्रता व चारित्र्य पडताळणी करून तसेच त्यांचे नियुक्ती प्राधिकाऱ्याशी विचारविनिमय करून शासन मान्यतेने उचित निर्णय घेण्यात येईल.

१०. दिनांक २९ जून २०२२ पासून वर नमूद क्रं. १ ते ९ सह अन्य सर्व तरतूदी यापुढे संपूर्ण इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनयमानुसार लागू राहतील



CamScanner

आणि दि. २९ जून २०२२ पूर्वी या क्षेत्रासाठी कार्यरत नगरपरिषद अथवा नगरपरिषदेच्या प्राधिकाऱ्याने या क्षेत्रात अधिकार आहे असे समजून दि. २९ जून २०२२ नंतर केलेली कोणतीही कृती सर्व प्रयोजनार्थ अधिकार कक्षेबाहेरील कृती मानली जाईल.

११. इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील पूर्वीच्या इचलकरंजी नगरपरिषद मालकीच्या मालमत्ता यापुढे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये निहित असतील व त्या मालमत्ताच्या अभिलेखावर नोंदीमध्ये बदलासाठी महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने सक्षम प्राधिका-याशी समन्वय साधून नियमानुसार कार्यवाही करावी.

उपरोक्तप्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेचे कामकाज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार करणेसंबंधीचे आदेश निर्गमित करणेस या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.

01/07/2022

( सुधाकर देशमुख )
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.



CamScanner

e- S patil



# इचलकरंजी महानगरपालिका

---

**विषय क्र. :- महाराष्ट्र सुरक्षा मंडळ मुंबई यांच्याकडून अधिकारी व सुरक्षा रक्षक घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

## <u>प्रस्ताव</u>

इचलकरंजी महानगरपालिकेला दैनंदिन कामकाज करताना अतिक्रमण काढणे, मालमत्तेचे सुरक्षा करणे, दैनिक प्रशासन चालविणे, मोर्चे सांभाळणे इ. प्रकारची बहुविध कामे करावी लागतात. यासाठी सुरक्षा रक्षक असणे व ते प्रभावशाली असणे गरजेचे आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तात्काळ प्रभावी सुरक्षा रक्षक नेमणे अत्यंत गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दि. १९ एप्रिल २०१० चे अधिनियमाने सुरक्षा महामंडळाची स्थापना करणेत आलेली आहे. उक्त अधिनियमातील कलम १५ (१) मध्ये राज्य शासनाची कार्यालये, संघटना आणि राज्य शासनाची सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना महामंडळाकडून सुरक्षा घेणे अनिवार्य असेल असे नमूद आहे.

उक्त महामंडळाकडून सद्यस्थितीत ९ सुरक्षा रक्षक व १ सुरक्षा अधिकारी असे एकूण १० शस्त्रधारी/विनाशस्त्रधारी गार्ड नियुक्त करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा अधिकाऱ्यांसह हत्यारी/बिनहत्यारी सुरक्षा रक्षक घेणेस व शासनाच्या मंजूर दराने वेळोवेळी वेतन अदा करणेस मान्यता मिळणेकामी तसेच भविष्यात वाढीव सुरक्षा रक्षक आवश्यक असल्यास ते घेण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे. प्रस्ताव सादर केला आहे.

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 02/2022 **दिनांक-** 05/07/2022

उपरोक्त प्रस्तावानुसार इचलकरंजी महानगरपालिकेला दैनंदिन कामकाज करताना अतिक्रमण काढणे, मालमत्तेचे सुरक्षा करणे, दैनिक प्रशासन चालविणे, मोर्चे सांभाळणे इ. प्रकारची बहुविध कामे करावी लागतात. यासाठी सुरक्षा रक्षक असणे व ते प्रभावशाली असणे गरजेचे असून सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तात्काळ प्रभावी सुरक्षारक्षक नेमणे अत्यंत गरजेचे असलेने महाराष्ट्र सुरक्षा महामंडळ, मुंबई यांच्याकडून ९ सुरक्षा रक्षक व १ सुरक्षा अधिकारी असे एकूण १० शस्त्रधारी / निमशस्त्रधारी सुरक्षा रक्षक (गार्ड) घेणे, शासनाच्या मंजूर दराने वेळोवेळी वेतन अदा करणेस मंजूरी देणेत येत आहे. तसेच भविष्यात वाढीव सुरक्षा रक्षक आवश्यक असल्यास ते घेण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

05/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

आस्थापना विभाग

प्रस्ताव -

महाराष्ट्र शासन, नगररविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. मनपा - 2022/प्रक्र96/नवि18, दि. 29 जुन 2022 शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र. मनपा 2022 /प्र.क्र.96 (3) /नवि 18 दि. 29 जून 2022 या व्दारे शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (1949 चा 59) याच्या कलम 3 चे पोटकल (2) आणि पोटकलम (2A) नुसार इचलकरंजी नगरपरिषदेचे संपुर्ण क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या उद्देशाने अधिक मोठे नागरी क्षेत्र असेल आणि या अधिक मोठया नागरी क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाच्या उद्देशाने इचलकरंजी शहर महानगरपालिका या नावाने ओळखले जाणारी महानगरपालिका असेल असे विर्निदिष्ट करणेत आलेली आहे. यामूळे इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर इचलकरंजी महानगरपालिकामध्ये झाले असून सदर महानगरपालिकेच्या कामकाजासाठी, महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (1949 चा 59) लागू झालेला आहे.

शासन निर्णय क्र. संकिर्ण -1055 /वर्गीकरण / प्र.क्र. 379/05 नवि-24 दिनांक 4 मे 2006 अन्वये राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्याआधारे महानगरपालिका क्षेत्रांचे 3 सेवेत विभागणी करून 38 अधिका-यांच्या पदासाठी आकृतीबंध निश्चित करणेत आलेला आहे.

अधिनियमाचे कलम 51 (4) नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजुरी शिवाय महानगरपालिकेतील अधिका-यांची व कर्मचा-यांची कोणतीही नविन पदे निर्माण करता येणार नाहीत अशी तरतुद आहे. इचलकरंजी महानगरपालिकेचे कामकाज कार्यक्षमतेने व गतिमानतेने पार पाडणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 ते 55 मध्ये असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे बाबतच्या तरतुदीनुसार अधिनियमातील विविध तरतुदींच्या अमंलबजावणीसाठी वैधानिक पदे आवश्यक आहेत. याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (1949 चा 59) नुसार इचलकरंजी महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, 3 प्रकारच्या सेवांकरीता 33 संवर्गातील एकूण 42 पदांच्या आकृतीबंधास तातडीने मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

याप्रमाणे आकृतीबंधास मंजूरी मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यतेस्तव कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> 03/2022 दिनांक 05/7/2022

तरी उपरोक्त प्रस्ताव नुसार इचलकरंजी महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण -1055 /वर्गीकरण / प्र.क्र. 379/05 नवि-24 दिनांक 4 मे 2006 अन्वये निश्चित करणेत आलेल्या 3 प्रकारच्या सेवांकरीता 33 संवर्गातील एकूण 42 पदांचे आकृतीबंधास तातडीने मंजूरी मिळणेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देणेत येत आहे.

05/07/2022

(सुधाकर देशमुख)

**प्रभारी अधिकारी तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

CS CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**

**आस्थापना विभाग**

प्रस्ताव-

शासनाने, नगर विकास विभागाकडील दिनांक 29 जून 2022 च्या अधिसूचनेद्वारे इचलकरंजी नगरपरिषदेचे रूपांतर इचलकरंजी महानगरपालिकेत केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३, अनुसूची ड - प्रकरण पाच आणि इतर तरतुदीनुसार विविध संविदा करताना तसेच महानगरपालिकेच्या कामकाजासाठी महानगरपालिकेचे बोधचिन्ह (LOGO) असलेली सामान्य मुद्रा वापरली जाते. यापूर्वी इचलकरंजी नगरपरिषदेची सामान्य मुद्रा सर्वत्र नगरपरिषद काळात व कामकाजासाठी वापरली जात होती. सदरची मुद्रा भविष्यात चालू ठेवण्यासाठी त्यात " इचलकरंजी नगरपरिषद" या शब्दाऐवजी "इचलकरंजी महानगरपालिका" व "स्थापना वर्ष १८८३" ऐवजी "स्थापना वर्ष २०२२" असा बदल करणे आवश्यक आहे.

वरील बाबीचा विचार करून इचलकरंजी नगरपरिषदेची सामान्य मुद्रा भविष्यात इचलकरंजी महानगरपालिकेत वापरासाठी चालू ठेवण्याकरीता त्यात " इचलकरंजी नगरपरिषद" या शब्दाऐवजी "इचलकरंजी महानगरपालिका" व "स्थापना वर्ष १८८३" ऐवजी "स्थापना वर्ष २०२२" असा बदल करून सुधारित बदलानुसार महानगरपालिकेचे बोधचिन्ह (LOGO) असलेली सामान्य मुद्रा तयार करणेस व महानगरपालिकेचे सुधारित बोधचिन्ह (LOGO) भविष्यात महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी वापरण्यास, तसेच या कामी येणाऱ्या आवश्यक खर्चास मा. प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता मिळणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> ०४/२०२२ दिनांक ०६/०७/२०२२

यापूर्वी वापरात असलेली इचलकरंजी नगरपरिषदेची सामान्य मुद्रा भविष्यात इचलकरंजी महानगरपालिकेत वापरासाठी चालू ठेवण्याकरीता त्यात " इचलकरंजी नगरपरिषद" या शब्दाऐवजी "इचलकरंजी महानगरपालिका" व "स्थापना वर्ष १८८३" ऐवजी "स्थापना वर्ष २०२२" असा बदल करून सुधारित बदलानुसार महानगरपालिकेचे बोधचिन्ह (LOGO) असलेली सामान्य मुद्रा तयार करणेस व महानगरपालिकेचे सुधारित बोधचिन्ह (LOGO) भविष्यात महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी वापरण्यास, तसेच या कामी येणाऱ्या आवश्यक खर्चास या ठरावाव्दारे मान्यता देणेत येत आहे.

06/07/2022

( सुधाकर देशमुख )

**प्रभारी अधिकारी तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

विषय क्र. : कर, लेखा व आस्थापना विभागास नविन संगणक प्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.

## प्रस्ताव

मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेशाप्रमाणे तत्कालीन नगरपरिषदेकडील कर विभागाचे सर्व संगणकीय कामकाज MAINET या Softwere मध्ये सन २०१६-२०१७ पासून ते सन २०२१-२०२२ अखेर सुरु आहे. सदर विभागाचे कामकाज शासनाने ABM Knowlegware Ltd या कंपनीमार्फत Mainet या प्रणाली मध्ये करणेत येते. तथापि १० एप्रिल २०२२ पासून ABM Knowlegware या कंपनीने नगरपरिषदेकडील त्यांचा सपोर्ट यांची सेवा नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे आदेशानुसार सदर कंपनीचे काम संपुष्टात आलेने कर विभागाकडे सदर संगणकीय कामकाज करताना मोड्युलमध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. यामध्ये याचा परिणाम नागरिकांची गैरसोय होत आहे. नगरपरिषदेमार्फत नागरिकांना कर विभागामार्फत तात्काळ सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शहरात विविध ठिकाणी चार प्रशासकीय कार्यालय स्थापित करणेत आलेली आहे. सदर संगणक प्रणाली MAINET सदर प्रशासकीय कार्यालयामध्ये ऑनलाईन सुविधा देणे अडचणीचे झालेमुळे कर विभागाकडून सदर प्रशासकीय कार्यालयास कोणतीही सोई सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेले नाहीत.

सध्या मा. शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.मनपा २०२२/ प्र.क्र. ९९/ नवि - १८ दि. २५/०४/२०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करणेत आलेले आहे. यास अनुसरुन मुख्य प्रशासकीय इमारतीसह शहरातील विविध ठिकाणी असलेले चार प्रशासकीय कार्यालयाकडील कर विभागाचे सर्व कामकाज यामध्ये कर संकलन, नागरिकांना ऑनलाईन करभरणा सुविधा, प्रमाणपत्रे तसेच SMS सुविधा इ सेवासुविधा देणे आवश्यक आहे. याकरीता HDFC बँकेकडून ई गव्हर्नन्स प्रणाली अंतर्गत नगरकार्यालयाशी या संगणक प्रणालीबाबतचा प्रस्ताव नगरपरिषदेस सादर केला आहे. यामध्ये HDFC बँक व ACENT Information Technology Pvt. Ltd यांचे संयुक्त विद्यमानाने नगरपालिका व महानगरपालिकेच्या दैनंदिन सर्व व्यवहाराकरीता नवीन संगणक प्रणाली सुरु करणेबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. या कंपनीमार्फत नगर कार्यावली अंतर्गत ANERP Solution For ULB ही संगणक प्रणाली इचलकरंजी नगरपालिकेस मोफत उपलब्ध करुन देणार आहेत. तसेच संगणक प्रणालीचा देखभाल दुरुस्तीचा सर्व खर्च HDFC बँकेमार्फत केला जाणार आहे. याकामी HDFC आणि ACENT Information Technology Pvt. Ltd यामध्ये संयुक्तीक करार झालेला आहे. सदर संगणक प्रणालीचा Live demo नगरपरिषदेच्या सभागृहात घेणेत आला होता. यामध्ये कर विभागासह अन्य विभागाशी संबधीत मोड्युलची माहिती मिळाली असून प्रथमदर्शनी सदर कार्यप्रणाली कर विभागाकरीता योग्य वाटते. या बरोबरच लेखा विभागाकडील कामाची व्याप्ती तसेच कर्मचारी संख्या विचारात घेता वेतन विषयक प्रणाली कार्यान्वीत होणे आवश्यक आहे. नमुद बँक ही लेखा व आस्थापना विभागाशी संबंधीत मोड्युल देखील उपलब्ध करुन देणार आहे. सदर कंपनीने सदर कार्यप्रणाली पुणे, अहमदनगर महानगरपालिका येथे सर्व सुविधांसह कार्यान्वित केली असलेचे समजते. त्यामुळे कर विभागाचे दैनंदिन कामकाजास सदर संगणक प्रणाली फायदा होणार आहे.

सबब याकामी कर, लेखा व आस्थापना विभागाची निकड विचारात घेता याकामी तत्कालीन मुख्याधिकारी इचलकरंजी नगरपरिषद यांचेशी समक्ष झाले चर्चेस अनुसरुन सदर HDFC बँक व ACENT Information Technology Pvt. Ltd यांचे अंतर्गत An ERP Solution For ULB ही संगणक प्रणाली महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेस मा. प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

CamScanner

**प्रशासकीय ठराव क्र. ०५/२०२२** **दि. ०७/०७/२०२२**

मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचलनालय मुंबई यांचे आदेशाप्रमाणे तत्कालीन नगरपरिषदेकडील कर विभागाचे सर्व संगणकीय कामकाज MAINET या Softwere मध्ये सन २०१६-२०१७ पासुन ते सन २०२१-२०२२ अखेर सुरु आहे. सदर बिलांचे कामकाज शासनाने ABM Knowlegware Ltd या कंपनीमार्फत Mainet या प्रणाली मध्ये करणेत येते. तथापि ३० एप्रिल २०२२ पासुन ABM Knowlegware या कंपनीने नगरपरिषदेकडील त्यांचा सपोष्ट यांची सेवा नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई, यांचे आदेशानुसार सदर कंपनीचे काम संपुष्टात आलेने संगणकीय प्रणाली कामकाज करणे अडचणीचे होत आहे. मा. शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.मनपा २०२२/ प्र.क्र. ९६/ नवि-१८ दि. २९/०६/२०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करणेत आलेले आहे.

शासनाने T+१ याप्रमाणे रक्कमा जमा होतील या शर्तीवर HDFC व इतर काही बँकेसोबत वसुली व्यवस्था किवा प्रणाली विकसनाबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन मान्यता देणेत येत असुन त्वरीत EOI देवुन MOU उपायुक्त यांचे स्तरावर करावा.

तरी इचलकरंजी महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारतीसह शहरातील विविध ठिकाणी असलेले चार प्रशासकीय कार्यालय, कर, लेखा व आस्थापना विभागाशी दैनंदिन कामकाजाकरीता नविन संगणक प्रणाली उपलब्ध करणे आवश्यक असुन सदर मोड्युल HDFC बँक व ACENT Information Technology Pvt. Ltd यांचे अंतर्गत An ERP Solution For ULB ही संगणक प्रणाली महानगरपालिकेस देखभाल दुरुस्तीसह मोफत उपलब्ध करुन घेणेस अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५ नियम २ (२) अन्वये मान्यता देणेत येत आहे.

07/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

विषय क्र. : मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचे निवासासाठी खाजगी निवासस्थान भाडयाने घेणेबाबत.

## प्रस्ताव

महाराष्ट्र शासनाकडील दि. २९/०६/२०२२ रोजीच्या अधिसुचनेने इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेले आहे. सद्य स्थितीत मा. आयुक्त, इ.म.प. यांच्यासाठी शासकीय निवास्थानाची सोय नाही त्यामुळे त्यांच्यासाठी खाजगी निवासस्थान घेणे आवश्यक आहे.

सदर खाजगी निवासस्थानासाठी महानगरपालिका हद्दीत चौकशी केली असता वॉ.न. १५ मध्ये श्री. मगदुम यांचे निवासस्थान मा. आयुक्तांच्या निवासस्थानासाठी उचित वाटले. याबाबत श्री. सुर्यकांत मगदुम व श्री. चंद्रकांत पारीसा मगदूम वॉ. १५/२३५ इचलकरंजी यांनी त्यांचे निवासस्थानासाठी बंगल्याचे किमान मासिक भाडे ३० हजार असावे किरकोळ दुरुस्ती, रंगरंगोटी भाडेकरुनी करणे, घरफाळा, पाणीपट्टी व लाईट बिल म.न.पा. कडुन भरणे तसेच वार्षिक १०% भाडे वाढ इ. अटीसह सदरची मिळकत मा. आयुक्तांच्या निवासस्थानासाठी देणेकरीता दि. ०८/०७/२०२२ इकडे प्रस्ताव सादर केला आहे. इ.म.न.प. च्या नगररचना विभागाकडून सदर निवास स्थानचे भाडे निश्चिती केला असता रु. ३३,२१२/- इतकी होते.

सदर प्रकरणी निवासस्थानाचे रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती, घरफाळा, पाणीपट्टी, लाईट बिल इ. महानगरपालिकेमार्फत करणेचे असलेने सदर निवासस्थानास रु. १५,०००/- मासिक भाडे तसेच वार्षिक ४% भाडे वाढ देणे योग्य वाटते. व त्यास संबंधीत मिळकत धारकांनी संमत्ती दर्शविलेली आहे.

तरी मा. आयुक्त यांचेसाठी खाजगी निवासस्थान भाडयाने घेणेकामी प्रशासकीय ठराव करण्यास मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.०६/२०२२** **दि.११/०७/२०२२**

महाराष्ट्र शासनाकडील दि. २९/०६/२०२२ रोजीच्या अधिसुचनेने इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेले आहे. सद्य स्थितीत मा. आयुक्त, इ.म.प. यांच्यासाठी शासकीय निवास्थानाची सोय नाही त्यामुळे त्यांच्यासाठी खाजगी निवासस्थान घेणे आवश्यक असुन इ.म.न.पा. हद्दीतीत चौकशी केली असता श्री. सुर्यकांत मगदुम व श्री. चंद्रकांत पारीसा मगदूम वॉ. १५/२३५ इचलकरंजी, यांचे खाजगी निवासस्थान मा. आयुक्त यांचे निवासस्थानासाठी भाडयाने उपलब्ध करुन देणेस तसेच बंगल्याचे किमान मासिक भाडे ३० हजार असावे किरकोळ दुरुस्ती, रंगरंगोटी भाडेकरुनी करणे, घरफाळा, पाणीपट्टी व लाईट बिल म.न.पा. कडुन भरणे तसेच वार्षिक १०% भाडे वाढ इ. अटीसह सदरची मिळकत देणेकरीता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील वॉ.न. १५ मध्ये श्री. मगदुम यांचे निवासस्थान मा. आयुक्तांच्या निवासस्थानासाठी योग्य असुन मा. आयुक्तांना निवासस्थान उपलब्ध करुन दिले पासुन ते निवासस्थान सोडण्यापर्यंत घर भाडे भत्ता देय असणार नाही तसेच निवासस्थानाचे विद्युत देयक वापर काळात मा. आयुक्तांनी भरावे तसेच निवासस्थानाचे रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती, घरफाळा, पाणीपट्टी, इ. व इतर सुविधा महानगरपालिकेमार्फत करणेचे असुन सदर निवासस्थानास रु. १५,०००/- मासिक भाडे तसेच वार्षिक ४% भाडे वाढ इ.म.न.प. कडुन देणेस मंजुरी देणेत येत आहे.

11/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : इचलकरंजी नगरपरिषदेकडील कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील आरक्षण फेरबदल विषय डि.पी.युनिटकडे पाठविणेबाबत.

**प्रस्ताव**

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी श्री.प्रकाश मारुती मोरबाळे व श्री.शशांक म.बावचकर यांनी मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे इचलकरंजी नगरपरिषदेकडील कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील विषय क्र.५२ ते ७८ या विषयांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम - ३०८ (१) खाली तहकुबी देणेबाबत तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे दालनात वेळोवेळी सुनावणी झालेल्या आहेत. तसेच याबाबतची मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दि.०१/०७/२०२२ रोजी सुनावणीवेळी महाराष्ट्र शासनाच्या दि.२९/०६/२०२२ रोजीच्या घोषणेने इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेने सदर प्रकरणी इचलकरंजी महानगरपालिका स्तरावर निर्णय घेणेबाबत सुचना केल्या आहेत. याबाबत नगररचना विभागाने अहवाल सादर केला आहे.

कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील विषय क्र.५२ ते ७८ च्या ठरावातील नमुद आरक्षणे पाहता, ही आरक्षणे शाळा, खुली मैदाने, पुर्व प्राथमिक शिक्षण, उद्याने, झोपडपट्टी पुनर्वसन इ.प्रयोजनार्थ आहेत. महानगरपालिकेच्या विकास योजनेचे काम सुरु असताना इतक्या मोठया प्रमाणात फेरबदलांचे प्रस्ताव शासनांस पाठविणे उचित नाही. सर्व ठराव डि.पी.युनिटकडे पाठविणे आवश्यक आहे. शहर नियोजनाच्या नियमांनुसार प्रत्येक निर्णयाची विधीग्राहयता तपासून शहर नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदरचे ठराव डि.पी.युनिट विचारात घेईल. सदरचे ठराव विचारात घेताना वेळोवेळीचे शासनाचे निर्देश, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व निर्बंध विचारात घेणे बंधनकारक राहील.

सबब, वरीलप्रमाणे कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील विषय क्र.५२ ते ७८ चे प्रस्ताव डि.पी.युनिट/नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेकरीता प्रशासकीय ठराव करणेत यावा.

**प्रशासकीय ठराव क्र.७ /२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील विषय क्र.५२ ते ७८ च्या ठरावातील नमुद आरक्षणे पाहता, ही आरक्षणे शाळा, खुली मैदाने, पुर्व प्राथमिक शिक्षण, उद्याने, झोपडपट्टी पुनर्वसन इ.प्रयोजनार्थ आहेत. महानगरपालिकेच्या विकास योजनेचे काम सुरु असताना इतक्या मोठया प्रमाणात फेरबदलांचे प्रस्ताव शासनांस पाठविणे उचित नाही. सर्व ठराव डि.पी.युनिटकडे पाठविणे आवश्यक आहे. शहर नियोजनाच्या नियमांनुसार प्रत्येक निर्णयाची विधीग्राहयता तपासून शहर नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदरचे ठराव डि.पी.युनिट विचारात घेईल. सदरचे ठराव विचारात घेताना वेळोवेळीचे शासनाचे निर्देश, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व निर्बंध विचारात घेणे बंधनकारक राहील.

सबब, वरीलप्रमाणे कौन्सिल सभा क्र.५ दि.२९/१२/२०२१ रोजीच्या सभेच्या नोटीसीमधील विषय क्र.५२ ते ७८ चे प्रस्ताव डि.पी.युनिट/नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेस मंजुरी देणेत येत आहे.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) चे प्रस्ताव डि.पी.युनिटकडे पाठविणेबाबत.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार आरक्षणांचे अंतिम विकास योजनेत फेरबदल करणेबाबत प्राथमिक ठराव मे.कौन्सिल सभा क्र.४, दि.२६/०२/२०२१, व मे.कौन्सिल सभा क्र.३, दि.२९/०९/२०२१ अन्वये झालेला आहे. तसेच फेरबदल करणेबाबतची जाहिर नोटीस दि.१०/०९/२०२१ व दि.०४/११/२०२१ रोजीचे स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेत आलेली होती. तसेच याबाबतच्या प्रसिध्दीकरण अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन राजपत्र भाग - १ पुणे विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३० ते ऑक्टोंबर ६, २०२१ व गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १८-२४, २०२१ मध्ये करणेत आले आहे.

सदर आरक्षणाबाबत विहीत मुदतीत सुचना / हरकती दाखल झालेल्या होत्या. त्यास अनुसरून संबंधितांना दि.१६/१२/२०२१ रोजी सुनावणीसाठी नोटीस बजावून म्हणणे मांडणेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने दि.२४/१२/२०२१ रोजी सुनावणी पार पडली. मात्र सदरच्या आरक्षणांचा अंतिम ठराव झालेला नाही. याबाबत नगररचना विभागाने अहवाल सादर केला आहे.

उपरोक्त ठरावातील नमुद आरक्षणे पाहता, ही आरक्षणे शाळा, खुली मैदाने, पुर्व प्राथमिक शिक्षण, उद्याने, झोपडपट्टी पुनर्वसन इ.प्रयोजनार्थ आहेत. महानगरपालिकेच्या विकास योजनेचे काम सुरु असताना इतक्या मोठया प्रमाणात फेरबदलांचे प्रस्ताव शासनांस पाठविणे उचित नाही. सर्व ठराव डि.पी.युनिटकडे पाठविणे आवश्यक आहे. शहर नियोजनाच्या नियमांनुसार प्रत्येक निर्णयाची विधीग्राहयता तपासून शहर नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदरचे ठराव डि.पी.युनिट विचारात घेईल. सदरचे ठराव विचारात घेताना वेळोवेळीचे शासनाचे निर्देश, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व निबंध विचारात घेणे बंधनकारक राहील.

सबब, उक्त नमुद फेरबदलाचे प्रस्ताव डि.पी.युनिट / नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेकरीता प्रशासकीय ठराव करणेत यावा.

**प्रशासकीय ठराव क्र. ८ /२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन नमुद आरक्षणे पाहता, ही आरक्षणे शाळा, खुली मैदाने, पुर्व प्राथमिक शिक्षण, उद्याने, झोपडपट्टी पुनर्वसन इ.प्रयोजनार्थ आहेत. महानगरपालिकेच्या विकास योजनेचे काम सुरु असताना इतक्या मोठया प्रमाणात फेरबदलांचे प्रस्ताव शासनांस पाठविणे उचित नाही. सर्व ठराव डि.पी.युनिटकडे पाठविणे आवश्यक आहे. शहर नियोजनाच्या नियमांनुसार प्रत्येक निर्णयाची विधीग्राहयता तपासून शहर नियोजनाच्या दृष्टीकोनातून सदरचे ठराव डि.पी.युनिट विचारात घेईल. सदरचे ठराव विचारात घेताना वेळोवेळीचे शासनाचे निर्देश, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व निबंध विचारात घेणे बंधनकारक राहील.

सबब, उक्त नमुद फेरबदलाचे प्रस्ताव डि.पी.युनिट / नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेस मंजुरी देणेत येत आहे.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : इचलकरंजी सांगली रोड झेंडा चौक ते पोटफाडी सि.स.न. ३२६३, ३२६४ इ. मधील मंजुर विकास योजनेतील रस्ता रुंदीने बाधीत होणारी जागा तसेच रुग्गे मळा टप्पा क्र. १ रि.स.न. ६२९ इ. मधुन जाणारा मंजुर विकास योजनतील पुर्व पश्चिम २४.०० मी. रुंद रस्त्याचे भुसंपादनाबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र. २१११/१३५२ सी.आर-१९/१२/डि.पी. सॅन्क्शन/नवि-१३, २४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि. १०/०७/२०१२ रोजीपासुन अंमलात आहे.

१) उक्त विकास योजनेतील सांगली रोड झेंडा चौक ते पोटफाडी या टप्पातील रस्त्याच्या रस्त्यारुंदीने बाधीत होणा-या मिळकतीचे संपादन होणेकरीता या कार्यालयाने भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि.२६/१०/२०१९ रोजी सादर केलेला आहे. उक्त भुसंपादन प्रस्तावानुसार नगरभुमापन अधिकारी इचलकरंजी यांचे कार्यालयाकडुन दि. २४/०३/२०२२ रोजी झालेली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

२) उक्त विकास योजनेतील रुग्गे मळा रि.स.न. ६२९ पै. इ. मधुन जाणारा २४.०० मी. रुंद पुर्व-पश्चिम विकास योजना रस्त्याच्या भुसंपादनाचा प्रस्ताव एलएक्यु/स्पे/४६८ हा कार्यान्वित असुन याकामी भुसंपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वयेचे घोषणापत्र प्रसिध्द करणेपुर्वी भुसंपादनाच्या ३०% रक्कम म्हणजेच एकुण ७९,३३,४५०/- भरणेची कार्यवाही महानगरपालिकेने केलेली आहे.

उक्त दोन्ही प्रकरणी वार्षिक मुल्यदर तक्त्यातील दरानुसार शासकीय नियमानुसार होणा-या मुल्यांकनाची रक्कम देणेच्या अटीवर खाजगी उक्त रस्त्याची जागा खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात आलेस त्याचा विकास लवकर करणे शक्य होईल.

सदर प्रकरणी पुढील कार्यवाही होणेकरीता मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेबाबत प्रशासकीय ठराव करणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८ /२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन,

१) इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजनेतील सांगली रोड झेंडा चौक ते पोटफाडी या टप्पातील रस्त्याच्या रस्त्यारुंदीने बाधीत होणा-या मिळकतीचे संपादन होणेकरीता या कार्यालयाने भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि. २६/१०/२०१९ रोजी सादर केलेला आहे. उक्त भुसंपादन प्रस्तावानुसार नगरभुमापन अधिकारी इचलकरंजी यांचे कार्यालयाकडुन दि. २४/०३/२०२२ रोजी झालेली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

२) इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजनेतील रुग्गे मळा रि.स.न. ६२९ पै. इ. मधुन जाणारा २४.०० मी. रुंद पुर्व-पश्चिम विकास योजना रस्त्याच्या भुसंपादनाचा प्रस्ताव एलएक्यु/स्पे/४६८ हा कार्यान्वित असुन याकामी भुसंपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वयेचे घोषणापत्र प्रसिध्द करणेपुर्वी भुसंपादनाच्या ३०% रक्कम म्हणजेच एकुण ७९,३३,४५०/- भरणेची कार्यवाही महानगरपालिकेने केलेली आहे.

उक्त दोन्ही प्रकरणी वार्षिक मुल्यदर तक्त्यातील दरानुसार शासकीय नियमानुसार होणा-या मुल्यांकनाची रक्कम देणेच्या अटीवर खाजगी उक्त रस्त्याची जागा खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेच्या ताब्यात आलेस त्याचा विकास लवकर करणे शक्य होणार असलेने वरील प्रकरणी पुढील कार्यवाही होणेकरीता मा. आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : वस्तु व सेवा कर परतावा अनुदान (GST परतावा) अनुदान मागणी बाबत.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र शासनाच्या दि. २९/०६/२०२२ रोजीचे अधिसुचनेने इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर इचलकरंजी महानगरपालिकेत झालेले आहे. त्यानुसार स्थानिक प्राधिकरणांना महाराष्ट्र वस्तु व सेवाकर अधिनियम २०१७ अन्वये वस्तु व सेवाकर भरपाई लागु आहे. दि. १ जुलै २०१७ पासुन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर बंद करुन वस्तु व सेवाकर (GST) करप्रणाली सुरु झाल्याने महानगरपालिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महानगरपालिकांना भरपाई अनुदान देण्याबाबत वस्तु व सेवाकर अधिनियम - २०१७ अन्वये राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. उपरेक्त अधिनियमातील कलम ४ व ५ अंतर्गत असलेल्या परंतुकानुसार सन २०१६-२०१७ हे आधारभुत वर्ष निश्चित करुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या संभाव्य वस्तु व सेवाकर भरपाईची रक्कम निश्चित करणेत आलेली आहे. याकामी राज्य शासनाकडून तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेस वितरीत केलल्या सहाय्यक अनुदानावरील काल्पनिक वाढ विचारात घेणेत आली आहे. सन २००९-२०१० पासुन नगरपरिषदेस प्रत्यक्ष प्राप्त सहाय्यक अनुदानावर अनुज्ञेय १०% वाढीप्रमाणे काल्पनिक वाढीव अनुदानाचा तक्ता तयार करुन सन २०१६-२०१७ या आधारभुत वर्षाची सहायक अनुदानाची क्क्म गृहीत धरली आहे. तसेच अधिनियमातील कलम ७ मधील परंतुकामध्ये दिलेल्या सुत्राप्रमाणे सन २०२२-२०२३ सालाच्या प्रक्षेपित (Projected) वस्तु व सेवा परतावा अनुदान रक्कमेची परिगणना करणेत आली आहे. त्यानुसार इचलकरंजी महानगरपालिकेस वार्षिक र.रु. १९३.५९ कोटी तसेच र.रु. १६.१३ कोटी याप्रमाणे वस्तु व सेवाकर परतावा अनुदान रक्कम (नुकसान भरपाई अनुदान) मागणी करणेबाबतचा प्रस्ताव मे. शासनाकडे सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. १०/२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन महाराष्ट्र शासनाच्या दि. २९/०६/२०२२ रोजीचे अधिसुचनेने इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर इचलकरंजी महानगरपालिकेत झालेले आहे. त्यानुसार स्थानिक प्राधिकरणांना महाराष्ट्र वस्तु व सेवाकर अधिनियम २०१७ अन्वये वस्तु व सेवाकर भरपाई लागु आहे. दि. १ जुलै २०१७ पासुन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर बंद करुन वस्तु व सेवाकर (GST) करप्रणाली सुरु झाल्याने महानगरपालिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी अधिनियमातील कलम ७ मधील परंतुकामध्ये दिलेल्या सुत्राप्रमाणे सन २०२२-२०२३ सालाच्या प्रक्षेपित (Projected) वस्तु व सेवा परतावा अनुदान रक्कमेची परिगणना केलेनुसार इचलकरंजी महानगरपालिकेस वार्षिक र.रु. १९३.५९ कोटी तसेच र.रु. १६.१३ कोटी याप्रमाणे वस्तु व सेवाकर परतावा अनुदान रक्कम (नुकसान भरपाई अनुदान) मागणी करणेबाबतचा प्रस्ताव मे. शासनाकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : महानगरपालिकेकडून देय होणा-या सर्व देयके अदा करणेसाठी सक्षम अधिकारी प्राधिकृत करणेबाबत.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र शासनाचे दि.२९/६/२०२२ चे अधिसूचनेने इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी शहर महानगरपालिकेत रुपांतर झालेले आहे. त्यामुळे तत्कालिन इचलकरंजी नगरपरिषदेवरील कार्यकारी प्राधिकृत पदे व्यपगत झालेली आहेत. सबब इचलकरंजी महानगरपालिकेकडून देय होणा-या सर्व देयक सक्षम अधिका-याच्या स्वाक्षरीने अदा करणेसाठी सक्षम अधिकारी प्राधिकृत करुन महानगरपालिकेच्या सुरु असलेल्या सर्व बँकामध्ये सहीचे नमुने सादर करणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिकेच्या सर्व व्यवहारांकरीता प्राधिकृत अधिकारी नियुक्त होणेकामी प्रशासकीय मंजुरी मिळणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ११/२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा अधिनियम क्र.५९ मधिल तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन कलम ६९ व इतर अनुषंगिक तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून देय होणा-या सर्व देयकांवर देयक अदा करणेसाठी सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेनंतर आयुक्तांच्या वतीने स्वाक्षरी करण्यासाठी विशेष कार्य अधिकारी तथा उपायुक्त डॉ.प्रदीप ठेंगल यांना अधिकृत करण्यात येत आहे.

तसेच प्रभारी अधिकारी तथा प्रशासक यांनी मान्यता दिल्या प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ मधिल कलम ६९ व इतर अनुषंगिक तरतुदी व कलम ८४ (१) नुसार धनादेशावर स्वाक्षरी करण्यासाठी विशेष कार्य अधिकारी डॉ. प्रदीप ठेंगल यांना उपायुक्त, इचलकरंजी महानगरपालिका म्हणून स्वाक्षरी करण्याचे तसेच श्रीमती कलावती मिसाळ, लेखापाल यांना मुख्य लेखापाल, इचलकरंजी महानगरपालिका म्हणून स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदरचे अधिकारात भविष्यात वेळोवेळी बदल करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त हे सक्षम असतील.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी**

**आस्थापना विभाग**

प्रस्ताव-

**विषय :-** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ च्या कामकाजासाठी महानगरपालिका आयुक्तांकडे निहित असलेले अधिकार उपायुक्तांना प्रदान करण्याबाबत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) च्या कलम ३ च्या पोट-कलम (२) आणि (२A) अंतर्गत शासन अधिसूचना, नगर विकास विभाग, क्रमांक : मनपा-२०२२ / प्र.क्र.९६ (१)/ नवि-१८, दि. २९.०६.२०२२ अन्वये महाराष्ट्र शासनाने इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्र मोठे नागरी क्षेत्र म्हणून प्रभावीपणे दि. २९.०६.२०२२ पासून विनिर्दिष्ट केले आहे, आणि इचलकरंजी शहराच्या महानगरपालिकेद्वारे ओळखल्या जाणाऱ्या अशा मोठ्या नागरी क्षेत्रासाठी एक महानगरपालिका असेल, असे नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, मोठे नागरी क्षेत्र म्हणून इचलकरंजी शहर महानगरपालिकेच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि सर्व कार्ये व कर्तव्य पार पाडण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) अधिनियमाच्या कलम ४५२A च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या अनुषंगाने सक्षम करणाऱ्या इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने उक्त कायद्याच्या अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी दि. २९ जून २०२२ पासून माझी नियुक्ती करण्यात आलेली आहे,

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्त यांना प्रदान केलेले किंवा त्यांच्याकडे सोपविलेले किंवा त्यामध्ये निहित असलेले महानगरपालिका अधिनियमाव्यतिरिक्त अन्य अधिनियमातील कार्यकारी अधिकार, कर्तव्य किंवा काम ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६८ नुसार अन्य कोणत्याही अधिकारी यांना प्रदान करता येतात आणि उक्त शासन अधिसूचनेनुसार आयुक्तांसह सर्व महानगरपालिका प्राधिकरणांची अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी मला प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

त्या अर्थी, प्राप्त अधिकाराचा वापर करून मी, सुधाकर विष्णू देशमुख, या आदेशाद्वारे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ च्या कामकाजासाठी महानगरपालिका आयुक्तांकडे किंवा नियोजन प्राधिकरणाकडे निहित असलेले १००० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडापर्यंतचे अधिकार कलम ६८ अन्वये उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांना प्रदान करत आहे. सदरचे अधिकार आयुक्त स्तरावरून पर्यवेक्षण किंवा पुनरिक्षणाच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहेत. अधिनियमाच्या प्रयोजनात त्यांनी या अधिकाराचा वापर केल्यास ते काम आयुक्तांच्या मान्यतेने केलेले आहे असे मानण्यात येईल. गुंठेवारी नियमनाबाबत शासनाच्या सर्व निर्देशांचे पालन करणे व वेळच्यावेळी प्रकरणी निकाली काढण्याची जबाबदारी नगररचना विभाग व उपायुक्त यांची राहील.



CamScanner

**प्रशासकीय ठराव क्र. १२**

दिनांक २०/०७/२०२२

वरीलप्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ च्या कामकाजासाठी महानगरपालिका आयुक्तांकडे किंवा नियोजन प्राधिकरणाकडे निहित असलेले १००० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडापर्यंतचे अधिकार कलम ६८ अन्वये उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांना प्रदान करणेत येत आहेत. सदरचे अधिकार आयुक्त स्तरावरून पर्यवेक्षण किंवा पुनरिक्षणाच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहेत. अधिनियमाच्या प्रयोजनात त्यांनी या अधिकाराचा वापर केल्यास ते काम आयुक्तांच्या मान्यतेने केलेले आहे असे मानण्यात येईल. गुंठेवारी नियमनाबाबत शासनाच्या सर्व निर्देशांचे पालन करणे व वेळच्यावेळी प्रकरणी निकाली काढण्याची जबाबदारी नगररचना विभाग व उपायुक्त यांची राहील अशी मंजूरी देणेत येत आहे.

20/07/2022

( सुधाकर देशमुख )
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय क्र. : महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध सभांच्या नियोजनाबाबत.

**प्रस्ताव**

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) च्या कलम ३ च्या पोट कलम (२) आणि (२A) अंतर्गत शासन अधिसुचना, नगर विकास विभाग, क्रमांकः मनपा-२०२२/प्र.क्र.९६(१)/ नवि-१८ दि. २९/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र शासनाने इचलकरंजी नगरपरिषद क्षेत्र मोठे नागरी क्षेत्र म्हणुन प्रभावीपणे दि. २९/०६/२०२२ पासुन विनिर्दिष्ट केले आहे. आणि इचलकरंजी शहराच्या महानगरपालिकेद्वारे ओळखल्या जाणा-या अशा मोठया नागरी क्षेत्रासाठी एक महानगरपालिका असेल असे नमुद केले आहे.

आणि ज्या अर्थी, मोठे नागरी क्षेत्र इचलकरंजी शहर महानगरपालिकेच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि सर्व कार्ये व कर्तव्य पार पाडण्यासाठी शासकीय अधिका-यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (५९ चा १९४९) अधिनियमाच्या कलम ४५२ A च्या पोट कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या अनुषंगाने सक्षम करणा-या इतर अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने उक्त कायद्याच्या अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी दि. २९ जुन २०२२ पासुन निम्न स्वाक्षरीकार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध प्राधिकरणाच्या कामाकाजाच्या दिनांक किंवा आठवडयातील दिवस व वेळ खालीलप्रमाणे निश्चित करुन देत आहेत.

१. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेसाठीची दिनांक ही त्या महिन्याची २० असेल व वेळ दुपारी ४.०० वाजताची असेल. जर या तारखेस सार्वजनिक सुट्टी येत असेल तर त्या तारखेच्या लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी ही सभा राहील. सभा कामकाज विभागाने अनुसुचित ड मधील नियमांचे तंतोतंत पालन करावे.

२. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका स्थायी समितीची सभा प्रत्येक आठवडयाच्या गुरुवारी असेल व वेळ दुपारी ४.०० वाजताची असेल. जर गुरुवार हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी ही सभा राहील. सभा कामकाज विभागाने अनुसुचित ड मधील नियमांचे तंतोतंत पालन करावे. सभेत पुढे घेण्यासाठी कामकाज नसल्यास त्या आठवडयात बैठक घेतली जाणार नाही.

३. महानगरपालिका आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील धोरणात्मक बाबींच्या निर्णयासाठी प्रत्येक आठवडयाच्या मंगळवारी व मंगळवार हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी विभागनिहाय बैठका घेण्यात येतील.

वर नमुद केलेल्या प्रमाणे जरी नियोजन केले असले तरी नवनिर्मीत महानगरपालिका असल्यामुळे व बहुतांशी बाबीवर लवकरात लवकर निर्णय घेणे अभिप्रेत असल्यामुळे आणि प्रकरण परत्वे वरील तीनही प्राधिकरणांचे निर्णय घेण्यासाठी प्रभारी अधिकारी तथा प्रशासक सक्षम असल्यामुळे प्राप्त अधिकारानुसार वरील तीनही प्राधिकरणांचे निर्णय घेण्यासाठी प्रभारी अधिकारी तथा प्रशासक सक्षम असल्यामुळे प्राप्त अधिकारानुसार वरील नियोजनांचे बंधन न पाळता सदरचे निर्णय वेळच्यावेळी घेतले जातील.

**प्रशासकीय ठराव क्र. १३ /२०२२** **दि.२० /७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध प्राधिकरणाच्या कामाकाजाच्या दिनांक किंवा आठवडयातील दिवस व वेळ खालीलप्रमाणे निश्चित करुन देत आहेत.

१. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेसाठीची दिनांक ही त्या महिन्याची २० असेल व वेळ दुपारी ४.०० वाजताची असेल. जर या तारखेस सार्वजनिक सुट्टी येत असेल तर त्या तारखेच्या लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी ही सभा राहील. सभा कामकाज विभागाने अनुसुचित ड मधील नियमांचे तंतोतंत पालन करावे.

CamScanner

२. महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिका स्थायी समितीची सभा प्रत्येक आठवडयाच्या गुरुवारी असेल व वेळ दुपारी ४.०० वाजताची असेल. जर गुरुवार हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी ही सभा राहील. सभा कामकाज विभागाने अनुसुचित ड मधील नियमांचे तंतोतंत पालन करावे. सभेत पुढे घेण्यासाठी कामकाज नसल्यास त्या आठवडयात बैठक घेतली जाणार नाही.

३. महानगरपालिका आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील धोरणात्मक बाबींच्या निर्णयासाठी प्रत्येक आठवडयाच्या मंगळवारी व मंगळवार हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास लगतपुर्वीच्या कामाच्या दिवशी विभागनिहाय बैठका घेण्यात येतील.

वर नमुद केलेल्या प्रमाणे जरी नियोजन केले असले तरी नवनिर्मीत महानगरपालिका असल्यामुळे व बहुतांशी बाबीवर लवकरात लवकर निर्णय घेणे अभिप्रेत असल्यामुळे आणि प्रकरण परत्वे वरील तीनही प्राधिकरणांचे निर्णय घेण्यासाठी प्रभारी अधिकारी तथा प्रशासक सक्षम असल्यामुळे प्राप्त अधिकारानुसार वरील तीनही प्राधिकरणांचे निर्णय घेण्यासाठी प्रभारी अधिकारी तथा प्रशासक सक्षम असल्यामुळे प्राप्त अधिकारानुसार वरील नियोजनांचे बंधन न पाळता सदरचे निर्णय वेळच्यावेळी घेतले जातील.

20/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

विषय : Building Plan Management System (BPMS) संगणकीय प्रणालीकरीता मनुष्यबळ (SSE) System Support Engineer उपलब्ध करून देणेबाबत.

**प्रस्ताव**

मे.शासनाचे दि.०१/१२/२०२१ रोजीचे पत्रान्वये सर्व महानगरपालिकांमध्ये बांधकाम परवानगी ही ऑफलाईन पध्दतीने न देता ऑनलाईन Building Plan Management System (BPMS) या संगणकीय प्रणालीव्दारे देणेबाबत सुचित केले आहे. सदर अनुषगांने इचलकरंजी नगरपरिषद हद्दीमध्ये सर्व विकास प्रस्तावांवर कार्यवाही ऑनलाईन (BPMS) संगणकीय प्रणालीव्दारे देणेत येत होती. मात्र मे.शासनाचे दि.२९/०६/२०२२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले आहे. तसेच मे.शासनाचे दि.०७/०७/२०२२ रोजीचे पत्रान्वये दि.३०/०६/२०२२ नंतरची कोणताही बांधकाम परवानगी ही ऑफलाईन पध्दतीने देणेत येऊ नये असे कळविणेत आले आहे.

सबब, इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेने ऑनलाईन (BPMS) संगणकीय प्रणालीमध्ये बदल होणार असलेने तसेच दि.३०/०६/२०२२ नंतरची सर्व बांधकाम परवानगी ही ऑनलाईन पध्दतीने देणेकरीता दि.१५/०७/२०२२ पासून पुढील सहा महिन्यांकरीता एक (SSE) System Support Engineer यांची नियुक्ती करणेबाबत नगररचना विभागाची मागणी आहे. सबब, वर नमुद मागणीच्या आधारे (SSE) System Support Engineer यांची नियुक्ती करणेकरीता प्रशासकीय मंजुरी मिळणेस विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र. १४/२०२२** **दि.२०/०७/२०२२**

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेने ऑनलाईन (BPMS) संगणकीय प्रणालीमध्ये बदल होणार असलेने तसेच दि.३०/०६/२०२२ नंतरची सर्व बांधकाम परवानगी ही ऑनलाईन पध्दतीने देणेकरीता दि.१५/०७/२०२२ पासून पुढील सहा महिन्यांकरीता एक (SSE) System Support Engineer यांची नियुक्ती करणेस तसेच येणा-या खर्चासही मंजुरी देणेत येत आहे.

20/7/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिकेकरिता सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्ण वेळ पाहणेकरिता मानधनावर विधी अधिकारी नियुक्त करणेकामी.

**प्रस्ताव**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या न्यायालयीन विभागाचे कामकाज राज्य स्तरीय नगरपरिषद कर्मचारी संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत न्यायालयीन दावा ज्या विभागाच्या संबंधीत आहे ते विभागप्रमुख आणि तत्कालीन नगरपरिषद पॅनेलवरील अधिवक्ता (वकील) यांचे दरम्यान समन्वय करुन पाहणेत येत होते. मात्र न्यायालयीन विभागाचे कामकाज पाहणा-या संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडे कायद्याची पदवी नसलेने किंवा विशेष कायदेशीर ज्ञानाअभावी कामकाजामध्ये अडचणी येत होत्या.

आता इचलकरंजी नगरपरिषदेचे शासनाने दि.२९/०६/२०२२ रोजीच्या अधिसुनेद्वारे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर केले आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५९ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या कामकाजासाठी लागु झालेल्या आहेत.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या न्यायालयीन विभागाच्या कामकाजाची व्याप्ती पाहता न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्णवेळ पाहणेसाठी सन २०२२-२०२३ ते २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता विधी अधिकारी म्हणुन सेवा उपलब्ध करुन घेणेकरीता मान्यताप्राप्त विद्यापिठाची विधी शाखेची पदवी आणि मा. उच्च न्यायालय किंवा त्यांच्या अधिपत्याखालील इतर न्यायालयामध्ये किमान ३ वर्ष अधिवक्ता (वकील) म्हणुन कामाचा अनुभव असलेल्या तसेच संगणकीय कामकाजाची किमान अर्हता धारण करणा-या वकीलांच्या कडुन Walk in Interview करीता अर्ज मागवुन पात्र वकीलांची विधी अधिकारी म्हणुन मानधनावर नियुक्ती करणे आवश्यक आहे.

तथापि वरील प्रमाणे कार्यवाही करणेपुर्वी न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्णवेळ पाहणेसाठी नियुक्त करण्यात यावयाच्या विधी अधिका-याचे दरमहाचे मानधन निश्चित करणे आवश्यक आहे. DAY NULM विभागाचे कामकाज पाहणा-या व्यवस्थापकास न.प. प्रशासन संचालनालयाकडुन दरमहा रु. ६००००/- इतके मानधन निश्चित करणेत आलेले आहे. त्याचप्रमाणे PMAY कक्षाकडील तांत्रिक सहाय्यक यांचे मानधन दरमहा रु. ४५०००/- इतके तसेच स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत कार्यरत समन्वयक यांना दरमहा र.रु.४००००/- इतके मानध निश्चित करणेत आलेले आहे. त्या धर्तीवर न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्णवेळ पाहणेसाठी नियुक्त करण्यात यावयाच्या विधी अधिका-याचे दरमहाचे मानधन निश्चित करणेकामी धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी सदर बाबत न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्णवेळ पाहणेसाठी नियुक्त करण्यात यावयाच्या विधी अधिका-याचे दरमहाचे मानधन मा. प्रशासकीय ठरावाद्वारे निश्चित करुन सदर प्रकरणी Walk In Interview करीता वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस आणि मुलाखतीसाठी दिनांक व वेळ निश्चित होऊन मिळणेस विनंती आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२४/२०२२** **दि.१३/०७/२०२२**

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेकरिता सन २०२२-२०२३ ते सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता न्यायालयीन विभागाचे कामकाज पुर्णवेळ पाहणेसाठी नियुक्त करण्यात यावयाच्या विधी अधिका-याचे दरमहाचे मानधन रु.२५,०००/- इतके निश्चित करणेत येत असून सदर प्रकरणी Walk In Interview करीता वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस मंजुरी देणेत येत आहे.

13/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिकेसाठी अभियोक्ते (वकील) यांचे मा.न्यायलयनिहाय प्रकरणांची फी / शुल्क निश्चित करणे व महानगरपालिकेकडून वकीलांना देय असलेल्या शुल्क / फी ची व प्रलंबित देयके अदा करणेस वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

## प्रस्ताव

मा.उच्च न्यायालय व इतर न्यायालयात इचलकरंजी महानगरपालिकेची अनेक प्रकरणे सुरु आहेत.महानगरपालिकेने सुरुवातीपासून मा.उच्च न्यायालयातील वकिलांचे शुल्क निश्चित केले नसल्याने प्रत्येक वकिल वेगवेगळे शुल्क आकारुन देयके सादर करीत असतात. त्यामध्ये एकसुत्रता आणणेकामी सर्व न्यायालयातील प्रकरणाबाबत वकिलांचे देय असलेले शुल्क /फी निश्चित करणे आवश्यक आहे.

सध्यस्थितीत इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये मा.न्यायालयीन प्रकरणांच्या कामकाजाकरीता मा.दिवाणी न्यायालय,मा.जिल्हा सत्र न्यायालय येथील प्रकरणाकरीता आजमितीस पुर्व नगरपरिषदेच्या पॅनेलवरील इचलकरंजी न्यायालयात १६ , कोल्हापूर न्यायालयात १ ,मुंबई हायकोर्ट ३ व सर्वोच्च न्यायालयात ३ वकील कार्यरत आहेत. सदर वकीलामार्फत इचलकरंजीच्या पुर्व नगरपरिषदेच्या विविध दाव्यामध्ये कामकाज सुरु असून दाव्याचे कामी त्यांनी मागणी केले फी बाबत यापुर्वी तत्कालीन नगरपरिषदेच्या मे.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करुन मे.स्थायी समिती चे मान्यतेने फी अदा करणेत येत होती.

वकीलांचे शुल्क / फी निश्चिती करणेकामी एकसुत्रता आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेने मा.न्यायालय निहाय व प्रकरण निहाय खालील प्रमाणे शुल्क/फी निश्चित केलेले आहे आहेत.

१) मा.दिवाणी न्यायालय / मा.जिल्हास्तरीय न्यायालय

| अ.क्र | न्यायालयीन बाब | टप्प्यानिहाय अदा करावयाचे शुल्क रुपये | प्रकरण निहाय एकूण शुल्क/ फी रुपये (जी.एस.टीसह ) |
|---|---|---|---|
| १ | मनपाविरुध्द दाखल दावा /अपिल/क्रिमिनल केस मध्ये लेखी कथन दाखल झाल्यावर ५० टक्के रक्कम | ३५००/- | ७०००/- |
| | दावा /अपिल /क्रिमिनल केस मध्ये अंतिम निर्णयानंतर सांक्षांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | ३५००/- | |
| २ | मनपाच्या वतीने अपिल दाखल करण्याकरीता | ५०००/- | १०,०००/- |
| | अपिलातील अंतिम निर्णयानंतर सांक्षाकित प्रत प्राप्त झाल्यानंतर (सदर अपिल दाखल करणेकरीता (Processin Fee) भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम मनपाने भराणा करावी) | ५०००/- | |
| ३ | Misscellaneous Application For Condonation of Delay Filed by the Corporation or against the Corporation दाखल झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | ३०००/- | ६०००/- |
| | अंतिम निर्णयानंतर ५० टक्के रक्कम | ३०००/- | |
| ४ | इतर Miscellaneous Application साठी | ३०००/- | ३०००/- |
| ५ | OMP (जन्म मृत्यू दाखल्याचे दावे) करीता अंतिम निर्णयानंतर | ३०००/- | ३०००/- |
| ६ | कॅव्हेट दाखल करणेकरीता | १०००/- | १०००/- |
| ७ | जुन्या न्यायालयीन प्रकरणामध्ये सांक्षाकित प्रती काढणेकरीता | ७००/- | ७००/- |
| ८ | अभिप्राय देणेकरीता | २०००/- | २०००/- |
| ९ | लिगल नोटीस तयार करुन बजावणेकरीता | १५००/- | १५००/- |
| १० | साधी /मायनर नोटीस | १०००/- | १०००/- |
| ११ | अभिप्राय देणेकरीता | २०००/- | २०००/- |
| १२ | करारनामा तयार करुन देणेकरीता (ठेक्याच्या किमंतीनुसार) | रु.५० लाख पर्यतच्या करारनाम्याकरीता रु २०००/- | रु ५० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या करारनाम्याकरीता रु.५०००/- |

CS CamScanner

२) मा.उच्चन्यायालय मुंबई

| अ.क्र | न्यायालयीन बाब | टप्प्यानिहाय अदा करावयाचे शुल्क रुपये | प्रकरण निहाय एकूण शुल्क/ फी रुपये (जी.एस.टीसह) |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिकेविरुध्द याचिका /अपिल/जनहित याचिका मध्ये शपथपत्र दाखल झाल्यानंतर ५० टक्के | २५०००/- | ५००००/- |
| | महानगरपालिकेविरुध्द याचिका /अपिल/जनहित याचिका मध्ये शपथपत्र दाखल निर्णयानंतर ५० टक्के | २५०००/- | |
| २ | मनपामार्फत याचिका/अपील दाखल झाल्यानंतर | २५०००/- | ४५०००/- |
| | अपिलातील अंतिम निर्णयानंतर सांक्षाकित प्रत प्राप्त झाल्यांनतर (सदर अपील दाखल करणेकरीता (Processing Fees) भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम मनपाने भरणा करणे | २००००/- | |
| ३ | मनपामार्फत सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केल्यास अंतिम निर्णयानंतर | २००००/- | २००००/- |
| ४ | मनपा विरुध्द दाखल होणारे सिव्हील ॲप्लिकेशन (Interim Relief) | १०,०००/- | १०,०००/- |
| ५ | Civil Misc,Application (for Services) | ३०००/- | ३०००/- |
| ६ | कॅव्हेट दाखल करणेकरीता | ३०००/- | ३०००/- |
| ७ | लिगल नोटीस तयार करुन बजावण्याकरीता | ३५००/- | ३५००/- |
| ८ | साधी /मायनर नोटीस बजावण्याकरीता | २०००/- | २०००/- |
| ९ | अभिप्राय देणेकरीता | ५०००/- | ५०००/- |
| १० | करारनामा तयार करुन देणेकरीता (ठेक्याच्या किमंतीनुसार) | रु.५० लाख पर्यंतच्या करारनाम्या करीता रु ५०००/- | रु ५० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या करारनाम्या करीता रु ७५००/- |

वरील निश्चित केले दराप्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेसाठी न्यायालयीन दावेचे कामी मा.न्यायालयानिहाय व प्रकरणनिहाय शुल्क /फी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१(१) (ज) नुसार अदा करणेस वित्तीय मान्यता मिळणे प्रशासकीय ठरावान्वये मिळणे आवश्यक आहे.

वरील दर हे उल्हासनगरमहापालिकेसाठी आहेत.इचलकरंजी महानगरपालिकेसाठी सदरचे दर हे यापुर्वी न.प.पॅनेलवरील अभियोक्ता यांना अदा केले आहेत यापेक्षा अधिकचे आढळून येत आहेत.याबाबत मा.उच्च न्यायालयातील अभियोक्ता ॲड.शिंदे यांना अदा केले दाव्या निहाय फीची प्रत प्रकरणी सामिल केली आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे दाखल होणारे प्रकरणी प्राप्त शुल्क / फी चा निर्णय त्यात्यावेळी प्राप्त होणारे मागणी नुसार करणे उचित होईल .

तरी इचलकरंजी महानगरपालिकेसाठी न्यायालय व दावा /याचिका /अपिल निहाय दर निश्चित करुन मिळणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२५/२०२२** **दि. १४/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेसाठी अभियोक्ते (वकील) यांचे मा.न्यायलयनिहाय प्रकरणांची फी / शुल्क निश्चित करणेस खालील प्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

१) मा.दिवाणी न्यायालय,इचलकरंजी / मा.जिल्हास्तरीय न्यायालय,इचलकरंजी

| अ.क्र | न्यायालयीन बाब | टप्प्यानिहाय अदा करावयाचे शुल्क रुपये | प्रकरण निहाय एकूण शुल्क/ फी रुपये (जी.एस.टीसह ) |
|---|---|---|---|
| १ | मनपाविरुध्द दाखल दावा /अपिल/क्रिमिनल केस मध्ये लेखी कथन दाखल झाल्यावर ५० टक्के रक्कम | ३,५००/- | ७,०००/- |
| | दावा /अपिल /क्रिमिनल केस मध्ये अंतिम निर्णयाची सांक्षांकित प्रत सादर केल्यानंतर ५० टक्के रक्कम | ३५००/- | |

CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मनपाच्या वतीने अपिल दाखल करण्याकरीता | ३५००/- | ७,०००/- |
| | अपिलातील अंतिम निर्णयानंतर सांक्षाकित प्रत प्राप्त झाल्यानंतर ( सदर अपिल दाखल करणेकरीता (Processin Fee) भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम मनपाने भराणा करावी) | ३५००/- | |
| ३ | Misscellaneous Application For Condonation of Delay Filed by the Corporation or against the Corporation दाखल झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | ३,०००/- | ६,०००/- |
| | अंतिम निर्णयानंतर ५० टक्के रक्कम | ३,०००/- | |
| ४ | OMP (जन्म मृत्यू दाखल्याचे दावे) करीता अंतिम निर्णयानंतर | १०००/- | १०००/- |
| ५ | कॅव्हेट दाखल करणेकरीता | १०००/- | १०००/- |
| ६ | लिगल नोटीस तयार करुन बजावणेकरीता | १५००/- | १५००/- |
| ७ | जमिनेचे प्रकरणी सर्च रिपोर्ट तयार करुन देणे | २०००/- | २०००/- |
| ८ | धनादेश न वटले प्रकरणी निगोशीएबल इस्ट्रमेंट ॲक्ट १३८ अन्वये दाखल करणेत येणारे दावे | रु ३००० | ३०००/- |
| ९ | करारनामा तयार करुन देणेकरीता (ठेक्याच्या किमंतीनुसार) | रु १०००/- | रु.१०००/- |

२) मा.उच्चन्यायालय मुंबई

| अ.क्र | न्यायालयीन बाब | टप्प्यानिहाय अदा करावयाचे शुल्क रुपये | प्रकरण निहाय एकूण शुल्क/ फी रुपये (जी.एस.टीसह ) |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिकेविरुध्द याचिका /अपिल/जनहित याचिका मध्ये शपथपत्र, लेखी कथन दाखल झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | १५०००/- | ३०,०००/- |
| | महानगरपालिके विरुध्द याचिका /अपिल/जनहित याचिका मध्ये निर्णयाची सांक्षाकित प्रत सादर केलेनंतर ५० टक्के रक्कम | १५०००/- | |
| २ | मनपामार्फत याचिका/अपील दाखल झाल्यानंतर | १५,०००/- | ३०,०००/- |
| | अपिलातील अंतिम निर्णयानंतर सांक्षाकित प्रत प्राप्त झाल्यांनतर (सदर अपील दाखल करणेकरीता (Processing Fees) भरावी लागणारी कोर्ट फी ची रक्कम मनपाने भरणा करणे | १५,०००/- | |
| ३ | मनपामार्फत सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केल्यास अंतिम निर्णयानंतर | १०,०००/- | २०,०००/- |
| ४ | मनपा विरुध्द दाखल होणारे सिव्हील ॲप्लिकेशन (Interim Relief) | १०,०००/- | |
| ५ | Civil Mise,Application (for Services) | ३,०००/- | ३०००/- |
| ६ | कॅव्हेट दाखल करणेकरीता | ३,०००/- | ३०००/- |
| ७ | लिगल नोटीस तयार करुन बजावण्याकरीता | १,०००/- | १०००/- |
| ८ | करारनामा तयार करुन देणेकरीता (ठेक्याच्या किमंतीनुसार) | रु.५० लाख पर्यतच्या करारनाम्याकरीता रु २०००/- | रु ५० लाख पेक्षा जास्त रक्कमेच्या करारनाम्या करीता रु २०००/- |
| ९ | दि. एम्प्लॉय प्राव्हीडंड फंड अपिलेट ट्र्युबनल मुंबई येथील दावे मध्ये शपथपत्र, लेखी कथन दाखल झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | २००००/- | ४०,०००/- |
| | दि. एम्प्लॉय प्राव्हीडंड फंड अपिलेट ट्र्युबनल मुंबई येथील दावे मध्ये निर्णयानंतर सांक्षाकित प्रत सादर केलेनंतर ५० टक्केरक्कम | २००००/- | |
| १० | मा.निबंधक,झोपडपटटी न्यायधीकरण,मुंबई येथील दावे मध्ये शपथपत्र, लेखी कथन दाखल झाल्यानंतर ५० टक्के रक्कम | २००००/- | ४०,०००/- |
| | मा.निबंधक ,झोपडपटटी न्यायधीकरण,मुंबई येथील दावे मध्ये निर्णयानंतर सांक्षाकित प्रत सादर केलेनंतर ५० टक्केरक्कम | २००००/- | |

- मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे दाखल होणारे प्रकरणी प्राप्त शुल्क / फी चा निर्णय त्यात्यावेळी प्राप्त होणारे मागणी नुसार करणे
- वर नमुद केले दाव्याचे कामी देणेत येणारे शुल्क/फी यामध्ये प्रवासखर्च,न्यायालयीन खर्च याचाही समावेश असेल.

CamScanner

- अ.क्र.९ व १० ही न्यायालये मुंबई उच्च न्यायालयापासून दूरच्या अंतरावर असलेने त्यांची फि ही उच्च न्यायालयातील अन्य दाव्याचेपेक्षा अधिक अदा करावी लागेल.
- इचलकरंजी महानगरपालिकेकडून यापुर्वी अभिप्रायासाठी शुल्क/फी आकारणी केली जात नाही त्यामुळे अभिप्राय हा मोफत घेणे उचित होईल.
- स्थानिक न्यायालयामध्ये धनादेश न वटले प्रकरणी निगोशीएबल इस्ट्रमेंट ॲक्ट १३८ अन्वये दाखल करणेत येणारे दाव्यामध्ये उक्त नमुद केलेनुसारची फि तसेच दाव्याचे कामी धनादेशाच्या रक्कमेवर होणारी २ टक्के प्रमाणेची स्टॅम्प ड्युटी ही अभियोक्ता यांनी भरणेची आहे. (सदर रक्कम दाव्याचे निकालानंतर मिळकत धारक यांचे कडून वसुल केली जाते)

याकामी वरील निश्चित केले दराप्रमाणे अर्ज मागविणेस मंजुरी देणेत येत आहे. महानगरपालिकेकडून वकीलांना देय असलेली किंवा सद्या मा.न्यायालयात सुरु असलेले दावे ज्यांची देयके अद्याप अप्राप्त आहेत अशी प्राप्त झालेली किंवा प्राप्त होणारी देयके वरील प्रमाणे निश्चित होणा-या दरा इतकी किंवा त्यापेक्षा कमीची असतील तर ती अदा करणेस व जी देयके वरील दरापेक्षा जादाची असतील तर ती वरील दराप्रमाणे निश्चित होणारे रक्कमे इतकी अदा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

14/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव : मे. कौन्सिल सभा क्र. ५ कौ.ठ.न. १८५ दि. २९/१२/२०२१ ने सौ. रुक्मिणी नानासो पारडे रा. जयभिमनगर झोपडपट्टी यांनी पिठाची गिरणीचे पुनर्वसन करुन दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबतच्या झालेल्या ठरावास स्थगिती मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

सौ. रुक्मिणी नानासो पारडे रा. जयभिमनगर झोपडपट्टी यांनी पिठाची गिरणीचे पुनवर्सन करुन दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत इकडे समजुतीच्या नकाशा जोडुन विनंती अर्ज दिला होता. सदर अर्जावर प्रभारी अध्यक्ष, इचलकरंजी नगरपरिषद यांनी धोरणात्मक निर्णयासाठी मे.कौन्सिलकडे प्रस्ताव सादर करणेत यावा असा आदेश दिला होता. सदर अर्जावर इकडुन नगररचनाकार इचलकरंजी नगरपरिषद यांचेकडुन अभिप्राय घेवुन मे. कौन्सिलकडे सविस्तार प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तावात जयभिमनगर झोपडपट्टीचे वॅम्बे योजनेतुन नविन घरकुले बांधुन वाटप करणेत आले आहे. सौ. पारडे यांनी जोडलेल्या नकाशानुसार नगररचना विभागाकडुन सल्ला घेतला असता नकाशामध्ये मागणी करणेत आलेली जागा बांधकामाच्या समास अंतरात येत असलेने त्या ठिकाणी पिठाच्या गिरणीकरीता परवानगी देता योर नाही असे नमुद केले होते.

सदर प्रस्तावावर मे. कौन्सिलने सौ. पारडे रा. जयभिमनगर झोपडपट्टी यांना पिठाच्या गिरणीचे पुनवर्सन करुन दुरुस्ती करणेस तसेच सदर ठिकाणी म.रा.वि.मं. कंपनीकडुन लाईट कनेक्शन घेणेसही परवानगी देणेत येत आहे असा ठराव करणेत आलेला आहे.

नगररचना विभाग इचलकरंजी नगरपरिषद यांचा अभिप्राय व अधिनियमातील तरतुदीचा विचार करता झालेल्या ठरावानुसार कार्यवाही करता येणार नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये दि. १८/०१/२०२२ रोजी इकडुन मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांचेकडे सदर ठरावास उक्त कलमान्वये स्थगिती देणेबाबत प्रस्ताव पाठविणेत आला होता. याबाबतची मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांनी दि. ०१/०७/२०२२ रोजी सुनावणी वेळी महाराष्ट्र शासनाच्या दि. २९/०६/२०२२ रोजीच्या घोषणेने नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतरझालेने सदर प्रकरणी आपल्या स्तरावर निर्णय घेणेबाबत सुचना केल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७- (३) मध्ये जेव्हा जेव्हा अधिनियमात स्पष्ट तसा निदेश देण्यात आला असेल तेव्हा तेव्हा महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या मान्यतेस किंवा मंजुरीस अधिन राहुन तसेच या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये घातलेले अन्य सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यास अधिन राहुन या अधिनियमाचा तरतुदींचा व त्या वेळी अंमलात असलेल्या ज्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये महापालिकेकडे कोणतेही कर्तव्य सोपवले असेल किंवा कोणताही अधिकार प्रधान केला असेल त्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेला संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्ताकडे निहीत असेल असे नमुद असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.०२६/२०२२** **दि.१४/०७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन उपरोक्त मे. कौन्सिल सभा क्र. ५ कौ.ठ.न. १८५ दि. २९/१२/२०२१ अन्वये झालेला ठराव हा ३ महिन्यांपेक्षा आधीचा असुन सदरचा ठराव हा म.न.पा. हिताविरुध्द असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७- (३) नुसार व महानगरपालिका सभेच्या ३ महीने आधिचा ठराव आहे. सदरचा ठराव महानगरपालिकेच्या हिताविरोधी आहे. त्यामुळे महानगरपालिकेस असलेले अधिकार प्रभारी अधिका-यास असल्याने त्याचा वापर करुन उक्त ठराव रद्द करणेत येत आहे.

14/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव : अरुण विद्या प्रसारक मंडळ यांना बालवाडी चालविणेसाठी मे. कौन्सिल सभा क्र. ५ ठ.न. १६९ दि. २९/१२/२०२१ चे मुदतवाढ मंजुरी अंमलबजावणीस स्थगिती मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

सौ. हिमाणी श्रेयस पाटील यांना नेताजी सुभाष चंद्र बोस तांबे माळ शाळा क. २३ मधील उत्तर पुर्व तळ मजल्यावर असलेल्या ४ वर्गखोल्यांची अधिनियमातील तरतुदीनुसार भाडेपट्टा मुदतवाढ मागणी केली होती. सदर अर्जावर इकडुन अधिनियमाती तरतुदीनुसार प्रथम ३ वर्ष व नंतर ६ वर्षे पर्यंत अशी एकुण ९ वर्षापर्यंत मुदतवाढ देता येते. भाडेमध्ये कमीत कमी २५% वाढ करणेबाबत प्रस्ताव मे. कौन्सिलकडे सादर केला होता. त्याप्रमाणे मे. कौन्सिल ठराव नं. १६९ दि. २९/१२/२०२१ ने निर्णय झालेला आहे.

मात्र मा. सदस्य यांचे सुचनेनुसार मे. कौन्सिल ठराव नं. १६९ दि. २९/१२/२०२१ मध्ये वॉ.नं. ५ पंत मळा येथील अरुण विद्या प्रसार मंडळ इचलकरंजी यांना बालवाडी चालविणेकामी मुदतवाढ देणेसही मंजुरी देणेत येत आहे असा ठराव करणेत आला.

अरुण विद्या प्रसारक मंडळ यांनी दि. ०५/०२/१९९७ चे अर्जाने वॉर्ड नं. ४ घर नं. ११८ स्वामीच्या घराजवळील बालवाडी इमारत ३ वर्ष मदतीसाठी भाडेपट्टयाने मागणी कली. सदर मागणीवरील प्रसताव मा. तत्कालीन अध्यक्षांनी रिपोर्टप्रमाणे अर्जदार यांना ३ वर्ष मुदतीने किंवा नगरपरिषदेस लागेल त्यावेळी खाली करुन देणेच्या अटीवर तसेच टी.पी. ठरवेल त्याप्रमाणे भाडे घेणेत यावे कार्योतर मे. कौन्सिलची मंजुरी घ्यावी असा आदेश दिला आहे. सदर आदेशानुसार संस्थेला भाडेपट्टा करुन बालवाडी ताब्यात घेणेबाबत इकडुन दि. १२/०९/१९९७ ने कळविले आहे. सदर पत्रात न.प. नगररचनाकार यांनी मासिक रु. २७०० + न.प. कर ३ वर्ष मुदतीकरीता किंवा नगरपरिषदेस हवी असेल त्यावेळी परत करणे या प्रमुख अटी आहेत.

अरुण विद्या प्रसारक मंडळ इचलकरंजी संस्थेने मुदतवाढ मागणी केली. त्यावरील प्रस्तावावर मे. कौन्सिल ठराव नं. १८६ दि. ०५/१२/२००९ ने मा. संचालक न.प. प्रशासन मुंबई यांची पुर्व मंजुरी घेवुन सार्वजनिक बांधकाम विभाग कोल्हापुर ठरवतील त्या भाडे व अधिमुल्यावर तसेच अन्य न.प.च्या अटी शर्तीप्रमाणे ९ वर्ष मुदतीसाठी देणेत सर्वानुमते मंजुरी देणेत येत आहे असा ठराव झाला आहे. मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी मुंबई यांनी या प्रकरणात लीजधारक व नगरपरिषदेने स्थायी निर्देश २४ दि. २८/१०/२००४ व मननप व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९२ अन्वये विहीत कार्यवाही केली नसल्यामुळे लीजधारकांच्या अनाधिकृत वास्तवाबाबत नियमानुसार शासन मान्यता मिळेपर्यंत किंवा जागा खाली करुन देणे यापैकी जे प्रथम घडेल त्याप्रमाणे त्रिसदस्य समितीचे ठरविलेले भाडे दुप्पट दराने आकारणी करणेची कार्यवाही करणेत यावी. याप्रकरणे अरुण विद्या प्रसारक मंडळ इचलकरंजी यांचे जागेबाबतची वस्तुस्थिती आहे. या विभागाकडुन मुदतवाढ देणे अथवा न देणे असा कोणताही प्रस्ताव सादर केलेला नसताना उक्तप्रमाणे ठराव झालेला आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये दि. १८/०१/२०२२ रोजी इकडुन मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापुर यांचेकडे सदर ठरावास उक्त कलमान्वये स्थगिती देणेबाबत प्रस्ताव पाठविणेत आला होता. याबाबतची मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांनी दि. ०१/०७/२०२२ रोजी सुनावणी वेळी महाराष्ट्र शासनाच्या दि. २९/०६/२०२२ रोजीच्या घोषणेने नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेने सदर प्रकरणी आपल्या स्तरावर निर्णय घेणेबाबत सुचना केल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७- (३) मध्ये जेव्हा जेव्हा अधिनियमात स्पष्ट तसा निदेश देण्यात आला असेल तेव्हा तेव्हा महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या मान्यतेस किंवा मंजुरीस अधिन राहुन तसेच या अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये घातलेले अन्य सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यास अधिन राहुन या अधिनियमाचा तरतुदींचा व त्या वेळी अंमलात असलेल्या ज्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये महापालिकेकडे कोणतेही कर्तव्य सोपवले असेल किंवा कोणताही अधिकार प्रधान केला असेल त्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेला संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्ताकडे निहीत असेल बाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

( पुढील पानावर . . . . .)

CamScanner

**प्रशासकीय ठराव क्र.२७/२०२२** दि.१४/०७/२०२२

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन उपरोक्त कौन्सिल सभा क्र. ५ ठ.न. १६९ दि. २९/१२/२०२१ ने मंजुर झालेल्या ठरावामध्ये मा. सदस्य यांचे सुचनेनुसार समाविष्ठ केलेल्या अरुण विद्या प्रसारक मंडळ यांना बालवाडी चालविणेसाठी मुदतवाढ देणेकामीच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७- (३) नुसार व महानगरपालिका सभेचे प्रभारी अधिकारी यांना प्राप्त अधिकाराचा वापर करुन ठरावातील वाढीव मजकुर रद्द करणेत येत आहे.

14/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत पायाभुत सुविधा उभारणेकामी सल्लागार कंपनीची सेवा घेणेकरीता महानगरपालिकेचे Empanelment करणे.

**प्रस्ताव**

सध्या शहरात अनेक मोठे प्रकल्प पुर्ण झाले आहेत. व काही पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. एकंदरीत शहराची वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात अनेक नाविन्यपुर्ण व वैशिष्ठपुर्ण प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. तथापि स्थापत्य विषयक व पाणी पुरवठयाचे व इतर मोठया प्रकल्पांचे नियोजन / आखणी करताना त्या त्या क्षेत्रातील अनुभवी तांत्रिक ज्ञान यंत्रसामुग्रीची उपलब्धतता असलेचे प्रकल्पांचे अचुक नियोजन होवुन प्रकल्प गुणवत्तापुर्वक पुर्ण होणे गरजेचे आहे.

यासाठी विविध विभागातील मोठया प्रकल्पांचे अंदाजपत्रक तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे (DPR), तांत्रिक मंजुरी आणणे, शासन स्तरावरील प्रशासकीय मंजुरी आणणे, निविदा तयार करणे, कामावर प्रत्यक्ष देखरेख करणे ही कामे करणेसाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्तींची / कंपनीची / फर्मची सल्लागार म्हणुन सेवा घेणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेचे Empanelment करणे आवश्यक आहे.

त्यासाठी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत पायाभुत सुविधा उभारणेकामी सल्लागार कंपनीची सेवा घेणेकरीता महानगरपालिकेचे Empanelment करणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२८/२०२२** **दि.२९/७/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत पायाभुत सुविधा उभारणेकामी सल्लागार कंपनीची सेवा घेणेकरीता महानगरपालिकेचे Empanelment करणेस मंजुरी देणेत येत आहे.

29/07/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिकेच्या मिळकती जागा वाटप बाबत नियामावली तयार करण्याबाबत प्रस्ताव.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७९ मध्ये महानगरपालिकांच्या मिळकती / जागा यांचे भाडे पट्टयाने देणे किंवा वाटप करण्याबाबतच्या तरतुदी आहेत. इचलकरंजी महानगरपालिका स्थापनेपुर्वी इचलकरंजी नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार विविध बांधकाम असलेल्या जागा / खोल्या / इमारती या व्यक्ती अथवा संस्था यांना अल्प मुदतीच्या / दिर्घ मुदतीच्या कराराने तेच अनामत रक्कम स्विकारुन कराराने दिल्या जात होत्या. मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक / १०२ /२००१ अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या मिळकत वाटपाची नियमावली तयार करुन त्यास शासन मान्यता घेतली असून सदरच्या नियमावलीचा वापर सध्या पुणे महानगरपालिका करत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७९ मध्ये महानगरपालिकांच्या मिळकती / जागा यांचे भाडेपट्टयाने देणे किंवा वाटप करण्याबाबतच्या तरतुदीनुसार यापुढे कार्यवाही करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरणसाठी नियमावलीचे प्रारुप तयार करुन सोबत सादर केले आहे. सदरच्या नियमावलीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता प्राप्त झाल्यास हि नियमावली शासनाच्या मान्यतेसाठी सादर करता येईल. असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२१ /२०२२** **दि. ०४/०८/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७९ अन्व्ये महानगरपालिकांच्या मिळकती / जागा भाडेपट्टयाने देणे किंवा वाटप करण्याबाबतच्या तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरणसाठीच्या नियमावलीस अधिनियम कलम ४५५ व ४५७ (१७) अन्वये मान्याता देणेत येत असुन सदर नियमावली शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेत यावी.

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्ताव: मालमत्ता संयुक्त करात सुट देणेकामी मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतधारकांना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके कर विभागाकडून नजिकच्या कालावधीत लागू करणेत येणार आहेत.

तत्कालीन नगरपरिषद अधिनियमातील कलम १९६५ चा कलम १२७ ( अ ) नुसार रक्कम जर देयक (बिल) दिल्यापासून १५ दिवसाच्या आत भरणेत आलेस संयक्त कराच्या १% इतकी सुट ज्या त्या आर्थिक वर्षातील चालू मागणी मध्ये देणेत येत होती.

सदर देयकाची रक्कम जर देयक (बिल) दिल्यापासून १५ दिवसाच्या आत भरणेत आले तर म.न.पा.अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कराधान कलम १४० (अ) अन्वये मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे अनर्धारित करीत अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्याच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील अशी तरतुद आहे.

यास अनुसरुन मा.प्रभारी अधिकारी तथा प्रशासकसो यांनी दि.५/८/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे संयुक्त करात चालू मागणीमध्ये सुट देणेत आलेली आहे.

१) दि.१/८/२०२२ ते दि.३१/८/२०२२ अखेर - ३% (तीन)
२) दि.१/९/२०२२ ते दि.१५/९/२०२२ अखेर - २% (दोन)
३) दि.१६/९/२०२२ ते दि.३०/९/२०२२ अखेर - १% (एक)

सध्या ACENT Information Technology Pvt.Ltd यांचे अंतर्गत An ERP Solution for ULB ही संगणक प्रणाली महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेची कार्यवाही सध्या सुरु असलेने वरीलप्रमाणे माननीयांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी सध्यस्थितीत करणे अडचणीचे आहे. यास्तव सदर संगणक प्रणालीवर कर विभागाकडील संगणकीय कामकाज प्रत्यक्ष सुरु झाले दिनांकापासून माननीयांनी वरील नमुद केलेप्रमाणे खालील नमुद केलेनुसार चालू मागणीमध्ये संयुक्त करात सुट देता येईल.

१) कर विभागाकडील संगणकीय कामकाज प्रत्यक्ष (Live) सुरु झाले दिनांकापासुन पुढील एक महिण्याकरिता - ३% (तीन)
२) तदनंतरचे पुढील १५ दिवसाकरीता - २% (दोन)
३) व त्यानंतरचे पुढील १५ दिवसाकरीता - १% (एक)

सदर मुदतीनंतर भरणारे मिळकतधारकांना सवलत न देता पुर्ण मालमत्ता कर भरुन घेणे सोईचे होईल.

याकामी महानगरपालिकेच्या महासभेची ठरावाव्दारे मान्यता मिळालेनंतर अंमलबजावणी करता येईल. याकरीता जरी मिळकत धारकांना कराची देयके लागू होणेस कालावधी लागणार असला तरी मिळकतधारकांच्या माहीतीकरीता मोठयाप्रमाणात दैनिक वृत्तपत्रातून जाहिर आवाहन / प्रसिध्दी, विविध प्रसार माध्यमाचे मार्फत प्रसिध्दी देवुन सदर सवलतीचा लाभ देता येईल.

**प्रशासकीय ठराव क्र. ३० /२०२२** **दि. ०४/०८/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन मा.प्रभारी अधिकारी तथा प्रशासकसो यांनी दि.५/८/२०२२ अन्वये संयुक्त करात चालू मागणीमध्ये सुट देणेस मंजुरी दिली असुन सध्या ACENT Information Technology Pvt.Ltd यांचे अंतर्गत An ERP Solution for ULB ही संगणक प्रणाली महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेची कार्यवाही सुरु असलेने सदर संगणक प्रणालीवर कर विभागाकडील संगणकीय कामकाज सद्यस्थितीत सुरु नसलेने त्यामुळे संगणकीय कामकाज प्रत्यक्ष सुरु झाले दिनांकापासून प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तारखा सुधारीत करुन चालू मागणीमध्ये संयुक्त

CS CamScanner

करात सुट देणेस मंजुरी देणेत येत आहे. तसेच मिळकतधारकांच्या माहितीकरीता विविध प्रसार माध्यामाचे मार्फत प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

04/08/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: दिनांक १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना राष्ट्रीय पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.अनियो-२००५ /१२६/ सेवा -५ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५

२) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील फेर लिलाव करणेस शासन निर्णय क्र.अंनियो /१००७/१८/ सेवा -४ दिनांक ७ जुलै २००७

३) महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.अंनियो /२०१२/प्र.क्र.९६/सेवा -४ दिनांक २७ ऑगष्ट २०१४

४) महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०२१/प्र.क्र.११९/नवि-२० दिनांक २२ फेब्रुवारी २०२२.

शासन सेवत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी (१) सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना ( म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशीकरण ) नियम १९८४) तसेच सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू न करता त्याऐवजी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS ) लागू करण्याचा निर्णय उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये शासनाने घेतला आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयाव्दारे निश्चित करुन देण्यात आली होती.

तद्नंतर शासनाने उक्त सदंर्भ क्र.३ वरील शासन निर्णयान्वये दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यासाठी केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) सामील होण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे वरील नमुद परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेस राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) असे संबोधण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार संचालक,लेखा व कोषागरे यांची राज्ये समन्वय अधिकारी आणि राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची राज्य समन्वय कार्यालय म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.४ वरील शासन निर्णयातील निर्देशानुसार दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना खालील अटी शर्तीस अधिन राहून राष्ट्रीय निवृत्ती योजना (NPS) लागू करण्यात आलेली आहे.

१) महानगरपालिकेमध्ये कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना NPS Trust यांचे समवेत करारनामा करणे आवश्यक राहील.

२) निवृत्ती वेतन विधी विनियामक व विकास प्राधिकरण आणि केंद्रिय देखभाल अभिकरण (CRA)-NSDL यांनी विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार कर्मचा-यांची राष्ट्रीय निवृत्ती वेतन नोंदणी करावी तद्नंतर महानगरपालिकांमध्ये दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना NPS मध्ये खाते उघडता येईल.

३) महानगरपालिकांमध्ये दिनांक ०१/११/२००५ किंवा त्यानंतर वरीलप्रमाणे नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांचे वेतनातून त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास ) अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या १०% दराने कर्मचारी अंशदान कपात करावे आणि नियोक्त्याचे अंशदान १०% इतके देण्यात यावे. शासन निर्णय दिनांक १९/०८/२०१९ नुसार दिनांक ०१/०४/२०१७ पासून नियोक्त्याचे अंशदान १४% दराने भरण्यात यावे. सदर अंशदान CRA आणि ट्रस्टी बँक यांना पाठवावे.

४) ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनातून १०% पेक्षा कमी किंवा जादा कपात केली असून तसेच नियोक्त्याचे अंशदान विहीत दराने दिले नसेल अशा प्रकरणी दिनांक ०६/०४/२०१५ चे शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४९ नुसार कार्यवाही करावी.

५) ज्यांचे वेतनातून अंशदान कपात केलेली नाही त्यांच्या बाबतीत मागील अंशदानाची वसुली वित्त विभागाचे दिनांक ०७/०७/२००७ मधील परिच्छेद १६ नुसार कार्यवाही करावी.

CS CamScanner

६) दिनांक ०६/०४/२००४ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार कपात केलेली रक्कम पूर्वीपासून शासकीय लेख्यात जमा केल्या असतील अथवा इतर बँकात ठेवी ठेवल्या असतील तर सदरचे अंशदान थेट NPS मध्ये वर्ग करण्याबाबत कार्यवाही करावी.

७) महानगरपालिकामध्ये कार्यरत महानगरपालिका आयुक्त,अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे DTA ची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. DTO म्हणून महानगरपालिका मुख्य लेखा व वित्त अधिकारी अथवा त्यांच्या समकक्ष अधिकारी काम पाहतील. DDO म्हणून संबंधित विभागप्रमुख / प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी काम पहातील.

८) केंद्रीय देखभाल अभिकरणास परिरक्षण शुल्क अदा करणे, एकूण योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणी व संनियंत्रण करणे, जमा रक्कमांचा ताळमेळ घालून कर्मचारीनिहाय अंशदान रक्कमेचा मेळ घालणे / कपात अंशदानाची माहिती केंद्रीय देखभाल अभिकरण व विश्वस्त बँकेकडे पाठविणे आणि तक्रराचे निराकरण करणे याची जबाबदारी DTO यांची राहील.

त्याच प्रमाणे इतर काही अटी आहे.

आता, इचलकरंजी महानगरपालिकेकडे कार्यरत असलेल्या दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांची यादी यासोबत जोडली असून सदर अधिकारी / कर्मचारी यांना संदर्भ क्र.४ वरील नगरविकास विभागाचे दिनांक २२/०२/२०२२ चे शासन निर्णयानुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत (NPS) सामील करणेकरिता सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार व त्यातील अटी / शर्तिस अधीन राहून कार्यवाही करणेस मा.प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र. ३३/२०२२** — **दि.२६/०८/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन दिनांक १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त झालेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत (NPS) सामील करणेकरिता महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०२१/प्र.क्र.११९/नवि-२० दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये शासन निर्णयातील निर्देश तसेच अटी/ शर्तीस अधीन राहुन कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

26/08/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्तावः महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ, मुंबई यांचेकडून शस्त्रधारी निमशस्त्रधारी तसेच सहा. सुरक्षा अधिकारी यांची सेवा घेणेबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिका करीता शस्त्रधारी व निमशस्त्रधारी सुरक्षा रक्षक व सुरक्षा अधिकारी आवश्यक आहेत. याकामी इकडुन दि. ०५/०७/२०२२ रोजी सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन प्रशासकीय ठराव क्र. २/२०२२ दि. ०५/०७/२०२२ ने मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडुन व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ मुंबई यांना दि. ०५/०७/२०२२ चे पत्राने कळविले. इकडुन कळविलेनुसार संचालक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ यांनी दि. २२/०७/२०२२ चे पत्राने प्रस्तुत कामी आवश्यक तो निधी उपलब्ध करणेबाबत व कराराचा नमुना सादर केला आहे.

त्याप्रमाणे इकडुन येणा-या प्रस्तुतच्या खर्चास आवश्यक तो निधी उपलब्ध करणेबाबत दि. २६/०७/२०२२ रोजी प्रस्ताव सादर केला. त्यास दि. २७/०७/२०२२ रोजी मान्यता मिळाली व त्याचवेळी करार करणेसाठी विभागप्रमुख श्री. सचिन पाटील यांना प्राधिकृत करणेत येत आहेत असे आदेश पारीत केले.

वरील आदेशाप्रमाणे इकडुन दि. २८/०७/२०२२ रोजी ३ वर्ष मुदतीकरीता दि. ०८/०८/२०२२ ते ०७/०८/२०२५ अखेर या कालावधीकरीता करार केलेला आहे. याप्रमाणे प्रस्तुत कामी इकडून कार्यवाही केलेली असुन अवलोकनी येणेस विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र.३४/२०२२** दि.२६/०८/२०२२

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन महाराष्ट्र सुरक्षा रक्षक मंडळ, मुंबई यांचेकडून शस्त्रधारी निमशस्त्रधारी तसेच सहा. सुरक्षा अधिकारी यांची सेवा घेणेस दि. ०८/०८/२०२२ ते ०७/०८/२०२५ अखेर ३ वर्ष या कालावधी करिता दि. २८/०७/२०२२ रोजी केले करारास मंजूरी देणेत येत आहे.

(signature) 26/08/2022
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगण गट नं. ८५ पै. १३८, रि.स.न. १८५६३ पै. १८५७४ पै. ते १८५७६, १८५७९ पै. संपुर्ण आरक्षणाचे क्षेत्र - २ हेक्टर ७० आर चे संपादन होणेकरीता प्रशासनकीय ठराव होणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - श्री. शंकर तातोबा चंदुरे व इतर ५ यांची दि. १७/०८/२०२२ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची खरेदी सुचना.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस/ २११/ १३५२/ प्र.क्र. १९/ १२/ डि.पी. सॅन्क्शन/ युडी -१३ दि. २४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि. १०/०७/२०१२ रोजीपासुन अंमलात आहे. उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगण या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापूर गट नं. १३८ पै. मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगण हे गट नं. ८५ पै. ८६ पै. १३८, रि.स.न. १८५६३ पै. १८५७४ पै. ते १८५७६, १८५७९ पै. मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र हे २ हेक्टर ७० आर इतके आहे. खरेदीसुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे गट नं. १३८ मधील एकुण १ हेक्टर ८७ आर इतके क्षेत्र बाधित होते.

सबब, आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगण चे संपुर्ण क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३५ /२०२२** **दि. ०२/०९/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगणसाठी गट नं. ८५ पै. १३८, रि.स.न. १८५६३ पै. १८५७४ पै. ते १८५७६, १८५७९ पै. संपुर्ण आरक्षणाचे क्षेत्र २ हेक्टर ७० आर चे संपुर्ण क्षेत्रास भुसंपादन करणेस व त्यास येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

०२/०९/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: बाहययत्रणेद्वारे मनुष्यबळ/कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्ध करुन घेणे.

**प्रस्ताव**

शासन अधिसुचना दि. २९ जुन २०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे, इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५९, महानगरपालिकेसाठी लागू झालेला आहे. तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेचा मंजुर सुधारीत आकृतीबंध त्यानुसार कार्यरत कर्मचारी यांचे समावेशन करुन महानगरपालिकेचा नवीन पदांचा आकृतीबंध करण्याची कार्यवाही अलहिदा सुरु आहे. त्याच प्रमाणे महानगरपालिकेचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी आणि अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी विभागाची पुर्नरचना करण्यात येवुन विभागप्रमुख व त्यांचे नियंत्रण अधिकारी यांच्या जबाबदा-या निश्चित करण्याबाबतची कार्यवाही अलाहिदा प्रस्तावित सुरु आहे.

महानगरपालिकेकरीता नविन पदांचा आकृतीबंध तयार करुन महासभेच्या मान्यतेने शासनास सादर करणे, आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळणे व त्यानुसार पदभरती या प्रक्रियेस दिनावधी लागणार आहे. तोपर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना,महानगरपालिकेमार्फत पुरविल्या जाणा-या सेवासुविधा पुरविण्यासाठी व याअंतर्गत महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. या अनुषंगाने महानगरपालिकेच्या विविध विभागाकडे आवश्यक मनुष्यबळाचा तपशिल संबंधित विभागप्रमुखांचे कडुन प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे. तसेच याप्रमाणे आवश्यक मनुष्यबळ बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन घेणे जरुरीचे असल्याने अशा मनुष्यबळांसाठी किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार द्यावयाचे वेतनाच्या आधारे प्रतिमहा खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. याकामी कामगार उपायुक्त (प्रा.वि.) मुंबई व सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचेकडील दि. ०१/०२/२०२२ चे परिपत्रकान्वये निश्चित केलेले दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३०/०६/२०२२ या कालावधीकरीताचे विशेष भत्याचे दर आणि शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि. २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसुचनेद्वारे पुनःनिर्धारीत केलेल्या किमान वेतनाचे दर यांचा आधार घेण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे शासन निर्णय क्र. पदनि-२५१२/का-१२ दि. ३ सप्टेंबर २०१४ मधील तरतुदींचा विचार करण्यात आलेला आहे.

महानरपालिकेच्या विविध विभाग प्रमुखांचे कडुन त्यांना आवश्यक असणारे मनुष्यबळ आणि उपरोक्त नमुद केलेले विशेष भत्यासंबंधीचे दि. ०१/०१/२०२२ चे परिपत्रक तसेच शासन अधिसुचना दि. २४/०२/२०१५ अन्वये पुनःनिर्धारीत करण्यात आलेले दर यांचे आधारे प्रतिमहा अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक यासोबत सादर केले आहे. कृपया अवलोकनी यावे.

वरीलप्रमाणे सोबतच्या अंदाजपत्रकानुसार प्रतिमहा र.रु. ७७,१२,८५०/- इतका खर्च येणार असुन वार्षिक खर्च र.रु. ९,२५,५४,२००/- इतका येणार आहे.

महानगरपालिकेकरीता एक वर्षासाठी (वार्षिक) बाहय यंत्रणेद्वारा कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ / सेवा पुरविणेकरीता ई-निविदा मागविणेच्या झाल्यास वार्षिक अंदाजित खर्च र.रु. ९,२५,५४,२००/- यावर परसेंटेज दराने प्रशासकीय शुल्क याप्रमाणे ई-निविदा मागवाव्या लागतील. मात्र तत्पुर्वी याकामी वार्षिक अर्थ संकलमध्ये, अर्थसंकल्पीय तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी विभागनिहाय मनुष्यबळाची मागणी, किमान वेतन दरानुसार अपेक्षित वार्षिक खर्च या बाबी लेखापरिक्षण विभागाकडून तसासुन त्याचे अभिप्रायासह लेखा विभागाकडून अर्थसंक ल्पीय तरतुदीकामी कार्यवाही झाल्यानंतर ई-निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत कार्यालयाने सादर केले प्रस्तावावर लेखा विभागाकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १०१ नुसार सन २०२२-२०२३ चे मंजुर अंदाजपत्रकात वाढ करणे आवश्यक असलेबाबत अभिप्राय दिला आहे.

(पुढील पानावर . . . .)

CamScanner

**प्रशासकीय ठराव क्र.३६/२०२२** दि. २/९/२०२२

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेकरीता एक वर्षासाठी (वार्षिक) बाह्य यंत्रणेद्वारा कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ / सेवा पुरविणे कामासाठी येणारा अंदाजे वार्षिक खर्च रु९,२५,५४,२००/- यास मंजुरी देणेत येत आहे. याकामी सन २०२२-२०२३ चे मंजुर अर्थसंकल्प मधील अनुदाने, अंशदाने व अर्थसहाय्य या लेखाशिर्षावरील तरतुद रु. ८१.६६ कोटी व चालू वर्षी थकित सहाय्यक अनुदान मासिक सहा. अनु. पोटी प्राप्त रु.१२२.६८ कोटी यामधील फरक रक्कमेतुन होणा-या जादा महसुली जमा मधुन सदरचे काम प्रस्तावित करणेस मंजुरी देणेत येत असून वार्षिक अंदाजित खर्च र.रु. ९,२५,५४,२००/- यावर परसेंटेज दराने प्रशासकीय शुल्क याप्रमाणे ३ वर्षे मुदतीसाठी ई-निविदा मागविणेसही मंजुरी देणेत येत आहे.

मनुष्यबळ पुरविण्या कामाचे अंदाजपत्रकात व निविदेत मनुष्यबळ काहीही धरले असले तरी आवश्यकतेनुसार कोणत्याही प्रवर्गात त्यापेक्षा कमी अथवा जादा मनुष्यबळ घेण्याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्तांचे असतील ठेकेदारास आयुक्तांच्या मागणीप्रमाणेच मनुष्यबळ पुरविणे बंधनकारक राहील.

(सुधाकर देशमुख) 02/09/2022

प्रभारी अधिकारी तथा प्रशासक

इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: पंचगंगा नदी उद्‌भवावरील पंपीग मशिनरी बदलणे व न.प. पाणी पुरवठा योजना अंतर्गत शुध्द पाण्याच्या पंपींग मशिनरी बदलणे.

**प्रस्ताव**

पंचगंगा नदी उद्‌भवावरील पंपीग मशिनरी बदलणे व न.प. पाणी पुरवठा योजना अंतर्गत शुध्द पाण्याच्या पंपींग मशिनरी बदलणे कामातील मक्तेदार मे.इलेकॉन एनर्जी सोलुशन्स यांना दि. २७/०१/२०२२ रोजी कामाचे कार्यादेश देणेत आले आहेत.

त्यानुसार मक्तेदार यांनी ८५% काम पुर्ण केले आहे. त्यांना बिल अदाई करताना केंद्र शासनाच्या सुधारीत जीएसटी नोटीफिकेशन नुसार १२ % ऐवजी १८% दराने जीएसटी मिळणेची दि. १९/०७/२०२२ रोजी पत्राने मागणी मक्तेदार यांनी केली आहे.

याबाबत उक्त कामाचे मुळ प्रस्तावाची तपासणी केली असुन त्यामधील मक्तेदाराने केलेल्या करारानुसार व त्यातील अटी शर्ती मधील अट क्र. १७ नुसार जीएसटी बाबत शासनाचे निर्णयानुसार कार्यवाही करावी लागलेस मक्तेदाराने बिलातुन जीएसटी कपाती बाबत कार्यवाही करणेस कोणतीही हरकत असणार नाही असे नमुद आहे.

त्यानुसार मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व ड्रेनेज यांनी उपरोक्त विषयांकित कामी सनदी लेखापाल यांचेकडे जीएसटी बाबत अभिप्राय मिळणेकामी दि. ०५/०८/२०२२ रोजी पत्र देणेत आले होते. मात्र सदर पत्रावर सनदी लेखापाल श्री महेश पोतदार यांनी महानगरपालिकेने निर्णय घ्यावा असे उलट टपाली कळविले आहे.

मा. भारत सरकार यांचे वित्त मंत्रालयाकडील दि. १३/०७/२०२२ चे परिपत्रकानुसार दि. १३/०७/२०२२ नंतर अदा होणा-या देयकास १८% प्रमाणे जीएसटी देणेस मान्यता प्रदान केली आहे.

सबब सदर कामी मक्तेदार यांचे मागणी बाबत जीएसटी देता येणे अगर कसे ? याबाबत इचलकरंजी महानगरपालिकेचे लेखापाल यांचा अभिप्राय घेणेत आलेला असुन प्रस्तुत प्रकरणी १३/०७/२०२२ नंतर शासकीय आदेशानुसार १२% ऐवजी १८% जीएसटी आदा करणेस हरकत नसलेबाबतचा अभिप्राय दिला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.३७/२०२२** **दि.१३/०९/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन मा. भारत सरकार यांचे वित्त मंत्रालयाकडील दि. १३/०७/२०२२ चे परिपत्रकानुसार बिल अदाई करताना केंद्र शासनाच्या सुधारीत जीएसटी नोटीफिकेशन नुसार १२% ऐवजी १८% दराने जीएसटी देणेबाबत मान्यता प्रदान केलेली आहे.

त्यानुसार पंचगंगा नदी उद्‌भवावरील पंपीग मशिनरी बदलणे व न.प. पाणी पुरवठा योजना अंतर्गत शुध्द पाण्याच्या पंपींग मशिनरी बदलणे कामाचे मक्तेदार मे.इलेकॉन एनर्जी सोलुशन्स यांना १२% ऐवजी १८% जीएसटी अदा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच केंद्र शासनाच्या दि. १३/०७/२०२२ चे परिपत्रकानुसार दि. १३/०७/२०२२ पासुन पुढील अदा होणा-या देयकांना १२ % ऐवजी १८% दराने जीएसटी अदा करणेत यावी.

13/09/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत इचलकरंजी न.प. पाणी पुरवठा योजनेची मजरेवाडी जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत ८०० मीमी व्यासाची दाबनलिका नदीपात्रातुन टाकणे.

**प्रस्ताव**

संदर्भ - १. इकडील जा.क्र. पा.पु./ २७१५/ २०२२ दि. ३०/०३/२०२२ रोजीचे पत्र
२. जा.क्र. तांशा -३/ १८४३/ २०२२ दि. ११/०८/२०२२ रोजीचे महाराष्ट्र जीवण प्राधिकरण, कोल्हापुर यांचे पत्र

विषयांकीत कामी नमुद योजनेमध्ये यापुर्वी मान्यता मिळालेल्या स्ट्रक्चरल ब्रिज ऐवजी नदीपात्रातुन पाईप लाईन टाकणेकामी दि. २४/०३/२०२२ रोजी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांची मान्यता मिळाली आहे.

सदर योजनेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणेत आलेल्या महाराष्ट्र जीवण प्राधिकरण मार्फत सदर झालेल्या बदलानुसार कार्यवाही करणेकामी संदर्भ क्र. १ नुसार इकडील कार्यालयामार्फत पत्र व्यवहार करणेत आला होता.

त्यानुसार संदर्भ क्र. २ चे पत्रान्वये प्रकल्प सल्लागार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर बदलास अनुसरुन अतिरिक्त दरसुची तयार केली असुन या दरसुचीस मा. मुख्यअभियंता, म.जी.प्रा.पुणे यांनी दि. २७/०८/२०२२ रोजी तत्वतः मान्यता दिली आहे. सदर दरसुचीमध्ये नमुद केलेप्रमाणे याकामी र.रु. ४८,३०,६००/- इतका खर्च अतिरिक्त म्हणुन मंजुरी देणेत आलेली आहे. यापुर्वी या योजनेमध्ये स्ट्रक्चरल ब्रिज बांधणेकामी र.रु. २,७८,५५,०२०/- इतक्या रक्कमेस मान्यता देणेत आली होती.

तरी वरील नमुद केलेप्रमाणे सदर योजना पुर्ण होणेकामी स्ट्रक्चरल ब्रिज ऐवजी नदीपात्रातुन पाईप लाईन टाकणेकामी र.रु. ४८,३०,६००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेकामी.

**प्रशासकीय ठराव क्र. ३८ /२०२२** दि. १३ /०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेची मजरेवाडी जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत स्ट्रक्चरल ब्रिज ऐवजी नदीपात्रातुन पाईप लाईन टाकणेकामी येणा-या र.रु. ४८,३०,६००/- इतक्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत आहे.

13/09/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिकेकडील जलतरण तलाव येथील प्रशिक्षक यांचे मानधनात वाढ करणेकामी.

**प्रस्ताव**

अर्जदार श्री. गंगाराम पांडुरंग बरगे, सुभाष सदाशिव स्वामी व अमिना गुलाब देसाई यांनी दि.३०/८/२०२२ चे अर्जानुसार इचलकरंजी पालिकेच्या जलतरण तलाव येथे सन १९९३ व अनुक्रमे १९९९ या सालापासुन बांधकाम खाते अंतर्गत २५ वर्षे प्रशिक्षक जीवरक्षक या पदावर काम करीत आहेत.

या प्रशिक्षण कामातुन पालिकेस आर्थिक उत्पन्न मिळत असते. सकाळी ६ ते १० व सायं ४ ते ८ या वेळेत पालिकेने ठरवुन दिलेले प्रशिक्षणाचे व जीवरक्षकाचे काम करत आहे. हे काम करत असताना एखाद्यावेळी बुडणा-या सभासदास वाचवण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालावा लागतो. व त्याचे प्राण वाचवण्याचे कर्तव्य बजावावे लागते. पण पुर्णवेळ काम करुन देखिल मासिक पगार मात्र रु. १५००/-मानधन स्वरुपात आहे.

तत्कालिन नगरपालिकेकडे वेळोवेळी लेखी व तोंडी पगारवाढीसाठी मागणी केली पण मुख्याधिका-यांना याबाबत अधिकार नाहीत असे सांगण्यात आल्याने याबाबत कोर्टाकडे दाद मागितली आहे. परंतु सध्या ते काम प्रलंबित आहे. सध्याच्या महागाईच्या दिवसातही सेवा नियमित व प्रामाणिकपणे देत असून प्रशासनाने आमच्या मागणीचा विचार करुन आम्हास किमान वेतन व आमची आजपर्यंतची सेवा विचारात घेऊन आम्हास सेवेत कायम करावे अशी मागणी केली आहे.

सदर अर्जावर मा. प्रभारी अधिकारी तथा प्रशासक यांनी दावा मागे घेणेच्या अटीस अधिन राहुन दरमहा रु. ५०००/ इतके मानधन अदा करणेस प्रशासकीय ठराव करणेबाबत आदेशित केले आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३९/२०२२** दि. २१/०९/२०२२

तरी वरील प्रमाणे अर्जदार यांनी दिलेले अर्ज अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिका जलतरण तलावाकडील काम करणारे प्रशिक्षक श्री. गंगाराम पांडुरंग बरगे, सुभाष सदाशिव स्वामी व अमिना गुलाब देसाई यांचे मानधनवाढ अगर सद्या त्यांच्या सुरु असणा-या सेवेकामी कोर्टात दावे सुरु असतील तर सदर दाखल केलेले दावे मागे घेणेच्या अटीवर सदर अर्जदार जीवरक्षक यांना दरमहा रु. ५,०००/- इतके मानधन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही) २१/०९/२०२२
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: रि.स.न. ९४६८, आरक्षण क्र. I / २४ मोठे तळे (पुर्वीच जलस्त्रोत) पुनरुज्जीवन व सुशोभिकरण करणे.

**प्रस्ताव**

इचलकरंजीचे जहागीरदार श्रीमंत घोरपडे सरकार यांचे काळात शहराला पाणी पुरवठा होत असलेल्या जलस्त्रोत ठिकाणी यापुर्वी लोकसहभागातुन स्वच्छता व खोलीकरण करुन घेतलेले आहे.

आता केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत इचलकरंजी शहरातील सि.स.न. ९४६८, आरक्षण क्र. I/२४ मोठे तळे (पुर्वीचे जलस्त्रोत) पुनरुज्जीवन व सुशोभिकरण करणे कामी रक्कम रु. २,५६,१४,०८०/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असुन याकामी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत शासनाकडे प्रस्तावित करणे, तांत्रिक मान्यता घेणे, निविदा मागविणेकामी प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४०/२०२२** दि. २१/०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत इचलकरंजी शहरातील सि.स.न. ९४६८, आरक्षण क्र. I/२४ मोठे तळे (पुर्वीचे जलस्त्रोत) पुनरुज्जीवन व सुशोभिकरण करणे कामी सन २०२२-२०२३ चे चालु दरसुची (DSR) नुसार सुधारीत अंदाजपत्रकीय रु. २,८६,८५,०६०/- इतक्या रक्कमेस मान्यता देणेत येत असुन केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत शासनाकडे प्रस्तावित करणेस, तांत्रिक मंजुरी घेणेस व निविदा प्राप्त होताच निविदा मागविणेस मंजुरी देणेत येत आहे.

२१/०९/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महाागरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इ.म.पा. विविध विभागांकडून वेगवेगळया स्वरुपाची कामांचे (संविदा) करारपत्रावर महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड प्रकरण ५ मधील (२) अन्वये मुद्रा लावणेसाठी महानगरपालिका उपआयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी यांचेमधील कोणत्याही दोन व्यक्तींचे नामनिर्देशन घोषित होणेबाबत.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्र-मनपा-२०२२/प्र.क्र. १६ (१)/ नवि-१८ दि. २९/०६/२०२२ अन्वये इचलकरंजी शहर महापालिका झालेले आहे.

महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड प्रकरण ५ मधील (२) अन्वये स्थावर मालमत्तेच्या किंवा त्या मधील हितसंबंधाच्या किंवा तिच्या बाबतच्या हक्कांच्या संपादनाशी संबंधित असलेल्या संविदे व्यतिरिक्त लावणे आवश्यक आहे. अशा प्रत्येक संविदेवर आणि लेखावर स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केलेला असेल असा, महानगरपालिका उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या उपस्थितीत लावण्यात आली पाहिजे, आणि अशा प्रत्येक संविदेवर व लेखांवर आपल्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात आली आहे. याचे दर्शक म्हणुन स्थायी उक्त दोन व्यक्तींनी त्यावर सहया केल्या पाहिजेत. उक्त व्यक्तींच्या सहया या, अशा कोणतीही संविदा किंवा लेख केल्याबद्दल कोणत्याही साक्षीदारांनी केलेल्या सहयांपासुन वेगळया असल्या पाहिजेत असे नमुद आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागांकडून वेगवेगळया स्वरुपाची कामे (संविदा) अभिकरणांमार्फत करण्यात येत असतात. सदर संविदा करताना महानगरपालिका व संबंधित अभिकरण यांच्या मध्ये करारपत्र केले जाते. सदर करारपत्र अधिकृत होणेसाठी करारपत्रावर महानगरपालिका उपआयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी, यांच्यामधील कोणत्याही दोन उपस्थितीत लावण्यात करीता नामनिर्देशन घोषित करणेकामी मान्यतेस्तव सादर.

**प्रशासकीय ठराव क्र. ४१/२०२२** दि. २१/०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इ.म.पा. विविध विभागांकडून वेगवेगळया स्वरुपाची कामांचे (संविदा) करारपत्रावर मुद्रा लावणेकामी 'महानगरपालिका अधिनियम अनुसुची - ड प्रकरण ५ नियम १(२)' मधील तरतुदीनुसार 'नगरसचिव' व 'उपायुक्त (कर)' यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

(सही) २१/०९/२०२२
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# <u>इचलकरंजी महानगरपालिका.</u>

---

प्रस्ताव: इचलकरंजी नळ पाणी पुरवठा योजना (कृष्णा नदी मजरेवाडी उद्भव) उर्वरीत दाबनलिका बदलणे.

<u>प्रस्ताव</u>

इचलकरंजी शहरासाठी मजरेवाडी कृष्णा उद्भवावरून ४५ द.ल.लि. क्षमतेची पाणी पुरवठा योजना सन २००१ पासून सध्या कार्यान्वित आहे. कालानुरूप सदर दाबनलिकेची आर्युमर्यादा संपल्याने वारंवार गळती होत असलेने शहरास अपुरा पाणी पुरवठा होत आहे. याआधी सदर योजनेमधील एकूण जवळ पास १८ कि.मी. पाईप लाईन मध्ये दोन टप्प्यामध्ये अनुक्रमे ६.२३५ कि.मी. व ५.८०० कि.मी. अशी एकूण १२.०३५ कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणेचे काम न.प.मार्फत शासकीय योजनेमधून करणेत आलेली आहे.

सध्या मुळ योजनेतील अंदाजे ५.८०० कि.मी. इतकी दाबनलिका जुनी असून ती वारंवार गळती होऊन नादुरूस्त होत असलेने शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवावा लागतो. या कारणे अपुरा पाणी पुरवठा झालेने प्रशासनास नागरीक व नगरसेवक यांच्या रोषास सामोरे जावे लागते. तसेच आजअखेर दोन टप्प्यात केलेल्या योजनेतील सुधारणेस न्याय देता येत नाही.

सदर उर्वरित ५.८०० कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणेकामी तसेच अस्तित्वातील मजरेवाडी पाणी उपसा केंद्राचे सक्षमिकरण करणेकामी इकडील कार्यालयामार्फत नेमणेत आलेल्या प्रकल्प सल्लागार मे. स्कायटेक कन्सल्टंट यांचेकडून र.रू. २३,७८,०८,७३६/- इतक्या किंमतीचा प्रस्ताव तयार करणेत आला आहे. सदरचा प्रस्ताव अमृत २.० योजनेअंतर्गत शासनाच्या संकेत स्थळावर मंजूरी मिळणेकामी दाखल करणेत आला आहे.

सदरचा प्रस्ताव हा इकडील कार्यालयामार्फत तांत्रिक मान्यता मिळणेकामी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत आला आहे.

दरम्यानच्या काळामध्ये इचलकरंजी शहरासाठी दूधगंगा नदी सुळकूड उद्भव येथून नवीन नळ पाणी पुरवठा योजना अमृत २.० या योजनेअंतर्गत मंजूर झालेने (अद्याप मंजूरीचा शासन निर्णय निर्गमित करणेत आलेला नाही.) प्रस्तावित योजना ही मंजूर कामाशी समकक्ष असलेने सदर योजना प्रस्तावित केल्यास सदरचे काम हे दूबार होणेची शक्यता असलेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे मत आहे.

मंजूर झालेली दूधगंगा नदी सुळकूड उद्भव योजना ही सध्या प्राथमिक टप्प्यात असून योजनेचा विस्तार पाहता योजना पुर्ण होण्यास किमान ४ वर्षांचा कालावधी आवश्यक आहे. अमृत योजनेमधून दूधगंगा नदी उद्भवावरून प्रस्तावित केलेली योजना पुर्णत्वास होईतोपर्यंत नागरिकांना किमान एक दिवस आड पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. सदर योजनेतील अस्तित्वातील M.S. दाबनलिका वारंवार गळती होत असलेने पाणी पुरवठा विस्कळीत होत असतो. त्यामुळे तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून सदरची योजना प्रस्तावित केली आहे. तसेच प्रस्तावित केलेली योजना ही दूधगंगा नदी सुळकूड उद्भव योजनेशी समकक्ष नाही.

सध्या कार्यान्वित असलेल्या कृष्णा योजनेचे पुर्ण बळकटीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे बळकटी करण न केलेस सध्या कृष्णा योजनेस होणाऱ्या गळतीचे प्रमाण पाहता भेडसावत असलेल्या तिव्र पाणी टंचाईस शहरास आणखी ३ ते ४ वर्ष सामोरे जावे लागणार आहे. सदरची वस्तुस्थिती पाहता प्रस्तावित केलेले काम हे पुर्णपणे स्वतंत्र स्वरूपाचे असून सध्या मंजूर झालेल्या दूधगंगा नदी सुळकूड उद्भव योजनेपासून पुर्णपणे विभक्त आहे. तरी सदरकामी शासनाकडे मंजूरीकामी प्रस्ताव पाठविणेसाठी योजना दुबार होत नसलेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविणेकामी मंजूरीसाठी सादर.

<u>प्रशासकीय ठराव क्र. ४२/२०२२</u> <u>दि. २१/०९/२०२२</u>

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी नळ पाणी पुरवठा योजनेची (कृष्णा नदी मजरेवाडी उद्भव) उर्वरीत ५.८०० कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणे तसेच अस्तित्वातील मजरेवाडी पाणी उपसा केंद्राच सक्षमिकरण करणे र.रु. २३,७८,०८,७३६/- चे केले प्रस्तावीत काम हे पुर्ण पणे स्वतंत्र स्वरुपाचे असुन सध्या मंजुर झालेल्या दुधगंगा नदी सुळकूड उद्भव योजनेपासुन पुर्ण पणे विभक्त असुन सदरचे प्रस्तावीत काम दुबार होत नसलेबाबतची मान्यता देणेत येत असुन सदर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाठविणेस मंजुरी देणेत येत आहे.

21/09/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महाागरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क. IV/१६ क्रिडांगण शहापुर गट नं. ८०९ सि.स.न. २०४४० आरक्षणाचे क्षेत्र - ०.८ हेक्टरचे संपादन होणेकरीता मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - श्री. पांडुरंग भैरु धोंडूपुडे व इतर ३ यांची दि. १३/०९/२०२२ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची खरेदी सुचना .

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस /२१११/१३५२/प्र.क्र.१९/१२/डी .पी.संक्शन/युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि.१०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे. उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र.IV/१६- क्रिडांगण या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापूर गट नं.८०९ मधील प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालनुसार आरक्षण क्र.IV/१६- क्रिडांगण हे गट नं.८०९ सि.स.नं.२०४४० मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकूण क्षेत्र हे ०.८ हेक्टर इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे गट नं.८०९ मधील एकूण ०.८ हेक्टर इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब आरक्षण क्र.IV/१६ - क्रिडांगणचे संपुर्ण क्षेत्राकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणे करिता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकरिता प्रशासकीय ठराव होणेस विनंती आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४३/२०२२** दि. २९/०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क. IV/१६ क्रिडांगण शहापुर गट नं. ८०९ सि.स.न. २०४४० आरक्षणाचे - ०.८ हेक्टरचे संपुर्ण क्षेत्र भुसंपादन करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदी अन्वये मंजुरी देणेत येत असुन सदर कामी येणा-या खर्चास ही मंजुरी देणेत येत आहे.

29/09/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्ताव: रि.स.न. ५८९ पै., नगररचना योजना क्र.१ अंतिम भुखंड क्र. २१ पै. या जागेतील आरक्षण क्र. ११० बस स्टॉपचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) चा प्रस्ताव डि.पी. युनिटकडे पाठविणेबाबत.

**प्रस्ताव**

रि.स.न. ५८९ पै, नगररचना योजना क्र. १, अंतिम भुखंड क्र. २१ पै, ही जागा दि. २५/०५/१९८१ चे मंजुर विकास योजना इचलकरंजी - सुधारीतचे प्रस्तावाप्रमाणे आरक्षण क्र. ११० बस स्टॉप या आरक्षणामध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे क्षेत्रफळ विकास योजना अहवालाप्रमाणे ०.२६ हेक्टर आर. इतके आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार सदरचे आरक्षण अंतिम विकास योजनेत फेरबदल करणेबाबत प्राथमिक ठराव मे. कौन्सिल ठराव क्र. २४८ दि. २६/०२/२०२१ अन्वये झालेला आहे.

दि. १८/०७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये श्री. मनोज किसन साळुंखे यांनी उक्त नमुद ठरावानुसार कार्यवाही न करता नव्याने बस स्टॉप ऐवजी कम्युनिटी सेंटर असा ठराव करुन शासनाकडे सादर करणेबाबत कळविले आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त बस स्टॉप या आरक्षणाऐवजी म्युनिसिपल पर्पज असा फेरबद्दल करणे योग्य वाटते.

सबब, उक्त नमुद फेरबदलाचा प्रस्ताव डि.पी. युनिट/नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेकरीता प्रशासकीय ठराव करणेकामी इकडे गोषवारा सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४४ /२०२२** दि. २१/०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन रि.स.न. ५८९ पै, नगररचना योजना क्र. १, अंतिम भुखंड क्र. २१ पै, ही जागा दि. २५/०५/१९८१ चे मंजुर विकास योजना इचलकरंजी सुधारीतचे प्रस्तावाप्रमाणे आरक्षण क्र. ११० - बस स्टॉप ०.२६ हेक्टर या क्षेत्रास 'बस स्टॉप' ऐवजी "म्युनिसिपल पर्पज" असा फेरबदल करणेस मंजुरी देणेत येत असुन सदर प्रस्ताव डि.पी. युनिट नगररचना अधिकारी यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

२१/०९/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इ .लकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क्र. V/४० लहान मुलांचे खेळाचे मैदान, (Children play Ground) शहापुर गट नं. २२५ पैकी, सि.स.न. १८६५५ पैकी आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०.२५ हेक्टरचे संपादन होणेकरीता प्रशासकीय ठराव होणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - श्री. मोहनराव गुंडो नाईक यांचेतर्फे अॅड. श्री. एस.वाय.सहस्त्रबुध्दे यांची दि. १३/०९/२०२२ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची खरेदी सुचना.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस/ २१११/ १३५२/ प्र.क्र. १९/ १२/ डि.पी. सॅन्क्शन/ युडी-१३ दि. २४/०५/२१२ रोजी मंजुर झाली असुन दि. १०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे. उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र. V/४० - लहान मुलांचे खेळाचे मैदान, (Children Play Ground) या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापुर गट नं. २२५ पैकी, सि.स.न. १८६५५ पैकी मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र V/४० लहान मुलांचे खेळाचे मैदान (Children Play Ground) हे शहापुर गट नं. २२५ पैकी, सि.स.न. १८६५५ पैकी मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र हे अंदाजे ०.२५ हेक्टर इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे शहापुर गट नं. २२५ पैकी, सि.स.न. १८६५५ पैकी मधील एकुण अंदाजे ०.३० हेक्टर इतके क्षेत्र बाधित होते.

सबब, आरक्षण क्र. V/४० लहान मुलांचे खेळाचे मैदान, (Children Play Ground) चे संपुर्ण क्षेत्राकरीता अंदाजे ०.२५ हेक्टर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नविन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४५ /२०२२** **दि.** २१/०९/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन विकास योजना इचलकरंजी (मंजुर) आरक्षण क्र. V/४० लहान मुलांचे खेळाचे मैदान, (Children play Ground) शहापुर गट नं. २२५ पैकी, सि.स.न. १८६५५ पैकी आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०.२५ हेक्टर क्षेत्राचे भुसंपादन करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नविन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदी अन्वये मंजुरी देणेत येत असुन सदरकामी येणा-या खर्चास ही मंजुरी देणेत येत आहे.

२१/०९/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: अमृत २.० अभियानाअंतर्गत इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेची (दुधगंगा उद्गभव) अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव शासनास सादर करणे करीता प्रशासकीय ठराव पारीत करणे बाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - १) मा.उपसचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमाक अमृत-२०२२/प्र/क्र.२५५/नवि-३३ दिनांक २९.०९.२०२२ चे पत्र

२) मुअ(पुणे)/ताशा-३/इचलकरंजी/तांमं/२९४९दिनांक२५.०९.२०२२ चे मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र

इचलकरंजी शहराकरीता नवीन नळ पाणी पुरवठा योजना दानोळी गाव येथून वारणा नदी उद्भवावरून केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत मंजूर होते. मात्र दानोळी येथील स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे सदर मंजूर वारणा योजनेचे काम सुरू झाले नाही. याचा विचार करून वारणा योजनेचे काम सुरू करणेस येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मा. उप मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा. नगरविकास मंत्री व मा. जलसंपदा मंत्री यांना इचलकरंजी शहरास मु.पो. सुळकूड, ता. कागल येथून दूधगंगा नदीवरून नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणेकामी दि. १८/०६/२०२० रोजी आयोजित बैठकीत तत्वतः मान्यता देणेत आली आहे. या बैठकीमध्ये या योजनेचा पुर्व व्यवहार्यता अहवाल मा. शासनाकडे पाठविणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आदेश देणेत आले होते. त्याप्रमाणे पुर्व व्यवहार्तता अहवाल म.जी.प्रा. कडे सादर करून दुधगंगा उदभव घेवून योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत अधिक्षक अभियंता मध्यवर्ती नियोजन संकल्प चित्र व सनियंत्रण कक्ष मुंबई यांचे पत्र क्र. म.जी.प्रा./ मनिसंवसंकक्ष/ नगरो/ ४१४/ २०२० दि. २२/१२/२०२० मंडळ कळविले होते.

त्यानुसार इचलकरंजी महानगरपालिकेने दुधगंगा उदभव घेवून योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे तांत्रीक मंजूरी मिळणेकामी सादर करणेत आला होता.

त्यानुसार इचलकरंजी शहर नळपाणी पुरवठा योजनेची अंदाजपत्रकाना अमृत २ अभियाना अंतर्गत आपल्या संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये रु.१६५.७० कोटी इतक्या किमतीस संदर्भिय पत्र क्रं.२ अन्वये मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फ़त तांत्रिक मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.

शासनाच्या संदर्भिय क्र.१ चे पत्रान्वये तांत्रिक मान्यता मिळालेल्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फ़त शासनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणेसाठी सादर करणेच्या सूचना आहेत. त्याचबरोबर शासनाने संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये निर्देशित केल्या प्रमाणे सदर योजनेची १) तपासणी सुची २) हमिपत्र ३) या योजनेकरिता स्वः हिस्सा उभा करणे व या योजनेच्या जादाच्या होणा-या खर्चास ४) नागरीकांच्या नळ जोडणीस जलमापक यंत्र (मिटर) बसवून त्यास टेलिस्कोपीक दराने पाणी बिल आकारणे बाबत प्रशासकिय ठराव पारीत करून योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल मा. शासनाकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फ़त सादर करणेच्या सुचना प्राप्त आहेत. त्यानुसार मा. शासनाकडे सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी वरील बाबीस अनुसरून खालिल प्रमाणे प्रशासकीय ठराव मंजुर करणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

१. अमृत २.० अभियानाअंतर्गत केंद्र शासनाच्या योजनेनुसार इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेच्या दूधगंगा उद्भव घेऊन तयार केलेल्या अंदापजत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडून त्यांचे मुअ(पुणे) /ताशा -३/इचलकरंजी/तांमं/२९४९ दि. २५.०९.२०२२ चे मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अन्वये रूपये १६५,७०,२८,५००/-इतक्या किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान करणेत आलेली आहे. इचलकरंजी महानगरपालिका या योजनेकरीता सर्व वित्तीय व दैनंदिन देखभालीच्या खर्चासह मान्यता देणे.

CamScanner

२. अमृत-२.० अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योजनेच्या १६५,७०,२८,५००/- कोटी किंमतीच्या योजनेवर महानगरपालिकेचा स्वहिस्सा ३०% प्रमाणे रक्कम रुपये ४९,७१,०८,५५०/- इचलकरंजी महानगरपालिका भरणेस मान्यता आवश्यक आहे. इचलकरंजी महानगरपालिका त्यासाठी १५ वा वित्त आयोग , न.पा. निधी व इतर अन्य योजनेमधून स्व हिस्सा उभारणेस मान्यता देणे.

३. इचलकरंजी महानगरपालिका सदर योजनेसाठी सर्व नळ कनेक्शन धारकांच्या कनेक्शनवर १००% मिटर्स बसविणेस तयार असून त्याप्रमाणे टप्प्या-टप्प्याने कार्यवाही करणेस मान्यता देणे.

४. प्रस्तावित योजना स्वंयसंतूलीत होणेसाठी अमृत-२ मार्गदर्शक तत्वानुसार टेलिस्कोपीक पाणी पट्टी आकारणेस तयार असून योजना कार्यान्वित होताच महापालिकेकडून कार्यवाही करणेस मान्यता देणे.

५. इचलकरंजी महानगरपालिका अमृत २ मार्गदर्शक तत्वाप्रमाणे प्रस्तावित योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेस या व्दारे मान्यता देणे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४६ /२०२२** दि. ०४/१०/२०२२.

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन अमृत २.० अभियानाअंतर्गत इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेची (दुधगंगा उद्बभव) अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव शासनास सादर करणेकामी खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

१. अमृत २.० अभियानाअंतर्गत केंद्र शासनाच्या योजनेनुसार इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेच्या दूधगंगा उद्भव घेऊन तयार केलेल्या अंदापजत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडून त्यांचे मुअ(पुणे) /ताशा -३/इचलकरंजी/तांमं/२९४९ दि. २५.०९.२०२२ चे मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अन्वये रूपये १६५,७०,२८,५००/-इतक्या किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान करणेत आलेली आहे. इचलकरंजी महानगरपालिका या योजनेकरीता सर्व वित्तीय व दैनंदिन देखभालीच्या खर्चासह मान्यता देणेत येत आहे.

२. अमृत-२.० अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार योजनेच्या १६५,७०,२८,५००/- कोटी किंमतीच्या योजनेवर महानगरपालिकेचा स्वहिस्सा ३०% प्रमाणे रक्कम रुपये ४९,७१,०८,५५०/- इचलकरंजी महानगरपालिका भरणेस मान्यता आवश्यक आहे. इचलकरंजी महानगरपालिका त्यासाठी १५ वा वित्त आयोग , न.पा. निधी व इतर अन्य योजनेमधून स्व हिस्सा उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

३. इचलकरंजी महानगरपालिका सदर योजनेसाठी सर्व नळ कनेक्शन धारकांच्या कनेक्शनवर १००% मिटर्स बसविणेस तयार असून त्याप्रमाणे टप्प्या-टप्प्याने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

४. प्रस्तावित योजना स्वंयसंतूलीत होणेसाठी अमृत-२ मार्गदर्शक तत्वानुसार टेलिस्कोपीक पाणी पट्टी आकारणेस तयार असून योजना कार्यान्वित होताच महापालिकेकडून कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

५. इचलकरंजी महानगरपालिका अमृत २ मार्गदर्शक तत्वाप्रमाणे प्रस्तावित योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेस या व्दारे मान्यता देणेत येत आहे.

04/10/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा कमी करणेबाबत.

**प्रस्ताव**

दि. २ ऑक्टोंबर २०२१ रोजी केंद्र शासनाने अमृत २.० अभियानाची घोषणा केलेली आहे. सदर अमृत २.० अभियान अंतर्गत नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा, मलनिःसारण व शहरातील तलाव पुनरुज्जीवीत करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. राज्य शासनाने केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाची अंमलबजावणीकरीता दि. १४ जुलै २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार ड वर्ग महानगरपालिकेकरीता वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार | केंद्र हिस्सा (%) | राज्य हिस्सा (%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (%) |
|---|---|---|---|---|
| १ | "ड" वर्ग महानगरपालिका | ३३.३३ | ३६.६७ | ३० |

केंद्र शासन अमृत १ अभियान अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा २५% एवढा होता तथापि अमृत २.० अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% एवढा ठेवण्यात आला आहे. वस्तुतः महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता महानगरपालिकेच्या स्वहिस्यासाठी निधी उभारणी करणे आर्थिक दृष्टया अवघड आहे.

सबब, सदर अमृत २.० अभियान अंतर्गत निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधानुसार "ड" वर्ग महानगरपालिकेचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% वरुन २५% करण्याकरीता निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे पुर्नविचार होणे आवश्यक आहे, याकरीता कार्यालयाने प्रशासकीय ठराव करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४७ /२०२२** दि. ०७/१०/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा ३०% ऐवजी २५% प्रमाणे करणेबाबत मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

07/10/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः १५व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत मूलभूत अनुदानाअंतर्गत मूलभूत अनुदानातून शिल्लक रक्कमेतून प्रस्तावित कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एफएफसी २०२०/प्र.क्र.५६/नवि-४ दि.२८/१०/२०२

२) मे.कौ.ठ.नं.२३१ दि.३०/०१/२०२० ने मान्यता

३) मे.कौ.ठ.नं.६ दि.३१/०५/२०१८ने मान्यता

उपरोक्त विषयास अनुसरून १५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या मूलभूत अनुदानाअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस सन २०२०-२१ व सन २०२१-२२ यामध्ये एकूण अनुदान र.रू. २८,१४,४५,३३१/- एवढी रक्कम प्राप्त झाली आहे. त्यानुसार एकूण र.रू.२८,१४,४५,३३१/- इतके अनुदान अखर्चित आहे. सदर अखर्चित अनुदानातून महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एफएफसी २०२०/प्र.क्र.५६/नवि-४ दि.२८/१०/२०२० रोजीच्या शासन निर्णया मधील निकष (II) बंधनकारक अनुदान (Tied Grants) : - (एकूण अनुदानाच्या ५० टक्के)

१. बंधनकारक अनुदानापैकी ५०% अनुदान a) Drinking Water (Including Rainwater Harvesting and Recycling) यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे.
२. उर्वरीत ५०% अनुदान b) Solid Waste Management यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे.
३. उपरोक्त a) व b) यापैकी एका घटकाची गरज पूर्ण झालेली असल्यास व त्यासाठी खर्च करण्याची आवश्यकता नसल्यास त्या घटकासाठीचे अनुदान दुसऱ्या घटकासाठी खर्च करण्याची मुभा असेल.

त्यानुसार १५व्या वित्त आयोगातील प्राप्त Solid Waste Management ५०% शिल्लक निधीतून र.रू. **६,७८,९२,५५०/-** एवढया रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | १) इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड नं.१ ते २६ मधील घरोघरी घंटागाडीव्दारे कचरा गोळा करणे, सर्व वॉर्डमधील रस्ते व गटारीमधून निघालेला कचरा गोळा करणे व कचराडेपोपर्यंत वाहतूक करणे व म.न.पा.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल दुरूस्ती करणे.<br>२) इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड क्र.१०,१३, २१(अंशतः),२२ व २३ मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा म.न.पा.सुचनेप्रमाणे वाहतूक करणे. |
| २ | अंदाजपत्रकीय रक्कम (सन २०२२-२३ करीता) | १) र.रू.४,८२,८९,४५०/- (माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२)<br>२) र.रू.१,९६,०३,१००/- (माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२)<br>------------------------<br>एकूण र.रू.६,७८,९२,५५०/- |
| ३ | प्रशासकीय मान्यतेची रक्कम | र.रू.६,७८,९२,५५०/- (माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२) |
| ४ | महानगरपालिकची मान्यता | १) मे.कौ.ठ.नं.२३१ दि.३०/०१/२०२०<br>२) मे.कौ.ठ.नं. मे.कौ.ठ.नं.६ दि.३१/०५/२०१८ |

CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५ | सदर काम १५व्या वित्त आयोगाच्या निकषानुसार अनुज्ञेय आहे काय | महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एफएफसी २०२०/ प्र.क्र.५६/ नवि-४ दि.२८/१०/२०२० रोजीच्या शासन निर्णयामधील निकष (II) बंधनकारक अनुदान (Tied Grants) :- (एकूण अनुदानाच्या ५० टक्के) b) Solid Waste Management यासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. |

सदर कामाचे स्वरूप सार्वजनिक असून कुठल्याही खाजगी स्वरूपाचे काम प्रस्तावित नाही आहे. सदर कामांमुळे सर्वसमावेशक नागरीकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे. सदर १५व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोगाची कार्यपध्दतीनुसार १५व्या वित्त आयोगाअंतर्गत Non-Million Plus Cities गटातील अनुदानातून घेण्यात येणाऱ्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांना असतील. तसेच प्रशासकीय मान्यता देण्यापुर्वी शासन निर्णयानुसार खालील बाबींची पुर्तता झाल्याची खात्री करण्यात आली आहे.

१) प्रस्तावित काम हे १५व्या वित्त आयोगाअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांपैकीच आहे.

२) अनुक्रमे १) मे.कौ.ठ.नं.२३१ दि.३०/०१/२०२० व २) मे.कौ.ठ.नं. मे.कौ.ठ.नं.६ दि.३१/०५/२०१८ नुसार कामाची शिफारस केली आहे

तरी पुढील नमुद कामांचा **१)** इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड नं.१ ते २६ मधील घरोघरी घंटागाडीव्दारे कचरा गोळा करणे, सर्व वॉर्डमधील रस्ते व गटारीमधून निघालेला कचरा गोळा करणे व कचराडेपोपर्यंत वाहतूक करणे व म.न.पा.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल दुरूस्ती करणे.
**२)** इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड क्र.१०,१३, २१(अंशत:),२२ व २३ मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा म.न.पा.सुचनेप्रमाणे वाहतूक करणे कामी माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२ पर्यंत खर्च व १५वा वित्त आयोग या लेखाशिर्षका अंतर्गत करणेकामी प्रशासकीय मान्यतेस कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४८ /२०२२** दि. १४/१०/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन १५व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या मूलभूत अनुदानाअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ करीता एकूण अनुदान र.रू. २८,१४,४५,३३१/- एवढी रक्कम प्राप्त झाली असुन सदर (बंधनकारक) अनुदानातील Soild Waste mangement (५०%) या शिल्लक निधीतुन र.रु. ६,७८,९२,५५५/- इतकी रक्कम शासन निर्देशानुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन आरोग्य विभागाकडील खालील कामांना माहे एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२ पर्यंत खर्च करणेस मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव |
|---|---|
| १ | इचलकरंजी शहरातील प्र.वॉ.नं. १ ते २६ मधील घरोघरी घंडागाडीद्वारे कचरा गोळा करणे तसेच या वॉर्ड मधील रस्ते व गटारी साफसफाई करुन निघालेला सर्व प्रकारचा कचरा (जैव व वैद्यकिय कचरा वगळुन) गोळा करुन कचरा डेपोवर वाहतुक करणे अथवा इकडील सुचनेनुसार टाकणे आणि म.पा. ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्ती सहसेवा पुरविणे. |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड क्र.१०,१३, २१(अंशत:),२२ व २३ मधील रस्ते व गटारी साफसफाई करून गोळा होणारा कचरा म.न.पा.सुचनेप्रमाणे वाहतूक करणे. |

14/10/2022
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका**
**कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान अदा करणे.**

वाचले :- १) इचलकरंजी महानगरपालिका सर्व कामगार कृती समिती यांनी दिले दिनांक २०.०९.२०२२ रोजीचे निवेदन.
२) शासन वित्त विभागाकडील क्रमांक अग्रिम -२०१८/प्र.क्र. ३७/१८/विनियम दि. २३ ऑक्टोंबर २०१८ चा निर्णय

## प्रस्ताव

उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये महानगरपालिका कर्मचारी संघटना यांनी निवेदन देवून महानगरपालिका कर्मचारी यांना सन २०२२ चे दिपावली सणाकरीता सानुग्रह अनुदान मिळणे विषयी मागणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणी खालील अटी शर्तीस अधिन राहुन **सानुग्रह अनुदान** अदा करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

१) दिनांक १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद आस्थापनेवर कार्यरत असणा-या कर्मचारी, राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांना देय राहील. उक्त कालावधीत मार्च २०२२ पूर्वी किमान सहा महिने कर्मचारी कार्यरत असणे आवश्यक राहील.

२) परिविक्षाधीन कालावधी पूर्ण न झालेल्या मात्र दिनांक ०१ एप्रिल २०२१ पुर्वी किमान एक वर्ष सेवा पुर्ण असलेल्या परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांनाही सदरची रक्कम देय राहील.

३) उक्त कालावधीत जो कर्मचारी सलग तीन महिन्याहून अधिक कालावधीत गैरहजर / विना वेतन रजेवर असलेस सदर सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

४) चालू आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिल २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ कालावधीत सुध्दा सलग तीन महिने अथवा त्यापेक्षा जादा कालावधी सेवेत गैरहजर अथवा विना वेतन रजा असलेसही देय होणार नाही, सध्या निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यासही सदर अनुदान देय होणार नाही. दि.०१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत कर्मचारी निलंबित असल्यास जर त्याचा निलंबित कालावधी सेवा कालावधी गृहित धरला नसेल तर सानुग्रह अनुदान परिगणणेसाठी हा काळ सेवा काळ मानला जाणार नाही.

५) दिनांक १ एप्रिल २०२१ ते ३० मार्च २०२२ या कालावधीत सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्त / मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सदर सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

अ) सहा महिने ते नऊ महिने इतक्या कालावधीची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना ५० % या प्रमाणात देय राहील.

ब) नऊ महिने ते अकरा महिने या कालावधीची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना ७५ % या प्रमाणात देय राहील.

क) अकरा महिन्याहून अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना १०० % सानुग्रह अनुदान देय राहील.

(पुढील पानावर. . .)

CamScanner

६) ज्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अनुज्ञेय असणार नाही, मात्र उपरोक्त वाचलेमध्ये नमुद क्र.२ वरील शासन निर्णयातील अटींस पात्र होणाऱ्या कर्मचा-यापैकी ज्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, ईद सणानिमित्त तसेच ख्रिस्मस करिता सण अग्रीम घेतलेले कर्मचारी वगळुन ज्या कर्मचा-यांचा ६ व्या वेतन आयोगानुसार ज्यांचा ग्रेड पे ४८०० चे अनुषंगाने ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनबॅड एस-१७-रु.४७६००-१५११०० पेक्षा जादा नाही अशा कर्मचा-यांकडून दोन जामीनदारासह बंधपत्र लिहून घेऊन सण अग्रीम रक्कम रु. १२५००/- अदा करुन ती समान दहा हप्त्यात वसुली करणेची आहे.

७) प्रकरणी शासन स्तरावरुन अथवा शासकीय लेखापरिक्षणात सानुग्रह अनुदान विषयक कोणत्याही प्रकारचा आक्षेप आलेस सदरची रक्कम वसुल करणेस हरकत नाही असे लाभार्थी कर्मचारी यांचेकडून बंधपत्र लिहून घेणेत यावे.

**प्रशासकीय ठराव क्र.४९** **दि.१७/१०/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन महानगरपालिका कर्मचारी यांना सन २०२२ चे दिपावली सणाकरीता मागील वर्षाप्रमाणे लाभ देण्यासाठी यावर्षाकरीता रुपये १३,०००/- (अक्षरी रु.तेरा हजार) सानुग्रह अनुदान प्रस्तावात नमूद १ ते ७ अटी / शर्तीस अधिन राहुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

17/10/2022

**सुधाकर देशमुख**
**प्रभारी अधिकारी तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना दिपावली सणानिमित्य सानुग्रह अनुदान रु.१३,०००/- ऐवजी रक्कम रु. १५,०००/- देणेस मंजुरी देणेबाबत.

**प्रस्ताव**

मा. प्रशासकीय ठराव क्र. ४९ दि. १७/१०/२०२२ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार म.न.पा. कर्मचा-यांना दिपावली सणानिमित्य सानुग्रह अनुदान रक्कम रु. १३,०००/- अदा करणेसंबंधी जा.क्र. आस्था.वशि-१/६६/२०२२ दि. १७/१०/२०२२ चे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

प्रकरणी इचलकरंजी म.न.पा. सर्व कामगार कृती समिती यांनी मा. आयुक्तसो, यांचेकडे समक्ष भेटुन केले मागणीच्या अनुषंगाने रक्कम रु.१३,०००/- ऐवजी रक्कम रु. १५,०००/- सानुग्राह अनुदान देणेबाबत मा. आयुक्तसो, यांनी समक्ष आदेशीत केले आहे.

तरी याप्रमाणे मा. प्रशासकीय ठराव होवुन तसे दुरुस्ती आदेश निर्गमित करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५० /२०२२**

दि. १८/१०/२०२२

वरीलप्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येवुन मा. प्रशासकीय ठराव क्र. ४९ दि. १७/१०/२०२२ मधील १ ते ७ अटी शर्तीस अधिन राहुन रक्कम रु. १३,०००/- ऐवजी रक्कम रु. १५,०००/- अशी दुरुस्ती करुन सानुग्रह अनुदान देणेस मंजुरी देणेत येत आहे.

18/10/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्ताव: हातकणंगले ते इचलकरंजी रेल्वे मार्ग व त्याकरीता आवश्यक अर्थ संकल्पीय तरतुद करणेकामी मा.केंद्र शासनाकडे मागणी करणेबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी वस्त्रनगरीच्या व्यापार उद्योग वाढीसाठी व शहर परिसराच्या सर्वांगीण विकासाकरीता भविष्यकाळाची गरज ओळखुन इचलकरंजी शहर रेल्वे सेवेशी जोडण्याबाबत तत्कालीन नगरपालिकेच्या सहकार्याने इचलकरंजी रेल्वे कृती समितीची स्थापना वर्ष २०११ मध्ये करण्यात आली. समिती द्वारे शहरास रेल्वे सेवेशी जोडले जाण्याबाबत सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे.

याचा सकारात्मक परिणाम होवुन वर्ष २०१७ च्या अर्थ संकल्पामध्ये हातकणंगले-इचलकरंजी रेल्वे मार्गास व त्याकरीता आवश्यक अंदाजे बजेट रु. १८० कोटी रक्कमेस शासनाने मंजुरी दिली. त्यानंतर मध्ये रेल्वे, पुणे विभागाकडून सर्वे होवुन त्याचा विस्तृत अहवाल रेल्वे मंत्रालयास सादर करण्यात आला. लगेचच जुन २०१७ मध्ये या मार्गाचे भुमीपुजन तत्कालीन मा. रेल्वेमंत्री श्री.सुरेशजी प्रभु यांचे हस्ते संपन्न झाले. त्यानंतरच्या प्रत्येक केंद्रीय बजेटमध्ये या प्रकल्पाकरीता नाममात्र रक्कम मंजुर करण्यात येत आहे.

मात्र रेल्वे मार्गाचे काम प्रत्यक्ष सुरु होण्यासाठी येत्या अर्थसंकल्पामध्ये भरघोस तरतुदीची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे प्रयत्न सुरु आहेत. यासाठी रेल्वे कृती समितीद्वारे जनजागरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याअंतर्गत मा. पंतप्रधान व मा. रेल्वेमंत्री यांना प्रत्येकी २५००० निवेदन पत्र पाठविण्याचा संकल्प केला आहे. त्याकरीता विविध सामाजिक संघटनानी त्यांच्या सदस्यांना, नागरीकांना आवाहन केले आहे.

याबाबत रेल्वे कृती समिती द्वारे आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका यांना निवेदन देवून इचलकरंजी शहरातील विविध शाळा व महाविद्यालयामध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनी व त्यांचे पालक यांना इचलकरंजी म.न.पा. च्या माध्यमातुन जास्तीत जास्त निवेदन पत्र पाठविण्याचे आवाहन करण्यात यावे अशी मागणी करणेत आली असून सदर जनजागृती मोहिम यशस्वी होणेकामी महानगरपालिका प्रशासनाचे सहाकार्य मिळावे अशी विनंती केली आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५७ /२०२२** दि. १८/१०/२०२२.

इचलकरंजी हे देशातील वस्त्रोद्योग व्यवसायातील अग्रेसर शहर असून शहर तसेच शहराच्या परिसरात उत्पादीत होणारे कापड देशाच्या विविध भागात पाठविणेसाठी तसेच शहरामध्ये देशाच्या विविध भागातून रोजगाराचे निमित्ताने येणारे मजूर, व्यावसायिक, तसेच शहरात उत्पादीत होणारे कापड तसेच व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल यांचे वाहतूकीसाठी इचलकरंजी शहरात रेल्वे सुविधा होणे अत्यावश्यक असलेने हातकणंगले ते इचलकरंजी रेल्वे मार्ग निर्मितीसाठी आवश्यक अर्थसंकलपीय तरतुद करणेसाठी मा.केंद्र शासनास विनंती करणेत येत आहे.

18/10/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका.

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्ताव: राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलकडील सहा.शिक्षक श्री.संजय बाबुराव कुंभार यांचा आपली एकच वेतनश्रेणी मध्ये १२ वर्षे सेवा पुर्ण झालेने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणे बाबत.

**प्रस्ताव**

मुख्यापक,रा.छ.शाहु हायस्कूल यांचे अहवालाप्रमाणे श्री.संजय बाबुराव कुंभार,सहा.शिक्षक यांनी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाकडील दिनांक १३/०५/१९९९ चे आदेशातील (१) प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची अर्हताकारी सेवा व (२) विहीत केलेले तीन आठवडयांचे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले असलेने त्याच प्रमाणे त्यांचे दिनांक १०/०६/२०१६ पासून वरिल वेतनश्रेणी देय आहे. सध्या ते S१४ - ३८६०० - १२२८०० ही वेतनश्रेणी घेत असून त्यांना दिनांक १०/०६/२०१६ पासून S१५ - ४१८०० - १३२३०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

याप्रमाणे वरिल वेतनश्रेणी देण्यास मा.प्रशासकीय ठराव करुन मंजुरीसाठी मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कोल्हापूर यांचेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. संबंधितांचे वेतन शिक्षण विभागाकडून अदा केले जात असलेने महानगरपरिषदेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

तरी वरिलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला आहे.

दि. ०२/११/२०२२

**प्रशासकीय ठराव क्र. ५२ /२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूलकडील सहा.शिक्षक श्री.संजय बाबुराव कुंभार यांची एकच वेतन श्रेणी मध्ये १२ वर्षे सेवा पुर्ण झालेने दिनांक १०/०६/२०१६ पासून S१५ - ४१८०० - १३२३०० ही वेतनश्रेणी देणेस मंजुरी देणेत येत असुन सदर वेतन शिक्षण विभागाकडून अदा करणेत यावे तसेच सदर वेतनश्रेणी देणेस मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कोल्हापुर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.

[signature] ०२/११/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इ.म.पा. हद्दीतीन थोरात चौक व रुणवाल टॉवर चौक स्वखर्चाने सुशोभिकरण करणेस परवानगी देणेबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी थोरात चौक येथील चौक सुशोभिकरण स्वखर्चाने करणेस महानगरपालिकेची परवानगी मिळणेबाबत चेअरमन, कोहीनुर सहकारी बँक लि. इचलकरंजी व अध्यक्ष सचिव श्री महेश नवयुवक मंडळ इचलकरंजी या दोन संस्थांनी मागणी आलेली आहे.

तसेच रुणवाल टॉवर येथील चौक सुशोभिकरण करणेस अध्यक्ष सचिव, श्री महेश नवयुवक मंडळ, इचलकरंजी यांनी मागणी केलेली आहे.

सदर मागणीस अनुसरुन प्र. नगररचनाकार यांचा अभिप्राय मागणी केला असता त्यांनी दि. ०२/०९/२०२२ रोजी त्यांचा अभिप्राय दिला असुन यामध्ये वाहतुकीस अडथळा होणार नाही याची खातरजमा करुन चौक सुशोभिकरण करण्यास हरकत नसलेचे नमुद केलेले आहे. चौक सुशोभिकरणासाठी प्राप्त अर्जाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | ठिकाण | अर्जदार | सुशोभिकरण तपशिल |
|---|---|---|---|
| १ | रुणवाल टॉवर येथील चौक | श्री. महेश नवयुवक मंडळ | परवानगी देणेस हरकत नाही |
| २ | थोरात चौक सुशोभिकरण | १) श्री. महेश नवयुवक मंडळ<br>२) कोहीनुर सहकारी बँक लि. | अस्तित्वात असलेल्या हायमास्ट जवळ बांधिव डिझाइनचे स्वतंत्र स्ट्रक्चर प्रस्तावित |
| | | | अस्तित्वात असलेल्या हायमास्ट हायमास्ट सभोवती वर्तुळकार बांधिव डिझाइनचे स्ट्रक्चर प्रस्तावित |

वरील तपशिल पाहता अ.क्र. १ मध्ये रुणवाल टॉवर येथील चौक सुशोभिकरण स्वखर्चाने करणेस अध्यक्ष सचिव, श्री. महेश नवयुवक मंडळ, इचलकरंजी यांना महानगरपालिकेची परवानगी देणेस हरकत नसलेबाबत तसेच अ.क्र. २ मध्ये नमुद थोरात चौक येथील चौक सुशोभिकरण करणे कामी सुशोभिकरणाचा तपशिल पाहता कोहिनुर सहकारी बँक लि. यांचेकडून होणा-या सुशोभिकरणामुळे येथील वाहतुकीस अडथळा होणार नसलेने थोरात चौक स्वखर्चाने सुशोभिकरण करणेस कोहिनुर सहकारी बँक लि. यांना परवानगी देणेबाबत इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५३ /२०२२** — **दि. ०२/११/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून वाहतुकीस अडथळा होणार नाही यास अधिन राहुन स्वखर्चाने खालील चौक सुशोभिकरण करणेस खालील अर्जदार यांना परवानगी देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण / सुशोभिकरण तपशिल | अर्जदार |
|---|---|---|
| १ | रुणवाल टॉवर येथील चौक | श्री. महेश नवयुवक मंडळ |
| २ | थोरात चौक सुशोभिकरण -<br>अस्तित्वात असलेल्या हायमास्ट हायमास्ट सभोवती वर्तुळकार बांधिव डिझाइनचे स्ट्रक्चर प्रस्तावित | कोहीनुर सहकारी बँक लि. |

(स्वाक्षरी) ०२/११/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिकेचे बोधचिन्ह संकल्पचित्राची (Logo) निवड करणेबा.

**प्रस्ताव**

नगरविकास विभागाकडील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३ प [illegible] म (२) व (२ए) नुसार दि. २९ जुन २०२२ रोजी प्रसिध्द झाले अधिसुचनेद्वारे इचलकरंजी नगर [illegible] रुपांतर महानगरपालिकेत झालेले आहे. इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वांना नव्याने अ [illegible] ावी व महानगरपालिकेचे कर्तव्य व भविष्यातील धोरणाविषयी सर्वसामान्य नागरीकांना माहिती [illegible] ाकरीता महानगरपालिकेचे आकर्षक व नाविण्यपुर्ण असे नविन बोधचिन्ह तयार करणेकामी मा. प्र [illegible] अधिकारी तथा प्रशासकसो यांचे आदेशानुसार समिती गठित करणेत आली होती.

सदर समिती मार्फत दि. ०८/०९/२०२२, दि. २३/०९/२०२२ व दि. १८/१०/२०२२ इ. रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये बोधचिन्ह निवड करणेकामी स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धमध्ये १५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धअंती ३ स्पर्धकांकडून अंतिम बोधचिन्ह (Logo Deisgns) घेणेत आले होते. सदर समितीमार्फत ३ संकल्पचित्राची निवड करुन या ३ स्पर्धकाचे एकत्रित संकल्पनेतुन अंतिम बोधचिन्ह साकारणेत आलेले असुन सदर बोधचिन्हाचा वापर इचलकरंजी महानगरपालिकेसाठी करणेचा आहे. अंतिम करणेत आलेले बोधचिन्ह खालीलप्रमाणे,

Multicolour | Single Colour Printing | Stamp & Sil

इचलकरंजी महानगरपालिकेसाठी १) राहुल बागडे, २) अजय माने, ३) निखील करोशी यांचे एकत्रित संकल्पनेतुन साकारणेत आलेले व या क्षेत्रातील तज्ञ श्री. पद्मांकात मुसळे यांची मदत घेवुन अंतिम करणेत आलेले बोधचिन्ह महानगरपालिकेचे बोधचिन्ह म्हणुन वापरणेस मंजुरी मिळणेकामी तसेच सदर स्पर्धेकरीता घोषित करणेत आलेले रक्कम रु. २५,०००/- रुपयाचे बक्षिस वरील तीन स्पर्धकामध्ये विभागुन देणेकामी प्रशासकीय ठराव होणेस विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र. ५४ /२०२२** दि. ०३/११/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेचे बोधचिन्ह संकल्पचित्राची (Logo) निवड करणेकामी इचलकरंजी महानगरपालिकेसाठी १) राहुल बागडे, २) अजय माने, ३) निखील करोशी यांचे एकत्रित संकल्पनेतुन साकारणेत आलेले व या क्षेत्रातील तज्ञ श्री. पद्मांकात मुसळे यांची मदत घेवुन वरीलप्रमाणे अंतिम करणेत आलेले बोधचिन्ह महानगरपालिकेचे बोधचिन्ह म्हणुन वापरणेस मंजुरी देणेत येत असुन सदर स्पर्धेकरीता घोषित करणेत आलेले रक्कम रु. २५,०००/- रुपयाचे बक्षिस उपरोक्त तीन स्पर्धकांमध्ये विभागुन देणेत यावे.

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील खालील अंदाजपत्रकांना मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ए झोन ट्रंकमेन भुयारी गटार योजना चालविणे व दुरुस्ती. | ३३,४५,८७०/- |
| २ | बी झोन ट्रंकमेन भुयारी गटार योजना चालविणे व दुरुस्ती. | ३२,३३,५७०/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागाकडील भुयारी गटारावरील मॅनहोल (चेंबर) मधील गाळ काढण्यासाठी अत्याधुनिक पध्दतीचा रोबट (एकुण २) खरेदी करणे. | ७९,०५,१३६/- |

तरी सदरचे विकास कामांच्या अंदाजपत्रकाना मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५५ /२०२२** **दि. १५/११/२०२२.**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून इ.म.पा. पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावात खालील अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत असुन आवश्यक त्याकामी तांत्रिक मंजुरी घेवून आर्थिक तरतुद पाहुन निविदा मागविणेत याव्यात.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | ए झोन ट्रंकमेन भुयारी गटार योजना चालविणे व दुरुस्ती. | ३३,४५,८७०/- |
| २ | बी झोन ट्रंकमेन भुयारी गटार योजना चालविणे व दुरुस्ती. | ३२,३३,५७०/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागाकडील भुयारी गटारावरील मॅनहोल (चेंबर) मधील गाळ काढण्यासाठी अत्याधुनिक पध्दतीचा रोबट (एकुण २) खरेदी करणे. | ७९,०५,१३६/- |

15/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

---

विषय : श्री.रमेश शिवाजी इंगवले, (निलंबित लिपिक) यांना वर्ग ४ च्या पदावर पदावनत करुन हजर करुन घेणेबाबत.

## प्रस्ताव

तत्कालीन नगरपरिषदेच्या मिळकत विभागाकडे कार्यरत असलेले श्री. रमेश शिवाजी इंगवले लिपीक टंकलेखक यांचेकडे मिळकत विभागाचे आधिनस्त असलेल्या सर्व कार्यालयांचे बुकींग करणे व भाडे वसुली करणेचे कामकाज सोपविणेत आले होते.सदर श्री. यांचेकडे याप्रमाणे जबाबदारीचे काम सोपविण्यात आले असताना शहरातील विविध नागरीकांना नगरपरिषद मालकीचे दुकाने गाळे तसेच घरकुले देणेचे आमिष दाखवून यापोटी श्री. इंगवले यांनी रक्कम घेतलेबाबत नगरपरिषदेकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने नगरपरिषद लेखापरिक्षण विभागाकडून श्री. इंगवले यांचे ताब्यातील सर्व दप्तर ताब्यात घेऊन त्याची तपासणी करुन लेखापरिक्षण विभागाने दि.२१/९/२०१९ व दि. २०/१२/२०१९ रोजी स्वतंत्रित्या अहवाल सादर केला होता. सदर दोन्ही अहवालानुसार श्री. इंगवले यांनी पदाचा दुरुपयोग करुन नगरपरिषदेच्या रु. १३,९६,३२०/- इतकी रक्कम नगरपरिषदेकडे भरणा न करता सदर रक्कमेचा अपहार केलेला होता.

वरीलप्रमाणे लेखापरिक्षण अहवालात सकृत दर्शनी दोषी आढळुन आलेने श्री. रमेश शिवाजी इंगवले लिपीक टंकलेखक यांना निलंबीत करणेत येवून त्यांच्यावर दि. ११/२/२०२१ रोजीचे दोषारोपपत्र बजावणेत येवून विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली होती.

श्री. रमेश शिवाजी इंगवले लिपीक यांना दोषारोप बजावले अंती श्री. इंगवले यांनी दि. १६/३/२०२१ रोजीचे बचावाचे दिले लेखी म्हणण्यामध्ये त्यांनी त्यांचेवर बजावणेत आलेले आरोप मान्य करुन (कबुल नामा)निलंबन आदेश रद्द करुन सेवेत हजर करुन घ्यावे तसेच अपहारीत रक्कमेवर व्याज घेऊ नयेत तसेच एफ.आर.आय. मागे घ्यावा अशी विनंती बचावाचे निवेदनात केलेली होती.

यावर तत्कालीन नगरपरिषदेचे अभियोक्ता व प्रस्तुत प्रकरणाचे चौकशी अधिकारी ॲड. मुकुंद आजरेकर यांचेकडे श्री. इंगवले यांचे बचावाचे निवेदनावर दि. १९/३/२०२१ अन्वये अभिप्राय मागणी केला असता, ॲड. आजरेकर यांनी "श्री. इंगवले यांची सध्याची शारिरीक व मानसिक परिस्थितीचा विचार करता नियमाप्रमाणे होणारी अपहाराची सर्व रक्कम भरुन घेऊन हा विषय सभागृहापुढे ठेवून सहानुभूती दाखवून त्यांना सौम्य स्वरुपाची शिक्षा अथवा दंडात्मक कारवाई करता येईल " असा अभिप्राय दिलेला होता. त्यास अनुसरून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ व त्यातील पोट नियम (दोन ) (४) व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नियम ९ नुसार जबरी शास्ती करणे व अपहारीत रक्कम व्याजासह वसुलात आणणेबाबतचा प्रस्ताव तत्कालीन न.प.च्या मा. स्थायी समितीकडे सादर केला होता,

उपरोक्त प्रस्तावावर तत्कालीन न.प.च्या मा. स्थायी समिती सभा ठराव नंबर १५ दि. २५/६/२०२१ अन्वये "(१) श्री. रमेश शिवाजी इंगवले लिपीक यांची शारिरीक स्थिती विचारात घेता, अपहाराची सर्व रक्कम त्यांच्याकडून स्टेट बँकेच्या चालू व्याजदराप्रमाणे वसुल करावी. (२) श्री. इंगवले यांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ (३) व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम १९७९ नियम (५) (शिक्षा) यानुसार चतुर्थश्रेणीतील पदावर पदावनत करणेची शास्ती करणेत येत असुन पदावनत करणेत आले नंतर पदावनत पदावरील वेतनवाढी रोखणेची शास्तीही करणेत येत आहे. (३) श्री.इंगवले यांनी अपहाराची रक्कम व्याजासह भरल्यानंतर सरकारी वकील यांचे सल्ल्याने त्यांचे विरुध्द दाखल करणेत आलेला फौजदारी गुन्हा मागे घ्यावा " असा निर्णय झालेला आहे.

श्री.इंगवले यांनी अपहाराची रक्कम व त्यावरील व्याज याप्रमाणे एकूण रक्कम रू.१५,८५,९४८/- पावती नं.३२/००३१३१ दिनांक ०३.०६.२०२२ ने लेखा विभागाकडे भरणा केलेली आहे.

CamScanner

तत्कालिन म.स्थायी समितीचे शिफारशी नुसार कार्यवाही होणेबाबत मा.आयुक्तसो यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता मा.आयुक्तसो यांनी सदर प्रस्ताव म.निलंबन आढावा समिती समोर सादर करणेबाबत आदेशित केले होते.

त्यानुसार श्री.इंगवले हे सेवेत दि.८/१०/१९८६ रोजी कुली (मजुर) या पदावर नियुक्त झाले आहेत. त्यांना दि.२३/७/२००८ चे आदेशाने लिपिक टंकलेखक पदावर पदोन्नती देणेत आलेली आहे.सद्या इंगवले यांना लिपिक पदावरुन निलंबित करणेत आले आहे.त्यांना पदावनत करावयाचे झालेस त्यांचे सेवा प्रवेशाचे पद कुली (मजुर) (चतुर्थश्रेणी) वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० व सातव्या वेतन आयोगानुसार रु.रु.१८०००-५६९०० (एस - ३) या वेतनश्रेणीमध्ये पदावनत करणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव निलंबन आढावा समितीसमोर सादर करणेत आला होता.

दि.४/११/२०२२ रोजी झालेल्या निलंबन आढावा समितीमध्ये श्री.इंगवले यांना त्यांचे सेवा प्रवेशाचे पद कुली (मजुर) (चतुर्थश्रेणी) सहाव्या वेतन आयोगानुसार रु.रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० व सातव्या वेतन आयोगानुसार रु.रु.१८०००-५६९०० (एस ३) या वेतनश्रेणीमध्ये पदावनत करणेस मान्यता देणेत आली.तसेच त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी गणनेस व पदावनत पदावरील वेतनवाढी रोखणेची शास्ती करणेस मान्यता देणेत आली आहे.

तरी निलंबन आढावा समितीचे दि.४/११/२०२२ चे बैठकीतील निर्णयानुसार श्री.रमेश शिवाजी इंगवले, (निलंबित लिपिक) यांना त्यांचे सेवा प्रवेशाचे पद कुली (मजुर) (चतुर्थश्रेणी) सहाव्या वेतन आयोगानुसार रु.रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० व सातव्या वेतन आयोगानुसार रु.रु.१८०००-५६९०० (एस ३) या वेतनश्रेणीमध्ये पदावनत करुन हजर करुन घेणेस तसेच त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी गणनेस व पदावनत पदावरील वेतनवाढी रोखणेची शास्ती करणेबाबतचा प्रस्ताव कार्यालयाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५६ /२०२२** **दि. १५/११/२०२२**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन निलंबन आढावा समितीचे दि.४/११/२०२२ चे बैठकीतील निर्णयानुसार श्री.रमेश शिवाजी इंगवले, (निलंबित लिपिक) यांना त्यांचे सेवा प्रवेशाचे पद कुली (मजुर) या चतुर्थश्रेणी पदावर सहाव्या वेतन आयोगानुसार रु.रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० व सातव्या वेतन आयोगानुसार रु.रु.१८०००-५६९०० (एस ३) या वेतनश्रेणीमध्ये पदावनत करुन हजर करुन घेणेस तसेच त्यांचा निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी गणनेस व पदावनत पदावरील वेतनवाढी रोखणेची शास्ती करणेत येत आहे.

१५।११।२०२२
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिकेच्या बालवाडीकडील मुला व मुलींना गणवेश,बुट,सॉक्स व शैक्षणिक साहित्य पुरविणे.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिका कडून कार्यरत असलेल्या एकुण ५ बालवाडी मधील सन २०२२-२०२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या ३ ते ६ वयोगटातील मुला व मुलींना महानगरपालिका मार्फत हाफ शर्ट, हाफ पॅन्ट, पिनो फ्रॉक, एम्ब्रॉयडरीसह, बुट, सॉक्स इत्यादी गणवेश व रंगनगरी चित्रकला लहान, रंगजगत मोठा गट, चित्रसंवाद, अंकमित्र मराठी व इंग्रजी, अक्षरदीप, पॅटर्न वर्ड सेमी, अल्फाबेट A to Z तसेच सॅक, पाटी, पाटी पेन्सील पुडा, रंगीत तेलकट खडू, खोडरबर, फुटपट्टी, टिफिन बॉक्स, टिफिन बॅग, पेन्सील, वॉटर बॅग इत्यादी शैक्षणिक साहित्य पुरविणेकामी दै.तरुणभारत मध्ये दि.०७/०८/२०२२ इ.रोजी शाळा व्यवस्थापन समिती इमपा बालवाडी विभागाकडून मार्केटमधुन कोटेशन मागविणेत आले होते. याकामी कादरीया ट्रेडर्स, महालक्ष्मी एंटरप्रायझेस, मुनलाईट कलेक्शन व शौर्य एंटरप्राईजेस यांचे कोटेशन प्राप्त झाले आहे. प्राप्त कोटेशन नुसार वरील नमुद काम पुर्ण करणेकामी अंदाजे रक्कम रु.८,२१,३४५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकास व सर्वात कमी दराचे प्राप्त पुरवठाधारक यांना कार्यादेश देणेस मे.शाळा व्यवस्थापन समिती ठराव नं.०६ दि.१५/०९/२०२२ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदरची रक्कम शाळा व्यवस्थापन समिती, इमपा बालवाडी विभाग यांचे नांवे वर्ग करणेस सचिव, यांनी दि.१९/०९/२०२२ च्या रिपोर्टान्वये मागणी केलेली आहे.

तरी शासन निर्णय क्रमांक - एमयुएम-२०२१/प्र.क्र.३८५/ नवि-१७ दि.२९ मार्च २०२२ मधील विवरणपत्र " ब " बालकांकरीता नागरी अंमलबजावणी करावयाच्या योजना मधील अ) मुद्दा क्र.४ नुसार इचलकरंजी महानगरपालिका बालवाडीकडील मुला व मुलींना गणवेश, बुट, सॉक्स व शैक्षणिक साहित्य पुरविणे कामी अंदाजपत्रक रक्कम रु.८,२१,३४५/- यास व सदरची शाळा व्यवस्थापन समिती, बालवाडी महानगरपालिका यांचे नांवे वर्ग करणेस महासभेची मंजूरी आवश्यक आहे. महिला बालकल्याण निधी या बजेट हेडवर रक्कम रु.४१.०० लाख तरतुद करणेत आलेली आहे. सदर कामी मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय मिळाला असुन सदरकामी अंदाजपत्रकास व सदरची रक्कम वर्ग करणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५७ /२०२२** **दि. १५/११/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन उपरोक्त शासन निर्णयान्वये इचलकरंजी महानगरपालिकेच्या बालवाडीकडील मुला व मुलींना गणवेश,बुट,सॉक्स व शैक्षणिक साहित्य पुरविणे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.८,२१,३४५/- यास मंजुरी देणेत येत असुन महिला बालकल्याण निधी या बजेट हेडवरील र.रु. ८,२१,३४५/- इतकी रक्कम शाळा व्यवस्थापन समिती , बालवाडी महानगरपालिका या हेडवर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

15/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास योजना इचलकरंजी ( मंजुर ) आरक्षण क्र.I/२३- चिल्ड्रन प्ले-ग्राऊंड, ( Children Ply Ground ) सि.स.नं. ९२२५,९२५०/१, ९२५०/२ ९२५०/३, ९२५०/४ पैकी आरक्षणाचे क्षेत्र- अंदाजे ९००.०० चौ.मी.क्षेत्राचे संपादन होणेकरिता प्रशासकीय ठराव होणे बाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - सुवास्तु कन्ट्रक्शन प्रा.लि. याचेतर्फे अॅड श्री.एम.वाय सहस्त्रबुध्दे यांची दि. १७/१०/२०२२ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची खरेदी सुचना

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस /२१११/१३५२/प्र.क्र.१९/१२ / डी.पी. सॅन्क्शन/युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असून दि.१०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे. उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र.I/१२- चिल्ड्रन प्ले-ग्राऊंड, ( Children Play Ground ) या आरक्षणाने बाधीत होणा-या इचलकरंजी सि.स.नं.९२२५, ९२५०/१, ९२५०/२,९२५०/३,९२५०/४ पैकी मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरिता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालनुसार आरक्षण क्र.I/२३- चिल्ड्रन प्ले - ग्राऊंड, ( Children Play Ground ) या आरक्षणाने बाधीत होणा-या इचलकरंजी सि.स.नं.९२२५, ९२५०/१, ९२५०/२,९२५०/३,९२५०/४ पैकी मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र हे ९००.०० चौ.मी.इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे इचलकरंजी सि.स.नं.९२२५, ९२५०/१, ९२५०/२,९२५०/३,९२५०/४ पैकी मधील एकुण अंदाजे ९००.०० चौ.मी. इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब, आरक्षण क्र.I /२३ - चिल्ड्रन प्ले - ग्राऊंड, ( Children Play Ground ) चे संपुर्ण क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकरीता प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५८ /२०२२** — दि. १५/११/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार विकास योजना इचलकरंजी ( मंजुर ) आरक्षण क्र.I/२३- चिल्ड्रन प्ले-ग्राऊंड, ( Children Ply Ground ) चे संपुर्ण क्षेत्राकरीता सि.स.नं. ९२२५,९२५०/१, ९२५०/२, ९२५०/३, ९२५०/४ पैकी आरक्षणाचे क्षेत्र- अंदाजे ९००.०० चौ.मी.क्षेत्राचे भुसंपादन करणेस व सदरकामी येणा-या खर्चासही मंजुरी देणेत येत आहे.

15/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

**विषय:- इचलकरंजी महानगरपालिकेकरीता पदांचा नवीन आकृतीबंध आणि इचलकरंजी महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ शासनाचे मंजूरीस्तव सादर करणेबाबत**

प्रस्ताव-

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/ प्र.क्र.९६ / नवि-१८ दि. २९ जून, २०२२ अन्वये नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. मनपा-२०२२/ प्र.क्र.९६ (३)/ नवि-१८ दि. २९ जून, २०२२ ची प्रसिध्द करणेत आलेली आहे. याव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याचा कलम ३ चे पोटकलम (२) आणि पोटकलम २(A) नुसार इचलकरंजी नगरपरिषदेचे संपुर्ण क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या उद्देशाने अधिक मोठे नागरी क्षेत्र असेल आणि या अधिक मोठ्या क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाच्या उद्देशाने इचलकरंजी शहर महानगरपालिका या नावाने ओळखली जाणारी महानगरपालिका असेल असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे. यामुळे इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये झाले असून सदर महानगरपालिकेच्या कामकाजासाठी महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) लागू झालेला आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०५५ / वर्गीकरण / प्र.क्र. ३७९/०५ नवि-२४ दिनांक ०४ मे, २००६ अन्वये राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्याआधारे महानगरपालिका क्षेत्रांचे ३ सेवेत विभागणी करून ३८ पदांसाठी आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) नुसार इचलकरंजी महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी दिनांक ०४ मे, २००६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या ३ प्रकारच्या सेवांकरीता ३३ पदांच्या व एकुण ४२ जागांच्या आकृतीबंधास तातडीने मंजूरी मिळणेकरीता शासनाचे मंजूरीसाठी जा. क्र. इमपा / आयु.कार्या /८७६ /२०२२ दिनांक ०६/०७/२०२२ चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने शासन निर्णय क्र. मनपा २०२२/ प्र.क्र.९६/नवि-१८ दि.२७/०७/२०२२ अन्वये ३४ संवर्गातील ४३ पदांच्या आकृतीबंधास शासनाने तात्पुरत्या स्वरुपात मान्यता दिलेली आहे.

आता, वरीलप्रमाणे मंजूर ४३ पदांसह इचलकरंजी महानगरपालिकेकरीता, महानगरपालिकेची कार्ये व कर्तव्ये पार पाडणेसाठी आवश्यक अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांचा आकृतीबंध तयार करणेत आला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

प्रस्तावित आकृतीबंध, पद, वेतनश्रेणी व पदसंख्येचा गोषवारा

| अ. क्र. | विभाग | वेतनश्रेणी | वेतनश्रेणी कशाचे आधारे निश्चित केली | संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | आयुक्त | शासनाने निश्चित केलेप्रमाणे वेतनश्रेणी | | 1 |
| 2 | अतिरिक्त आयुक्त | S-23-67700-208700 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 | 1 |
| 3 | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | S-23-67700-208700 | | 1 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | मुख्य लेखापरीक्षक | S-23-67700-208700 | दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 1 |
| 5 | शहर अभियंता (स्थापत्य) | S-23-67700-208700 | | 1 |
| 6 | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | S-23-67700-208700 | | 1 |
| 7 | जल अभियंता / कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) | S-23-67700-208700 | | 1 |
| 8 | सहाय्यक संचालक नगररचना | S-23-67700-208700 | | 1 |
| 9 | वैद्यकीय अधिक्षक | S-23-67700-208700 | शासन आरोग्य विभागाकडील दिनांक 2/08/2017 मधील निर्णयानुसार | 6 |
| | शल्य विशारद | S-23-67700-208700 | | |
| | स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ | S-23-67700-208700 | | |
| | बधिरीकरण शास्त्रज्ञ | S-23-67700-208700 | | |
| | भिषक | S-23-67700-208700 | | |
| | बालरोग तज्ञ | S-23-67700-208700 | | |
| 10 | आयु. वैद्यकीय अधिकारी | S-20-56100-177500 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 2 |
| 11 | वैद्यकीय अधिकारी /वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) | S-20-56100-177500 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 15 |
| 12 | उपायुक्त | S-20-56100-177500 | | 2 |
| 13 | मुल्यनिर्धारक कर संकलन अधिकारी | S-20-56100-177500 | | 1 |
| 14 | नगरसचिव | S-20-56100-177500 | | 1 |
| 15 | उपअभियंता (स्थापत्य) | S-20-56100-177500 | | 5 |
| 16 | उपअभियंता (विद्युत) | S-20-56100-177500 | | 1 |
| 17 | उपअभियंता (यांत्रिकी) | S-20-56100-177500 | | 1 |
| 18 | नगररचनाकार | S-20-56100-177500 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 1 |
| 19 | मुख्य अग्निशमन अधिकारी | S-20-56100-177500 | | 1 |
| 20 | पशुशल्य चिकित्सक | S-20-56100-177500 | | 1 |
| 21 | पर्यावरण संवर्धन अधिकारी | S-20-56100-177500 | | 1 |
| 22 | परिवहन व्यवस्थापक | S-20-56100-177500 | | 1 |
| 23 | शिक्षणाधिकारी | S-20-56100-177500 | | 1 |
| 24 | सिस्टीम मॅनेजर (ई-प्रशासन) | S-20-56100-177500 | दिनांक 27/07/2022 चे शासन निर्णयान्वये S15 वेतनश्रेणी मंजूर तथापि वेतनश्रेणी उन्नत करून प्रस्तावित | 1 |
| 25 | लेखा अधिकारी | S-16-44900-142400 | | 1 |
| 26 | प्रशासन अधिकारी (शिक्षण | S-15-41800-132300 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 2 |
| 27 | सहायक आयुक्त | S-15-41800-132300 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 8 |
| 28 | विधी अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 29 | कामगार अधिकारी | S-15-41800-132300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 30 | माहिती व जनसंपर्क अधिकारी | S-15-41800-132300 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 1 |
| 31 | महिला व बालविकास अधिकरी | S-15-41800-132300 | | 1 |
| 32 | समाज विकास अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 33 | सुरक्षा अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 34 | नगरउपसचिव | S-15-41800-132300 | | 1 |
| 35 | मुख्य उद्यान अधिक्षक | S-15-41800-132300 | | 1 |
| 36 | उपमुख्य लेखापरीक्षक | S-15-41800-132300 | | 1 |

CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 37 | सहायक नगररचनाकार | S-15-41800-132300 | | 4 |
| 38 | सहायक अग्निशमन अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 39 | क्रिडा अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 40 | सिस्टीम अॅनालिस्ट | S-15-41800-132300 | | 1 |
| 41 | उप परिवहन व्यवस्थापक | S-15-41800-132300 | | 1 |
| 42 | आगार व्यवस्थापक | S-15-41800-132300 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 1 |
| 43 | सांख्यिकी अधिकारी | S-15-41800-132300 | | 1 |
| 44 | सहा. मुल्यनिर्धारक कर संकलन अधिकारी | S-15-41800-132300 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 1 |
| 45 | सहा. अधिसेविका (असि. मेट्रन) | S-15-41800-132300 | शासन आरोग्य विभागाकडील दिनांक 2/08/2017 मधील निर्णयानुसार | 1 |
| 46 | अधिक्षक | S-14-38600-122800 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 22 |
| 47 | कनिष्ठ अभियंता (पाणीपुरवठा/ स्थापत्य/ विद्युत /कर/ यांत्रिकी/ हार्डवेअर व नेटवर्क/सॉफ्टवेअर/ कॉम्प्यु. प्रोग्रामर) शाखा अभियंता | S-14-38600-122800<br>S-15-41800-132300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 24 |
| 48 | अग्निशमन केंद्र अधिकारी (स्टेशन ऑफिसर) | S-14-38600-122800 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 4 |
| 49 | सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी | S-14-38600-122800 | शासन निर्णय क्र. मनपा-2022/प्र.क्र.96/नवि-18 दिनांक 27/07/2022 ने मंजूर | 1 |
| 50 | सहा. विधी अधिकारी | S-14-38600-122800 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 2 |
| 51 | परिसेविका (सिस्टर) | S-14-38600-122800 | शासन आरोग्य विभागाकडील दिनांक 2/08/2017 मधील निर्णयानुसार | 2 |
| 52 | लघुलेखक (निम्नश्रेणी) | S-13-35400-112400 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 3 |
| 53 | उपलेखापाल | S-13-35400-112400 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 5 |
| 54 | वाहन अधिक्षक | S-13-35400-112400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 55 | मुख्य स्वच्छता निरीक्षक | S-13-35400-112400 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 4 |
| 56 | वैद्यकीय समाजिक कार्यकर्ता (मेडिकल सोशल वर्कर) | S-13-35400-112400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 57 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | S-13-35400-112400 | शासन आरोग्य विभागाकडील दिनांक 2/08/2017 मधील निर्णयानुसार | 9 |
| 58 | अधिपरिचारीका (स्टाफ नर्स) | S-13-35400-112400 | | 20 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 59 | सहा. क्रिडा अधिकारी | S-13-35400-112400 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 1 |
| 60 | सहा. अंतर्गत लेखापरीक्षक | S-13-35400-112400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 61 | इलेक्ट्रीक सर्व्हीस ऑपरेटर | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 62 | साऊंड सिस्टीम ऑपरेटर | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 63 | गाळणी निरीक्षक | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 64 | ऑप्थॉल्मिक असिस्टंट | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 65 | क्ष- किरण वैज्ञानिक अधिकारी | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 66 | औषध निर्माण अधिकारी | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 11 |
| 67 | कंपौंडर | S-10-29200-92300 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 68 | आरेखक (ड्राफ्ट्समन) | S-8-25500-81100 | शासन निर्णय दिनांक 16/03/2021 ने मंजूर पनवेल म.न.पा. आकृतीबंधानुसार | 3 |
| 69 | ग्रंथपाल | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 70 | वरिष्ठ लिपीक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 31 |
| 71 | लघुटंकलेखक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 2 |
| 72 | प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडींग फायरमन) | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 12 |
| 73 | बालवाडी शिक्षीका | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 7 |
| 74 | उद्यान पर्यवेक्षक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 75 | सर्व्हेअर | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 2 |
| 76 | मेकॅनिक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 3 |
| 77 | आरोग्य सहायक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 16 |
| 78 | बहुउद्देशिय कर्मचारी (MPW)/ आरोग्य निरीक्षक/ स्वच्छता निरीक्षक | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 20 |
| 79 | ऑपरेशन थिएटर असिस्टंट | S-8-25500-81100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 80 | अनुरेखक (ट्रेसर) | S-7-21700-69100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 2 |
| 81 | गाळणी चालक/ प्रयोगशाळा सहायक | S-7-21700-69100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 5 |
| 82 | सहा ग्रंथपाल | S-7-21700-69100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 83 | दूरध्वनी चालक | S-7-21700-69100 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 4 |
| 84 | स्विय सहायक/ लिपीक/ उपमहापौर कार्यालय लिपीक/ सभापती स्थायी समिती कार्यालय लिपीक /गट नेता लिपीक /विरोधी पक्षनेता लिपीक/ सभागृह नेता लिपीक/ बिट निरीक्षक/ रोखपाल / लिपीक टंकलेखक/ सी.सी.टी.व्ही ऑपरेटर / वायरलेस ऑपरेटर/ डाटा एन्ट्री ऑपरेटर /वॉर्ड इन्स्पेक्टर | S-6-19900-63200 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 229 |
| 85 | वीजतंत्री/ वायरमन/ तारतंत्री/ मोटर वायरमन/ इलेक्ट्रीशियन | S-6-19900-63200 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 15 |
| 86 | फिटर/फिटर (यांत्रिकी)/प्लंबर | S-6-19900-63200 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 11 |
| 87 | वाहन चालक/ वाहन चालक कम ऑपरेटर (यंत्रचालक) | S-6-19900-63200 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 92 |
| 88 | वाहक | S-6-19900-63200 | | 10 |
| 89 | पंप ऑपरेटर/पंप अटेंडंट | S-6-19900-63200 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 10 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 90 | ड्रेसर / वॉर्डबॉय कम ड्रेसर | S-5-18000-56900 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| 91 | अग्निशमन विमोचक (फायरमन) | S-5-18000-56900 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 98 |
| 92 | हवालदार नाईक | S-3-16600-52400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 3 |
| 93 | क्लिनर | S-5-18000-56900 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 10 |
| 94 | बालवाडी दायी | S-3-16600-52400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 11 |
| 95 | बागमाळी | S-3-16600-52400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 30 |
| 96 | मुकादम | S-3-16600-52400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 30 |
| 97 | टर्नकी | S-3-16600-52400 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 4 |
| 98 | शिपाई/ सायकलस्वार/ अटेंडन्ट | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 173 |
| 99 | मजूर | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 154 |
| 100 | व्हॉलमन | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 3 |
| 101 | वॉचमन/ वॉचमन कम कामाठी/ चौकीदार | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 73 |
| 102 | वॉर्डबॉय / वॉर्ड सर्व्हंट / कक्षसेवक /आया / स्वयंसेविका /परटीन/ धोबी/ शस्त्रक्रियागृह परिचर | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 24 |
| 103 | सफाई कामगार | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1210 |
| 104 | वेल्डर | S-1-15000-47600 | न. प. मंजूर आकृतीबंधानुसार | 1 |
| | एकुण | | | 2501 |

याप्रमाणे एकुण २५०१ पदांच्या आकृतीबंधामध्ये वर्ग १ च्या ३२, वर्ग २ च्या ४६, वर्ग ३ च्या ६९७ आणि वर्ग ४ च्या १७२६ पदांचा समावेश असून सदरचा आकृतीबंध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१, ५२ व ५३ मधील तरतुदीनुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेने शासनाच्या मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे उक्त आकृतीबंधातील पदासाठीचे सेवा प्रवेश नियम तयार करून यासोबत सादर केलेले आहेत. सदरचे सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५४ अन्वये तयार करून अधिनियमाचे ४५५, ४५६, ४५७ व ४६५ नुसार शासनाचे मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिकेकरीता पदांचा नवीन आकृतीबंध (परिशिष्ट १ ते ६ ) आणि इचलकरंजी महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ तयार करण्यात आले आहेत. (प्रत संलग्न)

उक्त इचलकरंजी महानगरपालिकेकरीता पदांचा नवीन आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांना मा. प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता मिळून शासनाकडे मंजूरीसाठी सादर करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> ५९ /२०२२ दिनांक १७/११/२०२२.

वरीलप्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी महानगरपालिकेकरीता २५०१ पदांचा नवीन आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांना मंजूरी देणेत येत असून सदरचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम शासनाच्या मंजूरीसाठी सादर करणेसही मंजूरी देणेत येत आहे.

17/11/2022

( सुधाकर देशमुख )
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: अमृत प्रोत्साहन अभियान अंतर्गत प्राप्त निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोगाबाबत.

**प्रस्ताव**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेस अमृत प्रोत्साहन अभियान अंतर्गत निधी प्राप्त झालेला आहे. उपरोक्त निधीपोटी सद्या रक्कम रु. २४ लाख इतका निधी शिल्लक असुन बँक खातेवर व्याजासह रक्कम रु. १.७८ कोटी इतका निधी शिल्लक दिसुन येतो. सबब उपरोक्त अमृत प्रोत्साहन अभियान अंतर्गत नगरपरिषदेस १.५४ कोटी रक्कम व्याजापोटी प्राप्त झालेली आहे. मे. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-३४१६/ प्र.क्र. ४०/ नवि -४ दि. १४/०९/२०२० चे परिपत्रकाप्रमाणे नगर विकास विभागाकडील विविध योजनांमध्ये मंजुर करणेत येणा-या निधीवरील प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम त्या त्या योजनेसाठी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वापरण्यास मुभा राहील असे नमुद आहे. याकामी मुळ योजनेतील निधीकरीता लागू असलेल्या सक्षम प्राधिका-याकडून प्रशासकीय मान्यता घेणं आवश्यक आहे.

सद्या इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर इचलकरंजी शहर महानगरपालिका असे झालेले आहे. सबब उपरोक्त प्रकरणी अमृत प्रोत्साहन योजनेवरील व्याजाचा निधी खर्च करणेकामी महानगरपालिका स्तरावर मा. आयुक्त यांची प्रशासकीय मंजुर आवश्यक आहे.

सबब अमृत प्रोत्साहन योजनेच्या व्याजाच्या निधीतुन शासन निर्णय क्र. अमृत-२०१७/ प्र.क्र. २८/ नवि-३३ दि. २५/०१/२०१७ नुसार अमृत अभियान सुधारणांच्या (Reform) अंमलबजावणी पुर्तता अंतर्गत ई-गव्हर्नन्सचा समावेश आहे. त्या अन्वये महानगरपालिकेस कार्यालयीन कामकाजास्तव संगणक खरेदी करणे ही बाब अनुज्ञेय होतं. सबब अमृत प्रोत्साहन योजनेचा निधी अधिक त्यावरील व्याज अशी रक्कम रु. १,७८,००,९१५/- इतकी रक्कम बँक खात्यावर शिल्लक आहे. या रक्कमेतुन शासन परिपत्रक दि. १४/०९/२०२० मधील तरतुदीनुसार व्याजाचा निधी खर्च करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.६० /२०२२** **दि. १७ /११/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन मे. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-३४१६/ प्र.क्र. ४०/ नवि -४ दि. १४/०९/२०२० चे परिपत्रकान्वये अमृत प्रोत्साहन अभियान अंतर्गत प्राप्त निधीतील व्याजाच्या निधीतुन शासन निर्णय क्र. अमृत-२०१७/ प्र.क्र. २८/ नवि-३३ दि. २५/०१/२०१७ नुसार अमृत अभियान सुधारणांच्या (Reform) अंमलबजावणी पुर्तता अंतर्गत खर्च करणेस मंजुरी देणेत येत आहे.

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# <u>इचलकरंजी महानगरपालिका.</u>

---

प्रस्तावः मौजे शहापूर गट नं.३८५ पै.३८९ पै.आरक्षण क्र.IV/३० जमिनीबाबत.

**<u>प्रस्ताव</u>**

संदर्भ- श्री. अनिल आण्णसो नेमिष्टे व इतर इचलकरंजी यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये ची दि.३१/१०/२०२२ रोजीची नोटीस.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस/२१११/१३५२/प्र.क्र.१९/१२/डि.पी. सॅन्क्शन/युडी-१३ दि. २४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि. १०/०७/२०१२ रोजीपासुन अंमलात आहे.

उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र. IV/३० क्रिडांगण या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापुर गट नं. ३८५ पै, ३८९ पै, ३९० पै, मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र. IV/३०- क्रिडांगण हे शहापुर गट नं. ३८३, ३८५, ३८९ ते ३९२ सि.स.न. १९५२२ ते १९५२५ मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र हे १ हेक्टर ७५ आर इतके आहे. खरेदीसुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे उपरोक्त आक्षणाने एकुण १ हेक्टर ४० आर इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब, आरक्षण क्र. V/१४ क्रिडांगण चे संपुर्ण क्षेत्राकरीता म्हणजेच १ हेक्टर ७५ आर चे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र. ६१ /२०२२</u>** **<u>दि.१७ /११/२०२२</u>**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीन्वये आरक्षण क्र. IV/३०- क्रिडांगण हे शहापुर गट नं. ३८३, ३८५, ३८९ ते ३९२ सि.स.न. १९५२२ ते १९५२५ मध्ये समाविष्ठ असुन आरक्षणाचे एकुण १ हेक्टर ७५ आर इतक्या क्षेत्रास भुसंपादन करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

17/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्तावः मौजे शहापूर गट नं.२८२ पै.२८३ पै.आरक्षण क्र.IV/४५ जमिनीबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ- श्री. जोतीबा, प्रकाश बापूसाहेब नेमिष्टे व इतर रा.इचलकरंजी यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये ची दि.३१/१०/२०२२ रोजीची नोटीस.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस / २१११/ १३५२/ प्र.क्र.१९/ १२/ डी.पी.सॅन्वशन/युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि.१०/०७/२०१२ रोजीपासुन अंमलात आहे.

उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र.V/४५- प्राथमिक शाळा व क्रिडांगण या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापुर गट नं.२८२ पै.२८३ पै.मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरिता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे. विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र.V/४५ प्राथमिक शाळा व क्रिडांगण हे शहापुर गट नं.२८२ पै.,सि.स.नं.१८७०३ पै.,१८७०४ पै.मध्ये समाविष्ठ होत असुन आरक्षणाचे एकुण क्षेत्र ४९ आर इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे उपरोक्त आरक्षणाने एकुण ४९ आर इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब, आरक्षण क्र.V/४५- प्राथमिक शाळा व क्रिडांगण चे संपुर्ण क्षेत्राकरिता म्हणजेच ४९ आर चे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरिता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकरीता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६२ /२०२२** **दि. १७ /११/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन ी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीन्वये आरक्षण क्र.V/४५ प्राथमिक शाळा व क्रिडांगण हे शहापुर गट नं.२८२ पै.,सि.स.नं.१८७०३ पै.,१८७०४ पै.मध्ये समाविष्ठ होत असुन आरक्षणाचे एकुण क्षेत्र ४९ आर इतके संपुर्ण क्षेत्र भुसंपादन करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

17/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः मौजे शहापूर गट नं.३८५ पै.३८७ पै.आरक्षण क्र.IV/२९ जमिनीबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ- श्री.प्रदिप केशव नेमिष्टे व इतर रा.इचलकरंजी यांची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये ची दि.३१/१०/२०२२ रोजीची नोटीस.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस /२१११/१३५२/प्र.क्र.१९/१२/डी.पी.सॅन्क्शन /युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असून दि.१०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे.

उक्त विकास योजनेतील आरक्षण क्र.IV/२९- गार्डन या आरक्षणाने बाधीत होणा-या शहापुर गट नं.३८५ पै.३८९ पै.३८७ पै.मधील अर्जदार यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता संदर्भिय खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावली आहे. विकास योजना अहवालनुसार आरक्षण क्र. IV/२९ - गार्डन हे शहापुर गट नं. ३८३, ३८५ ते ३८९ पै.ते ३९२, सि.स.नं.१९३२७, १९४२८, १९४२२ पै. १९५५५ ते १९२५७ मध्ये सामाविष्ठ होत असुन आरक्षणाचे एकुण क्षेत्र ३७ आर इतके आहे. खरेदीसुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे उपरोक्त आरक्षणाने एकुण २० आर इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब आरक्षण क्र.IV/२९- गार्डन चे संपुर्ण क्षेत्राकरिता म्हणजेच ३७ आर चे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरिता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकरिता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६३/२०२२** **दि. १७/११/२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन क्र.IV/२९- गार्डन चे संपुर्ण क्षेत्राकरिता म्हणजेच ३७ आर चे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेस व त्याकामी येणा-या खर्चासही मंजुरी देणेत येत आहे.

[signature] 17/11/2022

(सुधाकर देशमुख)

प्रभारी अधिकारी तथा प्रशासक

इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

---

प्रस्ताव : महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टिकोनातुन विविध शुल्क व अधिमुल्य यांची फेररचना व आकारणी करणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ – १. मा. आयुक्त यांचे दि. २१/१०/२०२२ रोजीचे आढावा बैठकीतील दिलेले आदेश.

इचलकरंजी शहराची विकास योजना सुधारीत, भागशः सुधारीत व मुळ हद्द सुधारित व वाढीव हद्द सुधारित अनुक्रमे दि. २५/५/१९८१, दि. ५/३/१९९९, २४/५/२०१२ रोजी मंजुर झालेल्या आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१अअ) व कलम २०(४) अन्वये शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस-१८१८/सीआर-२३६/१८/डीपीवआरपी/कलम ३७(१अअ) (क) आणि कलम २०(४)/नवि-१३, दि. २/१२/२०२० अन्वये एकत्रीकृत विकास नियंत्रण नियमावली मंजुर केली असुन ती. ३/१२/२०२२ रोजीपासुन अंमलात आहे. उक्त विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीतसेच तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेतील प्रचलीत प्रध्दती विचारात घेऊन बांधकाम परवानगी प्रकरणी खालील बार्बीवर शुल्क आकारण्यात येत आहे.

१. विकास शुल्क २. बांधकाम उपकर ३. ॲन्सिलरी शुल्क
४. प्रिमियम शुल्क ५. वृक्षकर अनामत रक्कम

महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने मा. आयुक्त यांनी विविध शुल्क अधिमुल्य फेररचनेचा प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-५०१९/प्र.क्र. ११४/२०१९/नवि-२७ दि. २८/१०/२०२२ अन्वये नगररचना विभागामार्फत भाग नकाशा / झोन दाखले जनतेला उपलब्ध करुन देणेकामीच्या विद्यमान दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढीच्या दृष्टीने विविध शुल्कांची फेररचना होणे आवश्यक आहे. तसेच याकामी मा. आयुक्तांनी निर्देश दिलेले आहेत.

विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदी तसेच अन्य महानगरपालिकेतील प्रचलीत प्रध्दती विचारात घेऊन खालीलप्रमाणे महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणा-या विविध शुल्कांचा प्रस्ताव परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेनुसार तयार करणेत आलेला आहे.

**परिशिष्ट अ**

| अ.क्र. | बाब | | प्रचलित दर | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | विकास शुल्क | रहिवास<br>वाणिज्य<br>औद्योगीक | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ ब नुसार | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ ब नुसार |
| २ | वृक्षकर अनामत रक्कम | रहिवास | १०००/- | ३०००/- |
| | | वाणिज्य/ औद्योगीक | २०००/- | ६०००/- |
| ३ | बांधकाम उपकर | | रेडीकरनुसार बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीची किंमत वगळुन) १ टक्के दराने. | रेडीकरनुसार बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीची किंमत वगळुन ) १ टक्के दराने. |
| ४ | अनामत (शिथिलता मंजुर करावयाच्या प्रकरणी) भुखंडाचे क्षेत्र (चा.□□.)<br>अ. १००० पर्यंत<br>ब. १००१ ते २५००<br>क. २५०० ते १००००<br>ड. १०००० चे वर. | | निरंक | ५० रु. प्रती चा. मी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | नियमात शिथिलता देणे/ सामासिक अंतरात सुट देणे. (नियम २.४ नुसार रस्त्याकडील बाजु वगळून इमारतींचा वापर | रहिवास | निरंक | आवश्यक असलेल्या सामासिक अंतरामध्ये फक्त २० टक्के मर्यादेमध्ये सुट परंतु किमान सामासिक अंतर/ अग्निशमन दृष्टीकोनातुन आवश्यक सामासिक अंतराच्या अधिन राहुन दाटीवाटीच्या क्षेत्रासाठी चालु बाजारमुल्यदर तक्त्यातील जमीन दराच्या ३० टक्के किमान ५० हजार.तसेच, दाटीवाटीच्या बाहेरील क्षेत्रासाठी चालु बाजारमुल्यदर तक्त्यातील जमीन दराच्या ५० टक्के किमान १ लाख रुपये |
| | | औद्योगीक | निरंक | यंत्रमाग वापरासाठी जमिन दराच्या ५० टक्के किमान १ लाख रुपये. अन्य औद्योगीक वापरासाठी जमीन दराच्या ७५ टक्के किमान १.५० लाख रुपये. |
| | | वाणीज्य | निरंक | चालु बाजार मुल्यदर तक्त्यातील जमीनदराच्या १०० टक्के दराने किमान २ लाख रुपये. |
| | | मिश्र | निरंक | इमारतींचा प्रधान वापर विचारात घेऊन त्यानुसार बाजार मुल्यदर तक्त्यामधील जमीन दराच्या ७५ टक्के दराने किमान १ लाख रुपये. |
| ६ | मुदतवाढ प्रकरणी विलंब शुल्क | | १२०० रुपये/ प्रतिवर्ष. | एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. २.७.१. नुसार |
| ७ | रेखांकन विकास शुल्क | | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ ब नुसार | १. रहिवास वापरासाठी ८० रु./ चा. मी.<br>२. औद्योगीक वापरासाठी १२० रु./ चा. मी.<br>३. वाणिज्य वापरासाठी १६० रु./ चा. मी. |
| ८ | मंजुरी न घेता बांधकाम सुरु करणेत आले असेल व त्यास परवानगी अपेक्षिण्यात आली असेल<br>भुखंडाचे निव्वळ क्षेत्र (चा. चा. मी. )<br>अ. १००० पर्यंत<br>ब. १००१ ते २५००<br>क. २५०० ते १००००<br>ड. १०००० चे वर. | | निरंक | दाटीवाटीच्या क्षेत्रासाठी: अ. ३००००/- ब. ५००००/- क. ७५०००/- ड. १०००००/-<br>दाटीवाटीच्या क्षेत्राबाहेर: अ. ४००००/- ब. ६००००/- क. ८५०००/- ड. १२५०००/- |
| ९ | वापर दाखला न घेता जागेचा वापर सुरु करणेत आला असेल<br>१. निवासी.<br>२. औद्योगीक<br>३. वाणिज्य | | निरंक | १. १००००रु. /सदनिका.<br>२. २५००० रु. प्रती गाळा (२०० चा. मी. क्षेत्रापर्यंत) ७५ रु./ चा. मी. (२०० चा. मी. पेक्षा जास्त क्षेत्राकरिता)<br>३. ३००००रु. प्रती गाळा (२०० चा. मी. क्षेत्रापर्यंत) १७५ रु./ चा. मी. (२०० चा. मी. पेक्षा जास्त क्षेत्राकरिता) |
| १० | टिडीआर हस्तांतरण शुल्क | | निरंक | अ. ५०० चा. चा. मी. क्षेत्रापर्यंत २५००/-<br>ब. ५००चा. चा. मी. पेक्षा जास्त क्षेत्राकरिता- १० रु./ चा. चा. मी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | भाग नकाशा / झोन दाखला तपशिल | | |
| | नकाशा पुर्ण आकार २० X ३० से.मी. (A४ Size) | १००/- | ७००/- |
| | नकाशा ३० X ४५ से.मी. (A३ Size) | १२५/- | ११००/- |
| | नकाशा ४५ X ६० से.मी. (A२ Size) | १५०/- | १५००/- |
| | नकाशा ६० X ९० से.मी. (A१ Size) | १७५- | २५००/- |
| | नकाशा ७५ X १०५ से.मी. (A० Size) | २००/- | ६८००/- |
| | नगररचना योजनेतील एक अंतीम भुखंड व त्याचा मुळ भुखंड दर्शविणारा नकाशा | १००/- | ७००/- |
| | नगररचना योजनेतील दोन अंतीम भुखंड व त्यांचा मुळ भुखंड दर्शविणारा नकाशा | १५०/- | १५००/- |
| | नगररचना योजनेतील दोन पेक्षा अधिक अंतीम भुखंड व त्यांचा मुळ भुखंड दर्शविणारा नकाशा | २७५/- | २५००/- |
| | मंजुर नगररचना योजनेच्या योजना पुस्तकामधील एका अंतीम भुखंडाच्या उत्या-यासाठी | २००/- | २००/- |
| | मंजुर विकास योजनेमधील एक सि.सन. /रि.स.नं./ गट नं. च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी. | १००/- | ३००/- |
| | मंजुर रेखांकन /बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस प्रत) | २०/- प्रती | पत्राचे (आदेशाचे) — ५ रु. प्रती पान<br>नकाशा-<br>A४- ५० रु.<br>A३- १०० रु.<br>A२- १५० रु<br>A१- २०० रु. |
| | आरक्षण क्षेत्रफळ दाखला, वार्ड दाखला, गुंठेवारी लागु नसल्याचा दाखला/ जागा मन.पा. हद्दीमध्ये सामाविष्ठ बाबत व इत्यादी दाखले | १०० | ३०० |

वर नमुद तक्त्यातील अनुक्रमांक ७ मध्ये नमुद रेखांकन विकास शुल्क दरवाढीसाठी मा. शासनाची पुर्व मंजुरी घेणे अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक राहील, असे इकडील मत असुन वर दर्शविलेल्या तक्त्यातील शुल्क वाढीसाठी मान्यता घेणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६४ /२०२२** **दि. १७/११/२०२२.**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन विकास नियंत्रण नियमावली, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदी तसेच अन्य महानगरपालिकेतील प्रचलीत पध्दती विचारात घेऊन उपरोक्त् प्रस्तावात परिशिष्ट अ मध्ये नमुद अ.क्र. १ ते ११ नुसार महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टिकोनातुन विविध शुल्क व अधिमुल्य यांची प्रस्तावीत सुधारणांप्रमाणे फेररचना व आकारणी करणेस मंजुरी देणेत येत असून अनुक्रमांक ७ मध्ये नमुद रेखांकन विकास शुल्क दरवाढीसाठी मा. शासनाची पुर्व मंजुरी घेणेत यावी.

17/11/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी शहरासाठी कृष्णा नदीवरुन पाणी पुरवठा करणा-या योजनेतील अंतिम उर्वरीत दाबनलिका बदलणेकामीच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत करणेस मान्यता मिळणेस व निधी मंजुर होणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - जा.क्र.मु.अ.(पुणे)/ तांशा.३/ इचलकरंजी/ ता.मं./ ४००२ दि. १८/११/२०२२ अन्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत तांत्रिक मंजुरी

इचलकरंजी शहरासाठी मजरेवाडी कृष्णा उद्भवावरुन ५४ द.ल.लि. क्षमतेची पाणी पुरवठा योजना सन २००१ पासुन सध्या कार्यान्वित आहे. कालानुरुप सदर दाबनलिकेची आयुमर्यादा संपल्याने वारंवार गळती होत असलेने शहरास अपुरा पाणी पुरवठा होत आहे. याआधी सदर योजनेमधील एकुण जवह पास १८ कि.मी. पाईप लाईन मधील अनुक्रमे महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान अंतर्गत ६.२३५ कि.मी. पाईपलाईन व महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत ५.८०० कि.मी. अशी एकुण १२.०३५ कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणेचे काम इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत करणेत आलेले आहे.

सध्या मुळ योजनेतील उर्वरीत अंदाजे ५.८०० कि.मी. इतकी दाबनलिका जुनी असुन ती वारंवार गळती होऊन नादुरुस्त होत असलेने प्रशासनास नागरीक व माजी नगरसेवक यांच्या रोषास सामोरे जावे लागते. तसेच आज अखेर दोन टप्प्यात केलेल्या योजनेतील सुधारणेस अनुसरुन योजना पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत होणेस अडचण निर्माण होत आहे.

सदर उर्वरीत ५.८०० कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणेकामी तसेच अस्तित्वातील मजरेवाडी पाणी उपसा केंद्राचे सक्षमिकरण करणेकामी महानगरपालिकेमार्फत र.रु. २१,९५,६४,६००/- इतक्या किंमतीचा प्रस्ताव तयार करणेत आला असुन सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळाली आहे.

तरी सदर कामाची निकड पाहता सदर योजना होणे अत्यावश्यक असलेबाबत व उक्त प्रस्तावास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत निधी उपलब्ध होणेकामी मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आला आहे. सदरकामी इचलकरंजी महानगरपालिका स्व निधी हा १५ वा वित्त आयोग, महानगरपालिका स्व निधी अथवा तत्सम योजनेतुन भरावयास तयार आहे.

सबब सदर प्रस्तावानुसार संदर योजना महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत काम करणेस व स्व निधी हा १५ वा वित्त आयोग, महानगरपालिका स्व निधी अथवा तत्सम योजनेतुन भरावयास तयार असलेबाबाबत प्रशासकीय ठराव करणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६५ /२०२२** दि. ०६।१२।२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी शहरासाठी कृष्णा नदीवरुन पाणी पुरवठा करणा-या योजनेतील अंतिम उर्वरीत ५.८०० कि.मी. लांबीची दाबनलिका बदलणेकामी तसेच अस्तित्वातील मजरेवाडी पाणी उपसा केंद्राचे सक्षमिकरण करणेकामी महानगरपालिकेमार्फत र.रु. २१,९५,६४,६००/- इतक्या किंमतीच्या प्रस्तावास मंजुरी देणेत येत असुन सदर काम महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान

अभियान योजने अंतर्गत करणेस व उपरोक्तकामी स्व निधी हा १५ वा वित्त आयोग, महानगरपालिका स्व निधी अथवा तत्सम अन्य योजनेतुन भरणेस मान्यता देणेत येत आहे.

06/12/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास योजना इचलकरंजी (मंजुर) भुसंपादन, आरक्षण क्र. III/१-B-play ground व III/१ A shopping centre कबनुर गट नं. २६ पै, सि.स.न. २२४०३ आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०-८१ हे. आर क्षेत्राचे संपादन होणेकरीता प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस/२११९/१३५२/प्र.क्र. १९/१२/ डि.पी.सॅन्क्शन/युडी-१३ दि. २४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि. १०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे. सदर योजनेच्या वगळलेला भागाची विकास योजना (ई.पी.) दि. ०७/०१/२०१६ रोजी मंजुर झालेली आहे. उक्त विकास योजनेतील ई.पी.-१४ नुसार आरक्षण क्र. III/१-B- play Ground व III/१A Shopping centre या आरक्षणाने बाधीत होणा-या कबनुर गट नं. २६ पै, सि.स.न. २२४०३ मधील श्री. सुरेंद्र देव्वाप्पा केटकाळे व इतर १२ यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता दि. १८/११/२०२२ रोजी खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावली आहे.

विकास योजना अहवलानुसार आरक्षण क्र. III/१-B- Play ground व III/१A Shopping centre हे कबनुर गट नं. २६ पै. सि.स.न. २२४०३ मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र हे अंदाजे ०-८१ हे - आर इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे कबनुर गट नं. २६ पै. सि.स.न. २२४०३ मधील एकुण अंदाजे ९०२०.५ चौ.मी.इतके क्षेत्र बाधीत होते.

सबब आरक्षण क्र. III/१-B- play ground व III/१A Shopping centre चे अंदाजे ०-८१ हे-आर या संपुर्ण क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नविन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६६ /२०२२** **दि.** १६।१२।२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन आरक्षण क्र. III/१-B- play ground व III/१A Shopping centre चे अंदाजे ०-८१ हे-आर चे संपुर्ण क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेस व त्याकामी येणा-या खर्चासही मंजुरी देणेत येत आहे.

16/12/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

---

प्रस्ताव: अमृत प्रोत्साहन अभियान अंतर्गत प्राप्त निधीवरील व्याजाच्या रक्कमेचा विनियोगाबाबत.

**प्रस्ताव**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद कालावधीत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत न.प.फंडातून खालील कामे केलेली आहेत. त्यास मे.प्रशासकीय ठराव क्र.०९ दि.२५/०१/२०२२ तसेच मे.प्रशासकीय ठराव क्र.१९ दि.३०/०३/२०२२ ने मंजुरी मिळालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | पंचवटी चित्रमंदीर, तांबे माळ, सांगली नाका इ.न.प.पाण्याची टाकी व सार्वजनिक इमारतीच्या भिंती रंगविणे आणि प्रबोधनात्मक चित्रे काढणे. | ९,९४,२४९/- |
| २ | न.प. कचरा डेपोलगत मैला शुध्दकरण टाकी दर्शनी भाग व राजाराम स्टेडियम व न.प. जागा दर्शनी भाग रंगविणे व प्रबोधनात्मक चित्रे काढणे. | ९,९१,२४९/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **१९,८५,४९८/-** |

उपरोक्त देयके अदा करणे कामी **म.न.प.फंडामध्ये** निधी अपुरा आहे. सबब सदरची देयके अमृत अभियान अंतर्गत शिल्लक निधीतुन अदा करावयाची झालेस त्यास सुधारीत प्रशासकीय ठराव करणे आवश्यक आहे.

अमृत योजने अंतर्गत शासन निर्णय क्र.अमृत-२०१७ /प्र.क्र.२८ / नवि-३३ दि.२५/०१/२०१७ अन्वये प्रोत्साहन अनुदानाच्या वापरावयाच्या कार्यपध्दती मुद्दा क्र.३ (iv) मध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत अंतर्भुत घटकांसाठी खर्च करणेची मुभा आहे. सद्यस्थितीत अमृत योजनेच्या बँक खातेवर रक्कम रु.१.३८ कोटी इतका व्याजासह निधी शिल्लक आहे. तसेच मे.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -३४१६/ प्र.क्र.४०/नवि - ४ दि.१४/०९/२०२० चे अन्वये नगरविकास विभागाकडील विविध योजनामध्ये मंजूर करणेत येणा-या निधीवरील प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम ज्या त्या योजनेच्या अंतर्भुत घटकांवर खर्च करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने अमृत योजना प्रोत्साहन निधी अंतर्गत स्वच्छ भारत अभियान अंतर्भुत घटकावरील खर्चाची देयके निधीवरील शिल्लक व्याज रक्कमेतुन अदा करणेकामी प्रशासकीय मुंजुरीची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त अमृत प्रोत्साहन योजना निधीवरील शिल्लक व्याजाची रक्कमेतुन दि.१४/०९/२०२० शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे स्वच्छ भारत अभियानातंर्गत केलेली रक्कम रु.१९,८५,४९८/- ची देयके खर्च करणेकामी सदरचा प्रस्ताव इकडे सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८७ /२०२२** — **दि.** १६/१२/२०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन मे.शासन परिपत्रक क्र.संकीर्ण -३४१६/ प्र.क्र.४०/नवि -४ दि.१४/०९/२०२० अन्वये अमृत प्रोत्साहन योजना निधीवरील शिल्लक व्याजाच्या रक्कमेतुन स्वच्छ भारत अभियानातंर्गत प्रस्तावात नमुद अ.क्र. १ व २ केलेल्या कामांचे एकुण रक्कम रु.१९,८५,४९८/- इतकी देयके अदा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

१६/१२/२०२२

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: HWC साठी महानगरपालिकेकडील जागा मिळणे बाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ - १) राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग,पंचायत समिती, हातकणंगले यांचे कार्यालयांकडील जा.क्र./पसहा / वशि / ६१ / २०२२ दि.१५/०९/२०२२ चे पत्र.

२) या कार्यालयाकडील जा.क्र.मिळकत / १६ /प्र.क्र.१०/२०२२ दि.०१/११/२०२२ चे पत्र.

३) रा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी, इ.म.पा. यांचा दि.१४/११/२०२२ चा रिपोर्ट.

तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती, हातकणंगले यांनी उपरोक्त संदर्भिय पत्राने इचलकरंजी शहरासाठी यशवंत कॉलनी परिसर, जवाहर नगर स्वामी मळा पंचगंगा कारखाना परिसर व स्टार नगर आर के नगर येथील महानगरपालिकेची जागा मागणी केलेली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले यांनी ज्या परिसरामधील जागा मागणी केलेली आहे त्या परिसरामध्ये महानगरपालिका मालकीची कोणतीही बांधीव इमारत नसल्याने देता येणार नाही. असे तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये कळविणेत आलेले होते. परंतु रा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी इ.म.पा. यांनी संदर्भ क्र.३ नुसार Health Wellness Center सुरु करणेसाठी खालील जागा सुचविलेल्या आहेत.

१) म.न.पा. मालकीची व्यायाम शाळा, आसरा नगर गल्ली नं.५

२) म.न.पा. मालकीची अंगणवाडी इमारत पोष्ट ऑफिस बाजूला वॉ.नं.१८

३) म.न.पा. मालकीची राणी लक्ष्मीबाई शाळा क्र.१३ स्टार नगर वॉ.नं.२५

वरील नमुद ३ जागेपैकी अ.नं.३ बाबत प्रशासन अधिकारी, म.न.पा. शिक्षण मंडळ, यांचेकडून शाळा क्र.१३ बाबत अहवाल मागणी केला असता प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांनी शाळा क्र.१३ मध्ये वर्गखोल्या उपलब्ध नसलेबाबत दि. १६/११/२०२२ लेखी रिपोर्ट दिलेला आहे.

रा. आरोग्य अधिकारी, इ.म.पा. यांनी सुचित केलेल्या जागेची तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती, हातकणंगले यांनी आज दि. १२/०७/२०२२ इ. रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. प्रस्तावित अ.नं. १ व २ ची जागा Health Wellness Centre सुरु करणेसाठी घेणेबाबत व अ.नं. ३) म.न.पा. मालकीची राणी लक्ष्मीबाई शाळा क्र. १३, स्टार नगर वॉ.न. २५ मधील वर्गखोल्या रिकाम्या नसल्याने त्यांनी अन्य ठिकाणची जागा भाडेपट्ट्याने घेणेबाबत सांगितले. अ.नं. १ व २ याठिकाणी Health Wellness Centre सुरु करणेसाठी तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले यांना जागा दयावयाची झाल्यास प्रशासकीय ठरावाने व महानगरपालिका अटी व शर्तीस अधिन राहुन देता येईल. तरी त्यास आपली मान्यता मिळणेस विनंती.

विषयांकित नमुद कामी तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती, हातकणंगले, यांनी HWC करीता इचलकरंजी महानगरपालिकेच्या हद्दीतील ३ ठिकाणी जागा मागणी केलेली आहे. याबाबत तालुका अधिकारी पंचायत समिती हातकणंगले, वैद्यकिय आरोग्य अधिकारी इ.म.पा. यांचे समवेत मा. आयुक्तसो यांचे दालनात दि. १५/१२/२०२२ रोजी चर्चा करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये तालुका अधिकारी पंचायत समिती हातकणंगलले यांचे मागणीप्रमाणे (१) इ.म.पा. मालकीची व्यायाम शाळा, आसरानगर गल्ली नं. ५ (२) आर.के.नगर या ठिकाणी (३) विक्रमनगर येथे खाजगी मिळकती भाडेतत्वावर घेणेबाबत चर्चा झाली असलेचे रा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी, इ.म.पा. यांनी कळविले आहे.

तरी उक्त इ.म.पा. मालकीची व्यायाम शाळा, आसरानगर गल्ली नं. ५ इ.म.पा. ची असल्याने जागा द्यावयाची झालेस प्रशासकीय ठरावान्वये व इ.म.पा. च्या अटी शर्तीस अधिन राहुन देता येईल तरी त्यास मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६८ /२०२२** **दि. १६।१२।२०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले यांना Health Wellness Centre सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालकीची आसरानगर गल्ली नं. ५ येथील व्यायाम शाळेची जागा देणेस महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.

16/12/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव : जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२०२३ करिता प्रस्तावित कामांना मंजुरी मिळणेबत.

**प्रस्ताव**

जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर यांचेकडून सन २०२२-२०२३ करिता नगरोत्थान (जिल्हास्तर), दलित वस्ती योजना व नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत प्रस्तावित कामांच्या ठरावासह मागणी नोंदविणेबाबत संदेश प्राप्त झालेला आहे.

यांप्रमाणे बांधकाम विभागाकडून योजनानिहाय खालील कामे निश्चित करणेत आलेली आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नाव | कामांची संख्या | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) | १०२ | २७,३२,४३,६२७/- |
| २ | लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना | १३ | ७,७०,६७,३५०/- |
| ३ | नागरी दलितेत्तर योजना | २६ | ५,१०,०५,६००/- |
| ४ | वैशिष्टयपूर्ण योजना | ०१ | ४,५४,५०,६४१/- |

वरील नमुद कामांची सविस्तर यादी या सोबत जोडली असुन याप्रमाणे खालील नमुद कामांच्या अंदाजपत्रकांना व सदरची कामे संबंधित योजनेतुन प्रस्तावित करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०२२-२०२३ करिता प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भगतसिंग उदयान नजीक जलतरण तलाव बळकटीकरण कामे करणे. | १३५००००० |
| २ | कागवाडे मळा योग जिम्नॅशियम इमारत बळकटीकरण करणे. | ७५००००० |
| ३ | राजाराम स्टेडियम पत्रे बदलणे इमारत बळकटीकरण करणे. | ३००००००० |
| ४ | प्र.क्र.१९ टि.पी.सा.नं.१४ हॉकी मैदाजागेमध्ये प्रेक्षक गॅलरी बांधणे,कंपौंड करणे व इतर सुविधा विकसित करणे | २९०००००० |
| ५ | प्र.क्र.१४ रिसनं.५९९ आ.क्र.६ क्रिडांगण जागेत वॉकींग ट्रॅक,ओपन जीम,टेनिस लॉन व जागा डेव्हलप करणे. | ७४९८६५० |
| ६ | प्र.क्र.३ सावित्रीनगर जाधव घर ते राठोड घर जाधव घर ते कांबळे घर,भाडुंगे घर ते माचरे घर,ढोले घर ते ढेरे घर,राठोड घर ते शहापुरे घर,एकशिंगे घर ते कुंभार घर रस्ता कॉंक्रीट करणे. | ८१०४०० |
| ७ | प्र.क्र.३ सावित्रीनगर हैंडलगे घर ते ठोके घर कवडे घर ते ढेरे घर आणि कारंडे मळा ग.नं.५ मुल्ला घर ते गोंदकर घर रस्ता कॉंक्रीट करणे. | ७४०४०० |
| ८ | प्र.क्र.१ वॉ.नं.२३ धनगर मळा परिसर येथे आर.सी.सी. गटर करणे | ११०२४०० |
| ९ | प्र.क्र.१ वॉ.नं.२३ धनगर मळा परिसर येथे रस्ता डांबरीकरण करणे | २०३७००० |
| १० | प्र.क्र.१६ कामाक्षी रेसिडंसी ते लाटणे प्लॉट पर्यंत रस्ता डांबरी करणे | ७००००० |
| ११ | प्र.क्र.३ विठ्ठलागर गल्ली नं.६ (हमाल गल्ली) आर.सी.सी.गटर करणे | १०२०३०० |
| १२ | प्र.क्र.१ डाके हार्डवेअर ते कांबळे सर ते बनसोडे घर ते माने अपार्टमेंट आर.सी.सी.गटर करणे | २२६८८०० |
| १३ | प्र.क्र.११ मधील मकोटे बोळ (रिक्रेशन हॉल) मंगळवार पेठ मधील सार्वजनिक शौचायल बांधणे | ३८५०००० |
| १४ | प्र.क्र.१५ मधील जाधव मळा सार्वजनिक शौचालय बांधणे | ३९४०००० |

CS CamScanner

| | | |
|---|---|---|
| १५ | प्र.क्र.२ मधील रफीक खान ते जब्बार मोमीन आणि पोवार घर ते बादशहा जमादार,साई-नगर शहापुर आर.सी.सी.गटर करणे. | ११५९६६० |
| १६ | प्र.क्र.१६ अरुण नलावडे ते शम्स मेडीकल शिवमंदिर परिसर दोन्ही बाजुस आरसीसी गटर करणे. | २०२२१०० |
| १७ | प्र.क्र.१६ तांबोळे घर ते भाजी मार्केट पारीजात सोसायटी आरसीसी.गटर करणे. | २१४५४०० |
| १८ | प्र.क्र.१६ भिडे घर ते दरीबे घर ते शिवमंदिर हाफराऊंड गटर करणे. | १०१५४०० |
| १९ | प्र.क्र.१६ भिडे फॉर्म हाऊस ते दत्तवाडे घर ते नंदु पाटील ते रावण घर ते नक्षत्र हाफ राऊंड गटर करणे. | २१००५०० |
| २० | प्र.क्र.१६ दरीबे घर ते डफेदार घर हाफ राऊंड गटर करणे | ८१०५०० |
| २१ | प्र.क्र.१६ शिवंमदिर ते बारगीर घर आरसीसी गटर करणे | १५१४३०० |
| २२ | प्र.क्र.१६ शिवमंदिर ते बापट घर ते घोरपडे घर हाफ राऊड गटर करणे. | १३४०२०० |
| २३ | प्र.क्र.२ तारदाळ रस्ता ते दिलीप पाटील घर स्वामी समर्थ कॉलनी आरसीसी गटर करणे. | १९८०७०० |
| २४ | प्र.क्र.९ शास्त्री सोसायटी मध्ये हा.रा.गटर करणे. | १४९५१०० |
| २५ | प्र.क्र.९ बलवान वाळु डेपो ते जोतिबा मंदिर रस्ता डांबरी करणे. | १९९०३०० |
| २६ | प्र.क्र.९ शिंरगावे घर ते नॅशनल हायस्कुल रस्ता डांबरी करणे | १९९७२०० |
| २७ | प्र.क्र.९ भगतसिंग रिक्षा स्टॉप ते सामेनाथ किराणा स्टोअर्स रस्ता डांबरीकरण करणे. | १९९८५०० |
| २८ | प्र.क्र.८ जवाहरागर एम.एस.पान शॉप ते जातिलिंग पान शॉप ते ठाकरे चौक हा.रा.गटर करणे. | १४९९१०० |
| २९ | प्र.क्र.६ विकासनगर उपाध्ये घर ते बाडे चाळ ते जांभळे प्लॉट आरसीसी गटर करणे. | १४९५२०० |
| ३० | प्र.क्र.७ भारतमाता हौसिंग सोसायटी गल्ली नं.१ ते ७ दुतर्फा हा.रा.गटर करणे. | १९९८१०० |
| ३१ | प्र.क्र.१४ राधाकृष्ण कॉलनी मधील अंतर्गत रस्ते डांबरी करण करणे | २९८०२०० |
| ३२ | प्र.क्र.१३ कापड मार्केट मागील परिसर मंत्री घर ते एचडीएफसी बँक हा.रा.गटर करणे. | १४९०२०० |
| ३३ | प्र.क्र.१० पाटील घर ते बोंगार्डे घर,गुलाब पैलवान ते मेंगाणे घर ते परीट घर ते पॅलवान चाळ हा.रा.गटर करणे. | २५१०००० |
| ३४ | प्र.क्र.११ लिगाडे मळा शिगद घर ते मोमीन घर व बुगड घर ते साळुंखे घर ते शिवरत किराणा ते सुतार घर हा.रा.गटर करणे. | १५१०५०० |
| ३५ | प्र.क्र.११ स्वामी मळा डाकरे घर ते कोल्हापुर रोड ते महिंद्रा शोरुम दोन्ही बाजुस आरसीसी सारण गटर करणे. | ३९७०००० |
| ३६ | प्र.क्र.१३ मुक्त सैनिक सोसायटी डावरे घर ते पोळे घर ते शेंडगे घर,खोचरे घर ते कुबेर घर,खामकर घर ते पटेल घर,कुंभार घर ते पटेल घर रस्ते डांबरीकरण करणे. | ४४९०८०० |
| ३७ | प्र.क्र.१३ मुक्त सैनिक सोसायटी डावरे घर ते पोळे घर ते शेंडगे घर,खोचरे घर ते कुबेर घर,खामकर घर ते पटेल घर,कुंभार घर ते पटेल घर दुतर्फा हाफ राऊंड गटर करणे. | २७९५२०० |
| ३८ | प्र.क्र.१६ स्वामी मळा गल्ली नं.१,२,३ हाफ राऊंड गटर करणे | ७९०५०० |
| ३९ | प्र.क्र.२१ महात्मा फुले चौक ते साळुंखे किराणा रस्ता डांबरीकरण करणे | २२४०५०० |
| ४० | प्र.क्र.२१ गांधी कॅम्प ते छावडा बिल्डींग रस्ता डांबरीकरण करणे. | २२८०२०० |
| ४१ | प्र.क्र.२१ महेश पोटे घर ते मारुती मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. | १७२५५०० |
| ४२ | प्र.क्र.२३ मुरदंडे मळा येथील गल्लीतील व चंदुररस्ता गटर करणे. | ३५००००० |
| ४३ | प्र.क्र.२३ श्री विजय राठोड घरामागे रस्ता करणे. | ८००००० |
| ४४ | प्र.क्र.२२ पाटील घर ते काजवे घर आण्णा रामगोंडा शाळा परिसरातील रस्त्यास गटर करणे. | १०००००० |

| | | |
|---|---|---|
| ४५ | प्र.क्र.२२ डॉ.ढवळे हॉस्पिटल मागील परिसरात गटर करणे. | २५००००० |
| ४६ | प्र.क्र.२३ कलानगर परिसरातील बोळ रस्त्यास गटर करणे. | १५००००० |
| ४७ | प्र.क्र.२३ स्वामी विवेकानंद कॉलनी अंतर्गत रस्त्यास गटारी बांधणे. | ३०००००० |
| ४८ | प्र.क्र.२४ विजय जोशी गल्ली व सातपुते घर परिसरातील रस्ते व गटर करणे. | २५००००० |
| ४९ | प्र.क्र.२४ जैन बोर्डींग ते प्रिदर्शनी कॉलनीकडे जाणा-या रस्त्यास गटर करणे. | १५००००० |
| ५० | प्र.क्र.२६ कॉंग्रेस कमिटी मागील गल्ली मधील रस्ते डांबरी करणे. | २५००००० |
| ५१ | प्र.क्र.३१ जुना चंदुर रस्ता ते हर्ष ते श्रेया अपार्टमेंट पर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. | ९०५००० |
| ५२ | प्र.क्र.२३ स्वामी विवेकानंद कॉलनी मधील रस्ते डांबरी करणे | २५००००० |
| ५३ | प्र.क्र.२४ श्रध्दा कॉलनी अंतर्गत रस्त्यास गटर करणे. | २०००००० |
| ५४ | प्र.क्र.२४ श्रध्दा कॉलनी दानम्मा किराणा ते गणेश मंदिर ओमाज घर ते कुलकर्णी घर रस्त्यास दोही बाजुस गटर करणे. | १५००००० |
| ५५ | प्र.क्र.२६ कागवाडे मळा परिसरातील गटारी करणे. | १५२०००० |
| ५६ | दातार मळा परिसरातील कारीवडेकर घर ते कदम शेळके घर ते नंदीवाले घर गणपते घर आरेकर घर गटारी करणे | २०००००० |
| ५७ | प्र.क्र.२८ लंगोटे मळा परिसरातील रस्त्यास गटारी करणे | १५००००० |
| ५८ | प्र.क्र.२८ आवाडे नगर परिसर अंतर्गत गटारी करणे | २३००००० |
| ५९ | प्र.क्र.२६ कॉंग्रेस कमिटी मागील परिसरात गटारी करणे. | १५००००० |
| ६० | स्वामी समर्थ मंदिर परिसरातील रस्ते करणे | ३०००००० |
| ६१ | प्र.क्र.२२ टाकवडे रोड ते लक्ष्मी व्यंकटेश एज्युकेशन सोसायटी रस्ता करणे. | २५००००० |
| ६२ | प्र.क्र.२७ डीवायएसपी ऑफीस मागील बोळ रस्ते कॉंक्रीटींग व गटारी करणे. | २२००००० |
| ६३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर व होगाडे गारमेंटस ते हिरा जीम आर.सी.सी.गटर करणे. | २७०५८०० |
| ६४ | रेणुका झोपडपट्टी मध्ये आर.सी.सी.गटर करणे. | ५००००० |
| ६५ | प्र.क्र.१२ कामगार चाळ म्हेत्तर समाज मधील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटींग करणे | ५००००० |
| ६६ | प्र.क्र.१२ मधील नॅशनल टायर्स ते सरीता टेक्सटाईल आणि समाजवाधी प्रबांधिनी मागील रस्ता डांबरी करणे. | २१७६२०० |
| ६७ | प्र.क्र.१ मधील गल्ली नं.९ गट नं.८२२ ओपनस्पेस ला कंपौड वॉल बांधणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २५६०८०० |
| ६८ | प्र.क्र.१ गल्ली नं.६,७,८,९ मध्ये हा.रा.गटर करणे. | ८७०००० |
| ६९ | प्र.क्र.१ मधील सावली सोसायटी अंतर्गत बोळ रस्ते कॉंक्रीटींग करणे | १०९०८५० |
| ७० | प्र.क्र.१ मधील सावली सोसायटी अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे | १८००००० |
| ७१ | प्र.क्र.१ मधील पाण्याची टाकी समोरिल गल्ली नं.१ ते ५ हा.रा.गटर करणे | १०२०३०० |
| ७२ | प्र.क्र.१ चौंडेश्वरी कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरी करणे. | १५९०८०० |
| ७३ | प्र.क्र.१ चौंडेश्वरी कॉलनी अंतर्गत हा.रा.गटर करणे. | ८७०००० |
| ७४ | प्र.क्र.१ शाहु हौसिंग सोसायटी अंतर्गत हा.रा.गटर करणे. | १०२५००० |
| ७५ | प्र.क्र.१ अवधुत नगर सत्यम युवक मंडळ परिसर हा.रा.गटर करणे. | ५४०९०० |
| ७६ | प्र.क्र.१ बालाजी मंगल कार्यालय परिसर हा.रा.गटर करणे. | ८२५३०० |
| ७७ | प्र.क्र.१९ सादिक म्हालदार ऑफीस ते खंजिरे बिल्डींग डांबरी रस्ता करणे | ८००००० |
| ७८ | प्र.क्र.१९ पंत मंदिर परिसर बोळ रस्ते सिमेंट कॉंक्रीटींग करणे | ७००००० |
| ७९ | प्र.क्र१९ नगरपालिका कॉलनी खंजिरे मळा रस्ता कॉंक्रीटींग करणे. | ७००००० |

| | | |
|---|---|---|
| ८० | प्र.क्र.६ विकासनगर येथे मोटरवाले घर ते गडसाळे घर,खाडे चाळ ते देवमोरे घर व घुगरे घर ते उत्तुरे घर कॉंक्रीट रस्ता करणे. | २६५०५०० |
| ८१ | प्र.क्र.५ गणेशनगर आवळे वखार गल्ली नं.३ डांगरे घर ते करपे टेलर आर.सी.सी.गटर करणे | २२५०००० |
| ८२ | प्र.क्र.१८ जयभवानी विद्यामंदिर क्र.१२ येथे किचनशेड,स्वच्छतागृह मुख्य प्रवेशव्दार बांधणे व मैदान तयार करणे. | १८००००० |
| ८३ | प्र.क्र.२८ गुरुकन्नागर परिसरातील रस्ते बळकटीकरण व मजबुतीकरण करणे. | २८८०३१७ |
| ८४ | प्र.क्र.२८ गुरुकन्ननगर गल्ली नं.१ ते ६ परिसरातील अंतर्गत गटरी करणे. | ३५२०८५० |
| ८५ | प्र.क्र.२८ लिंबु चौक परिसरातील चिचले गल्ली रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ४५५५०४० |
| ८६ | प्र.क्र.२८ लिंबु चौक परिसरातील अंतर्गत आरसीसी गटारी करणे. | ४५८०५६० |
| ८७ | प्र.क्र.२८ चोगुले घर ते गञ्चुर्णी कारखाना रस्ता डांबरीकरण करणे | २०००००० |
| ८८ | प्र.क्र.२८ लंगोटे मळा परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | २३००००० |
| ८९ | प्र.क्र.२५ ढेरे घर ते कुमार पाटील घर,विजय मुतालीक घर ते पाटील घर परिसरातील गटर करणे. | १८००००० |
| ९० | प्र.क्र.२५ संग्राम चौक व षटकान चौक परिसरातील मुख्य रस्त्यास गटारी करणे. | २८००००० |
| ९१ | प्र.क्र.२२ दुरुस्थनी इमारत ते शिवाजीनगर पोलीस स्टेशन ते म्हेत्तर गल्ली रस्ता डांबरी करणे. | १९००००० |
| ९२ | प्र.क्र.२५ शाहु हायस्कुल ते तीन बत्ती चौक दुतर्फा गटर करणे. | १८००००० |
| ९३ | प्र.क्र.२६ वेदभवन इमारत बळकटीकरण व मजबुतीकरण करणे. | ३०००००० |
| ९४ | प्र.क्र.१६ सुतार घर ते मिरजकर घर व बादशहा बागवान पंप ते ओढयापर्यंत रस्ता व घोरपडे घर ते कोंदाडे घर डांबरी करणे | ३४००००० |
| ९५ | प्र.क्र.११ हॉकी मैदान विकसित करणे. | ३०००००० |
| ९६ | प्र.क्र.१६ राजु येलाज घर ते मोरे वझार व कैश बागवान घर ते येलाज मळा विहीरीपर्यंत रस्ता डांबरी करणे. | १५००००० |
| ९७ | प्र.क्र.१६ बालाजी कॉलनी १,२,३ रस्ता कॉंक्रीटीग करणे. | १२००००० |
| ९८ | प्र.क्र.१६ रायगड कॉलनी हरिष लाटणे घर ते दळवी घर व अमीन रमदान ते मोकाशी घर कॉंक्रीटीग करणे. | १४००००० |
| ९९ | प्र.क्र.३ सोलगे मळा लामकाने घर ते कांबळे घर,कुंभार घर ते तेली घर दत्त मंदिर ते मोरे घर,लोहार घर ते ताल्ला घर,हल्याळ घर ते मेरगु घर,चन्नुर घर ते शंकु घर रस्ता कॉंक्रीटींग करणे. | ८००००० |
| १०० | प्र.क्र.१६ ठिकठिकाणी आर.सी.सी.व हाफ राऊंड गटर करणे. | २०००००० |
| १०१ | प्र.क्र.२५ संग्राम चौक व षटकोन चौक परिसर बोळ रस्ते कॉंक्रीट करणे | १५१०००० |
| १०२ | प्र.क्र. १६ महालक्ष्मी नगर ओपन स्पेस दक्षिण उत्तर कंपौड वॉल करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | ९,७२,०००/- |
| | एकुण | २७,३२,४३,६२७/- |

P.t.o.

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२२-२०२३ करिता प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१७ साईट नं.१०२ रमाई आवास घरकुलासाठी अंतर्गत कॉंक्रीटचे रस्ते,गटर बांधणे व शौचालय बांधणे. | १७९५८००० |
| २ | प्र.क्र.३१ टाकवडे वेस,बौध्द विहार कंपौड बांधणे,इमारत बळकटीकरण कामे करणे. | १०५००००० |
| ३ | प्र.क्र.३१ टाकवडे रोड रोहीदास समाज इमारत बळकटीकरण कामे करणे. | ३०००००० |
| ४ | प्र.क्र.१७ साईट नं.१०२,आ.क्र.II/७ मध्ये कम्युनिटी सेंटर व लायब्ररी इमारत बांधणे व त्या जागेस कंपौड करणे. | २५०००००० |
| ५ | प्र.क्र.१० आंतरभारती शाळा ते क्रांती चौक ते भगतसिंग चौक आरसीसी मध्ये हाफ राऊंड गटर करणे. | १५१२४०० |
| ६ | प्र.क्र.१२ कामगार चाळ च सिध्दार्थ हौसिंग सोसायटी मधील आर.सी.सी.गटर करणे. | ७००००० |
| ७ | प्र.क्र.५ आंबेडकर नगर मलके घर ते सुतार घर,शिरसागर घर ते मलके घर ते येजरे घर ते भोरे घर,मुसळे घर ते सुतार घर, मारुती मंदिर ते मलके घर कॉंक्रीट रस्ते करणे. | ३५९०१०० |
| ८ | प्र.क्र.५ आंबेडकर नगर भोरे घर ते आरगुणे घर आणि नवले घर ते सुतार घर,रावळ घर ते उबारे घर हा.रा.गटर करणे. | १४९५५०० |
| ९ | प्र.क्र.५ आंबेडकर नगर येथील जाधव घर ते कांबळे घर व चौगुले घर ते रमाकट्टी घर आणि रॉय घर ते साळुंखे घर रस्ता डांबरीकरण करणे. | १८२०४०० |
| १० | बौध्द विहार ते मगदुम दर्गा ते रोहीदास समाज मंदिर लगत मुख्य रस्त्यास गटारी करणे. | ४०००००० |
| ११ | प्र.क्र.३० ढोर वेस तालीम मुख्य रस्ते व गटरी करणे. | २५००००० |
| १२ | प्र.क्र.३१ रोहीदास समाज मंदिर बोळ रस्त्यास गटारी व कॉंक्रीटीकरण करणे. | २५००००० |
| १३ | कामगार चाळ मधील महानगरपालिका कॉम्प्लेक्स ते दगडी चाळ ते वाल्मिकी समाज मंदिर,हनुमान मंदिर अंतर्गत रस्ते डांबरी करणे | २४९०९५० |
| | एकुण | ७७०६७३५० |

दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२२-२०२३ करिता प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१ मधील गणेशनगर कोदे ते मिरगे घर ते मुदगल घर व पी.ए.पाटील ते जठार कारखाना व गंजणे घर ते मिरगे ते हावळ कारखाना ते ठाणेकर घर गणेशनगर ग.नं.७ व ८ हाफ राऊंड गटर करणे. | ७९०९०० |
| २ | प्र.क्र.१२ भोनेमाळ मध्ये सुनिल सायझिंग समोर आरसीसी गटर करणे. | ८७०४०० |
| ३ | प्र.क्र.३ सोलेगे मळा सोनम गॅस गोडावुन ते मार्कंडेय मंदिर आणि रमशे कवडे प्लॉट नं.२२ नजीक आर.सी.गटर करणे. | २०४०२०० |
| ४ | प्र.क्र.४ कृष्णानगर गल्ली नं.१ ते ७ मध्ये रस्ते कॉंक्रीट करणे. | ३९७५४०० |
| ५ | प्र.क्र.४ कृष्णानगर म्हसोबा गल्ली नं.१ ते ६ रस्ते कॉंक्रीट करणे. | ३५१०४०० |
| ६ | प्र.क्र.५ गणेशनगर येथे आळंदे घर ते मांगुरे घर दोन्ही बाजु हाफ राऊंड गटर करणे. | १४९०९०० |
| ७ | प्र.क्र.७ म्हसोबा गल्ली नं.१ ते ५ रस्त्यांना दोन्ही बाजुस हाफ राऊंड गटर करणे. | २४५०२०० |
| ८ | प्र.क्र.९ जवाहरागर राजदुत हॉटेल ते मारुती मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. | २४९०१०० |
| ९ | प्र.क्र.४ विक्रमनगर सोळंखी अपार्टमेंट ते गैबान पेट्रोल पंप रस्ता हॉटमिक्स करणे. | १९९०१०० |
| १० | प्र.क्र.८ जवाहरनगर व्यंकटेश कॉलनी मेटे घर ते पाटील डॉक्टर दोन्ही बाजुस हा.रा.गटर करणे. | १४८०५०० |

| | | |
|---|---|---|
| | | ९९०३०० |
| ११ | प्र.क्र.८ जवाहरनगर येथे पार्वती ट्रेडर्स ते उमराणे वखार हा.रा.गटर करणे. | १४९०५०० |
| १२ | प्र.क्र.१० जवाहरनगर रोशन मस्जिद सुनिल कोरवी घर ते अस्लम सनदी घर व पाकीजा चिकन सेंटर ते पाटील घर आणि दाढीवाले घर ते गवते घर हा.रा.गटर करणे. | १४९५८०० |
| १३ | प्र.क्र.१० जवाहरनगर ठाकरे चौक ते गैबान कोळसा सेंटर एक बाजु आणि भानु मुजावर कंट्रोल दुकान ते मोमीन घर हा.रा.गटर करणे. | १४९५३०० |
| १४ | प्र.क्र.१० कोले मळा इलाई मुल्ला घर ते देवकरे घर आणि मुचकंडी घर ते सारण गटर आणि दमाने घर ते खोत घर दुतर्फा गटर करणे. | १४६०८०० |
| १५ | प्र.क्र.११ स्वामी मळा मध्ये दयानंद कोळी ते नदाफ घर,लाड घर ते पटकर घर,घोरपडे घर ते पाटील घर देसाई घर ते कोळी घर रस्ता कॉक्रीट करणे. | |
| १६ | प्र.क्र.११ स्वामी मळा पाटील मंडप ते माळगे घर,मोहिते घर ते सातपुते घर,कुंभार घर ते गांजवे घर आणि सतिष घोरपडे ते पाटील घर दोन्ही बाजुस हा.रा.गटर करो. | १९८०५०० |
| | | ३०००००० |
| १७ | लिंबु चौक ते गुरकन्ननगर परिसर गटारी करणे. | १०००००० |
| १८ | लिंबु चौक ते हिरलेगे मळा रस्त्यास गटारी बांधणे. | ३०२८००० |
| १९ | प्र.क्र.३० बागवान पट्टी व शेळके मळा परिसर रस्त्यास गटर करणे. | १५००००० |
| २० | प्र.क्र.२३ पुजारी मळा केसरवाणी घर ते कुंभार घर खान घर ते शिंदे घर गटर करणे. | |
| २१ | प्र.क्र.२३ पाथरवट मळा मस्जिद परिसरातील मराठे घर ते सुतार घर तांबोळी घर ते मुमले घर गटर करणे. | १८००००० |
| २२ | प्र.क्र.३० मरगुबाई मंदिर परिसरातील रस्ते व गटारी करणे | ३०००००० |
| २३ | प्र.क्र.२९ बरगे मळा परिसरातील अंतर्गत रस्ता कॉक्रीट करण व गटर करणे | २०८०००० |
| २४ | प्र.क्र.३० शेळके मळा परिसरातील गल्ली नं.१,२,३ व अमीन पठाण घर ते अवधुत परीट घर रस्त्यास कॉक्रीट करणे | १८००००० |
| २५ | प्र.क्र.३० मरगुबाई मंदिर परिसर चावरे गल्ली पट्टेकरी बोळ, जामदार गल्ली रस्त्यास गटर करणे. | १८००००० |
| २६ | प्र.क्र.३० जुना चंदुर रस्ता दुर्गामाता गल्ली मध्ये हाफ राऊंड गटार बांधणे | १९९५३०० |
| | एकुण | ५१००५६०० |

वैशिष्टयपुर्ण योजना अंतर्गत सन २०२२-२०२३ करिता प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.३१ पंचगंगा नदीजवळ श्री गणेश मुर्ती विसर्जन करिता कृत्रिम तलाव तयार करणे (पहिला टप्पा) | ४५४५०६४९ |

**प्रशासकीय ठराव क्र. ६९ /२०२२**

दि. 23।12।2022

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन सन २०२२-२०२३ करिता वरील प्रमाणे प्रस्तावात नमुद महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना व नागरी दलितेत्तर योजना व वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत अंदाजपत्रके मंजुर करणेत येत असुन सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे सादर करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

23/12/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभुत सुविधांची निर्मीती व विकासाकरीता अनुदान उपलब्ध होणेकामी प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके मंजुर करणे व अनुदान मागणीसाठी प्रस्ताव सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत.

## प्रस्ताव

**संदर्भ -** १) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडभ्ल शासन निर्णय क्र. आयआयआय - पॉलिसी २०१०/ प्र.क्र. ७६८/ उद्योग - २ दि. २२/०२/२०१३

२) महाराष्ट्र शासन उद्योग ,उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक औपासु -२०१२/ प्र.क्र. २३४/ उद्योग - २ दि. २५/०२/२०१४

महाराष्ट्र राज्याचा समतोल औद्योगिक विकास घडविण्यासाठी त्याद्वारे आर्थिक विकास साधण्यासाठी आणि नविन उद्योग घटकांच्या स्थापनेस चालना देण्यासाठी व त्याद्वारे रोजगाराच्या भरीव संधी निर्माण होण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेले आहे.

या धोरणाअंतर्गत औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी औद्योगिक पायाभुत सुविधांची निर्मीती व निधी वाटपाची कार्यपध्दती वरील संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयान्वये निश्चित करणेत आलेले आहे.

राज्यातील कोणत्याही पायाभुत सुविधा ज्यांचा थेट संबंध औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी येतो किंवा औद्योगिक विकासाला मदत करतो अशा कोणत्याही औद्योगिक पायाभुत सुविधांची निर्मीती व विकास याकरीता महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ अंतर्गत निधी उपलब्ध होवु शकतो.

इचलकरंजी शहर हे वस्त्रोउद्योगाचे मँचेस्टर म्हणुन ओळखले जात असुन वस्त्रोउद्योबरोबरच इतर उद्योग ही मोठया प्रमाणात सुरु आहेत. इचलकरंजी शहरात दि इचलकरंजी इंडिस्ट्रीयल को-ऑप इस्टेट लि. इचलकरंजी ही औद्योगिक वसाहत असुन या वसाहतीमध्ये मुलभुत पायाभुत सुविधा विकसीत केल्यास उद्योग वाढीस चालना मिळू शकते. महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ अंतर्गत पायाभुत सुविधांची निर्मीती व विकास याकरीता शासनाकडून निधी उपलब्ध होवू शकत असलेने बांधकाम विभागाकडून खालील नमुद ३ कामांची अंदाजपत्रके तयार करणेत आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. ५५६,५८८ (अ,ब) व ५८९ दि. इचलकरंजी इंडस्ट्रीयल को. ओ. इस्टेट लि. इचलकरंजी मध्ये पायाभुत सुविधा करणे. (नाईट कॉलेज परिसर) | ३,४२,५५,४६०/- |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. ५८६,५८७, ६०२ व ६०४ दि. इचलकरंजी इंडस्ट्रीयल को. ओ. इस्टेट लि. इचलकरंजी मध्ये पायाभुत सुविधा करणे (इदगाह मैदान परिसर) | १,९१,००,१३०/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील गट नं. ४७० अ, ७५१,७५३ ते ७७३, ७८१ ते ७८५ व ७८७ ते ८०४ दि. इचलकरंजी इंडस्ट्रीयल को. ओ. इस्टेट. लि. इचलकरंजी मध्ये पायाभुत सुविधा करणे. (शहापुर) | १६,९९,२४,५४०/- |
| | एकूण | २२,३२,८०,१३०/- |

प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रकामध्ये गटर्स, स्ट्रीट लाईट व खराब झालेले रोड प्रस्तावित केलेले आहेत.

सदरची कामे महाराष्ट्र औद्यगिक धोरण २०१३ अंतर्गत औद्योगिक पायाभुत सुविधांची निर्मीती व विकास याकरीता अनुदान मागणीसाठी प्रस्तावीत करावयाची झाल्यास एकुण प्रस्ताव रक्कमेच्या २५% म.न.पा. हिस्सा भरावा लागेल. (संदर्भ - कोल्हापुर महानगरपालिकेचे दि. २९/१२/२०१६ इ. रोजीचे पत्र)

तरी उपरोक्त नमुद केलेली रक्कम रु. २२,३२,८०,१३०/- ची ३ कामे महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ चा शासन निर्णय २०१३ नुसार औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभुत सुविधांची निर्मीती व विकासाकरीता अंतर्गत अनुदान मिळणेसाठी प्रस्तावित करणेस सदर कामाचे अंदाजपत्रकास व एकुण प्रस्ताव रक्कमेच्या २५% इतका म.न.पा. हिस्साची ( रु. ५,५८,२०,०३२/-) तरतुद करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र.७० /२०२२</u>** <u>दि.</u> २९ / १२ / २०२२

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ शासन निर्णयान्वये औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभुत सुविधांची निर्मीती व विकासाकरीता प्रस्तावात नमूद ३ कामांना रक्कम रु. २२,३२,८०,१३०/- इतके अनुदान मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेत येत असुन उपरोक्त धोरणान्वये एकुण प्रस्ताव रक्कमेच्या २५% ( रु. ५,५८,२०,०३२/-) इतका म.न.पा. हिस्सा भरणेकामी तरतुद करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

तसेच ज्या मालमत्ता औद्योगिक वसाहतीनी म.न.पा. कडे हस्तांतरीत केलेल्या नाहीत त्यासाठीचा हिस्सा औद्योगिक वसाहतींनी महानगरपालिकेकडे भरावा. तसेच अन्य ज्या काही कामांसाठी म.न.पा. हिंस्सा भरणा करावा लागत असेल तर धोरण निश्चित करणेस मंजूरी देणेत येत आहे. तसेच हिस्सा भरणेची तरतूद अंदाजपत्रकामध्येही करणेस मंजूरी देणेत येत आहे.

29/12/2022
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका.**

प्रस्ताव: डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटलकडील रुग्णाकडून आकारणी करणेसाठी एक्स-रे चे दर निश्चित करणे बाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबडेकर हॉस्पिटलमध्ये बाहय रुग्ण चालविणेत येतो. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत नव्याने एक्स-रे मशीन ( सी.आर.सीस्टीमसह ) बसविणेत आलेले आहे.याठिकाणी रुग्णासाठी एक्स-रे सेवेचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. इंदिरा गांधी मेमोरीयल हॉस्पिलमध्ये मे.शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये विलीनीकरण होण्यापुर्वीचे दर हे सर्व साधारणपणे रक्कम रु.१०० ते २२० इतके होते. शहरातील खाजगी एक्स-रे सुविधा असणा-या हॉस्पिटलमधुन एक्स-रे दराची खात्री केली असता सदरचे दर रक्कम रु.४००ते ५०० इतके आहेत.

या सर्वांचा विचार करता खालील शिफारस केले दराप्रमाणे एक्स-रे दर आकरणीबाबत तसेच इचलकरंजी महानगरपालिकेचे कार्यरत कर्मचारी व त्यांचे कुटुंब ( आई,वडील,पत्नी,व वय वर्षे १८ खालील मुले) आणि सेवानिवृत्त कर्मचारी (पती,पत्नी), इचलकरंजी शहरातील दारिद्रय रेषेखालील रेशनकार्डधारक तसेच स्वातंत्र्य सैनिक यांना एक्स-रे सेवा मोफत देणे यास महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

| अ.क्र. | रुग्णांचा देणेत येणा-या सेवेचा प्रकार | शहरातील खाजगी ठिकाणचे दर | शिफारस केले दर |
|---|---|---|---|
| १ | एक्स-रे फी | ४०० ते ५०० | स्थानिक रु.१५०/- व परगावचे रुग्ण रु.२५०/- |

तरी इमपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटलकडील रुग्णांना वरील नमुद तक्त्याप्रमाणे एक्स-रे दर आकारणी करणेस मंजूरी मिळणे कामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७१ /२०२२** **दि. २१ / १२ / २०२२**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून प्रस्तावातील शिफारस केले स्थानिक रुग्णास रु.१५०/- व परगावचे रुग्णास रु.२५०/- दराप्रमाणे एक्स-रे दर आकरणीबाबत तसेच इचलकरंजी महानगरपालिकेचे कार्यरत कर्मचारी व त्यांचे कुटुंब ( आई,वडील,पत्नी,व वय वर्षे १८ खालील मुले) आणि सेवानिवृत्त कर्मचारी (पती,पत्नी), इचलकरंजी शहरातील दारिद्रय रेषेखालील रेशनकार्डधारक तसेच स्वातंत्र्य सैनिक यांना एक्स-रे सेवा मोफत देणेस मंजूरी देणेत येत आहे.

29/12/2022

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका.**

प्रस्ताव: महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम-२००६ व सुधारणा अधिनियम-२०१५ मधील तरतुदीनुसार Fire Infrastructure Charges आकारणी करणे बाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ :- १) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम - २००६ व सुधारणा अधिनियम - २०१५.

२) नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.अशसे-२०१४/प्र.क्र.१७१/नवि-२० दि.१२/०५/२०१५.

३) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२०.

मा.शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.२९/०६/२०२२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी शहर महानगरपालिकेमध्ये रुपांतर करणेत आलेले आहे. महानगरपालिकेच्या संपुर्ण कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या २,९२,०६० इतकी असून या संपुर्ण कार्यक्षेत्रात नागरीकांना अग्निसुरक्षेबाबतची सुविधा पुरविणे ही आवश्यक बाब आहे. इचलकरंजी महानगरपालिका ही नव्याने स्थापन झालेली असून इचलकरंजी शहर हे वस्त्रोद्योगाचे देशातील मोठे केंद्र आहे. सुरुवातीस वस्त्रोद्योगातील दोन चार प्रकारच्या उत्पादनाने सुरु करणेत आलेला व्यवसाय सद्या तब्बल ३ हजारहून अधिक प्रकारच्या वस्त्राचे उत्पादन करीत आहे.

शहरातील औद्योगिक विस्ताराचा विचार करता भविष्यात वेगवेगळया प्रकारची आव्हाने अग्निशमन विभागासमोर आहेत. भविष्यातील आव्हाने स्विकारताना अग्निशमन विभाग तितक्याच सक्षमपणे स्थापन करुन ठेवणेकरीता अग्निशमन विभागास विविध वाहनांची आवश्यकता भासणार असून अग्निशमन विषयक पायाभूत सुविधा उभारणेकरीता व येणा-या कालावधीकरीता आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. नव्याने अग्निशमन विषयक पायाभूत सुविधा उभारताना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे.

मा.शासनाने दि.०२/१२/२०२० रोजीच्या अधिसुचनेव्दारे मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केली असून दि.०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. सदर नियमावलीतील विनियम क्र.२.२.१४ (ii) नुसार हा Fire Infrastructure Charges बाबत असून यामध्ये These Charges shall be decided by the government from time to time अशी तरतुद आहे. मा.शासनने दि.०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशान्वये नियमावलीतील विनियम क्र.२.२.१४(ii) नुसार Fire Infrastructure Charges ची आकारणी वेगळयाने करण्याची आवश्यकता नाही. मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम -२००६ मधील तरतुदीनुसार आवश्यकती फी / शुल्क आकारणी करणेत यावी व त्याचा विनियोग सदर अधिनियमातील तरतुदीनुसार करणेत यावा असे आदेश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम -२००६ हा महाराष्ट्र राज्यासाठी दि.०६/१२/२००८ रोजी पासून लागू करणेत आलेला आहे. या अधिनियमांमध्ये अग्निशमन सेवेच्या अनुषंगाने वसुल करावयाचे शुल्क, त्यामध्ये वाढ अथवा घट करणे, असे शुल्क स्वतंत्र निधीमध्ये ठेवून त्याचा विनियोग कशाप्रकारे करावा याबाबत सविस्तर तरतुदी करणेत आलेल्या आहेत.

CS CamScanner

सद्यस्थितीत नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देताना Fire Infrastructure Charges ची आकरणी करणेत येत नाही. तसेच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फतही अग्निशमन सेवा शुल्क आकारणी करणेत येत नाही. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून व नव्याने अग्निशमन विषयक पायाभूत सुविधा उभारताना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणेकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम - २००६ व सुधारणा अधिनियम - २०१५ तरतुदीनुसार परिशिष्ठ - अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शुल्क आकारणे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम ९९ व ३८६ (२) अन्वये विविध कर, फी इत्यादी दराबावत मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७२/२०२२** **दि. २९/१२/२०२२.**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून प्रस्तावातील शिफारस केले प्रमाणे नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देताना Fire Infrastructure Charges ची आकरणी करणेत येत नाही. तसेच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फतही अग्निशमन सेवा शुल्क आकारणी करणेत येत नाही. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून व नव्याने अग्निशमन विषयक पायाभूत सुविधा उभारताना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करणेकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम - २००६ व सुधारणा अधिनियम- २०१५ तरतुदीनुसार परिशिष्ठ-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे शुल्क आकारणे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम - १९४९ चे कलम ९९ व ३८६ (२) अन्वये विविध कर, फी इत्यादी दर आकारणीस मंजूरी देणेत येत आहे तसेच या रक्कमेसाठी अग्निसुरक्षा निधी म्हणून स्वतंत्र बँक खाते उघडणेसही मंजूरी देणेत येत आहे.

29/12/2022
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका.**

प्रस्ताव: गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर व्याख्यानमाला आयोजित करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्ताव**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या वतीने गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर व्याख्यानमाला सन २००६ सालापासून प्रतीवर्षी आयोजित केली जाते. सन २००६ साली गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर व्याख्यानमाला कायमस्वरुपी आयोजित करणेस व येणा-या खर्चास मंजुरी देणेत आलेली होती. सदर कामी मागील तीन वर्षात प्रतीवर्षी २ लाख ते २.५० लाख इतका खर्च झालेला आहे.

सदर व्याख्यानमाला ही शहरातील नामवंत व्याख्यानमाला म्हणून ओळखली जाते. या व्याख्यानमालेस राज्यातील व राज्याबाहेरील नामवंत व्याख्याते यांनी व्याख्याने दिलेली आहेत.

तथापि शासन अधिसुचना दि.२९ जुन २०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले आहे. व्याख्यानमाला आयोजित करणेकरिता लेखाशिर्षावर र.रु.३ लाख इतकी बजेट तरतुद करणेत आली असून उपरोक्त कामी प्रतीवर्षी प्रमाणे व्याख्यानमाला आयोजित करणेकरीता व प्रतिवर्षी बजेटमध्ये तरतुद करणेस कायम स्वरुपी प्रशासकीय मंजुरी मिळावी.

तरी सदर व्याख्यानमाला घेणेस व अंदाजे र.रु.३ लाख इतक्या खर्चास तसेच सदर व्याख्यानमालेसाठी वक्ते ठरविणे, त्यांचे मानधन व त्या अनुषंगाने इतर बाबी ठरविणे कामी समिती गठीत करणे आवश्यक असलेने समिती गठीत करणेसही मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.७३ /२०२३** दि. ०२।०१।२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी महानगरपालिकेच्या गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाचे वतिने व्याख्यानमाला आयोजित करणेकरीता लेखाशिर्षावर र.रु.३ लाख प्रतिवर्षी बजेटमध्ये कायमस्वरुपी तरतुद करणेस तसेच सदर व्याख्यानमाला घेणेस व सदर व्याख्यानमालेसाठी वक्ते ठरविणे, त्यांचे मानधन व त्या अनुषंगाने इतर बाबी ठरविणेकामी समिती गठीत करणे व येणा-या खर्चास मंजूरी देणेत येत आहे.

०२।०१।२०२३

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

**प्रस्ताव:** दि. ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२२ अखेर बांधकाम उपकराची रक्कम रु. २,३५,६५,०७५/- महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग करणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ - Office of the principal Account Genral (Audit) ‍ I, Maharashtra यांचेकडील Audit Memorandum No. AMGIV/PA/Welfare Cess/ AM - ५ दि. ०१/१२/२०२२.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत ऑनलाईन बी.एम.पी.एस. प्रणाली मार्फत बांधकाम परवानगी देणेत येतात. तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेत दि. ०१/०४/२०१८ पासुन बी.एम.पी.एस. प्रणाली कार्यान्वित असुन काही अपवाद वगळता ऑनलाईन बांधकाम परवानगी देणेत आलेल्या आहेत. दि. ०१/०४/२०१८ पासुन दि. ३१/०३/२०२२ पर्यंत नगररचना विभागामार्फत विविध शुल्कापोटी जमा होणा-या रक्कम या लेखा खात्याकडे चलनाद्वारे जमा करणेत आलेल्या आहेत. संदर्भीय Audit Memorandum मध्ये दि. ०१/०४/२०१८ पासुन दि. ३१/०३/२०२२ पर्यंत नगररचना विभागामार्फत जमा होणा-या विविध रक्कम या लेखा खात्याकडे जमा झालेली उपकराची रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग न केलेलबाबत आक्षेप नोंदविणेत आलेला आहे.

सबब, दि. ०१/०४/२०१८ ते दि. ३१/०३/२०२२ अखेर जमा झालेली उपकराची रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग केली आहे. अगर कसे? याबबात खात्री करुन माहिती सादर करणे बाबत लेखाधिकारी यांचेकडे दि. ०५/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करणेत आली होती त्यावर दि. ०१/०४/२०१८ ते दि. ३१/०३/२०२२ अखेर बांधकाम उपकर रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे आदा करणेबाबतचे कोणतेही देयक लेखा विभागाकडे अदायकी कामी आलेले नाही अथवा प्रलंबित नसलेचे दि. ०६/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये लेखाधिकारी यांना कळविले आहे.

सबब, दि. ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२२ अखेर बांधकाम उपकराची रक्कम रु. २,३५,६५,०७५/- जमा असुन रक्त अधिनियमातील तरतुदीनुसार जमा झालेल्या उपकराच्या १ टक्के रक्कम वजा करता येईल व उर्वरीत रक्कम महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांचेकडे वर्ग करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रकरण लेखा विभागाकडे पाठविले असता सन २०२२-२०२३ चे मंजुर अंदाजपत्रकामध्ये उपकर शासनखाती जमा करणे हे खर्चाचे लेखाशिर्ष उपलब्ध नाही. त्याकरीता प्रशासकीय ठराव करुन वर नमुद केलेनुसार नवीन लेखाशिर्षाचा अंतर्भाव करुन नमुद रक्कम शासनाकडे वर्ग करणेबाबत दि. २१/१२/२०२२ रोजीच्या टिप्पणीद्वारे कळविले आहे.

CamScanner

सबब उक्त प्रकरणी नगररचना विभागाकडील उपकर शासनखाती जमा करणे या खर्चाच्या नवीन लेखाशिर्षाच्या अंतर्भाव करणेकरीता प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५४/२०२३** दि. १८/०१/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी घेवुन सन २०२२-२०२३ चे मंजूर अंदाजपत्रकामध्ये नगररचना विभागाकडील उपकर शासनखाती जमा करणे या नवीन लेखाशिर्षचा अंतर्भाव करणेस मंजुरी देणेत येत असुन दि. ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०२२ अखेर बांधकाम उपकराची रक्कम रु. २,३५,६५,०७५/- महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचेकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

18/01/2023

(सुधाकर देशमुख)

प्रभारी अधिकारी तथा प्रशासक

इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: नविन मालमत्ता कर आकारणीकरीता दर निश्चित करणे बाबत.

**प्रस्ताव**

तत्कालीन महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२४ नुसार सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षामध्ये इचलकरंजी नगरपरिषदेची चतुर्थ वार्षिक कर आकारणी पुर्ण करणेत आलेली आहे.

चतुर्थ वार्षिक कर आकारणीसाठी मा.प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी, कोल्हापूर यांनी मंजूर केलेले झोन निहाय रहिवास,वाणिज्य,औद्योगीक,शैक्षणिक संस्था व रिकाम्या भुखंडाचे वार्षिक भाडयाचे अपेक्षित दर सन २०१६-१७ चे दरामध्ये १०% वाढ करुन ( जमिनीची मुळ किंमत धरुन ) सोबत जोडले दरपत्रकानुसार सन २०२१-२०२२ ते २०२५-२०२६ अखेर सुधारणा करणेत आलेल्या आहेत.

सध्या शासन नगरविकास विभागाकडील मनपा-२०२२/प्र क्र ९६ (१) / नवि-१८ दि.२९/०६/२०२२ चे अधिसुचनेव्दारे इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झालेले आहे.

महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मालमत्ता करापासून मिळत असलेने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात होणा-या नविन मिळकती,रिकामा प्लॉट तसेच इमारत वापरात होणारे बदल यांचकरिता सुधारीत दराने आकारणी करणेकरीता दर निश्चित करणे आवश्यक आहेत.

मा. प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी, कोल्हापूर यांचे वरील दरपत्रकाचा संदर्भ विचारात घेऊन सुधारीत दर सन २०२३-२४ करीता निश्चित करुन देणे बाबतची विनंती दि.१३/१२/२०२२ अन्वये मा.नगररचनाकार, नगररचना विभाग इचलकरंजी महानगरपालिका यांचेकडे केली असता सर्वसाधारणपणे १०% ची वाढ करणेस हरकत नसले बाबत दि.१३/०१/२०२३ अन्वये कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम ९९ मध्ये करांचे दर निश्चित करणे बाबतची तरतुद नमुद असुन यामध्ये " महानगरपालिकेने याबाबत स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन पुढील सरकारी वर्षात कलम १२७ पोट कलम (१) मध्ये निर्दिष्ठ केलेले नगरपालिका कर ज्या दरांनी बसवण्यात येतील ते दर आणि उक्त कलमाच्या पोट कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या करांपैकी जे कोणतेही कर (स्थानिक संस्था कर वगळून ) बसवण्याचे तिने ठरवले असेल ते कर पुढील सरकारी वर्षात ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसवण्यात येतील ते दर व ती मर्यादा प्रकरण ११ मध्ये विहित केलेल्या मर्यादांस व शर्तीस अधिन राहुन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित केले पाहिजेत " अशी तरतुद आहे.

यास अनुसरुन महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मालमत्ता करापासून मिळत असलेने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात होणा-या नविन मिळकत,रिकामा प्लॉट तसेच इमारत वापरात होणारे बदल यावर नविन दराने आकारणी करणेकामी नगररचना विभागाने प्रस्तावात प्रस्तावित केलेली १०% दरवाढ सन २०२३-२०२४ पासुन लागू करणेस मंजुरी मिळणे करिता इकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

CamScanner

दि.१८ / ०९ /२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. ७५ /२०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन मा. प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी, कोल्हापूर यांचेकडील दरपत्रकाचा संदर्भ विचारात घेवून नविन मिळकती, रिकामा प्लॉट तसेच इमारत वापरात होणारे बदल या इमारतीसाठी विभागवार प्रति चौ.मि.वार्षिक भाडयाने अपेक्षित दर (जमिनीची किंमत धरुन ) ती खालील तक्त्या प्रमाणे -

| अ.क्र. | झोन क्र. | विभाग क्र.व नकाशात दर्शविलेला रंग | रहिवास रु.चौ.मि. | औद्योगिक/ घरगुती आणि गोदाम रु.चौ.मि. | वाणिज्य | शैक्षणिक संस्था | रिकामा प्लॉट भुखंड सन २०२३-२४ रु.चौ.मि. | गुंठेवारी बिगर शेती सन २०२३-२४ रु.चौ.मि. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | I | निळा | ४४५ | अ)इचल.औद्या. वसाहत-५५५ ब) इतर भाग-४८९ | ५९४ | ५५५ | १५ | १७ |
| २ | II | गुलाबी | ४०७ | ४८४ | ५१७ | ५११ | १४ | १३ |
| ३ | III | भगवा | ३३५ | अ) शहापूर- औद्यो वसाहत-४५१ ब) इतर भाग-३६८ | ४७३ | ५६५ | १२ | १३ |
| ४ | IV | पिवळा | २९७ | ३६८ | ४६७ | ४२३ | ११ | १२ |
| ५ | V | हिरवा | २९१ | ३६३ | ४६२ | ४२३ | ११ | १२ |

सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात होणा-या नविन मिळकत,रिकामा प्लॉट तसेच इमारत वापरात होणारे बदल यावर नविन दराने आकारणी करणेकामी नगररचना विभागाने प्रस्तावात प्रस्तावित केलेली १०% दरवाढ सन २०२३-२०२४ पासुन लागू करणेस मंजुरी देणेत येत आहे.

(सुधाकर देशमुख) १८/०९/२०२३
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: ए झोन विभागाकरीता पाणी सोडबंद करणेकरीता टनंकी पुरविणे.

## प्रस्ताव

सदरकामी पाणी पुरवठा करीता अंदाजपत्रक तयार केले असुन अंदाजपत्रकानुसार सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता कामे करणेकरीता निविदा मागवुन कामगिरी होणे आवश्यक आहे. सदरचे काम न.प. फिल्टर हाऊस पाणी सोडबंदसाठी कर्मचारी पुरविणे या लेखाशिर्षामधुन प्रस्तावित करण्यात येत आहे. या लेखाशिर्ष मधुन पा.पु. विभागाकडुन चौमाहीसाठी र.रु. ४० लाख इतकी तरतुद केली आहे. सबब सदर अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेवुन निविदा मागवुन कामगिरी करणेकामी प्रशासकीय ठरावास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७६ /२०२३** दि. 23 / 09/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी सन २०२३ - २०२४ चे दुरुस्ती अंदाजपत्रकामध्ये आवश्यक तरतुद उपलब्ध करुन घेणेच्या अटीस अधिन राहुन ए झोन विभागाकरीता पाणी सोडबंद करणेकरीता टनंकी पुरविणे कामाचे र.रु. २९,९२,५०४/- इतक्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत असुन आर्थिक तरतुद पाहून निविदा मागविणेत यावी.

23/04/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: मा.आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांचे टि.पी.स्कीम-१ फायनल प्लॉट नं.६२९ पै.(प्रांत कार्यालया नजीक) येथे शासकीय निवासस्थान इमारत बांधणे (भाग-१). अंदाजपत्रकीय र.रु. २,१८,९४,९४०/- (जी.एस.टी. सह)

**प्रस्ताव**

नगरविकास विभागाकडील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३ पोटकलम (२) व (२ ए) नुसार दि.२९ जून २०२२ रोजी प्रसिध्द झाले अधिसुचनेव्दारे इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झालेले असुन महानगरपालिकेच्या स्थापने नंतर महानगरपालिकेचे मा.आयुक्त यांचेसाठी निवासस्थानाची आवश्यकता असुन सद्यस्थितीत मा.आयुक्त निवासस्थानाची व्यवस्था नसलेने निवासस्थान बांधणे आवश्यक आहे. याकरीता इकडील नगररचना खात्याकडून प्राप्त माहितीनुसार मा.आयुक्त व नगररचनाकार यांचेसह समक्ष पाहणी करुन प्रांत कार्यालयानजीक टी.पी.स्कीम १, फायनल प्लॉट नं.६२९ पै.हि जागा त्यांना निश्चित केलेली आहे. या जागेमध्ये,

" मा. आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांचे टि.पी.स्कीम-१, फायनल प्लॉट नं.६२९ पै.(प्रांत कार्यालया नजीक) येथे शासकीय निवासस्थान इमारत बांधणे, (भाग-१) "अंदाजपत्रकीय र.रु. २,१८,९४,९४०/- (जी.एस.टी. सह) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदर अंदजपत्रकास मंजुरी मिळणे करिता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७७ /२०२३** दि. २५ /०७ /२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार "मा. आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी यांस टि.पी.स्कीम-१, फायनल प्लॉट नं.६२९ पै. (प्रांत कार्यालया नजीक) येथे शासकीय निवासस्थान इमारत बांधणे, (भाग-१) "अंदाजपत्रकीय र.रु. २,१८,९४,९४०/- (जी.एस.टी. सह) अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत असुन आवश्यक त्याकामी तांत्रिक मंजुरी घेऊन आर्थिक तरतुद पाहून निविदा मागविणेत यावी.

25/07/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः विकास योजना इचलकरंजी (मंजुर) भुसंपादन, आरक्षण क्र.I/३२,चिल्ड्रन प्ले-ग्राऊंड, सि.स.नं.७३४ पै.७४४ पै.७५१ पै.आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०.०६ हे.क्षेत्राचे भुसंपादन होणेकरिता प्रशासकीय ठराव होणे बाबत.

## प्रस्ताव

संदर्भ :- श्रीराम माधव मोघे यांची दि.२३/१२/२०२२ रोजीची (इकडे प्राप्त दि.२६/१२/२०२२) व श्री.केशव माधव मोघे यांची दि.०९/०१/२०२३ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस / २१११/१३५२/प्र.क्र.१९/१२/डी.पी.सॅन्क्शन/ युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असून दि.१०/०७/२०१२ रोजी पासून अंमलात आहे. उक्त विकास योजनेनुसार आरक्षण क्र.I/३२,चिल्ड्रन प्ले- ग्राऊंड या आरक्षणाने बाधीत होणा-या इचलकरंजी सि.स.नं.७३४पै,७४१ पै, ७४४ पै,७५१ पै. मधील श्री.श्रीराम माधव मोघे यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरिता दि.२३/१२/२०२२ रोजीची (इकडे प्राप्त दि.२६/१२/२०२२) व श्री.केशव माधव मोघे यांची दि.०९/०१/२०२३ रोजीची खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे.

विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र.I/३२, चिल्ड्रन प्ले- ग्राऊंड हे इचलकरंजी सि.स.नं.७३४पै,७४१ पै, ७४४ पै,७५१ पै.मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकूण क्षेत्र हे अंदाजे ०.०६ हे. इतके आहे. खरेदी सुचनेमध्ये नमुद केलेनुसार अर्जदार यांचे इचलकरंजी सि.स.नं.७३४ पै,७४१ पै, ७४४ पै, ७५१ पै. मधील एकुण अंदाजे ०.०६ हे. इतके क्षेत्र बाधित होते.

सबब आरक्षण क्र.I/३२, चिल्ड्रन प्ले- ग्राऊंड चे अंदाजे ०.०६ हे. या संपुर्ण क्षेत्राकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम -१२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरिता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणे करिता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७८ /२०२३** दि. २५ / ०७ /२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम -१२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीन्वये विकास योजना इचलकरंजी (मंजुर) भुसंपादन, आरक्षण क्र.I/३२,चिल्ड्रन प्ले-ग्राऊंड, सि.स.नं.७३४ पै.७४४ पै.७५१ पै.आरक्षणाचे क्षेत्र ०.०६ हे. या संपुर्ण क्षेत्राचे भुसंपादन करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरकामी येणा-या खर्चास ही मंजुरी देणेत येत आहे.

25/07/2023
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह) (पुन्हा लागू) अधिनियम १९७९ ची अंमलबजावणी करणे.

## प्रस्ताव

कायदा आणि न्यायव्यवस्था विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३ नोव्हेंबर २०१२ चे सुधारीत आवृत्तीन्वये महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्राकरीता " इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह) (पुन्हा लागू) अधिनियम १९७९ (The Maharashtra Tax on Buildings (With larger residential Premises) ( Re-Enacted ) लागू करणेत आलेला आहे.

याद्वारे अधिनियम खालील बाबीची तरतुद करणेत आलेली आहे.

१) सदर अधिनियमातील नियम ३ पोट नियम (४) (ii) नुसार बृहमुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता इतर महापालिका क्षेत्रात १५० चौ.मी.क्षेत्रापेक्षा जास्त आहे आणि दर योग्यमुल्य एक हजारपेक्षा जास्त आहे. अशा निवासी जागेच्या मिळकतींना शेडयुल (सेक्सन ३) मध्ये नमुद केले दरानुसार निवासी जागेच्या दरयोग्य मुल्याच्या १०% इतका कर आकारणेची तरतुद करणेत आलेली आहे.

२) तसेच नियम ४(१) व (२) नुसार सदर कर खालील नमुद बाबीवर आकारला जाणार आहे.(१) इमारतीतील कोणत्याही निवासी जागेचा भोगवटदार किंवा इमारतीचा मालक असेल. (२) (अ) जर जागा भाडेकराराकडून दिली गेली असेल (ब) परिसर उपलेट असल्यास वरिष्ठ भाडेकराराकडून.

३) अधिनियमातील नियम ८ (१) नुसार करपात्र परिसर असलेल्या सर्व इमारतीची तपासणी करुन त्याची यादी आणि दर तयार करुन प्रकाशित करणे आवश्यक आहे.(२) तसेच नियम ९ (३) नुसार सदर यादीतील कोणतीही नोंद पडताळणीअंती समाविष्ट करुन, हटून किंवा बदलून यादी अद्यावत करता येईल. (३) प्रत्येक करपात्र जागेचा मालकाकडून मालमत्ता वापर निवासी सुरु आहे किंवा निवासी वापर बंद आहे याचा तपशिल सादर करेल व त्यानुसार सदरची निवासी मिळकत करपात्र राहणे बंद राहिल.

४) अधिनियम ९ (१) नुसार प्रथमच तयार करणेत येणारी मुल्यमापन यादी साधारणपणे एक वर्षाच्या आत तयार केली जाईल आणि त्यानंतरची प्रत्येक यादी ती वर्षाच्या ३० जुनच्या तारखेपुर्वी तयार केली जाईल.

५) नियम १० तील तरतुदीनुसार मुल्यांकन यादी किंवा सुधारणांची यादी प्रकाशीत करणे आवश्यक आहे, व अशी यादी कोणतेही शुल्क न घेता जागेचा मालक, किंवा त्यांचा एंजट यास देता येईल. अशी यादी प्रसिध्दी केल्यानंतर त्यात नमुद १५ दिवसांपेक्षा कमी आणि तीस दिवसांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीतीच्या आत यादीवर आक्षेप घेतला जाईल व तशी नोंद पुस्तकात घेतली जाईल.अशा यादीवर आक्षेप घेणा-याकडून सुनावणी घेऊन त्यावर निकाल देईल शक्य असल्यास कोणतीही दुरुस्ती यादीमध्ये करणेत येईल. अशी प्रमाणित केलेली यादी प्रसिध्द करणेत येईल.

६) नियम ११ नुसार कराच्या रक्कमेवर आक्षेप घेणारी कोणतीही व्यक्ती कर भरण्याचे अधिकार किंवा त्यांचे दायित्व नाकारल्यास अपिलीय प्राधिकरणाकडे विहीत नमुन्यात अपील करु शकते. परंतु कर भरल्याशिवाय असे कोणतेही अपिल दाखल करता येणार नाही. दाखल केलेले अपिल पुरेसे कारण समाधानकारक असल्यास सदरचे अपिल मान्य करता येईल. अपिल मान्य करताना मुल्यांकनाची पुष्टी,कमी वाढ इत्यादी कारणासह निर्देश देता येईल सदरचे आदेश अंतिम असतील.

CamScanner

७) नियम १२,२८ नुसार निवासी कर हा ज्या पध्दतीने मालमत्ता कर वसुल केला जातो त्याच पध्दतीने १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत वसुल केला जाईल. देयकामध्ये नियम १३ व १४ व १९ नुसार, असा कर किंवा (मुदतीत न भरल्यामुळे आकारणेत आलेल्या दंडाच्या मानाने देय असलेली रक्कम सर्व प्रत्येक वर्षाच्या समाप्तीच्या ३ महिन्यांच्या आत राज्य सरकारकडे भरणा केली जाईल व त्याचे विवरणपत्र सादर केले जाईल.

८) नियम १५ नुसार, असा कर किंवा दंडाच्या वसुलीमध्ये राज्य सरकारकडे भरणा करणेस चुक केली असल्यास महापालिकेने कोणत्याही बँकेत ठेवलेल्या पैशातुन जेवढी रक्कम आहे तेवढी रक्कम सरकारी भरणा करावी लागेल.

९) नियम १७ व १८ व २९ मधिल तरतुदीनुसार, कर दात्याने भरलेला कर हा कायदयान्वये त्याच्या रक्कमेच्या रक्कमेपेक्षा जास्त आहे. अशा कर दात्याला अपिल आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत जादा रक्कमेचा परतावा मिळण्याचा अधिकार असेल. किंवा रद्द केलेल्या कायद्यांतर्गत कोणतीही रक्कम भरणा-या कोणत्याही व्यक्तीने या कायद्यांतर्गत कर भरण्यास जबाबदार नाही असे आढळल्यास शक्य तितक्या लवकर अशा व्यक्तीला योग्य त्या चौकशीअंती भरलेला परताना देता येईल.

१०) नियम २१ नुसार निवासी कर आकारणीकामी कर दात्याने सादर केलेली माहिती चुकीची आढळल्यास त्याला एक मुदतीसाठी कोणत्याही एका वर्तनाच्या कारावासाची शिक्षा दिली जाईल. ती तीन महिन्यापर्यंत वाढू शकेल किंवा पाचशे रुपयापर्यंत वाढू शकेल.

११) नियम २४ नुसार केंद्र किंवा राज्य सरकार, तसेच स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या आणि केवळ सार्वजनिक उदेशासाठी वापरल्या जाणा-या इमारती.

मा.शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र मनपा २०२२/ प्र.क्र. ९६/नवि-१८दिनांक २९/०६/२०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करणेत आलेले आहे.

वरील अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून महानगरपालिका क्षेत्राकरिता " इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह ) (पुन्हा लागू) अधिनियम १९७१ ची अंमलबजावणी इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत करणे आवश्यक आहे.

तत्कालीन नगरपालिका कालावधीमध्ये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात इचलकरंजी नगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ताची मोजणी (चतुर्थ वार्षिक कर आकारणी) पुर्ण करणेत येवून सुधारीत कर आकारणी करणेत आलेली आहे. सदर सर्व वॉर्डाच्या कर आकारणी यादीमध्ये नमुद असलेल्या १५० पेक्षा जास्त क्षेत्रफळ असणा-या निवासी मिळकतीची पडताळणी करुन त्याची यादी तयार करुन त्यामध्ये खालीलप्रमाणे वॉर्डनिहाय निवासी मिळकतीची संख्या व त्याचे एकूण वार्षिक कर योग्य मुल्य दर्शविले आहे.

| वॉर्ड नंबर | १५० पेक्षा जास्त क्षेत्रफळ असणा-या निवासी मिळकतीची संख्या | वार्षिक कर योग्य मुल्य |
|---|---|---|
| १ | २५ | ६८२३१७ |
| २ | ४६ | १७०२३८१ |
| ३ | ५५ | १५५८३८० |
| ४ | २७ | ११४८४८६ |
| ५ | ७९ | ३३६७०८७ |
| ६ | ७२ | ३०६५३६७ |
| ७ | २७ | ९८२२९९ |
| ८ | ८० | ३२०९८२० |
| ९ | ८९ | २८८३४११ |
| १० | ९० | ३४०८७८७ |
| ११ | ३९ | २१७५५४४ |

| | | |
|---|---|---|
| १२ | ५६ | ३०५६००४ |
| १३ | ७५ | ३२१७४४८ |
| १४ | ५० | १८६६९२० |
| १५ | ४८ | १८६१०६४ |
| १६ | ६७ | २९८८७७० |
| १७ | ६७ | ३३६९०६१ |
| १८ | २८ | ११०६३४७ |
| १९ | १०९ | ४०११०७३ |
| २० | ३१ | १२५१६१४ |
| २१ | ५२ | २३३४२६३ |
| २२ | १८ | ६८५६७१ |
| २३ | ११ | ३९७२७८ |
| २४ | ४४ | १६४९६६५ |
| २५ | ३७ | ११७२६९१ |
| २६ | ९ | २१२४७० |
| एकूण | १२५१ | ५,२३,६४,३०६ |

वरीलप्रमाणे १५० चौ.मी.व त्यापेक्षा जादा क्षेत्र असलेल्या एकूण १२५१ निवासी मिळकती असून त्याचे एकूण वार्षिक कर योग्य मुल्य ५,२३,६४,३०६/- इतके आहे. सदर १२५१ मिळकतधारकांना त्यांचे वार्षिक कर योग्य मुल्यावर १०% निवासी कराची आकारणी करुन, अशी यादी १५ दिवसाकरीता नोटीस बोर्ड तसेच दैनिक वृतपत्रात प्रसिध्द करुन त्यावर आक्षेप मागविणे आवश्यक आहे. आलेल्या आक्षेपाची तसेच नियम ११ नुसार आलेल्या अपिलाची सुनावणी घेऊन त्यावर निर्णय देणे आवश्यक आहे. तदनंतर अंतिम यादीनुसार सदर मिळकतधारकांना त्यांना अनुज्ञेय करणेत येणारे कर देयकामध्ये निवासी कराचा समावेश करुन त्यांना सन २०२३-२०२४ चे कर मागणीचे देयकामधून सदर कर वसुलात आणणे आवश्यक आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कराधान नियम मधिल कलम १२९ (२) मध्ये "कलम ९९ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेस निर्धारीत करता येईल अशा दराने व दिनांकास आणि त्या दिनांकापासून मालमत्ता कर बसविण्याची तरतुद आहे. अशा कर कलम ९९ मधिल तरतुदीनुसार पुढील सरकारी वर्षात ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील तो दर व ती मर्यादार प्रकरण ११ मध्ये विहीत केलेल्या मर्यादास व शर्तीस अधीन राहून २० फेब्रुवारी किंवा त्यापुर्वी मा.महासभेच्या मंजूरीने बसविता येईल अशी तरतुद आहे.

यास अनुसरुन महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्राकरीता "इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह ) (पुन्हा लागू ) अधिनियम १९७९ मधिल तरतुदीनुसार ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १५० चौ.मी.व त्यापेक्षा जास्त आहे अशा मिळकतींना त्यांचे मालमत्ता कर देयकातून निवासी कर १०% प्रमाणे पुढील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात म्हणजेच दि०१/०४/२०२३ पासून लागू करणेस मंजुरी मिळणे करिता इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७९ /२०२३** **दि. २५ / ०७ /२०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्राकरीता "इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह ) (पुन्हा लागू ) अधिनियम १९७९ मधिल तरतुदीनुसार महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कराधान नियम मधिल कलम १२९ (२) मध्ये "कलम ९९ चे तरतुदीन्वये प्रकरण ११ मधील विहीत केलेल्या मर्यादास व शर्तीस अधीन राहून ज्या निवासी मिळकतीचे क्षेत्र १५० चौ.मी.व त्यापेक्षा जास्त आहे

CamScanner

अशा मिळकतींना त्यांचे वार्षिक कर योग्य मुल्यावर १०% निवासी कर याप्रमाणे मालमत्ता कर देयकातून पुढील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात म्हणजेच दि०१/०४/२०२३ पासून लागू करणेस मंजूरी देणेत येत आहे.

25/01/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रि.स.नं.६९० पैकी व रि.स.नं.४४४ पैकी या जागेवर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणे बाबत.

## प्रस्ताव

संदर्भ : १) तत्कालीन नगरपरिषदेचा मे.कौन्सिल ठराव नं.१०५ दि.३१/०८/२०१९ रोजीचा ठराव.

२) मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जा.क्र.टि.पी./२२६३/२०१९ दि.०३/१०/२०१९ रोजी या कार्यालयाने पाठविलेला प्रस्ताव

३) मा.आवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.टिपीएस-२११९/१९९५/प्र.क्र.१३५/२०२२/नवि-१३ दि.११/०१/२०२३ रोजीचे निदेश.

मंजूर विकास योजना इचलकरंजी मूळ हद्द भागशः सुधारीत आणि वाढीव हद्द सुधारीत दि.२४/०५/२०१२ ची अधिसुचना क्र.No.TPS-२१११/१३५२/CR-१९/१२/D.P.Sanction UD-१३ अन्वये मंजूर झाली असून सदर विकास योजना दि.१०/०७/२०१२ पासून अंमलात आली आहे.

उक्त विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.I/१३ "शैक्षणिक संकुल आणि क्रिडा संकुल" यासाठी आरक्षित असून सदर आरक्षण इचलकरंजी रि.स.नं.६९० पैकी या जागेमध्ये समाविष्ट होत असून या आरक्षणाचे क्षेत्रफळ १ हेक्टर ६ आर इतके आहे.तसेच उक्त विकास योजनेमध्ये रि.स.नं.४४४ पैकी जागा आरक्षण क्र.I/१४ "व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर " साठी आरक्षित असून त्याचे क्षेत्र ८१ आर इतके आहे. उक्त दोन्ही आरक्षणांचे समुचित प्राधिकरण इचलकरंजी महानगरपालिका आहे. तसेच सदर क्षेत्रांच्या संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून ती सद्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने कौन्सिल ठराव नं.१०५ दि.३१/०८/२०१९ अन्वये मंजूरी दिले नुसार, तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी क्र.टिपीएस-२११९/१९९५/प्र.क्र.१३५/२०२२/नवि-१३ दि.११/०१/२०२३ रोजी उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम -१९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश दिलेले आहेत.

" महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त आरक्षणामधून जाणारा पूर्व-पश्चिम १२.०० मी.वि.यो.रस्ता कायम ठेऊन तसेच आ.क्र.I/१३ "शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल "या आरक्षणापैकी उत्तरेकडील ५०% क्षेत्र (५३ आर ) याच प्रयोजनासाठी आरक्षणात कायम ठेऊन आ.क्र.I/१३ "शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल व क्रिडा संकुल " या आरक्षणापैकी उर्वरित दक्षिणेकडील बाजूचे ५०% क्षेत्र (८१ आर ) वगळून त्याऐवजी एकूण १.३४ हे.आर क्षेत्रावर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणेकामी व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीस अनुसरुन फेरबदल करणे. "

CamScanner

मा. शासनाच्या उक्त निदेशाचे अवलोकन केले असता, विकास योजनेमध्ये फेरबदल करणेकामी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) मा.शासनाच्या दि.११/०१/२०२३ रोजीच्या निदेशात नमुद केलेप्रमाणे वर नमुद क्षेत्रावर न्यायालयीन इमारत ( अद्यावत न्याय संकुल ) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणेकामी व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीस अनुसरुन फेरबदलाची सूचना आम जनतेच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी दि.११/०१/२०२३ रोजीच्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रसिध्द करणे.

२) सदर दोन आरक्षणाखालील जागा भूसंपादनव्दारे सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या (तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या ) मालकीची व ताब्यात असल्याने सदर जागा विधी व न्याय विभागास न्यायालयीन इमारतीकरिता हस्तांतरण करण्याची कार्यवाही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ ( MMCACT, १९४९ ) मधील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे स्तरावरुन करणे. याकरीता भुमी संपादन व पुर्नवसन करताना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ मधील तरतुदीनुसार उक्त जागेचे आजमितीची किंमत व भुसंपादनासाठी महानगरपालिकेने केलेला खर्च विधी व न्याय विभागाने महानगरपालिकेस देणेची कार्यवाही पूर्ण करणे.

३) वरील दोन्ही मुद्यांची कार्यवाही पुर्ण झालेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मध्ये विहीत केलेली आवश्यक ती सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करणे.

सबब, मा. शासनाच्या दि. ११/०१/२०२३ रोजीच्या निदेशानुसार उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल करणेकामी वरील मुद्दा क्र. १ ते ३ बाबतची कार्यवाही करणेकामी प्रशासकीय ठराव करणेस इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८० /२०२३** **दि. २५ / ०७ /२०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रि.स.नं.६९० पैकी व रि.स.नं.४४४ पैकी या जागेवर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

१) मा.शासनाच्या दि.११/०१/२०२३ रोजीच्या निदेशात नमुद केलेप्रमाणे वर नमुद क्षेत्रावर न्यायालयीन इमारत ( अद्यावत न्याय संकुल ) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणेकामी व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीस अनुसरुन फेरबदलाची सूचना आम जनतेच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी दि.११/०१/२०२३ रोजीच्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रसिध्द करणे.

२) सदर दोन आरक्षणाखालील जागा भूसंपादनव्दारे सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या (तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या ) मालकीची व ताब्यात असल्याने सदर जागा विधी व न्याय विभागास न्यायालयीन इमारतीकरिता हस्तांतरण करण्याची कार्यवाही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ ( MMCACT, १९४९ ) मधील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे स्तरावरुन

CS CamScanner

करणे. याकरीता भुमी संपादन व पुर्नवसन करताना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ मधील तरतुदीनुसार उक्त जागेचे आजमितीची किंमत व भुसंपादनासाठी महानगरपालिकेने केलेला खर्च विधी व न्याय विभागाने महानगरपालिकेस देणेची कार्यवाही पूर्ण करणे.

३) वरील दोन्ही मुद्यांची कार्यवाही पुर्ण झालेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) मध्ये विहीत केलेली आवश्यक ती सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करणे.

25/01/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर हे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने सुधारीत करणेबाबत.

## प्रस्ताव

इचलकरंजी महानगरपालिकेने उत्पन्न वाढीच्या दृष्टीने जा.क्र.इमपा/लेप/०९/२०२२ दि.१०/१०/२०२२चे आदेशान्वये इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचे कर व दर सुधारणा करून लेखा व लेखापरिक्षण विभागाकडे माहिती देणेबाबत उपरोक्त आदेशान्वये सुचित केले आहे. आरोग्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचे कर व दर सुधारणा खालीलप्रमाणे केलेले आहे. तसेच मा.प्रभारी अधिकारी तथा प्रशासकसो,इ.म.न.पा.यांचे दि.१७/०४/२०२२ चे आदेशान्वये या त्यानुसार इकडून देण्यात येणाऱ्या सेवांचे दर सुधारीत कर त्यानुसार सदरची माहिती दि.१४/११/२०२२ रोजी देणेत आलेली होती. तद्नंतर मुख्य लेखाधिकारी, इ.म.प.यांनी दि.२३/०१/२०२३ चे परिपत्रकानुसार अंदाजपत्रकामध्ये उत्पन्न वाढीच्या दृष्टीने जे लेखाशिर्ष सुचविलेले आहेत त्यांचे बाबनिहाय प्रशासकीय ठराव करून लेखाविभागाकडे तात्काळ सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार भविष्यात म.न.पा.वर पडणाऱ्या आर्थिक भार विचारात घेता यापुर्वीचे सेवांचे कर व दर सुधारणा ह्या जवळपास २० ते ३० वर्षापासूनचे दर आहेत. त्यामध्ये कालानुरूप वाढ होणे अत्यावश्यक असलेने म.न.पा. मार्फत देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा चांगल्या प्रकारे देण्याच्या उद्देशाने दरात व करात खालीलप्रमाणे प्रस्तावित वाढ सुचविणेत येत आहे. त्यानुसार त्यामध्ये वाढ करण्यात येवून याकामी प्रशासकीय ठराव होणे आवश्यक आहे. तसेच नविन काही विशिष्ट वस्तूंची यादी फी यामध्ये समाविष्ट केलेली आहेत त्यासही मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्रं. | विशिष्ठ वस्तूंची यादी / फी | सद्याची फी | प्रस्तावित दर वाढ फी |
|---|---|---|---|
| १. | आरोग्य विषयक दाखला फी (आस्थापना/ व्यवसाय) | रू.२५००/- | रू. ३०००/- |
| २. | आरोग्य विषयक ना हरकत दाखला (बचत गट) | रू.२००/- | रू. ५००/- |
| ३. | सेप्टीक टँक उपसा फी शहर हद | रू.७००/- | रू. २०००/- |
| ४. | सेप्टीक टँक उपसा (शहरा बाहेरील १५किलो मीटर पर्यंत येता जाता व त्यापुढे प्रति किलो मीटर रू. २५ प्रमाणे) | रू.२०००/- | रू. ३०००/- |
| ५. | औषध फवारणी फी प्रति १०X१० = १०० फुट | रू.२८ /- | रू. १००/- |
| ६. | कातडी कमावणे दाखला | रू.२००/- | रू. ५००/- |
| ७. | फिरते शौचालय प्रतिदिन | रू.२०००/- | रू. २०००/- |
| ८. | जन्म प्रमाणपत्र | रू.१५/- प्रती | रू. ५०/- |
| ९. | मृत्यू प्रमाणपत्र | रू.२५/- प्रती | रू. १००/- |
| १०. | जन्म/मृत्यू नोंद नसलेबाबत समज | रू.५० /- | रू. १००/- |
| ११. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र | रू.१००० /- | रू. २०००/- |
| १२. | विशेष स्वच्छता कर | रू. ३०/- प्रती सीट | रू. ३६०/- |

| अ.क्रं | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सेवा कर | सद्याची फी (वार्षिक) | प्रस्तावित दर वाढ फी (वार्षिक) |
|---|---|---|---|
| १. | निवासी | रू.३६०/- | रू.३६०/- |

CamScanner

| अ.क्रं | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सेवा कर | सद्याची फी (वार्षिक) | प्रस्तावित दर वाढ फी (वार्षिक) |
|---|---|---|---|
| २. | शैक्षणिक संस्था/वस्तीगृहे धार्मिक संस्था या शासकीय/निमशासकीय कार्यालये. | रू.७२०/- | रू.७२०/- |
| ३. | विवाह कार्यालय, मनोरंजन सभागृहे एक पडदा चित्रपट | रू.६०००/- | रू.६०००/- |
| ४. | बहुपडदे चित्रपटगृहे | रू.१२०००/- | रू.१२०००/- |
| ५. | पन्नास खाटापेक्षा कमी रूग्णालये | रू.९६०/- | रू.९६०/- |
| ६. | पन्नास खाटापेक्षा जास्त रूग्णालये | रू.१४४०/- | रू.१४४०/- |
| ७. | शोरूम ( उपकरणे,फर्निचर आटो मोबाईल/इलेक्ट्रानिक्स,गोदामे, उपहार गृहे,हॉटेल,कारखाने) | रू.९६०/- | रू.९६०/- |
| ८. | राहण्याची व जेवण्याची व्यवस्था असणारे हॉटेल | रू.१२००/- | रू.१२००/- |
| ९. | इतर | रू.५४०/- | रू.५४०/- |

| अ.क्रं. | विशिष्ठ वस्तूंची यादी / फी | सद्याची फी | प्रस्तावित दर वाढ फी |
|---|---|---|---|
| १. | इचलकरंजी शहरातील X-Ray केंद्र व्यवसाय परवाना शुल्क | -- | रू.२०००/- |
| २. | शहरातील MRI/CT Scan केंद्र व्यवसाय परवाना शुल्क | -- | रू.१००००/- |
| ३. | शहरातील खाजगी वैद्यकीय ओ.पी.डी.व्यवसाय परवाना शुल्क | -- | रू.२०००/- |
| ४. | शहरातील खाजगी पॅथालॉजी लॅब व्यवसाय परवाना शुल्क | -- | रू.२०००/- |
| ५. | शहरातील खाजगी ब्लड बँक/रक्तपेढी परवाना शुल्क | -- | रू.५०००/- |
| ६. | शहरातील खाजगी फिजीयोथेरपी सेंटर व्यवसाय परवाना शुल्क | -- | रू.२०००/- |

इचलकरंजी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचे कर व दर सुधारणाबाबत वर दर्शिविलेल्या तक्त्यातील सेवांचे शुल्क प्रस्तावित दरवाढ फी प्रशासकीय मान्येस्तव सादर.

<u>प्रशासकीय ठराव क्र. ८७/२०२३</u>

दि. १६/०२/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी महानगरपालिका आरोग्य विभागाकडुन प्रस्तावात नमुद करणेत आलेल्या सेवांचे कर व दर वरीलप्रमाणे प्रस्तावित केले दरानुसार दरवाढ / फी वाढ करणेस मंजुरी देणेत येत असुन सदरची दरवाढ / फी वाढ दि. ०१/०४/२०२३ पासुन लागु करणेस मान्यता देणेत येत आहे.

16/02/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिका मालमत्ता कराचे नविन दर निश्चित करणे बाबत.

**प्रस्ताव**

प्रस्तावाचे अनुषंगाने मालमत्ता कराचे नविन दर खालिलप्रमाणे निश्चित करणे आवश्यक आहे.

| कराचे नांव | महानगरपालिका अधिनियम नमुद केलेनुसार दर | निश्चित करावयाचे दर |
|---|---|---|
| संयुक्त कर ( सर्वसाधारण कर ) | १२ टक्याहुन कमी नाही इतका | कर योग्य मुल्यावर २८% |
| पाणीपट्टी | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | याबाबतचा प्रस्ताव पाणी पुरवठा विभागाकडून सादर करणे उचित होईल. |
| पाणीपुरवठा लाभ कर ( अतिरिक्त पाणीपट्टी ) | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | कर योग्य मुल्यावर २% |
| साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | ड्रेनेज सुविधेचा लाभ घेतला असल्यास कर योग्य मुल्यावर ५%<br>लाभ घेतला नसल्यास प्रत्येक शौचालयास रु.१००/- वार्षिक |
| मलप्रवाह लाभ सुविधा कर | कामांच्या प्रमाणात कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | कर योग्य मुल्यावर २% |
| शिक्षण उपकर | कर योग्य मुल्यावर १% पेक्षा अधिक असणार नाही या दराने | विशेष शिक्षण कर यानुसार २.८०% दराने |
| पथकर | कर योग्य मुल्यावर १०% पेक्षा अधिक असणार नाही या दराने | कर योग्य मुल्यावर १% |
| वृक्ष कर | - | १% कर योग्य मुल्यावर |
| अग्निशमन कर | - | सर्वसाधारण (संयुक्त कर) कराच्या रक्कमेवर १% |
| घनकचरा / सेवा उपयोगीता शुल्क | - | नगरविकास विभागाकडील अधिसुचना दि.०१/०७/२०१९ मध्ये नमुद केले दरानुसार |
| महाराष्ट्र शासनाचे शिक्षण कर व रोजगार हमी कर | - | कर योग्य मुल्यावर शासनाने निश्चित केले दरानुसार ( महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर कायदा १९६२ कलम ३ ) |
| दाखला फी | १००/- | २५०/- |
| येणे बाकी नसले बाबतचा नाहरकत दाखला | ० | १००/- |
| नवीन इमारतीस दयावयाचे मिळकत नंबर प्लेट | ५०/- | १००/- |

वरीलप्रमाणे प्रस्तावीत केलेले नविन मालमत्ता कर व मालमत्ता कराचे दर लागू करणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीने बसविणे आवश्यक आहे. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कराधान नियम मधिल कलम १२९ (२) मध्ये "कलम ९९ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेस निर्धारीत

करता येईल अशा दराने व दिनांकास आणि त्या दिनांकापासून मालमत्ता कर बसविण्याची तरतुद आहे अशा कर कलम ९९ मधिल तरतुदीनुसार पुढील सरकारी वर्षात ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील तो दर व ती मर्यादा प्रकरण ११ मध्ये विहीत केलेल्या मर्यादांस व शर्तीस अधीन राहुन २० फेब्रुवारी किंवा त्यापुर्वी मा. महासभेच्या मंजूरीने बसविता येईल अशी तरतुद आहे."

यास अनुसरुन वरीलप्रमाणे नविन बसवावयाचे मालमत्ता कर व नविन दराने सुधारीत केलेले मालमत्ता कर हे दि.०१/०४/२०२३ पासून लागू करणेस मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८२/२०२३** दि. १६/०२/२०२३

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ कराधान नियम मधील कलम १२९ (२) मध्ये कलम ९९ च्या तरतुदीन्वये तसेच प्रकरण ११ मध्ये विहीत केले मर्यादा व शर्तीस अधिन राहुन खालीलप्रमाणे नवीन मालमत्ता कर व नवीन दराने सुधारीत केलेले मालमत्ता कराचे दर दि. ०१/०४/२०२३ पासुन लागु करणेस मंजुरी देणेत येत आहे.

| कराचे नांव | महानगरपालिका अधिनियम नमुद केलेनुसार दर | सुधारीत नवीन मालमत्ता कराचे दर |
|---|---|---|
| संयुक्त कर ( सर्वसाधारण कर) | १२ टक्याहुन कमी नाही इतका | कर योग्य मुल्यावर २८% |
| पाणीपट्टी | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | याबाबतचा प्रस्ताव पाणी पुरवठा विभागाकडून सादर करणे उचित होईल. |
| पाणीपुरवठा लाभ कर ( अतिरिक्त पाणीपट्टी ) | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | कर योग्य मुल्यावर २% |
| साफसफाई कर किंवा मलप्रवाह कर | कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | ड्रेनेज सुविधेचा लाभ घेतला असल्यास कर योग्य मुल्यावर ५% लाभ घेतला नसल्यास प्रत्येक शौचालयास रु.१००/- वार्षिक |
| मलप्रवाह लाभ सुविधा कर | कामांच्या प्रमाणात कर योग्य मुल्यावर महानगरपालिकेस वाजवी वाटेल त्या दराने | कर योग्य मुल्यावर २% |
| शिक्षण उपकर | कर योग्य मुल्यावर १% पेक्षा अधिक असणार नाही या दराने | विशेष शिक्षण कर यानुसार २.८०% दराने |
| पथकर | कर योग्य मुल्यावर १०% पेक्षा अधिक असणार नाही या दराने | कर योग्य मुल्यावर १% |
| वृक्ष कर | - | १% कर योग्य मुल्यावर |
| अग्निशमन कर | - | सर्वसाधारण (संयुक्त कर) कराच्या रक्कमेवर १% |
| घनकचरा / सेवा उपयोगीता शुल्क | - | नगरविकास विभागाकडील अधिसुचना दि.०१/०७/२०१९ मध्ये नमुद केले दरानुसार |
| महाराष्ट्र शासनाचे शिक्षण कर व रोजगार हमी कर | - | कर योग्य मुल्यावर शासनाने निश्चित केले दरानुसार ( महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर कायदा १९६२ कलम ३ ) |
| दाखला फी | १००/- | २५०/- |
| येणे बाकी नसले बाबतचा नाहरकत दाखला | ० | १००/- |

CamScanner

| कराचे नांव | महानगरपालिका अधिनियम नमुद केलेनुसार दर | सुधारीत नवीन मालमत्ता कराचे दर |
|---|---|---|
| नवीन इमारतीस दयावयाचे मिळकत नंबर प्लेट | ५०/- | १००/- |

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिकेच्या अभिलेख विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर सुधारणा करणेबाबत.

## प्रस्ताव

जा.क्र. इमपा/ लेप/ ०९/ २०२२ दि. १०/१०/२०२२ चे आदेशान्वये इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर सुधारणा करुन लेखा व लेखापरिक्षण विभागाकडे माहिती देणेबाबत उपरोक्त आदेशान्वये सुचित केले आहे. अभिलेख विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर सुधाराणा खालीलप्रमाणे केलेले आहे.

| अ.क्र. | दाखल्यांचे नाव | सद्याची फी | प्रस्तावित दरवाढ फी |
|---|---|---|---|
| १ | असेसमेंट उतारा (हस्त लिखीत) | २५/- प्रती पान | ५०/- प्रती पान |
| २ | असेसमेंट उतारा (ऑनलाइन) | २५/- प्रती पान | ५०/- प्रती पान |
| ३ | विवाह नोंदणी (फॉर्म फी) | निशुल्क | १००/- प्रती फॉर्म |

इचलकरंजी महानगरपालिकेच्या अभिलेख विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर सुधारणा बाबत वर दर्शविलेल्या तक्त्यातील सेवांचे शुल्क वाढीसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.८३/२०२३** दि. १६/०२/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या अभिलेख विभागामार्फत देण्यात येणा-या सेवांचे कर व दर सुधारणा बाबत दर्शविले तक्त्यातील सेवांचे शुल्क वाढीकामी प्रस्तावित केलेल्या दरवाढीस खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | दाखल्यांचे नाव | सद्याची फी | दरवाढ फी |
|---|---|---|---|
| १ | असेसमेंट उतारा (हस्त लिखीत) | २५/- प्रती पान | ५०/- प्रती पान |
| २ | असेसमेंट उतारा (ऑनलाइन) | २५/- प्रती पान | ५०/- प्रती पान |
| ३ | विवाह नोंदणी (फॉर्म फी) | निशुल्क | १००/- प्रती फॉर्म |

16/02/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिकेकडील कार्यरत कर्मचारी यांना गणवेश वाटप करणेबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिकेकडील कर्मचा-यांना गणवेश खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करणेस्तव वृत्तपत्रातुन प्रसिध्दी देवुन दर व नमुने मागविणेत आले होते. त्यानुसार खुल्या बाजारातुन ३ मक्तेदारांकडुन नमुने व दर प्राप्त झाले आहेत. सदरचे प्राप्त नमुने दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन इन्स्टीट्युट (डी.के.टी.ई) या संस्थेकडून तपासुन घेवुन त्यांचे स्पेसिफिकेशन टेस्ट रिपोर्ट प्राप्त झालेला आहे तो सोबत आहे.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांचेकडुन गणवेश खरेदीकामी/ पुरविणेकामी शासन निर्णय आहे. तथापि इकडील स्पेसिफिकेशन प्रमाणे गणवेश पुरवठा करणेस यंत्रमाग महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे. (सोबत पत्र आहे) तसेच GEM पोर्टलवर गणेवश खरेदीकामी फॅसिलिटी मॅनेजर यांचा अहवाल घेतला असुन GEM पोर्टलवर सादर स्पेसिफिकेशन प्रमाणे गणवेश उपलब्ध नसलेबाबत अहवाल दिला आहे.

तरी उपरोक्त कामी प्राप्त झालेल्या सर्वात कमीच्या दरानुसार सोबत जोडले तक्त्यानुसार र. रु. ४९,६२,५८९/- चे अंदाजपत्रकी तयार करणेत आले आहे. तरी अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व सदर कामी स्पेसिफिकेशन प्रमाणे ई-निविदा मागविणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८४/२०२३** दि. २०।०२।२०२3

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी इचलकरंजी महानगरपालिकेकडील पात्र अधिकारी/ कर्मचारी यांना गणवेश खरेदी करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,६२,५८९/- यास मंजुरी देणेत येत असुन आर्थिक तरतुद पाहुन ई-निविदा मागविणेत याव्यात.

20।02।202

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: महानगरपालिका मालकीच्या विविध ठिकाणी बांधणेत आलेल्या सांस्कृतीक हॉल/ कार्यालयाचे, योग व जिम्नॅशिअम व्यायाम शाळा, राजाराम स्टेडियम (मैदान) इ. मध्ये भाडेवाढ करणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ - १) मा. प्रभारी अधिकारी तथा प्रशासकसो यांचे दि. ०६/१०/२०२२ इ. रोजी झालेल्या आढावा बैठक
२) जा.क्र. इमपा/ लेप/ ०९/ २०२२ दि. १०/१०/२०२२ रोजीचे परिपत्रक

इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या विविध ठिकाणी असणारे सांस्कृतीक हॉल, मैदाने, छोटया मोठया कार्यक्रमासाठी भाडेने देणेत येतात. सदर ठिकाणे वेळोवेळी नागरीक, विविध संघटना, क्रिडा समित्या, अन्य संस्था इ. भाडेने मागणी करीत असतात.

इचलकरंजी शहरातील खाजगी कार्यालये यांचे भाडे आकारणी दर पाहता महानगरपालिकेचे कार्यालंयाचे भाडे व अन्य कर यामध्ये थोडयाफार प्रमाणात फरक दिसुन येतो. यापुर्वी तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने निश्चित केलेलेप्रमाणे भाडे आकारणी होत असलेने इचलकरंजी महानगरपालिकेचे उत्पन्नामध्ये वाढ होणेसाठी उपरोक्त संदर्भिय झालेल्या निर्णयाप्रमाणे सुधारीत दरवाढ करणेबाबत सुचविणेत आलेले आहे. त्यानुसार याबाबतचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.न. | मंगलकार्यालयाचे नांव | जुने दर | | सुचविणेत आलेले दर | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंगलधाम | | | | | सदरचे कार्यालय भाडेने दिले जात नाही. |
| | अ) तळमजला | १०००/- | २५००/- | १०००/- | ३५००/- | |
| | ब) वरचा मजला | १०००/- | २५००/- | १०००/- | ३५००/- | |
| | क) नारायण सभागृह | १०००/- | २०००/- | १०००/- | ३०००/- | |
| २ | रिक्रिएशन हॉल | १०००/- | २०००/- | १०००/- | ३०००/- | |
| ३ | वेद भवन | १०००/- | २५००/- | १०००/- | ३५००/- | |
| ४ | शेळके भवन | १०००/- | २०००/- | १०००/- | ३०००/- | |
| ५ | राजीव गांधी भवन | | | | | |
| | अ) तळ मजला | २०००/- | ९०००/- | २०००/- | १२०००/- | |
| | ब) वरचा मजला | २०००/- | ४०००/- | २०००/- | ६०००/- | |
| | क) पटांगण | २०००/- | १००००/- | २०००/- | १२०००/- | |
| ६ | सोलगे भवन | १०००/- | १०००/- | १०००/- | २०००/- | |
| ७ | गेस्ट हाऊस | १०००/- | १०००/ | १०००/- | १०००/- | |
| ८ | कलागते भवन | ५००/- | ५००/- | १०००/- | १०००/- | |
| ९ | यशवंतराव चव्हाण (वंदे मातरम जवळ) | ५००/- | ५००/- | १०००/- | १०००/- | |
| १० | प्रियदर्शनी हॉल | ५००/- | ५००/- | १०००/- | १०००/- | |
| ११ | बॅटमिंटनसाठी हॉल/ कार्यालय प्रति तास भाडेने देणे (मासिक) | | ६००/- | | १०००/- | |
| १२ | राजाराम स्टेडीयम | | ६००/- | | १०००/- | |
| १३ | योग जिम्नॅशियम मैदान (क्रिकेट व शासकीय कार्यक्रम) (१ दिवस) | | | | १०००/- | |
| १४ | योग जिम्नॅशियम येथे योगासन संबंधित शिबिर / कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कार्यक्रम आयोजित करणेस. | | | १०००/- | २०००/- | |

CamScanner

इचलकरंजी महानगरपालिका मालकीचे आरगे भवन हे कार्यालय मक्ता पध्दतीने चालविणेस दिलेले आहे. तर कै. बाळासाहेब माने भवन याठिकाणी महानगरपालिकेचे विभागीय कार्यालय सुरु करणेत आलेले आहे. तर तक्त्यातील नव्याने सुचविणेत आलेल्या अ.न. १३ व १४ साठी यापुर्वी भाडे आकारणी करणेत येत नव्हते सदर मैदान व हॉलची भाडे आकारणी करणे योग्य होईल.

तसेच सदर कार्यालयामध्ये नागरीकांकडून कार्यक्रमावेळी वापरण्यात येत असलेल्या लाईट (वीज) भाडे रु. ८/- युनिट याप्रमाणे आकारणी करणेत येते. महावितरण विभागाकडून वारंवार लाईट (वीज) बिलामध्ये झालेली वाढ पाहता लाईट (वीज) भाडे रु. १०/- प्रती युनिट याप्रमाणे आकारणी होणे आवश्यक आहे. तरी सदर दरवाढीस मान्यतेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८५ /२०२३**

दि. २०/०२/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते १४ मध्ये नमुद असणा-या इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध ठिकाणचे सांस्कृतीक हॉल/ कार्यालये, मैदानांचे सुचविणेत आलेल्या दरानुसार भाडेवाढ करणेस मान्यता देणेत येत असुन नागरीक, विविध संघटना, क्रिडा समित्या, अन्य संस्थाकडून वापरणेत येणा-या कार्यालयांचे रु. १०/- प्रमाणे प्रती युनिट (वीज) आकारणी करणेसही मंजुरी देणेत येत आहे.

20/02/2023

(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः महानगरपालिका क्षेत्रात विशिष्ठ वस्तु व घरगुती वापराशिवाय इतर प्रयोजानार्थ विनिर्दिष्ठ केलेल्या वस्तु यांचे परवाना फी मध्ये दरवाढ करणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ - जा.क्र. इमपा/ लेप/ ०९/ २०२२ दि. १०/१०/२०२२ रोजीचे परिपत्रक

तत्कालीन नगरपरिषदेच्या मे. कौन्सिल ठराव नं. ५०३ दि. २८/०३/२०११ चे मंजुरीने इकडुन विशिष्ठ वस्तु व घरगुती वापराशिवाय इतर प्रयोजनार्थ विनिर्दिष्ठ परवाना देणेसाठी परवाना फी घेणेत येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३, ३८६ अन्वये विशिष्ठ ठरावीक मर्यादेपर्यत कोणत्याही जागेत किंवा कोणत्याही जागेवर विनिर्दिष्ठ प्रयोजनासाठी जागा वापरासाठी महानगरपालिकेकडुन परवाना देणेत येतो.

संदर्भीय परिपत्रकाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात विशिष्ठ वस्तु व घरगुती वापराशिवाय इतर प्रयोजनार्थ विनिर्दिष्ठ केलेल्या वस्तु यांचे परवाना फी यामध्ये १० ते १२ वर्षापासुन फी वाढ न झालेने सुधारीत २०% दरवाढ खालिलप्रमाणे आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८५/२०२३ / अ** दि. 20/02/2023

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महानगरपालिका क्षेत्रात विशिष्ठ वस्तु व घरगुती वापराशिवाय इतर प्रयोजनार्थ विनिर्दिष्ठ केलेल्या वस्तु यांचे परवाना फी मध्ये सोबतच्या परिशिष्ठाप्रमाणे २० % ०दरवाढ करणेस मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | वस्तूची यादी | मे. कौ. ठराव नं. ५०३ दि. २८/३/२०११ | २०% प्रमाणे वाढीव सुचविलेले दर |
|---|---|---|---|
| १ | १)पान तंबाखू विडी काडी सिगरेट किरकोळ विक्री | ५०० | ६०० |
| | २)पान तंबाखू विडी काडी सिगरेट होलसेल विक्री | १८०० | २२०० |
| २ | १)हेअर कटींग सलून (प्रत्येक खुर्चीस) | ३६० | ५०० |
| | २) हेअर कटींग सलून (ब्युटी पार्लर) | ४८० | ६०० |
| ३ | १) धोबी दुकान विज वापरासह | १००० | १२०० |
| | २) धोबी दुकान विज शिवाय डिलेव्हरी शॉप्स कोळशाची इस्त्री | ५०० | ६०० |
| ४ | १) चर्मकार दुकान (१०० स्क्वे. फुटाचे अतिल | ५०० | ६०० |
| | २) चर्मकार दुकान (१०० स्क्वे. फुटाचे वरील प्रत्येक शंभर फुटास अगर त्याचे भागास) | ८०० | १००० |
| | ३) चर्मकार दुकान रस्त्यावरील केबीन मध्ये व इतर ठिकाणी | ३०० | ४०० |
| ५ | लोहार /तांबट भाते, भुस, भट्टया, पोहे, चिरमुरे फुटाणे, वगैरे भट्टया व पिठाची गिरणी व डंक | | |
| | १) इले. ५ हॉर्स पॉवर पर्यत | ६०० | ८०० |
| | २) इले. ६ ते २५ हॉर्स पावर पर्यंत | ८५० | ११०० |
| | ३)इले. २६ ते ४५ हॉर्स पावर पर्यंत | १२०० | १५०० |
| | ४) ४५ हॉर्स पॉवरचे पुढे | २००० | २४०० |
| | ५) बिगर विजेचा वापर | ३०० | ४०० |
| ६ | पेट्रोल साठा विक्री डिझेल गॅस इंधनासाठी वापर | ५००० | ६००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | मोबाईल व तत्सम लुब्रीकंटस ऑईल विक्री | १५०० | १८०० |
| ८ | जळाऊ लाकुड विक्री | १००० | १२०० |
| ९ | जळाऊ कोळसा, कोक, किरकोळ साठा विक्री | १००० | १२०० |
| १० | १) सॉ मशिन इलेक्ट्रीक ५ हॉर्स पॉवर पर्यंत | १२०० | १५०० |
| | २) सॉ मशिन इलेक्ट्रीक ६ ते २५ हॉर्स पॉवर पर्यंत | १४०० | १७०० |
| | ३) सॉ मशिन इलेक्ट्रीक २६ ते ४५ हॉर्स पॉवर पर्यंत | २००० | २५०० |
| | ४) सॉ मशिन इलेक्ट्रीक ४५ हॉर्स पॉवर पर्यंत | ३००० | ३६०० |
| ११ | इमारत लाकूड, मंगलोरी कौले, विक्री | १५०० | १८०० |
| १२ | १) साबन कारखाने | २००० | २४०० |
| १३ | १) औषध दुकान व सौंदर्य प्रसादने | २००० | २४०० |
| | २) विष युक्त औषधे दुकाने केमिकल्स उत्पादन | १५०० | १८०० |
| | ३) विष युक्त औषधे दुकाने केमिकल्स विक्री | १५०० | १८०० |
| | ४) आयुर्वेदीक उत्पादन साठा व विक्री दुकान | २००० | २२०० |
| १४ | १) देशी दारु किरकोळ विक्री | ३००० | ३६०० |
| | २) ताडी विक्री | २००० | २४०० |
| | ३) देशी दारु घाऊक विक्री | ४००० | ४८०० |
| | ४) विदेशी दारु किरकोळ विक्री | ४००० | ४८०० |
| | ५) विदेशी दारु घाऊक विक्री | ५००० | ६००० |
| | ६) बिअरबार अगर परमिट रुम | ५००० | ६००० |
| १५ | चमडे, हाडे, शिंगे वगैरेचा साठा | १००० | १२०० |
| १६ | १) चूना, कुंभार, भट्टया विजेवर | १००० | १२०० |
| | २) हस्त व्यवसाय | ५०० | ६०० |
| १७ | १) चमडे कमिवणे, रंगविणे, माल तयार करणे, हस्त व्यवसाय, | ५०० | ६०० |
| | २) चमडे कमिवणे, रंगविणे, माल तयार करणे, विजेवर , | १००० | १२०० |
| १८ | स्पिरिट, रॉकेल, डांबर, रंग, टरपेंट ऑईल, वापरणेस ज्वालाग्रह पदार्थ रहाळ, साठा विक्री | १५०० | १८०० |
| १९ | विजेचा वापर पाने किंवा यांत्रीक शक्तीच्या सहाय्याने चालणारे भयकारक, उत्साहकारक धंदे (फॅक्ट्री, वर्कशॉप, प्रक्रीया अगर तत्सम धंदे) | | |
| | १) ५ हॉर्स पॉवरपर्यंत | १००० | १२०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १५०० | १८०० |
| | ३) ११ ते ४० हॉर्स पॉवरपर्यंत | २००० | २४०० |
| | ४) ४१ ते १०० हॉर्स पॉवरपर्यंत | ३००० | ३६०० |
| | ५) १०१ ते १५० हॉर्स पॉवरपर्यंत | ४००० | ४८०० |
| | ६) १५१ ते २५० हॉर्स पॉवरपर्यंत | ५००० | ६००० |
| | ७) २५१ ते ४५० हॉर्स पॉवरपर्यंत | ७००० | ८४०० |
| | व त्यानंतरचे दर १० हॉर्स पॉवरचे भागास रु. १५५ | | ० |
| २० | डायनामाईट, गंधक, ब्लास्टींग पावडर, फॉरमोनेट मर्क्यूरी, गन, कॉटन, पावडर, नायट्रीक, ग्लीसरीन, फॉस्फरस, आतीशबाजी फटाके, आगपेटी, व इतर त्या संबंधी साहित्य उत्पादन व विक्रीसाठी | २००० | २४०० |
| २१ | सेल्यूलाईट व त्या पासून तयार होणारा माल विक्री | १००० | १२०० |
| २२ | कॉटन (रेफ्यूज वेस्ट) कॉटन सिडस् विक्री | १००० | १२०० |
| २३ | द्रोण, पत्रावळी, उत्पादन व विक्री | ३०० | ४०० |
| २४ | कागदाची रद्दी व इतर तत्सम वस्तू विक्री व स्टॉक | १००० | १२०० |
| २५ | मटण, चिकन, मासे, साठा व विक्री | ७५० | ७५० |
| २६ | चरबी, साठा विक्री | १००० | १२०० |
| २७ | विक्रीसाठी साठयासह बारदान पोती वगैरे | १००० | १२०० |
| ४९ | प्र.क्र.१८ पी.बा.पाटील मळ्यातील गुरुकुल कॉलनी , म्हसोबा गल्ली नं.२ व निंबाळकर घर ते टाकवडे रोड बळकटीकरण व मजबुतीकरण करणे. | २३६८४४० |
| ५० | प्र.क्रं.१८ टाकवडे रोड ते लक्ष्मी व्यंकटेश एज्युकेशा शाळा रस्ता डांबरीकरण करणे | ८८१२५० |
| ५१ | प्र.क्र.१९ मधील हॉकी मैदान मध्ये खेळाडुसाठी टॉयलेट व बाथरुम बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | १९०६६७० |

CamScanner

| | | |
|---|---|---|
| ५२ | प्र.क्र.१९ मधील मंगळ्वार पेठ समडोळे गल्ली,रिंग रोड बागवान गल्ली रस्ता कॉंक्रीटींग करणे. | २२०३८८० |
| ५३ | प्र.क्र.२० गावभाग पोलीस स्टेशन ते दगडू माने घर ते आवळे मैदान लालनगर आरसीसी गटर करणे | १४९९७०० |
| ५४ | प्र.क्र.२१ गांधी कॅंप ते छाबडा बिल्डींग रस्ता डांबरीकरण करणे | १५५५४०० |
| ५५ | प्र.क्र.२२ पाटील घर ते काजवे घर आण्णा रामगोंडा शाळा परिसरातील रस्त्यास गटर बांधणे. | ४५०२५० |
| ५६ | प्र.क्रं.२२ आण्णा रामगोंडा शाळा परिसर अंतर्गत रस्ते डांबरी करणे | १२२९११५ |
| ५७ | प्र.क्र.२३ पुजारी मळा केशरवाणी घर ते कुंभार घर,खान घर ते शिंदे घर अंतर्गत गटर्स करणे. | १०३०९५० |
| ५८ | प्र.क्र.२३ कलाननगर परिसरातील बोळ रस्त्यास गटर करणे. | ९७०४५० |
| ५९ | प्र.क्र.२४ श्रध्दा कॉलनी व यशवंत कॉलनी अंतर्गत गटारी करणे | २०३१३७७ |
| ६० | प्र.क्र.२५ संग्राम चौक ढेरे घर ते कुमार पाटील घर,विजय मुतालिक घर ते पाटील घर परिसरातील गटर बांधणे | १७३७२२० |
| ६१ | प्र.क्र.२५ छत्रपती शाहु हायस्कुल ते तीन बत्ती व गोसावी गल्ली हा.रा. गटर करणे | २४९६८२० |
| ६२ | प्र.क्र.२६ वेदपाठशाळा इमारतीचे नुतनीकरण करणे | १७१४६०० |
| ६३ | प्र.क्रं.२६ रविंद्रनाथ टागोर वाचनालय बळकटीकरण व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणे | १५३०८५० |
| ६४ | प्र.क्रं.२६ जिमॅशियम हॉल पत्रे बसविणे, वॉटरप्रुफींगची , बळकटीकरणाची कामे करणे | २४९६९९० |
| ६५ | प्र.क्रं.२६ रविंद्रनाथ टागोर वाचनालय मध्ये लंच शेड बांधणे | ९५०४८० |
| ६६ | प्र.क्र.२७ टिळक रोड रस्ता डांबरीकरण करणे | २३२०३४० |
| ६७ | प्र.क्र.२७ DYSP ऑफीस मागील बोळ रस्ता कॉंक्रीट व गटर करणे | २२००००० |
| ६८ | प्र.क्र.२८ गुरुकन्ननगर ग.१ ते ६ अंतर्गत रस्त्यास गटार बांधणे. | ३३४४५५० |
| ६९ | प्र.क्र.२८ गुरुकन्ननगर ग.१,७ व दत्त मंदिर जवळील रस्ता कॉंक्रीट करणे | ११७६८५० |
| ७० | प्र.क्र.२९ बरगे मळा परिसरातील अंतर्गत रस्त्यास कॉंक्रीट करणे व गटर बांधणे | १५६१२२० |
| ७१ | प्र.क्र.३० चौगुले घर (जुना चंदुर रस्ता ) गट्टाणी करखाना पर्यंत रस्ता करणे | १९५५०३० |
| ७२ | प्र.क्र.३० जुना चंदुर रस्ता व हर्ष श्रेया (पाटील) अपार्टमेंट पर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे | ११०९७९० |
| ७३ | प्र.क्र.३१ कलागते मल्टीपरपज हॉल मध्ये रंगकाम व खिडक्या बसविणे. | ८५०५५० |

CS CamScanner

| | | |
|---|---|---|
| ७४ | प्र.क्र.३१ पंचगंगा स्मशानभूमी मधील मुख्य दहन शेडचे पत्रे बसविणे व दुरुस्ती करणे | ७९७७०० |
| ७५ | महिलांकरीता बाजार स्थळी स्वच्छतागृह बांधणे (विकली मार्केट , थोरात चौक बाजार, स्वामी अपार्टमेंट बाजार, आण्णा रामगोंडा बाजार) | ३०४२५७६ |
| ७६ | प्र.क्र.१५ रि.स.नं.६११/आ.क्र.II शांतीनगर मुस्लीम कब्रस्तान करिता टॉयलेट व बाथरुम बांधणे आणि आर.सी.सी.कंपौड करणे. | ४९,२६,४१०/- |
| | एकुण | १२१९२६३३५/- |

१.अ) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत (अतिरिक्त अनुदान अंतर्गत प्रस्तावित)

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शहीद भगतसिंग जलतरण तलावाचे बळकटीकरण,मजबुतीकरण व सुशोभिकरण करणे | १३४८०५६४ |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शहीद भगतसिंग जलतरण तलावाचे समोरिल बाजुस कंपौड बांधणे रक्कम रु. | १६२५११८० |
| | एकुण | १५११०७७४४ |

२. लो.आ.भा.साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत-

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्रं.५ आंबेडकर नगर मलके घर ते सुतार घर, क्षिरसागर घर ते मलके घर, येजरे घर ते भोरे, मुसळे घर ते सुतार घर रस्ते कॉंक्रीटींग करणे व गटर बांधणे सह मलके घर ते लक्ष्मी मंदीर रस्ता कॉंक्रीटींग करणे. | १९८०१०० |
| २ | प्र.क्रं.१२ कामगार चाळमधील मनपा कमान ते दगडी चाळ मुख्य रस्ता डांबरी करणे. | ९१५९८० |
| ३ | प्र.क्रं.१७ रमाई आवास घरकुलासाठी शौचालय बांधणे,वॉटरप्रुफींग, रंगकाम कामे करणे. | १४६०९३३० |
| ४ | प्र.क्रं.१७ वायसीपी कॉलेज चौक ते सांगली रोड रिक्षा स्टॉप (उत्तर बाजू ) व आसरानगर ग.नं.३ व ४ गटर करणे | १९३२४६० |
| ५ | प्र.क्रं.२० आंतरभारती शाळा ते क्रांती चौक ते भगतसिंग चौक आरसीसी हाफ राऊंड गटर करणे. (पश्चिम बाजू ) | १५१२४०० |
| ६ | प्र.क्रं.३० ढोर वेस तालीम माणिक जाधव घर ते संजय सोनवणे घर व लगत बोळ क्रं.१ ते ६ गटर बांधणे ,कॉंक्रीटींग करणे . | १४७०१६० |
| ७ | प्र.क्रं.३१ टाकवडे वेस बौध्द विहार कंपौड बांधणे,विहार इमारत बळकटीकरण कामे करणे. | १०५०२८४५ |
| ८ | प्र.क्रं.३१ टाकवडे रोड रोहीदास समाज कंपौड बांधणे,इमारत बळकटीकरण कामे करणे. | ३०७६७१३ |
| | एकूण | ३५९९९९८८ |

३. अग्निशमन सेवांचे बळकटीकरण योजना (जिल्हास्तर)

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी १ नग नवीन अग्निशमन वाहन खरेदी करणे . | ६५,००,००० |

तसेच प्रशासकीय मान्यता मिळणेच्या अनुषंगाने वरील कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेसही मान्यता देणेत येत आहे.

25/03/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास कामाचे मुदतवाढीचा मा.प्रशासकीय ठराव पारीत होणेबाबत.

**प्रस्ताव**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर ) अंतर्गत इचलकरंजी सा.नं.III/३१A या जागेत भाजी मार्केट व दुकान केंद्र बांधणे, एस्टी.रु.१२८३१३०८/- हे काम मक्तेदार श्री.प्रशांत रा.बेलवले यांना मंजुर असुन सदर कामाची मुदत दिनांक २५/१२/२०२१ रोजी संपलेली आहे. तथापि सदर कामाचे मक्तेदार यांनी दिनांक २०/०१/२०२२ रोजीचा अर्ज देवुन सदर जागेमध्ये गटारीचे पाणी साचत असलेने, अनियमित पावसामुळे कामाचे जागी पाणी साचलेने काम मुदतीत पुर्ण करता येवु शकत नसलेने सदर कामास दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत मुदतवाढ मागणी केलेली होती सदर बाबत इकडिल दिनांक २५/०१/२०२२ व दिनांक ०७/०४/२०२२ चे मा.कौन्सिल मान्यतेसाठी सादर केले प्रस्तावावर तत्कालीन मा.मुख्यअधिकारी तथा प्रशासक यांनी दोन महिने मुदतवाढ दयावी असे दिनांक ०८/०४/२०२२ रोजी आदेशित केले होते. याप्रमाणे मा.मुख्यअधिकारी तथा प्रशासकसो यांचे थेट मान्यता आदेश असल्याने मा.प्रशासकीय ठराव केलेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. सदर आदेशाच्या दिनांक ०८/०४/२०२२ पासुन दोन महिने कालावधित काम पुर्ण करण्यात आलेले आहे. काम पुर्णत्वाचा दिनांक ०७/०६/२०२२ असा आहे.

सदर कामाचे तिसरे व अंतिम देयक तयार करुन लेखापरिक्षणासाठी सादर केले असता, वरीलप्रमाणे मुदतवाढ मंजुरीचा मा.प्रशासकीय ठराव आवश्यक असलेबाबत सुचना केल्या आहेत.

तरी वरील प्रमाणे वस्तुस्थिती अवलोकनी येवुन सदरचे काम दिनांक ०७/०६/२०२२ रोजी पुर्ण झाले असलेने तत्कालीन मा.मुख्यअधिकारी तथा प्रशासकसो यांनी दिले दिनांक ०८/०४/२०२२ चे आदेशानुसार मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी पुर्वी प्रशासकाने मान्यता दिलेली आहे. मात्र ठराव नाही त्यामुळे पुनश्च कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. प्रशासकीय ठराव करावा असे दि.५/४/२०२३ नुसार आदेशित केले आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.०७ /२०२३** **दि.०८/०४ /२०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर ) अंतर्गत इचलकरंजी सा.नं.III/३१A या जागेत भाजी मार्केट व दुकान केंद्र बांधणे, एस्टी.रु.१,२८,३१,३०८/- कामाचे मक्ते. श्री.प्रशांत रा.बेलवले यांना मंजुर आहे. सदर कामाची मुदत दि. २५/१२/२०२१ रोजी संपली होती. तथापि सदर कामाचे मक्तेदार यांनी दिनांक २०/०१/२०२२ रोजीचा अर्ज देवुन सदर जागेमध्ये गटारीचे पाणी साचत असलेने, अनियमित पावसामुळे कामाचे जागी पाणी साचलेने काम मुदतीत पुर्ण करता येवु शकत नसलेने सदर कामास दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत मुदतवाढ मागणी केलेली होती. त्यास अनुसरुन कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वाचणेत आला.

तरी मक्तेदार श्री.प्रशांत रा.बेलवले यांना दि. ०८/०६/२०२२ पर्यंत मुदतवाढीस पुर्वीच्या प्रशासकानी दिलेल्या मान्यतेस या ठरावाने कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

08/04/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या श्रीमंत नारायणराव घोरपडे नाट्यगृह भाडेपट्टयाने चालविणेस देणेकामी.

**प्रस्ताव**

तत्कालीन नगरपरिषद मे.कौन्सिल ठराव क्र.१७० दि.२९/१२/२०१९ अन्वये नगरपरिषद मालकीची इमारती / कार्यालये / जलतरण तलाव / मैदान /ना.बा.घोरपडे नाटयगृह ई लिलाव /ई निविदा पध्दतीने भाडेपट्टयाने देणेस मंजूरी मिळालेली आहे.

यानुसार श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे नाटयगृह वार्षिक उत्पन्न व नाटयगृहासाठी होणारे लाईट बील,मेंटेनन्स इत्यादीसाठी होणारा खर्च पाहता profit bas method न वापरता, full house capacity method ने नाटयगृहाचे, नगररचनाकार, इचलकरंजी महानगरपालिका यांनी वार्षिक भाडे रक्कम रु.८३,३७,९१४/- निश्चित करुन दिले आहे.सोबत आवलोकनास उपलब्ध आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ मध्ये महानगरपालिका मिळकतीच्या विनियोगाबाबत नमुद आहे. मिळकत भाडेपट्टयाने द्यावयाची झालेस ई लिलाव अथवा ई निविदा करणे आवश्यक आहे. ई- लिलाव अथवा ई-निविदा कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे -

१) भाडेपट्टा करारनामा हा ३ वर्षे कालावधी राहील.

२) प्रति वर्षी १० % प्रमाणे भाडेवाढ राहील.

३) भाडेपट्टा कालावधी निर्माण होणारे दायीत्व पट्टेदारास भरावे लागेल.

४) ३ वर्षात काम समाधानकारक राहीलेस व वेळोवेळी भाडे भरणा केलेस पुढील ३ वर्षे मुदतवाढ देणेत येईल.

या व्यतिरिक्त ई-लिलाव अथवा ई-निविदाच्या अटी / शर्ती लागु राहतील. तरी उपरोक्त मिळकत भाडेपट्टयाने द्यावयाचे झालेस वार्षिक भाडे इतकीच डिपॉझिट रक्कमेवर ई-लिलाव अथवा ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.०२ /२०२३** दि.०६/ ०४/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून इ.म.पा. मालकीच्या श्रीमंत नारायणराव घोरपडे नाटयगृह भाडेपट्टयाने देणेकामी ई लिलाव अथवा ई निविदेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन उपरोक्त मिळकतचे वार्षिक भाडे इतकेच डिपॉझिट रक्कमेवर ई - लिलाव / ई निविदा मागविणेस मंजुरी देणेत येत आहे.

06/04/2023

(सुधाकर देशमुख)

आयुक्त तथा प्रशासक

इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचे रि.स.नं.६०१,६०२,६०३ पै.येथील कार्यालयास मुदतवाढ देणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ :- जा.क्रं.बीएलडी ११२०२३ / दनि-३४ /२१३ /२०२३ दि.२४/०३/२०२३ चे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचे पत्र.

इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या शहिद भगतसिंग उद्यान, लक्ष्मी प्रोसेस समोरील इमारत व खुली जागा याचा रि.स.नं.६०१,६०२,६०३ पै.हि मिळकत निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे मे.कौ.ठ.नं.६६ दि.३०/०७/२०१९ अन्वये दि.२९/०८/२०१९ ते दि.२८/०८/२०२२ अखेर दर महा रु.१८७७०/- करासह या भाडेवर भाडेपट्टयाने दिलेली आहे. सदरचे भाडे हे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी जा.क्र.रेसा / १२३८५ /दि.१४/११/२०१९ ने निश्चित करुन दिले आहे.

आता निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी दि.२४/०३/२०२३ चे पत्राने रि.स.नं.६०१,६०२,६०३ पै.शहिद भगतसिंग उद्यान जवळील लक्ष्मी प्रोसेस समोरील जागेच्या भाडेपट्टयाची १० वर्षापर्यंत मुदत वाढवून मिळणेविषयी संदर्भिय पत्राने विनंती केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७ मध्ये नगरपालिकेचे मालमत्तेचे विनियोग करणेचे तरतुदी दिलेले आहेत. त्यामध्ये "आयुक्तास, महानगरपालिका ठरविल व लादील अशा मुदतीकरीता व अटी शर्तिस अधिन राहून वेळोवेळी , त्याच रितीन भाडेपट्टयाचे नुतनीकरण करता येईल."असे नमुद आहे.

तरी उक्त प्रकरणी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांना सदर जागेस मुदतवाढ दयावयाची झालेस प्रशासकीय ठराव करणे आवश्यक आहे. तरी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,कोल्हापूर यांचेकडून नव्याने भाडे निश्चिती करणेस व सदर जागेस १० वर्षासाठी मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०३ /२०२३** दि.०६/ ०४/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या शहिद भगतसिंग उद्यान, लक्ष्मी प्रोसेस समोरील इमारत व खुली जागा रि.स.नं.६०१,६०२,६०३ पै. येथील मिळकत निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क येथील कार्यालयाचे भाडे सार्व. बांधकाम विभाग, कोल्हापुर यांचेकडून निश्चिती करणेस व सदर कार्यालयास १० वर्ष मुदतवाढ देणेस मंजुरी देणेत येत आहे.

06/04/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास काम करणेस ना-हरकत दाखला देणे बाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ :- मा.उपअभियंता (बांधकाम ) जि.प.उपविभाग, हातकणंगले यांचे जा.क्र.जिप उप /बांध / आस्था-१ /२१८ /२३ दिनांक २१/०३/२०२३ इ.रोजीचे पत्र.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : सावियो -२०२३ /प्र.क्र.५३ /अजाक दिनांक ३१ जानेवारी २०२३ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठी इचलकरंजी मनपा हद्दीतील शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील अ.क्र.२५ वर नमुद असलेल्या खालील नमुद कामास मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | मंजुर निधी (रु.लक्ष) | वितरीत निधी (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| २५ | इचलकरंजी येथे प्रभाग क्र.१७ साईट नं.१०२ रमाई आवास घरकुलासाठी अंतर्गत कॉंक्रीट,रस्ते, गटर बांधणे व शौचालय बांधणे. | ७०.०० | १४.०० |

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.उपअभियंता (बांधकाम) जि.प.उपविभाग,हातकणंगले यांनी संदर्भिय पत्र देवुन उपरोक्त नमुद काम हे जिल्हा परिषद बांधकाम विभाग या कार्यान्वयीन यंत्रणेकडुन करणेत येणार असलेने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी इचलकरंजी महानगरपालिका यांच्या कामाची निवड केलेबाबतचा ठराव व काम पुर्ण झालेनंतर महानगरपालिका काम ताब्यात घेवुन देखभाल दुरुस्ती करणेस तयार असलेबाबतचा ठराव व अन्य कागदपत्रे मागणी केलेली आहेत.

रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत साईट नं.१०२ मध्ये अनु.जाती व नवबौध्द घटकांसाठी (BPL) १८१ घरकुले बांधणे रक्कम रु.२,७१,५०,०००/- हे काम महानगरपालिकेकडून सुरु असुन सद्यस्थितीत ३ इमारतींचे काम पुर्ण झालेले असुन उर्वरीत इमारतीचे काम अंतिम टप्यात आहे. सदरचे काम हे सन २०१३-१४ अंतर्गत मंजुर झालेले असुन प्रति लाभार्थी रु.१.५० लाख या प्रमाणात अनुदान मंजुर असलेने या अनुदानातुन वैयक्तिक घरकुल बांधुन देणे ही बाब शक्य असलेने फक्त घरकुल बांधुन देणेचे काम करणेत येत आहे. अपु-या अनुदानामुळे व न.पा. ची अर्थिक स्थिती यामुळे वैयक्तिक शौचालय बांधणे,अंतर्गत गटर बांधणे व अंतर्गत रस्ते करणे या पायाभुत सुविधा पुरविणे ही कामे करता आली नाहीत.

सद्यस्थितीत साईट नं.१०२ येथे ३ इमारतींचे काम पुर्ण झालेले असुन पुर्ण झालेल्या इमारतीमधील घरकुलांचे पात्र लाभार्थ्यांना वाटप देखील करणेत आलेले आहे. यामुळे बांधकाम विभागाकडुन लोकशाहिर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजना सन २०२२-२३ अंतर्गत प्र.क्र.१७ रमाई आवास घरकुलासाठी शौचालय बांधणे, वॉटरप्रुफींग, रंगकाम कामे करणे रक्कम रु.१,४६,०९,३३०/- हे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे. यामध्ये ९० वैयक्तिक शौचालय बांधणे कामाचा समावेश आहे.

बांधकाम विभागाकडुन प्रस्तावित करणेत आलेल्या कामामध्ये अंतर्गत कॉंक्रीट रस्ते,गटर बांधणे या कामाचा समावेश नाही. घरकुल वाटप केलेले पात्र लाभार्थी हे येथे इमारतीत वास्तव्यास असलेने या ठिकाणी गटर व रस्ते करणे आवश्यक आहे.

CamScanner

शौचालय बांधकाम हे मनपा कडुन करणेत येणार असलेने शौचालय बांधणे ही बाब वगळुन मा.उपअभियंता (बांधकाम ) जि.प.उपविभाग, हातकणंगले यांचे मागणीप्रमाणे प्रस्तावित काम जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचेकडुन करणेस महानगरपालिकेचा हरकत नसलेबाबत व काम पुर्ण होवुन दोष दायित्व कालावधी पुर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करीत असलेबाबत दाखला देणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ना-हरकत दाखला व इतर आवश्यक ती कागदपत्रे देणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.०४ /२०२३** दि.०६/ ०४/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून खालील नमुद काम जिल्हा परिषद बांधकाम विभाग, यांचेकडून करुन घेणेस महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला देणेस व सदरचे काम पुर्ण झालेनंतर कामांचा दोष दायित्व कालावधी पुर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करीत असलेचा दाखला तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रे देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | मंजुर निधी (रु.लक्ष) | वितरीत निधी (रु.लक्ष) |
|---|---|---|---|
| २५ | इचलकरंजी येथे प्रभाग क्र.१७ साईट नं.१०२ रमाई आवास घरकुलासाठी अंतर्गत कॉंक्रीट,रस्ते, गटर बांधणे व शौचालय बांधणे. | ७०.०० | १४.०० |

(सुधाकर देशमुख) ०६/०४/२०२३
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

---

**प्रस्ताव :-** इचलकरंजी महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रि.स.नं.६९० पैकी व रि.स.नं.४४४ पैकी या जागेवर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणेकामी प्रशासकीय ठराव होणेबाबत.

**<u>प्रस्ताव</u>**

मंजूर विकास योजना इचलकरंजी मूळ हद्द भागशः सुधारीत आणि वाढीव हद्द सुधारीत दि.२४/५/२०१२ ची अधिसूचना क्र. No.TPS-२१११/१३५२/CR-१९/१२/ D.P.Sanction/ UD-१३ अन्वये मंजूर झाली असून सदर विकास योजना दि.१०/७/२०१२ पासून अंमलात आली आहे.

उक्त विकास योजनेमध्ये आरक्षण क्र.I/१३ " शैक्षणिक संकुल आणि क्रिडा संकुल " यासाठी आरक्षित असून सदर आरक्षण इचलकरंजी रि. स.नं.६९० पैकी या जागेमध्ये समाविष्ट होत असून या आरक्षणाचे क्षेत्रफळ १ हेक्टर ६ आर इतके आहे. तसेच उक्त विकास योजनेमध्ये रि.स.नं.४४४ पैकी जागा आरक्षण क्र.I/१४ " व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर " साठी आरक्षित असून त्याचे क्षेत्र ८१ आर इतके आहे. उक्त दोन्ही आरक्षणांचे समुचित प्राधिकरण इचलकरंजी महानगरपालिका आहे. तसेच सदर क्षेत्रांच्या संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून ती सद्या महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत.

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने कौन्सिल ठराव नं.105 दि.31/08/2019 अन्वये मंजूरी दिले नुसार, तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी क्र.टिपीएस – 2119/1995/ प्र.क्र.135/2022/नवि-13 दि.11/01/2023 रोजी उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम – 1966 चे कलम 37 (1) अन्वये खालीलप्रमाणे निदेश दिलेले आहेत.

" महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त आरक्षणामधून जाणारा पूर्व-पश्चिम १२.०० मी. वि.यो. रस्ता कायम ठेऊन तसेच आ.क्र.I/१३ " शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल " या आरक्षणापैकी उत्तरेकडील ५०% क्षेत्र (५३ आर) याच प्रयोजनासाठी आरक्षणात कायम ठेऊन आ.क्र.I/१३ " शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल " या आरक्षणापैकी उर्वरित दक्षिणेकडील बाजूचे ५०% क्षेत्र (५३ आर) तसेच त्यासह आ.क्र.I/१४ " व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर " या आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र (८१ आर) वगळून त्याऐवजी एकूण १.३४ हे.आर क्षेत्रावर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणेकामी व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीस अनुसरुन फेरबदल करणे. "

मा.शासनाच्या उक्त निदेशास अनुसरून आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करणेस प्रशासकीय ठराव क्र.80/2023 दि.25/01/2023 अन्वये मंजूरी दिलेली आहे. त्यास अनुसरून अधिनियमातील तरतुदीनुसार मराठी व इंग्रजी या भाषेमध्ये जाहिर नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र भाग – 1 पुणे विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी 2 – 8, 2023 / माघ, 13 – 19 शके 1994 मधील पान क्र. 13-15 मध्ये तसेच दि. 28 जानेवारी 2023 रोजी दै.महासत्ता व दै.पुढारी या वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेत आलेली आहे. जाहिर नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात एकूण 5 सुचना व हरकती प्राप्त झालेल्या असून सदर सुचना / हरकतदार यांची सुनावणी दि.16/03/2023 रोजी पुर्ण झालेली आहे. सदर प्राप्त सुचना / हरकती वरील अभिप्राय सोबत जोडलेला आहे. सुचना व हरकतीवरील अभिप्रायाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा.शासनास अंतिम मंजुरीस्तव सादर करणेपुर्वी खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव पारित करणे आवश्यक आहे.

1) हरकतदार श्री. शंकर सुर्याप्पा कोळेकर व इतर १० यांच्या मालकीच्या सदर दोन्ही आरक्षणामधील पूर्व - पश्चिम १२.०० मीटर विकास योजना रस्त्याचे (क्षेत्र अंदाजे १० आर) भुसंपादन महानगरपालिकेतर्फे अद्याप झालेले नाही. उक्त आरक्षणांच्या हद्दीनंतर उर्वरीत प्रस्तावित १२ मीटर रस्त्यात अनधिकृत विकास झालेला आहे. तसेच सदरचा प्रस्तावित १२ मीटर रस्ता कायम ठेवल्यास प्रस्तावित न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी असलेल्या जागेचे दोन भागामध्ये विभाजन होत आहे. सबब हरकतदार श्री. शंकर सुर्याप्पा कोळेकर व इतर १० यांच्या

CamScanner

प्रतिज्ञापत्रास अनुसरून त्यांच्या मालकीच्या सदर आरक्षणातील पुर्व - पश्चिम १२.०० मीटर विकास योजना रस्त्याच्या जागेच्या अंदाजे – 10.00 आर. क्षेत्राचा व त्यावरील अनधिकृत असलेल्या बांधकामाचा कोणताही मोबदला न देता त्यांना त्या ऐवजी आरक्षण क्र.I/१४, व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर या आरक्षणांच्या दक्षिण बाजूचे म्हणजेच सन्मती मतिमंद शाळेच्या पश्चिम बाजूचे अंदाजे - 9.30 आर. इतके क्षेत्र विनामोबदला देणे तसेच सदरचे क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ट करणेत यावे.

2) हरकतदार अध्यक्ष श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी यांनी नमुद केलेप्रमाणे श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी संचलित, श्री. एन. डी. मगदूम प्राथमिक विद्यामंदीर व श्री. शांतीनाथ इंग्लिश मेडीयम स्कूल या इमारतीस अस्तित्वातील पोहोच रस्ता उपलब्ध नाही. तसेच मा. प्रकाश आवाडे, आमदार, इचलकरंजी विधानसभा यांनी दि.१९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी करीता रस्ता ३० फुट रस्ता उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे. पत्रावर मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मा. अपर मुख्य सचिव नवि - १ यांना तपासून प्रस्ताव सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत. सबब अ. क्र. 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रस्तावित न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) च्या दक्षिण बाजूस व सन्मती मतिमंद शाळेच्या उत्तरेस किमान ६.00 मीटर रुंदीचा पुर्व - पश्चिम रस्ता प्रस्तावित करणेत यावा.

3) अ. क्र. 1 व 2 अन्वये बदल केलेनंतर आ.क्र.I/१३ "शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल" या आरक्षणापैकी उर्वरित दक्षिणेकडील बाजूचे ५०% क्षेत्र (५३ आर) तसेच आ.क्र.I/१४ "व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर" या आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र (८१ आर) ऐवजी आ.क्र.I/१४ चे भागश: क्षेत्र (अंदाजे - 67.00 आर.) व १२.०० मीटर विकास योजना रस्त्याखालील जागेचे क्षेत्र (अंदाजे – 10.00 आर.) एकूण क्षेत्र – 77.00 आर. क्षेत्र असे दोन्ही आरक्षणापैकी एकूण १.३० हे.आर. एकसलग क्षेत्रावर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणे व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करणेत यावे.

4) याकरीता भुमी संपादन व पुर्नवसन करताना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम – 2013 मधील तरतुदीनुसार उक्त जागेची आजमितीची किंमत व भुसंपादनासाठी महानगरपालिकेने केलेला खर्च विधी व न्याय विभागाने महानगरपालिकेस देणेच्या अटीवर सदर जागेचे हस्तांतरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (MMC ACT, 1949) मधील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे स्तरावरून करणेस शासन मान्यता देण्यात यावी.

**प्रशासकीय ठराव क्र. 05/2023** **दि13/04/2023**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील रि.स.न. 690 पैकी व रि.स.न. 444 पैकी या जागेवर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत असुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम – 1966 चे कलम 37 (1) अन्वये सदर प्रस्ताव अंतिम मंजूरीस्तव मा. शासनाकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

1) हरकतदार श्री. शंकर सुर्याप्पा कोळेकर व इतर १० यांच्या मालकीच्या सदर दोन्ही आरक्षणामधील पूर्व - पश्चिम १२.०० मीटर विकास योजना रस्त्याचे (क्षेत्र अंदाजे १० आर) भुसंपादन महानगरपालिकेतर्फे अद्याप झालेले नाही. उक्त आरक्षणांच्या हद्दीनंतर उर्वरीत प्रस्तावित १२ मीटर रस्त्यात अनधिकृत विकास झालेला आहे. तसेच सदरचा प्रस्तावित १२ मीटर रस्ता कायम ठेवल्यास प्रस्तावित न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी असलेल्या जागेचे दोन भागामध्ये विभाजन होत आहे. सबब हरकतदार श्री. शंकर सुर्याप्पा कोळेकर व इतर १० यांच्या प्रतिज्ञापत्रास अनुसरून त्यांच्या मालकीच्या सदर आरक्षणातील पुर्व - पश्चिम १२.०० मीटर विकास योजना रस्त्याच्या जागेच्या अंदाजे – 10.00 आर. क्षेत्राचा व त्यावरील अनधिकृत असलेल्या बांधकामाचा कोणताही मोबदला न देता त्यांना त्या ऐवजी आरक्षण क्र.I/१४, व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर या आरक्षणांच्या दक्षिण बाजूचे म्हणजेच सन्मती मतिमंद शाळेच्या पश्चिम बाजूचे अंदाजे - 9.30 आर. इतके क्षेत्र विनामोबदला देणे तसेच सदरचे क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ट करणेत यावे.

2) हरकतदार अध्यक्ष श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी यांनी नमुद केलेप्रमाणे श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी संचलित, श्री. एन. डी. मगदूम प्राथमिक विद्यामंदीर व श्री. शांतीनाथ इंग्लिश मेडीयम स्कूल या इमारतीस अस्तित्वातील पोहोच रस्ता उपलब्ध नाही. तसेच मा. प्रकाश आवाडे, आमदार, इचलकरंजी विधानसभा यांनी दि.१९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे श्री. शांतीनाथ एज्युकेशन सोसायटी, इचलकरंजी करीता रस्ता ३० फुट रस्ता उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली आहे. पत्रावर मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मा. अपर मुख्य सचिव नवि - १ यांना तपासून प्रस्ताव सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत. सबब अ. क्र. 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रस्तावित न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) च्या दक्षिण बाजूस व सन्मती मतिमंद शाळेच्या उत्तरेस किमान ६.00 मीटर रुंदीचा पुर्व - पश्चिम रस्ता प्रस्तावित करणेत यावा.

3) अ. क्र. 1 व 2 अन्वये बदल केलेनंतर आ.क्र.I/१३ "शैक्षणिक संकुल व क्रिडा संकुल" या आरक्षणापैकी उर्वरित दक्षिणेकडील बाजूचे ५०% क्षेत्र (५३ आर) तसेच आ.क्र.I/१४ "व्हेजिटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर" या आरक्षणाचे संपूर्ण क्षेत्र (८१ आर) ऐवजी आ.क्र.I/१४ चे भागश: क्षेत्र (अंदाजे - 67.00 आर.) व १२.०० मीटर विकास योजना रस्त्याखालील जागेचे क्षेत्र (अंदाजे – 10.00 आर.) एकूण क्षेत्र – 77.00 आर. क्षेत्र असे दोन्ही आरक्षणापैकी एकूण १.३0 हे.आर. एकसलग क्षेत्रावर न्यायालयीन इमारत (अद्यावत न्याय संकुल) या प्रयोजनासाठी आरक्षण ठेवणे व सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण विधी व न्याय विभाग नियुक्त करणेत यावे.

4) याकरीता भुमी संपादन व पुर्नवसन करताना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम – 2013 मधील तरतुदीनुसार उक्त जागेची आजमितीची किंमत व भुसंपादनासाठी महानगरपालिकेने केलेला खर्च विधी व न्याय विभागाने महानगरपालिकेस देणेच्या अटीवर सदर जागेचे हस्तांतरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (MMC ACT, 1949) मधील तरतुदीनुसार इचलकरंजी महानगरपालिकेचे स्तरावरुन करणेस शासन मान्यता देण्यात यावी.

17/04/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका.

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः मे. कौ.ठ.न. ८३ दि. ०६/०८/२०२१ अन्वये शहरातील मृत्यु पावलेल्या व्यक्तींचे / मयताचे वारसांना प्रेताचे अत्यंविधीसाठी (दहन/दफन निधी) मदत देणेत आली असुन सन २०२२-२०२३ मध्ये न.पा.चे रुपांतर हे महानगरपालिकेत झालेने सदर कामी महानगरपालिकेचा सुधारीत ठराव करणेबाबत.

**प्रस्ताव**

तत्कालीन इचलकरंजी नगगरपरिषदेच्या मे.कौ.ठ.न. ८३ दि. ०६/०८/२०२१ चे मंजुरीने शहरातील मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे वारसांना एक व्यक्तीचे / प्रेताचे अत्यंविधीसाठी र.रु. ३०००/- इतका खर्च येत असलेने (दहन /दफन निधी) मदत म्हणुन र.रु. ३०००/- प्रमाणे इतकी रक्कम वारसाचे बँक खातेवर म.न.पा.कडुन RTGS ने जमा अदा करणेत येत असुन सदर कामी सन २०२२/२०२३ चे बजेट मध्ये प्रेताचे अत्यंविधीसाठी मदत दें या हेडवर (पान नं. ३०) र.रु. ३६,००,०००/- इतकी तरतुद यापुर्वी करणेत आलेली आहे.

सन २०२२-२०२३ या वर्षामध्ये डिसेंबर २०२२ अखेर एकुण ६४२ मयत व्यक्तीचे वारसांना उपरोक्त प्रमाणे मदत देणेकामी र.रु. १९,२६,०००/- इतकी रक्कम खर्ची झालेली आहे. व दि. ३१ मार्च २०२३ अखेर साधारणतः अंदाजे र.रु. ६ लाख इतकी अशी एकुण र.रु. २५,२६,०००/- इतकी या आर्थिक वर्षात खर्च होईल.

तसेच सदरकामी मा. आयुक्तसो यांचेशी मा. आरोगय अधिकारी यांचेसह प्रत्यक्ष झाले चर्चेनुसार उपरोक्त ठराव झालेपासुन मयताचे मयत निधी मदत मागणीसाठी सरसकट मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेवर आर्थिक खर्चाचा बोजा मोठया प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे महापालिकेच्या खर्चात बचत होण्याच्या दृष्टीने मयत व्यक्तीचे वारसदाराचे नाव दारिद्रय रेषेखालील (BPL) यादीमध्ये नोंद असेल अशा गरजु नागरीकांना सदर प्रमाणे मयताचे/ प्रेताचे अंत्यविधी साठी मदत देणे उचित होईल,

तरी शासनाचे दि. २९/०६/२०२२ चे अधिसुचनेद्वारे इचलकरंजी नगरपालिकेचे रुपांतर इचलकरंजी महानगरपालिकेत झाले असलेने शहरातील मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे/ मयताचे वारसांना प्रेताचे अंत्यविधीसाठी (दहन/दफन निधी) मदत देणेकामी उपरोक्त प्रमाणे दहन/दफन निधीची मदत ही फक्त दारीद्रय रेषेखालील (BPL) यादीमध्ये नोंद असलेलया पात्र वारसांनाच अदा करणेकामी आपली मान्यता मिळणेसाठी व इचलकरंजी महानगरपालिकेचा सदरकामी प्रशासकीय ठराव करणेस इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ६ /२०२३** **दि. २७/०४/ २०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून प्रस्तावात नमुद केले प्रमाणे इचलकरंजी महानगरपालिका शहर हद्दीतील ज्यांची नोंद दारिद्रय रेषेखालील (BPL) यादीमध्ये आहे, अशा गरजु वारसांना प्रेताचे अत्यंविधीसाठी (दहन दफन निधी) मदत म्हणुन देणेबाबतच्या सुधारीत दुरुस्तीस मंजुरी देणेत येत आहे.

27/04/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

प्रस्ताव: मालमत्ता करात (संयुक्त करावर) सवलत देणेबाबत.

## प्रस्ताव

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकत धारकांना सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची देयके माहे मे २०२३ पासुन लागु करणे बाबतची कार्यवाही कर विभागामार्फत सुरु करणेचा मानस आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ कराधान नियम मधील कलम १४० (अ) मध्ये मालमत्ता कर देण्याकरीता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती असा कर, त्या प्रयोजनाकरीता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर, संपुर्ण वर्षाकरीता आगाऊ भरत असले तर, तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारीत करील अशा दराले मालमत्ता कर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरीता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील अशी तरतुद आहे.

यास अनुसरुन सन २०२२/२०२३ या आर्थिक वर्षात मा. प्रशासकीय ठराव क्र. ३०/२०२२ दि. ०४/०८/२०२२ चे मंजुरीने चालु मागणीतील संयुक्त करावर ३%, २% व १% अशी सवलत देणेत आलेली होती. सदर सवलतीचा मिळकतधारकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला असुन खालीलप्रमाणे सवलतीनुसार मालमत्ता कर वसुल झालेला आहे.

१) दि. १५/०८/२०२२ ते १५/०९/२०२२ या कालावधीत ३% प्रमाणे रु. ९१,५७,२७८/-

२) दि. १६/०९/२०२२ ते ३०/०९/२०२२ या कालावधीत २% प्रमाणे रु. १,१२,२५,३९५/-

३) दि. ०१/१०/२०२२ ते ३१/१०/२०२२ या कालावधील १% प्रमाणे रु. ४,४२,३१,९७४/-

अशी एकुण ६,४६,१४,६४७/- इतकी रक्कत सवलत/ सुट कालावधीत वसुल झालेली आहे.

सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षापासुन मिळकतधारकांना खालीलप्रमाणे नविन कर तसेच मालमत्ता कराचे सुधारीत दर लागु करणेत येणार आहेत.

१) पथकर १%

२) मलप्रवाह लाभ सुविधा कर २%

३) पाणीपुरवठा लाभ कर २%

४) अग्निशमन कर १% ऐवजी २%

५) विशेष स्वच्छता कर प्रती रु. ३० ऐवजी रु. १००/-

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात तत्कालीन नगरपरिषद कालावधीत चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणेत येवुन सर्वसाधारण १०% दरवाढ करणेत आलेली आहे. शहरातील मिळकतधारकांचा/ नागरीकांचा चार वर्षानेच पुढील कर आकारणी होणार आहे व पुढील चार वर्षाकरीता कराची आकारणी निश्चित करणेत आलेली आहे असा समज झालेला आहे.

तथापि महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे वरीलप्रमाणे तीन नविन कर निश्चित केले दराप्रमाणे तसेच जुन्या करामध्ये दरवाढ करणेत आलेली असलेने नागरीकांचेवर एकप्रकारे कर व दरवाढीचा बोजा पडलेला आहे. त्यामुळे वरीलप परिच्छेद २ मध्ये नमुद केले अधिनियमातील तरतुदीनुसार

CamScanner

इचलकरंजी शहरातील सर्व मिळकत धारकांचेकरीता की, जे मिळकतधारक सन २०२३/२०२४ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराचा भरणा आगाऊ भरणा करातील त्यांना खालील नमुद केलेप्रमाणे मालमत्ता करातील (संयुक्त करावर) चालु मागणीवर सुट/ सवलत देता येईल.

१) मालमत्ता कराचे देयक लागु झाले दिनांकापासुन पुढील २ महिन्याकरीता ६%

२) ६% करीता लागु केलेली २ महिन्याच मुदत संपले दिनांकापासुन पुढील २ महिन्याकरीता ४%

३) ४% करीता लागु केलेली २ महिन्याची मुदत संपले दिनांकापासुन पुढील २ महिन्याकरीता २%

वरीलप्रमाणे सवलत / सुट देणेकरीता महानगरपालिकेच्या महासभेची मान्यता आवश्यक आहे. महासभेची मान्यता मिळालेनंतर नागरीकांचे / मिळकतधारकांचे माहितीकरीता मोठया प्रमाणात प्रसार माध्यमाचेद्वारे प्रसिध्दी/ दैनिक वृत्तपत्रातुन जाहिर आवाहन शहरात विविध ठिकाणी जाहिरात फलक या माध्यमातुन याची अंमलबजावणी करणेकामी मान्याता मिळणेस्तव इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ७/२०२३** **दि. २७/०४/ २०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ११ कराधान नियम मधील कलम १४० (अ) मधील तरतुदीनुसार मालमत्ता करातील संयुक्त करावर (सर्वसाधारण कर) चालु मागणीवर खालीलप्रमाणे सवलत / सुट देणेत येत असुन शहरातील नागरीकांचे / मिळकतधारकांचे माहितीकरीता मोठया प्रमाणात प्रसार माध्यमाचेद्वारे प्रसिध्दी/ दैनिक वृत्तपत्रातुन जाहिर आवाहन तसेच शहरात विविध ठिकाणी जाहिरात फलक या माध्यमातुन अंमलबजावणी करणेस मंजुरी देणेत येत आहे.

१) माहे जुलै २०२३ अखेर ६%
२) माहे ऑगस्ट करीता ४%
३) माहे सप्टेंबर करीता २%

27/04/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणेच्या दृष्टीने बांधकाम विभागाकडुन आकारण्यात येणा-या दरामध्ये सुधारणा करणेबाबत.

**प्रस्ताव**

महागरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने बांधकाम विभागाकडुन पुरविणेत येणा-या सुविधांसाठी आकरणेत येणा-या दराचा आढावा घेवुन वेळोवेळी यामध्ये सुधारणा करणेत आलेली आहे.

सध्या सन २०२३-२०२४ हे नविन आर्थिक वर्ष सुरु झालेले असलेने सदर आर्थिक वर्षासाठी खालील सुविधांच्या दरामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा काही सुविधांसाठी नव्याने आकारणी करणे आवश्यक आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | आकारणी करावयाच्या बाबींचे नाव | सध्या आकारणेत येणारा दर | प्रस्तावित सुधारीत दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मक्तेदार यांना वर्क डन/ इन हेंड सर्टीफिकेट देणे | ० | १००० | नव्याने आकारणी |
| २ | रस्ता खुदाई दुरुस्ती चार्जेस | खडीकरण २२४२/-<br>डांबरीकरण ६१०५/-<br>------------------<br>एकुण ८३४७/- र.मी. | खडीकरण २४६६/-<br>डांबरीकरण ६७१६/-<br>------------------<br>एकुण ९१८२/- र.मी. | १०% वाढ |
| ३ | अतिक्रमण दंड - खोकी | १५००/- | १८००/- | २०% वाढ |
| ४ | अतिक्रमण दंड - हातगाडे/ ढकलगाडे | १०००/- | १२००/- | २०% वाढ |
| ५ | अतिक्रमण दंड - डिजीटल बोर्ड, लोखंडी स्टॅड, छपरी | ५००/- | ६००/- | २०% वाढ |
| ६ | अतिक्रमण दंड - टोपली व इतर किरकोळ साहित्य | ५०/- | ६०/- | २०% वाढ |

तरी महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी वरीलप्रमाणे आकारणी करावयाच्या दरामध्ये सुधारणा / वाढ करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ८/२०२३** दि. २७/०४/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षासाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद अ.क्र. १ ते ६ नुसार आकारणेत येणा-या दरामध्ये सुधारीत दराप्रमाणे वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

27/04/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

इचलकरंजी महानगरपालिका

विषय - इचलकरंजी नगरपरिषद सन २०१९/२० शासकिय लेखापरिक्षण अनुपालन अहवाल सादर करणे बाबत.

प्रस्ताव

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेचे सन २०१९/२० चे शासकिय लेखापरिक्षण पूर्ण झाले असून त्याबाबतचा लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेस दि.०९/११/२०२२ रोजी प्राप्त झाला असून सदर लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम १०(१) नुसार अहवाल मिळाले पासून ४ महिन्याचे आत अनुपालन (उत्तरे) अहवाल मे.कौन्सिलचे मान्यतेच्या ठरावासह पाठविणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांची उत्तरे विभागप्रमुखांनकडून तयार होवून आलेली असुन ती सोबत मान्यतेसाठी जोडली आहेत. कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या १ ते १२० परिच्छेदे तयार करण्यात आलेल्या अनुपालन अहवालास मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम १०(१) नुसार मे.कौन्सिलमध्ये मंजूरी मिळणे आवश्यक आहे. व मंजूर ठरावासह अनुपालन (उत्तरे) अहवाल मे.सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोल्हापूर व मे.सह.संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा पुणे तसेच मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर व मा.आयुक्तसो, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तरी सदर अनुपालन अहवालास प्रशासकीय ठरावासह पाठविणेस मान्यता मिळणेस विनंती.

---

प्रशासकीय ठराव क्र. ०९ /२०२३ दिनांक ०५/०५/२०२३

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेचे सन २०१९/२० चे शासकिय लेखापरिक्षण पूर्ण झाले असून त्याबाबतचा लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिकेस दि.०९/११/२०२२ रोजी प्राप्त झाला असून सदर लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम १०(१) नुसार अहवाल मिळाले पासून ४ महिन्याचे आत अनुपालन (उत्तरे) अहवाल मे.कौन्सिलचे मान्यतेच्या ठरावासह पाठविणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांची उत्तरे विभागप्रमुखांनकडून तयार होवून आलेली असुन ती सोबत मान्यतेसाठी जोडली आहेत. कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या १ ते १२० परिच्छेदे तयार करण्यात आलेल्या अनुपालन अहवालास मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम १०(१) नुसार मे.कौन्सिलमध्ये मंजूरी मिळणे आवश्यक आहे. व मंजूर ठरावासह अनुपालन (उत्तरे) अहवाल मे.सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोल्हापूर व मे.सह.संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा पुणे तसेच मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर व मा.आयुक्तसो, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तरी सन २०१९/२० शासकिय लेखापरिक्षण अनुपालन अहवालास मान्यता देणेत येत आहे. यापुढे आणखी पुर्तता दाखल करणे किंवा अनुपालन दाखल करण्याची कार्यवाही प्रशासकिय स्तरावरुन करण्यात यावी.

04/05/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः महानगरपालिकेकडील गणवेश पात्र कर्मचा-यांना तत्कालीन न.प. उपविधीप्रमाणे गणवेश देणेबाबत.

**प्रस्ताव**

महानगरपालिकेकडील अधिकारी/ कर्मचारी यांच्या विविध मागण्या बाबतचे संदर्भिय निवेदनाची प्रत, त्यातील मागणी क्र. ९ च्या अनुषंगाने इकडे प्राप्त झालेली आहे. ज्या कर्मचा-यांना म.न.पा.कडून उपविधीप्रमाणे दोन वर्षातुन एकदा दिला जाणारा गणवेश गेली अनेक वर्षापासुन देण्यात आलेला नाही. तो सत्वर देण्यात यावा अशी मागणी संघटनेने केली आहे.

शासन अधिसुचना दि. २९ जुन २०२२ अन्वये इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर होवुन इचलकरंजी महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. तत्कालीन इचलकरंजी न.प. कडुन म.न.प. अधिनियम १९६५ मधील कलम ३२२ नुसार इ.न.प.च्या अधिकारी कर्मचारी यांना गणवेश, जर्सी, रेनकोट, चप्पल, देण्यासंबंधीचे उपविधी १९८६ त्याचप्रमाणे वॉचमन यांना गणवेश देण्यासंबंधीचे उपविधी, १९८८ चे तयार केले होते. सदर उपविधीतील परिशिष्ट अ ज्यांना टेरीकॉट ड्रेस देण्याचे आहे त्या सेवकांची व अधिकारी यांची यादी त्याचप्रमाणे परिशिष्ट ब मध्ये ज्याना सुती गणवेश देण्याचा आहे त्या सेवकांची यादी निश्चित करुन देण्यात आलेली आहे.

शासनाच्या दि. २९ जुन २०२२ च्या अधिसुचनेद्वारे इचलकरंजी न.प.चे महानगरपालिकेत रुपांतर करण्यात आल्यामुळे सदर क्षेत्रामधील कामकाजाचे नियमनासंबंधी मा. प्रभारी अधिकारी तथा प्रशासक यांनी जा.क्र. इमपा/आयुक्त कार्या/ ०३/२०२२ दि. ०१/०७/२०२२ चे आदेश निर्गमित केले असुन त्याद्वारे संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिका-याकडे प्रलंबित असतील अशा सर्व कार्यवाह्या महानगरपालिकेकडे हस्तातंरीत केल्याचे मानले जाईल व त्या म.न.पा. अधिनियमानुसार पुढे चालविले जातील असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

कामगार संघटना कृती समितीच्या संदर्भातील निवेदनातील विषयांकित मागणीच्या दृष्टीने कार्यवाही करावयाची झाल्यास तत्कालीन न.प. उपविधीतील तरतुदी विचारात घेवुन जरी गणवेश पात्र कर्मचा-यांना सन २०१८ - १९ पासुन गणवेश देण्यात आले नसले तरी इचलकरंजी महानगरपालिका दि. २९ जुन २०२२ अस्तित्वात आलेली असल्याने गणवेश पात्र कर्मचा-यांना महानगरपालिकेकडून प्रथम पुरवठा/ वितरण सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात देण्याबाबत निर्णय व्हावा लागेल.

त्याचप्रमाणे तत्कालीन (वर नमुद) उपविधीतील परिशिष्ट अ आणि परिशिष्ट ब मध्ये अनुक्रमे टेरिकॉट व सुती गणवेश देण्यासंबंधी तरतुद केली असली तरी उक्त उपविधीत परिशिष्ट व नमुद कर्मचा-यांना टेरीकॉट गणवेश देणे उचित वाटत असल्याने याबाबतही धोरणात्मक निर्णय व्हावा लागेल तसेच कर विभागाकडील शिपाई कर्मचारी यांनी दि. २२/०८/२०२२ रोजी दिलेला अर्ज कामी सामील केलेला आहे. भागामध्ये फिरती करतेवेळी खाकी रंगाच्या गणवेशामुळे भटकी कुत्री अंगावर येत असल्याने खाकी रंगाच्या ऐवजी पांढ-या रंगाचे कापड मिळणेची विनंती केली तद्नंतर पुन्हा दि. २३/०१/२०२३ चे निवेदन देवुन निळा स्कायब्लु शर्ट व निळी किंवा काळ पॅन्ट याप्रमाणे किंवा कार्यालयाचे सोईप्रमाणे ड्रेसकोड देणेबाबत विनंती केली आहे. सदरची मागणी योग्य वाटत असल्याने याबाबतही धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी कामगार संघटना कृती समितीकडील संदर्भाधीन निवेदनातील विषयांकित मागणी कर विभागाकडील शिपाई कर्मचा-यांचा दि. २२/०८/२०२२ व दि.२३/०१/२०२३ चे अर्ज अनुषंगाने खालील बाबी संदर्भात मा. प्रशासकीय ठरावाद्वारे निर्णय होणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

१. तत्कालीन न.प.चे अधिकारी व कर्मचारी यांना गणवेश देण्यासंबंधीचे उपविधीतील परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मध्ये नमुद कर्मचा-यांना म.न.पा. कडील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात प्रथम वितरण गृहीत धरुन गणवेशपात्र कर्मचा-यांना टेरीकॉट गणवेश वितरण करणे.

CamScanner

२. परिशिष्ट ब मधील कर्मचा-यांना सुती गणवेशा ऐवजी परिशिष्ट अ प्रमाणेच टेरीकॉट गणवेश देणे (महिला कर्मचारी वगळुन)

३. कर वसुली विभागाकडील शिपाई कर्मचा-यांची मागणी विचारात घेवुन सर्वच शिपाई कर्मचा-यांना पांढरा गणवेश देणे याबाबत खालीलप्रमाणे निश्चितता होणे उचित वाटते.

| | | |
|---|---|---|
| अ) | सर्व सफाई कामगार कर्मचारी | टेरीकॉट खाकी रंग (दोन वर्षातुन एकदा तीन ड्रेसकरीता ८ मीटर कापड) |
| ब) | शिपाई टेरीकॉट | पांढरा रंग (दोन वर्षातुन एकदा तीन ड्रेसकरीता ८ मीटर कापड) |
| क) | वॉचमन / कुली/ कुली कम शिपाई व तत्सम कर्मचारी | टेरीकॉट खाकी रंग (दोन वर्षातुन एकदा तीन ड्रेसकरीता ८ मी. कापड) |
| ड) | वर्ग ३ मधील उपविधीनुसार गणवेशपात्र कर्मचारी | यापुर्वीचे धोरणानुसार टेरीकॉट खाकी (दोन वर्षातुन एकदा तीन ड्रेसकरीता ८ मी. कापड) |

४. प्रत्येकी पुरुष कर्मचा-याला ८ मीटर कापड देणे. ( ३ ड्रेसचे)

५. महिला स.का. कर्मचारी ९ वारी सुती साडया निळा रंग २ वर्षातुन एकदा ६ साडया

६. कार्यालयातील चतुर्थ श्रेणी महिला शिपाई कर्मचारी ६ वारी टेरिकॉट साडया फिकट निळा रंग (२ वर्षातुन एकदा ३ साडया)

**प्रशासकीय ठराव क्र. १० /२०२३** दि. ०४/०५/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन तत्कालीन न.प. उपविधीप्रमाणे महानगरपालिकेकडील पात्र अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात खालिलप्रमाणे गणवेश देणेस मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचा हुद्दा | कापडाचा प्रकार | कापडांचा रंग | कापडाचे माप |
|---|---|---|---|---|
| १ | सफाई कर्मचारी पुरुष | टेरीकॉट | स्काय ब्लु | ८ मी (३ ड्रेस) |
| २ | सफाई कर्मचारी महिला | सुती | ९ वारी/ ६ वारी निळी गडद साडी व ब्लाऊज पीस | ६ साडी ६ ब्लाऊज पीस |
| ३ | शिपाई, वाहन चालक, फार्मसिस्ट, वॉर्डबॉय, वॉर्डबॉय कम ड्रेसर | टेरीकॉट | पांढरा | ८ मी |
| ४ | मेकॅनिक, असि. मेकॅनिक | टेरीकॉट | निळा | ८ मी |
| ५ | महिला शिपाई, चतुर्थ श्रेणीतील महिला वर्ग (स.का. महिला वगळता) | टेरीकॉट | गुलाबी | ३ साडया ३ ब्लाऊज पीस |
| ६ | सॅनिटरी इन्सपेक्टर | टेरीकॉट | पांढरा शर्ट नेव्ही ब्लु पॅन्ट | ८ मी |
| ७ | अग्निशमन केंद्र अधिकारी | टेरीकॉट | पांढरा शर्ट नेव्ही ब्लु पॅन्ट | ८ मी |
| ८ | फायरमन | टेरीकॉट | स्कॉय ब्लु शर्ट नेव्ही ब्लु पॅन्ट | ८ मी |
| ९ | चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी वर्ग | टेरीकॉट | खाकी | ८ मी |

[signature] ०४/०५/२०२३
(सुधाकर देशमुख)
प्रभारी अधिकारी तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विकास कामांसाठी शासनाचा निधीउपलब्ध होणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ - १) माउपसचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडुन जावक-बैठक-२०२२/प्र.क्र.३०५/नवि-३३ दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीचे प्राप्त झालेले इतिवृत्त.
२) माननीय मुख्यमंत्री महोदय यांचसमवेत दिनांक १७/४/२०२३ रोजी पार पडलेली बैठक.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात सादर करण्यात येते की, हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील विषयांच्या बाबतीत दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.सदरचे बैठकीचे इतिवृत्त संदर्भान्वये इकडे प्राप्त झाले आहे.सदर बैठकीसाठी महानगरपालिकेने विविध विकास कामांचे प्रस्ताव मान्य करण्याबाबत शासनास टिप्पणी सादर केली होती.

त्यास अनुसरुन सदर बैठकीत "सदर कामांच्या अनुषंगाने काम निहाय प्रस्ताव शासनास सादर करावे व सदर प्रस्ताव प्राप्त होताच त्यास अनुसरुन निधीउपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही नगरविकास विभागाने करावी" असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीत दिले.

तसेच संदर्भ क्र.२ मध्ये नमूद माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशानुसार खालील नमूद केलेल्या कामांचे प्रस्ताव बांधकाम विभागाकडुन तयार करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रस्ते बळकटीकरण व मजबुतीकरण करणे | ६३,६१,२९,२८८/- |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रिंगरोड व पाणंद रस्ते मजुबतीकरण व बळकटीकरण करणे. | २२,७७,०३,५५७/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील तिनबत्ती चौक ते किसान चौक ते चंदुर रस्ता (ओढयापर्यंत) मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे ,आर.सी.सी.गटर व फुटपाथ करणे | ६,७९,८६,१६३/- |
| ४ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील महापुर -२०२१ काळा ओढा कलव्हर्ट ठिकाणी पुल बांधणे. | ५,३५,२०,४५४/- |
| ५ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील तीनबत्ती चौक ते चंदुर (ओढयापर्यंत) रस्त्यास स्ट्रीट लाईट बसविणे. | १,२७,९३,२६३/- |
| | | |
| | एकुण | ९९,८१,३२,७२५/- |

वरील नमूद कामांच्या अंदाजपत्रकांना व सदर कामांचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत अनुदान मागणीसाठी शासनाकडे सादर करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी व योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ३०% प्रमाणे होणारा मनपा हिस्सा रक्कम रु.२९,९४,३९,८१८/- भरणेकामी आवश्यक ती आर्थिक तरतुद करणेस मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

CamScanner

दि. ०४/०५/२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. ९९ /२०२३**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रस्ते,रिंगरोड व पाणंद रस्ते बळकटीकरण व मजबुतीकरण करणे,तिनबत्ती चौक ते किसान चौक रस्ता मजबुतीकरण व स्ट्रीट लाईट बसविणे व महापुर -२०२१ काळा ओढा कलव्हर्ट ठिकाणी पुल बांधणे ही कामे करणेकरिता खालील कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देणेत येत असुन सदर कामांचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत अनुदान मागणीसाठी शासनाकडे सादर करणेस व योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ३०% प्रमाणे होणारा मनपा हिस्सा रक्कम रु.२९,९४,३९,८१८/- भरणेकामी आवश्यक ती आर्थिक तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रस्ते बळकटीकरण व मजबुतीकरण करणे | ६३,६१,२९,२८८/- |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रिंगरोड व पाणंद रस्ते मजुबतीकरण व बळकटीकरण करणे. | २२,७७,०३,५५७/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील तिनबत्ती चौक ते किसान चौक ते चंदुर रस्ता (ओढयापर्यंत) मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे ,आर.सी.सी.गटर व फुटपाथ करणे | ६,७९,८६,१६३/- |
| ४ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील महापुर -२०२१ काळा ओढा कलव्हर्ट ठिकाणी पुल बांधणे. | ५,३५,२०,४५४/- |
| ५ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील तीनबत्ती चौक ते चंदुर (ओढयापर्यंत) रस्त्यास स्ट्रीट लाईट बसविणे. | १,२७,९३,२६३/- |
| | | |
| | एकुण | ९९,८१,३२,७२५/- |

(सुधाकर देशमुख) ०४/०५/२०२३

प्रभारी अधिकारी तथा प्रशासक

इचलकरंजी महानगरपालिका

CS CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

**प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिकेचा सन २०२३/२०२४४ चे वार्षिक अंदाजपत्रक मधील महसुली सर्व पुरवठादार आणि कंत्राटदार या लेखाशिर्षावरील बजेट इतर लेखाशिर्षावर वर्ग करणे बाबत.**

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिकेचे सन २०२२/२०२३ चे सुधारीत व सन २०२३/२०२४ चे वार्षिक अंदाजपत्रकास प्रशासकीय ठराव क्र.९७/२०२३ दि. १४/०३/२०२३ च्या ठरावान्वये सन २०२३-२०२४ मधील भाग दोन महसुली 'ज' राखीव निधी व संकिर्ण खर्च मधील महसुली सर्व पुरवठादार आणि कंत्राटदार यांचे प्रलंबित बिले तरतुद रक्कम रु. २०,००,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुदी मधून सन २०२२-२०२३ व त्यापुर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये देणेत आलेल्या कार्याआदेशानुसार सुरु असलेली अथवा पुर्ण झालेल्या कामांची देयके खर्च टाकणेस तसेच सन २०२३-२०२४ या चालु आर्थिक वर्षात देणेत येणाऱ्या कार्या आदेशानुसार केलेल्या कामांची सर्व देयके सन २०२३-२४ च्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदी मधून खर्च टाकणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन सदर कामाकाजासाठी समिती प्रस्तावीत करणे कामी मा. आयुक्त तथा प्रशासक, इचलकरंजी महानगरपालिका यांचे दि.३/५/२०२३ च्या आदेशा दिलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.१२ /२०२३** दि.४/०५/२०२३

इचलकरंजी महानगरपालिकेचे सन २०२२/२०२३ चे सुधारीत व सन २०२३/२०२४ चे वार्षिक अंदाजपत्रकास प्रशासकीय ठराव क्र.९७/२०२३ दि. १४/०३/२०२३ च्या ठरावान्वये सन २०२३-२०२४ मधील भाग दोन महसुली 'ज' राखीव निधी व संकिर्ण खर्च मधील महसुली सर्व पुरवठादार आणि कंत्राटदार यांचे प्रलंबित बिले तरतुद रक्कम रु. २०,००,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुदी मधून सन २०२२-२०२३ व त्यापुर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये देणेत आलेल्या कार्याआदेशानुसार सुरु असलेली अथवा पुर्ण झालेल्या कामांची देयके खर्च टाकणेत यावीत तसेच सन २०२३-२०२४ या चालु आर्थिक वर्षात देणेत येणाऱ्या कार्या आदेशानुसार केलेल्या कामांची सर्व देयके सन २०२३-२४ च्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदी मधून खर्च टाकणेत कामी मा. आयुक्त तथा प्रशासक, इचलकरंजी महानगरपालिका यांचे दि.०३/०५/२०२३ च्या आदेशानुसार खालील प्रमाणे समिती गठीत करणेत येत आहे.

| अ.क्र | समिती सदस्य |
|---|---|
| १ | अतिरिक्त आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका |
| २ | प्र.मुख्य लेखाधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका |
| ३ | प्र. मुख्य लेखापरिक्षक, इचलकरंजी महानगरपालिका |

तरी वरील समितीच्या मान्यतेने देयके अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

04/05/2023

(सुधाकर देशमुख )
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत अनुदान मिळणेकामी प्रस्तावित करणेत येणा-या विकास कामांना मंजूरी देणेबाबत.

प्रस्ताव

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेच्या विहीत निकषानुसार खालील नमूद विकास कामे आवश्यक्ते प्रमाणे प्रस्तावित करणेत आलेली असुन इचलकरंजी शहराची वाढती लोकसंख्या पाहता व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदरची विकास कामे म.न.प.फंडातुन करणे शक्य नसलेने प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत अनुदान मिळणेकामी प्रस्ताव सादर करणे कामी खालील कामांची निश्चिती करणेत आलेली आहे.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी रि.स.नं.६९०,आरक्षण क्र.I/१३ शैक्षणिक संकुल आणि क्रिडा संकुल या आरक्षित जागेवर अत्याधुनिक व सुसज्ज किडासंकुल व शैक्षणिक संकुल उभारणे. | ५,०९,०३,६२५ /- |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शालेय विदयार्थ्यांना क्रिडा सुविधा असलेले शहीद भगतसिंग जलतरण तलावाचे बळकटीकरण, मजबुतीकरण व सुशोभिकरण करणे. | १,३४,८०,५६४/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शालेय विदयार्थ्यांना क्रिडा सुविधा असलेलशहीद भगतसिंग जलतरण तलावाचे समोरिल बाजुस कंपौड बांधणे | १६,२५,१८०/- |

वरील नमूद कामांच्या अंदाजपत्रकास व सदर कामांचा प्रस्ताव प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण अंतर्गत अनुदान मागणी करणेकामी मा.जिल्हा खनिकर्म अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापुर यांचेकडे सादर करणेस प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. 93 / २०२३ दि. 25/ ०५ /२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील खालील विकास कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देणेत येत असुन सदरची कामे प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण अंतर्गत हाती घेणेस मंजूरी देणेत येत आहे.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी रि.स.नं.६९०,आरक्षण क्र.I/१३ शैक्षणिक संकुल आणि क्रिडा संकुल या आरक्षित जागेवर अत्याधुनिक व सुसज्ज किडासंकुल व शैक्षणिक संकुल उभारणे | ५,०९,०३,६२५ /- |
| २ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शालेय विदयार्थ्यांना क्रिडा सुविधा असलेले शहीद भगतसिंग जलतरण तलावाचे बळकटीकरण, मजबुतीकरण व सुशोभिकरण करणे. | १,३४,८०,५६४/- |
| ३ | इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शालेय विदयार्थ्यांना क्रिडा सुविधा असलेलशहीद भगतसिंग जलतरण तलावाचे समोरिल बाजुस कंपौड बांधणे | १६,२५,१८०/- |

तसेच प्रशासकीय मान्यता व अनुदान मिळणेच्या अनुषंगाने वरील कामांचा प्रस्ताव मा.जिल्हा खनिकर्म अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,कोल्हापुर यांचेकडे पाठविणेसही मान्यता देणेत येत आहे.

25/05/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: विकास योजना इचलकरंजी ( मंजुर )
आरक्षण क्र.III /१३ डिस्पेन्सरी, मौजे- कबनूर,गट नं.६२/ अ पैकी,६३ पैकी, गट नं.६४ पैकी, ६५ / अ पैकी, सि.स.नं.२२९६३ पैकी, सि.स.नं.२२९६४ पैकी, सि.स.नं.२२९६५ पैकी, सि.स.नं.२२८८१ पैकी,आरक्षणाचे क्षेत्र -अंदाजे ० हेक्टर १८ आर क्षेत्राचे भुसंपादन होणेकरीता प्रशासकीय ठराव होणेबाबत.

## प्रस्ताव

संदर्भ :- श्री. देवगोंडा बाबगोंडा पाटील व इतर यांचेतर्फे अॅड. श्री.पी.यु. समडोळे यांची दि.०४/०५/२०२३ व दि.०६/०५/२०२३ रोजीची ( इकडे प्राप्त दि.०८/०५/२०२३ ) रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-१९६६ चे कलम -१२७ अन्वयेची नोटीस.

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीएस /२१११/१३५२/ प्र.क्र.१९/१२ डी.पी.सॅन्क्शन /युडी-१३ दि.२४/०५/२०१२ रोजी मंजुर झाली असुन दि.१०/०७/२०१२ रोजी पासुन अंमलात आहे. उक्त विकास योजनेनुसार आरक्षण क्र. III / १३ डिस्पेन्सरी या आरक्षणाने बाधीत होणा-या मौजे- कबनूर, गट नं.६२ /अ पैकी, ६३ पैकी, गट नं.६४ पैकी, ६५ / अ पैकी, सि.स.नं.२२९६३ पैकी, सि.स.नं.२२९६४ पैकी, सि.स.नं.२२९६५ पैकी, ६३ पैकी, गट नं.६४ पैकी मधील १) श्री.पिरगोंडा दादा पाटील २) श्री. धुळगोंडा दादा पाटील ३) महादेव दादा पाटील ४) श्री.बाबगोंडा दादा पाटील, मयत वारस अ) श्री.शिवगोंडा बाबगोंडा पाटील ब) श्री.देवगोंडा बाबगोंडा पाटील ६) नागोंडा कलगोंडा पाटील ७) धुळगोंडा दादा पाटील, मयत वारस अ) श्री. महादेव धुळगोंडा पाटील ब) सदाशिव धुळगोंडा पाटील क) प्रकाश धुळगोंडा पाटील ८) श्री. इसाक महंमद फकीर ९) श्री. नसीम इसाम फकीर १०) श्री. इरफान बादशहा बागवान ११) श्री. इम्रान बादशहा बागवान १२) श्री. मोहसिन बादशहा बागवान यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता दि. ०४/०५/२०२३ व दि. ०६/०५/२०२३ रोजीची (इकडे प्रापत दि. ०८/०५/२०२३) रोजीची खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावली आहे.

विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र. III/१३ डिस्पेन्सरी या आरक्षणाने बाधीत होणा-या मौजे-कबनुर गट नं. ६२/अ पैकी, ६३ पैकी, गट नं. ६४ पैकी, ६५/अ पैकी, सि.स.न. २२९६३ पैकी, सि.स.न. २२९६४ पैकी, सि.स.न. २२९६५ पैकी, सि.स.न. २२८८१ पैकी मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुण क्षेत्र अंदाजे ० हेक्टर १८ आर इतके आहे.

सबब, आरक्षण क्र. III/१३ डिस्पेन्सरी चे अंदाजे ० हेक्टर १८ आर या संपुर्ण क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.98/२०२३** **दि. 06/06/2023**

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून आरक्षण क्र. III/१३ डिस्पेन्सरी या आरक्षणाने बाधीत होणा-या मौजे-कबनुर गट नं. ६२/अ पैकी, ६३ पैकी, गट नं. ६४ पैकी, ६५/अ पैकी, सि.स.न. २२९६३ पैकी, सि.स.न. २२९६४ पैकी, सि.स.न. २२९६५ पैकी, सि.स.न. २२८८१ पैकी मध्ये समाविष्ठ होत असुन आरक्षणाचे एकुण क्षेत्र अंदाजे ० हेक्टर १८ आर हे संपुर्ण क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीन्वये भुसांपदन करणेस व त्यास येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

06/06/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: इचलकरंजी शहरातील नवजात शिशु मुलगा व मुलगी यांना बेबी किट व स्तनदा मातांना पोषण आहार देणे कामी बेबी किट पुरविणे कामाबाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी शहरातील वय वर्षे ० ते २ महिने मधील नवजात शिशु मुलगी यांना बेबी किट व स्तनदा मातांना पोषक आहार व इतर साहित्य पुरविणे कामांचे सर्वात कमी दराचे मक्तेदार श्री. दगडु सत्याप्पा माने यांचे शे. एस्टीमेंट दराची निविदा तत्कालीन नगरपरिषद मे. मुख्यअधिकारी व अध्यक्षासो यांची समिती दि. १२/१०/२०२१ अन्वये मंजुरी मिळाली असुन सदर कामास प्रशासकीय मा. आयुक्तसो, महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य पुणे यांचीही मंजुरी प्राप्त आहे. मक्तेदार श्री. माने यांना इकडुन जा.क्र. / महिला व बालकल्याण विभाग /२२१३/२०२२ दि. ०३/०२/२०२२ अन्वये कामाची वर्क ऑर्डर देणेत आलेली आहे.

महानगरपालिकेमार्फत पहिल्या व दुस-या प्रसुतीच्या वेळी जन्मणा-या नवजात शिशु (मुलगी) बालकांनाच बेबी किट दिले जाते. यानुसार मंजुर मक्तेदार यांचेकडून पहिल्या टप्यामध्ये एकुण ६०० किट ताब्यात घेवुन वाटप करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी सन २०२३ अभियान अंतर्गत शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना थेट मदत तसेच विविध शासकीय योजनाच्या माहितीचा विस्तृत प्रमाणावर प्रसार करण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार दि. ११/०६/२०२३ रोजी जिल्हास्तरावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत निर्देश आहेत. याबाबत मा.जिल्हाधिकारीसो यांनी दि.३१/०५/२०२३ रोजी बैठक घेऊन, सदर अभियान अंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना वस्तू स्वरुपात लाभ देण्याचे निर्देश दिले आहेत.

शासकीय योजनांची जत्रा या अभियांनातंर्गत इकडुन शहरामध्ये सर्व्हे केला असता नव्याने वय वर्षे ० ते ६ महिने लाभार्थ्यांची अंदाजे ७०० संख्या प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी सन २०२३ अभियान अंतर्गत उक्त होणा-या कार्यक्रमाचे औचित्य साधुन शासकीय योजनांची जत्रा अंतर्गत शहरातील वय वर्षे ० ते २ महिने ही अट शिथील करुन त्या ऐवजी ० ते ६ महिने या गटातील (फक्त मुलीं करीता) नवजात शिशु बेबी किट व स्तनदा मातांना पोषक आहार देणेकामी बेबी किट पुरविणेकामी मंजुर मक्तेदार दगडु सत्याप्पा माने यांचे मंजुर शे. एस्टीमेट दराप्रमाणे पुरविणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे. तरी सदर योजनेच्या प्रलंबित मागण्या विचारात घेऊन वरील लाभार्थीना लाभ देण्यासाठी प्रशासकीय ठराव होणेस मान्यता मिळावी हि विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र. १५/२०२३** दि. ०६/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन दि.०६/०६/२०२३ चे आदेशान्वये योजना बंद करणेचे निर्देश दिले आहेत, तथापि प्रलंबित मागण्या विचारात घेवून वरील लाभार्थीना लाभासाठी एक वेळ संधी म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या शासन आपल्या दारी सन २०२३ अभियान अंतर्गत उक्त होणा-या कार्यक्रमाचे औचित्य साधुन शासकीय योजनांची जत्रा अंतर्गत शहरातील वय वर्षे ० ते २ महिने ही अट शिथील करुन त्या ऐवजी ० ते ६ महिने या गटातील अंदाजे ७०० (फक्त मुलीं करीता) नवजात शिशु बेबी किट व स्तनदा मातांना पोषक आहार पुरविणेकामी मंजुर मक्तेदार श्री. दगडु सत्याप्पा माने यांचे मंजुर शे. एस्टीमेट दराप्रमाणे पुरविणेस मुदतवाढ देणेस मंजूरी देणेत येत आहे.

06/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः मालमत्ता कर व दरवाढबाबत.

## प्रस्ताव

श्री. शशांक मल्हारराव बावचकर, सचिव महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी, माझी नगरसेवक, इ.न.प. यांनी दि. ०२/०४/२०२३ रोजी प्रेस नोट देवुन यामध्ये नव्या आर्थिक वर्षात महानगरपालिकेचा सर्व सामान्य नागरीकांवर बोजा या मथ्याळयाखाली इचलकरंजी महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५९ मधील कलम ९९ चा आधार घेऊन प्रशासकीय ठराव क्र. ८१ दि. २०२३ अन्वये आरोग्य विभागामार्फत पुरविण्यात येणा-या सेवांचे कर व दरमध्ये प्रंचड वाढ केली आहे. सदरची करवाढ अव्यवहारी असुन त्याचा योग्य तो विचार करुन कर वाढ किती प्रमाणात करावी याचा विचार करावा असे नमुद केले आहे.

तसेच मा. खा. श्री. धैर्यशील संभाजीराव माने लोकसभा सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२३ रोजी पत्र देवुन याद्वारे इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये जन्म मृत्युचे दाखले, नळ पाणी कनेक्शन, घर फाळा यासह इतर विभागामध्ये करवाढ व दरवाढ करण्यात आलेली आहे. इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करुन महाराष्ट्र राज्यामध्ये नव्याने इचलकरंजी महानगरपालिका स्थापन करण्यात आली त्यावेळी इचलकरंजी शहरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारची करवाढ व दरवाढ होणार नाहर असे आश्वस्त करण्यात आले होते. पंरतु गेल्या काही दिवसांमध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये करवाढ व दरवाढ करण्यात आलेली आहे. या करवाढ व दरवाढीस स्थगिती देणेबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे कळविले आहे.

करविभागाकडुन सादर करणेत आलेले मालमत्ता कर/ नविन व इतर फी चे दरवाढीचे प्रस्तावावर खालीलप्रमाणे मा. प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता दिलेली आहे.

१) प्रशासकीय ठराव क्र. ८२/२०२३ दि. १६/०२/२०२३ अन्वये मालमत्ता करामध्ये नविन कराचा समावेश व काही करामध्ये करवाढ केलेली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

अ) विशेष स्वच्छता कर प्रति शौचालयास रु. ३० ऐवजी रु. १००/-

ब) मलप्रवाह लाभ सुविधा कर कर योग्य मुल्यावर २%

क) पाणी पुरवठा लाभ कर - कर योग्य मुल्यावर २%

ड) पथकर - कर योग्य मुल्यावर १%

इ) इमारत दाखला फी रु. १०० ऐवजी रु. २५०/-

ई) येणे बाकी नसले बाबतचा नाहरकत दाखला रु. १००/-

उ) नविन इमारतीस दयावयाचा नंबरप्लेट रु. ५० ऐवजी रु. १००/-

२) प्रशासकीय ठराव क्र. ७५/२०२३ दि. १८/०१/२०२३ अन्वये नविन मिळकती रिकामा प्लॉट तसेच इमारत वापरात होणारे बदल या इमारतीसाठी सन २०२१-२२ या दराचे १०% ची दरवाढ करणेस मान्यता दिलेली आहे.

३) प्रशासकीय ठराव क्र.७९/२०२३ दि. २५/०१/२०२३ अन्वये विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. २३ नोंव्हेंबर २०१२ चे सुधारीत आवृत्तीन्वये महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्राकरीता इमारतीवरील महाराष्ट्र कर (मोठया निवासी जागेसह) (पुन्हा लागु) अधिनियम १९७९ मधील कलमानुसार १५० चौ.मी. त्यापेक्षा जादा निवासी क्षेत्र आहे. अशा मिळकतधारकांना १०% निवासी कर लागु करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

४) वाहन विभागाकडील प्रशासकीय ठराव क्र. ८६/२०२३ दि. २०/०२/२०२३ अन्वये अग्निशमन कर १% ऐवजी २% करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

वरील व्यतिरिक्त महानगरपालिकेच्या विविध विभागाकडुन प्रशासकीय ठरावाद्वारे करवाढ व दरवाढ करणेत आलेली आहे.

सबब श्री. शशांक मल्हारराव बावचकर, यांची दि. ०२/०४/२०२३ रोजी दिलेली प्रेस नोट व करवाढ व दरवाढीस स्थगिती देणेबाबत मा. खा. श्री. धैर्यशिल संभाजीरावव माने लोकसभा सदस्य यांनी दि. ०९/०६/२०२३ रोजी

CamScanner

दिलेले पत्राचा विचार करता ही या बाब धोरणात्मक निर्णयाशी संबंधीत असलेने सदरचा प्रस्तावास धोरणात्मक मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

<u>प्रशासकीय ठराव क्र. ९६/२०२३</u> <u>दि.</u> ९/६/2023

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन दि. ०९/०६/२०२३ चे आदेशान्वये प्रस्तावात नमुद अ.क्र. १ ते ४ मधील सर्व निर्णय म.न.पा. हितार्थ घेणेत आले होते तथापि सदर निर्णय लोकनियुक्त म.न.पा. स्थापनेनंतर घेतल्यास ते बहुमताचे निर्णय असतात.

तरी वरील प्रस्तावात नमुद अ.क्र.३ मधील प्रशासकीय ठराव क्र.७९/२०२३ दि. २५/०१/२०२३ मधील मोठया निवासी मिळकतीवरील कर वगळता महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील प्रशासकीय ठरावाद्वारे करणेत आलेली कर व दर वाढ पुढील अंदाजपत्रक किंवा लोकनियुक्त म.न.पा. अस्तित्वात येईतोपर्यंत स्थगित करणेत येत आहे.

09/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः अमृत योजनेतंर्गत साकारण्यात आलेल्या एकूण ११ ऑक्सिजन पार्कची सन २०२२-२३ करीता वार्षिक देखभाल करणे कामी मक्तेदारास मुदतवाढ मंजूर करणेबाबत.

## प्रस्ताव

विषयांकीत कामी मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे दिनांक ०७/०९/२०२२ चे मंजूर आदेशान्वये मक्तेदार जोतिराम लखु बरगे यांचे नांवे शे.२६% कमी दराने मंजूर आहे. मक्तेदारास दिनांक १४/०९/२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला असून, अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,८१,९४०/- ही एक वर्षाचे देखभालाचे कामकाजाची आहे. तथापि सन २०२२-२३ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुद अपुरी असलेने विषयांकित कामावरील अन्य आणखी ११ कामासाठी सहा महिने मुदतीकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामधील अन्य ११ कामे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे नांव | वार्षिक अंदाजपत्रकीय रक्कम | मक्तेदार | कार्यादेश दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क रि.स.नं.६१५,६१९ पार्ट-१ | ३८८३२०/- | शामराव वडींगे | १८/१०/२०२२ |
| २ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क रि.स.नं.६१५,६१९ पार्ट-२ | ३८५१८०/- | शामराव वडींगे | १८/१०/२०२२ |
| ३ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट नं.८६,८७ शहापूर | ८५००८०/- | शामराव वडींगे | १८/१०/२०२२ |
| ४ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट नं.६८ आर.के.नगर पार्ट-१ | ४०५९८०/- | शामराव वडींगे | १८/१०/२०२२ |
| ५ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट नं.६८ आर.के. नगर पार्ट-२ | ४०२७९०/- | शामराव वडींगे | १८/१०/२०२२ |
| ६ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क रि.स.नं.६१८ आरगे भवन | ७०३६२०/- | जोतिराम बरगे | १४/०९ /२०२२ |
| ७ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट नं.३८६ कृष्णानगर | ३८१९४०/- | जोतिराम बरगे | १४/०९ /२०२२ |
| ८ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट नं.४७ इंदिरा कॉलनी | ६९७२५०/- | जोतिराम बरगे | १४/०९/२०२२ |
| ९ | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या ऑक्सिजन पार्क गट रि.स.नं.५४९ कुरुंदवाडे मळा | ३८८२३०/- | जोतिराम बरगे | १४/०९/२०२२ |
| १० | अमृत योजने अंतर्गत साकारणेत आलेल्या पंचवटी चित्रमंदिर पाठीमागील ऑक्सिजन पार्क रि.स.नं.५६२ व डॉ.ढवळे हॉस्पिटील मागे ओझा घराजवळील | ६९०९६०/- | जोतीराम बरगे | १४/०९/२०२२ |
| ११ | अमृत योजने अंतर्गत तयार करणेत आलेल्या पंचवटी चित्र मंदिरमागे O२ पार्क | ५,३९,७३०/- | जोतीराम बरगे | १४/०९/२०२२ |

उपरोक्त सर्वच ११ कामांच्या सहा महिने मुदतीकरीता देण्यात आलेले कार्यादेशानुसार सर्वच कामांची मुदती दिनांक १३/०३/२०२३ रोजी संपलेल्या आहेत. मात्र देखभाली अभावी उद्यानांची दुरावस्था होवू नये या दृष्टीने मंजूर मक्तेदारांचेकडून कामे सुरु ठेवण्यात आलेली आहेत.

CamScanner

आता, सन २०२३-२४ चे वार्षिक अर्थसंकल्पामध्ये बागा / उद्यान साहित्य खरेदी / दुरुस्ती या बजेट हेडला पुरेशी तरतुद असुन, केवळ पुरेशा बजेट तरतुदी अभावी वार्षिक अंदाजपत्रक असुनही सहा महिने कालावधीसाठी निविदा मागविण्यात असल्याने उक्त नमुद ११ कामांकरीता ,कार्यादेशानुसार दिलेली सहा महिन्यांची मुदत संपले तारखेपासून सहा महिने मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी वरिल प्रमाणे मुदतवाढ मंजूरीस तसेच पुढील सहा महिने कालाधीकरीता योग्य किंमतीच्या मुद्रांकावर करारपत्र करुन घेवून त्याप्रमाणे कार्यादेश देण्यास इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.१६/२०२३** दि.१६/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन प्रस्तावात नमुद अ.क्र. १ ते ११ कामांना पुढील निविदा प्रक्रिया त्वरीत पुर्ण करणेच्या शर्तीस अधिन राहुन वरील अ.क्र. १ ते ११ कामातील मक्तेदार यांना मंजुर निविदा दराप्रमाणेच मुदत संपले दिनांकापासुन पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यंत मुदतवाढ देणेस मंजुरी देणेत येत आहे.

(सही) 16/06/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**

**विषय** - महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधातील पदोन्नतीसाठी असलेल्या कोट्यातील उपअभियंता हे रिक्त पद पदोन्नतीने भरणेकामी केले कार्यवाहीस शासनाची कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत.

वरील विषयाबाबतचा कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव वाचण्यात आला.

/- शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०२३ अन्वये इचलकरंजी महानगरपालिकेकरिता १७४४ पदांचा आकृतीबंध शासनाने मंजूर केलेला आहे. त्याचप्रमाणे सदर पदांचे सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ चे शासनाने नगर विकास विभागाकडील विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०२.०५.२०२३ अन्वये मंजूर केले आहेत. सदर सेवा प्रवेश नियम दिनांक ०२ मे, २०२३ चे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध होवून अंमलात आले आहेत.मंजूर आकृतीबंधामध्ये, गट अ मध्ये उपअभियंता (स्थापत्य) अशी बांधकाम विभागाकरिता ४ पदे तसेच पाणीपुरवठा विभागाकरिता १ पद याप्रमाणे एकूण ५ पदे मंजूर आहेत. सदर पदाची वेतनश्रेणी एस २०-५६१००-१७७५०० अशी असून पदोन्नतीचे प्रमाण १००% असे आहे. पदोन्नतीसाठीच्या उपअभियंता पदाच्या पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता - "इचल. म.न.पा.आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)/ पा.पु. या पदावरील किमान तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल", अशी आहे.

२. मंजूर सेवा प्रवेश नियमामध्ये नियम क्र. ६ मध्ये " पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, ज्येष्ठता आणि पात्रता या तत्वावर अर्हताप्राप्त कर्मचा-यामधून केली जाईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५ अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग १ ची इतर पदे पदोन्नतीने भरताना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजुरी घेतल्यानंतरच पदोन्नतीने भारता येतील अशी तरतूद आहे.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चा ५९ मधील ५४ मध्ये नेमणुका करण्याची पद्धत स्पष्ट करण्यात आले असून कलम ५४ (१) नुसार आयुक्त किंवा त्याने याबाबत पद निर्देशित केलेला अधिकारी, मुख्य लेखापरीक्षक, संबंधित विभाग प्रमुख व आयुक्ताने नामनिर्देशित केलेला फक्त एक अन्य अधिकारी यांची मिळून बनलेली एक निवड समिती असेल अशी तरतूद आहे.त्यानुसार या म.न.पा. करिता अशी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

४. राज्य शासकीय अधिकारी कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबत एकत्रित मार्गदर्शक तत्वे शासनाने सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एस आर पी २०१८/ प्रकरण १५९/ कार्यासन १२ दिनांक ०१ ऑगस्ट २०१९ ने प्रसृत केली आहेत. त्यानुसार पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रातील पात्र अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवालांची पूर्तता (मागील पाच वर्षांचे स्वयंमूल्य निर्धारण अहवालानुसार देण्यात आलेली प्रतवारी / आलेला गुणांक यासह ), शैक्षणिक अर्हता, विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरणे, मत्ता व दायित्व विवरणपत्रे इत्यादी बाबीसंबंधी तपशील अवलोकनी घेवून, उक्त परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या समितीच्या दिनांक १४.०६.२०२३ चे बैठकीमध्ये वरील अर्हता पूर्ण करणा-या श्री. सुभाष सुधाकर देशपांडे, शाखा अभियंता यांना गट अ मधील उपअभियंता या पाणीपुरवठा विभागाकडील पदावर नियुक्ती देण्याबाबत निर्णय झालेला आहे.

५. उपरोक्त निर्णयानुसार श्री. सुभाष सुधाकर देशपांडे यांना गट अ मधील उपअभियंता या पाणीपुरवठा विभागाकडील पदावर नियुक्ती देण्यात येत असल्याबाबतचे जा.क्र. इमपा/आस्था/कर्मचारी पदोन्नती/०१/प्र.क्र. /२०२३ दिनांक १४.०६.२०२३ चे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

६. आता, उक्त परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद मंजूर सेवा प्रवेश नियमामध्ये नियम क्र. ६ मधील तरतुदीनुसार वरीलप्रमाणे केलेल्या पदोन्नतीचे कार्यवाहीस शासनाची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९७ अ /२०२३** दिनांक १६.०६.२०२३

उक्त प्रस्तावाप्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

16/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक,
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

प्रस्तावः महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी शहर पाणीपुरवठा योजना मजरेवाडी जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंतची अशुध्द पाण्याची दाबनलिका बदलणे (उर्वरीत अंतिम काम)

## प्रस्ताव

संदर्भ - १. निविदा सुचना क्र. ०५ सन २०२२-२०२३ दि. १७/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आलेली फेर निविदा (द्वितीय

२) याकामीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. यश कन्सल्टन्सी, बेलापुर, मुंबई यांचे दि. ११/०५/२०२३ चे अभिपाय

३) मे. इलेकान एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि.जे.व्ही. इन्फ्रास्टक्चर यांना इकडील दि. १६/०६/२०२३ चे इकडील पत्र

४) मे. इलेकान एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि.जे.व्ही. एम.डी. इन्फ्रास्टक्चर यांचे दि. १९/०६/२०२३ चे पत्र

५) मे. यश कन्सल्टंट यांचा दि. १९/०६/२०२३ चा अभिप्राय

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान सन २०२२-२०२३ अंतर्गत इचलकरंजी शहर पाणीपुरवठा कृष्णा नदी मजरेवाडी उद्‌भव उर्वरीत पाईप लाईन बदलणे (उर्वरीत पुर्ण पाईपलाईन) कामी दि. ०१/०३/२०२३ रोजी मिळालेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार इकडील विभागामार्फत निविदा सुचना क्र. ०५ सन २०२२-२०२३ दि. २३/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. सदर निविदेची अंतीम मुदत ही दि. ०६/०४/२०२३ दु. ३.०० वाजेपर्यंत देणेत आली होती. त्यानंतर इच्छित निविदाकार यांनी मुदतवाढीची मागणी केलेने स्पर्धात्मक निविदा होणेकामी इकडील विभागामार्फत सदर निविदेस दि. १२/०४/२०२३ दु. ३.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देणेत आली होती.

सदर निविदा प्रसिध्दी काळामध्ये एकच निविदाकार प्राप्त झालेने सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा न उघडता याकामी शासन निर्णय क्र. CAT/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २७/०९/२०१८ सार्वजनिक बांधकाम विभाग मधील विनियमीत केलेल्या तरतुदीनुसार सदर निविदेस फेर ई-निविदा (द्वितीय) सुचना क्र. ०५ दि. १७/०४/२०२३ सकाळी ११.०० वा ते दि. २६/०४/२०२३ दु. ३.०० वाजेपर्यंत प्रसिध्द करुन दि. २७/०४/२०२३ दु. ३.०० वाजेपर्यंत होती. दि. ०२/०५/२०२३ च्या मा. उपायुक्त यांचे आदेशाने सदर निविदेतील तांत्रिक लिफाफा उघडणेत आला. याकामी खालीलप्रमाणे एकुण दोन निविदाकार यांनी निविदा सादर केली आहे.

१) गोरुर इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. मुंबई

२) हुलग्याप्पा भिमाप्पा हुलेमणी, मौलाली बंदगीसाब बागवान जे.व्ही.

वरील निविदाकारांनी सादर केलेली निविदा कागदपत्रे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडे तांत्रिक छाननीकरीता देणेत आली आहेत. त्यानुसार त्यांनी संदर्भ क्र. २ अन्वये कागदपत्रांची छाननी करुन इकडे अभिप्राय सादर केला आहे. सदर अभिप्रायास अनुसरुन दोन्ही निविदा कारांचे संदर्भातील ठळक निरीक्षणे खालीलप्रमाणे,

CamScanner

१. गोरुर इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि.मुंबई सदर निविदा काराने मागील तीन वर्षाचे आय.टी.आर. सादर केलेले नाहीत. निविदा कामी आवश्यक असणारे Undertaking for guarantee व undertacking for man blacklisting ही कागदपत्रे निविदाकाराने निविदाकाळातील भरलेली नसुन सन २०२२ मधील असल्याचे आढळुन आले आहे. तसेच निविदाधारकाने सादर केलेले Collabration Agreement हे निविदेतील कामासाठी नसुन अन्य कामासाठीचे असलेचे आढळुन आले आहे.

२. हुलग्याप्पा भिमाप्पा हुलेमणी, मौलाली बंदगीसाब बागवान जे व्ही निविदाकार यांनी निविदेमध्ये नमुद कामसाठी Joint venture व collabration agreement हे एकाच वेळी एकत्रितरित्या सादर केले आहे.

वरील निरिक्षणानुसार कागदपत्रांचे छाननी पुर्ण करता दोन्ही निविदाकार हे निविदेस पात्र होत नाहीत. असे निरीक्षण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केले आहे. त्यानुसार इकडील विभागाने दोन्ही निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असुन निविदाकार हे या निविदेस पात्र होत नसलेचे निरीक्षणास सहमती दर्शविली आहे.

तरी सदरची निविदा प्रक्रिया पुर्ण होणेसाठी फेर निविदा करणे आवश्यक असलेने दि. २९/०५/२०२३ रोजी फेर निविदा ५ (तृतीय) २०२२-२०२३ मागविण्यात आली असता त्यास एकाच निविदाधारकाने निविदा सादर केली असुन मा. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. सी.ए.टी./२०१७/प्र.क्र.०८/ इमा-२ दि. २७/०९/२०१८ मधील अ.क्र. ४४ मधील तरतुदीनुसार तृतीय मागणी वेळी १ किंवा अधिक निविदा प्राप्त झाल्यास निविदा उघडणे अनुज्ञेय असल्याने निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणेत आला. त्यानुसार निविदाकारांनी सादर केलेली निविदा कागदपत्रे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडे तांत्रिक छाननीकरीता देणेत आली आहेत. त्यानुसार त्यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये कागदपत्रांची छाननी करुन इकडे अभिप्राय सादर केला आहे. सदर अभिप्रायास अनुसरुन निविदाकार हे पात्र होत असलेने निविदाकार यांचा वित्तीय लिफाफा क्र. २ वित्तीय लिफाफा दि. १६/०६/२०२३ रोजी उघडण्यात आला यावेळी निविदाकार यांनी सदरची निविदा ही अंदाजपत्रकीय रक्कमेवर शे. ९.५०% जादा दराने सादर केली आहे.

निविदाकार यांनी सादर केलेली निविदा जादा दराने प्राप्त झालेमुळे निविदाकार यांना जादा दराबाबत स्वयं स्पष्ट अहवाल सादर करणे संबंधी कार्यालयामार्फत दि. १६/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या दराबाबत तडतोड करणेबाबत या कार्यालयामार्फत दि. १६/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली असता निविदाकार यांनी दि. १९/०६/२०२३ रोजी विहीत मुदतीमध्ये जादा दराबाबतचे स्पष्टीकरण या कार्यालयाकडे सादर केले आहे. सदर प्राप्त स्पष्टीकरणामध्ये अंदाजपत्रक चालु दराशी तुलना केले असता बांधकाम विभागाकडील चालु दरसुची व या कामी बापरणेत येणा-या साहित्याची भाव वाढ यांचेशी तुलना केली असता सध्याचा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१२% जादा (ढोबळमानाने) असल्याचे नमुद केले आहे. निविदाकार यांनी सदरची निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५०% जादा दराने सादर केली आहे. त्यानुसार चालु दरावर निविदाकार यांनी सादर केलेली निविदा ही २.६२% कमी दराची येते.

त्यानुसार निविदाकार यांनी दिलेली दर सध्याचे प्रचलित नियमानुसार योग्य असल्याचे मत या कामीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी इकडे सादर केले आहे. अहवालावरुन निविदाकारची सादर केलेली शे. ९.५०% जादा म्हणजेच सध्याच्या बाजार भावाच्या चालु अंदाजपत्रकीय दरावर शे. २.६२%

CamScanner

कमी दराची निविदा मान्य करणे कामी तसेच याकामी होणा-या र.रु. १,६५,३७,१९५/- अतिरिक्त खर्चास मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.१८ /२०२३** दि. १९/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी शहर पाणीपुरवठा योजना मजरेवाडी जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्रापर्यंतची अशुध्द पाण्याची दाबनलिका बदलणे (उर्वरीत अंतिम काम) कामाचे निविदाधारक मे. इलेकान एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि.जे.व्ही. एम.डी. इन्फ्रास्टक्चर यांची शे. ९.५०% जादा म्हणजेच सध्याच्या बाजार भावाच्या चालु अंदाजपत्रकीय दरावर शे. २.६२% कमी दराची निविदा मंजुर करणेत येत असुन याकामी र.रु. १,६५,३७,१९५/- इतक्या होणा-या अतिरिक्त खर्चास मान्यता देणेत येत आहे.

[signature] 19/06/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्ताव: ऑलम्पिक साईज जलतरण तलाव फिल्टरशेन प्लांट मक्ता पध्दतीने चालवणे कामास मुदतवाढीबाबत.

**प्रस्ताव**

वरील विषयानुसार इचलकरंजी महानगरपालिका कडील शंकरराव पुजारी ऑलम्पिक साईज जलतरण तलाव आहे. सदर जलतरण तलावामध्ये अस्तीवातील ४२ लाख लिटर्स क्षमतेचे फिल्टरेशन प्लांट याची दैनंदिन देखभाल करणे व सदर प्लांट चालविणे कामी आवश्यक रसायने पुरविणे व त्याची दुरुस्ती करणे हे काम मनुष्यबळ नसल्याने मक्ता पध्तीने करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाचे वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे अंदाजपत्रक रक्कम रु.१३,०४,२३५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक मंजुरी व पुढील कार्यवाहीस्तव सादर केला असुन विषयांकित कामी नगरोत्थान निविदा प्रस्तावित करणेचे काम इकडील विभागामार्फत सुरु होते. याप्रकरणी सदरचे जलतरण तलाव हा खाजगी मक्ता पध्दतीने प्रचलन करणेस मा. उपायुक्तांनी आदेशित केले आहे. त्यानुसार मा. आयुक्त यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर आदेशाच्या अधिन राहुन जलतरण तलाव खाजगी तत्वावर चालविणेसाठी महानगरपालिकेच्या मिळकत विभागामार्फत कार्यवाही सुरु असुन सध्या याकामी मुल्यांकन करणेकामी नगररचना विभागाकडे प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

सदर कामीची सध्या सुरु असलेल्या कामाची मुदत दि. ३१/०३/२०२३ रोजी संपुष्टात आली आहे. परंतु मिळकत व्यवस्थापन विभागामार्फत सध्या सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही.

सबब याकामीची कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यंत सध्या सुरु असलेल्या मक्ता पध्दतीच्या कामास मुदतवाढ देणे योग्य राहील असे इकडील मत आहे.

सबब या प्रकरणी सध्या सुरु असलेल्या मक्ता पध्दतीच्या कामास खाजगी तत्वावर जलतरण तलाव चालविणेच्या कामाची मिळकत विभागामार्फत कार्यालयीन प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यंत मुदतवाढ मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.१९ /२०२३** दि. १९/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवून मा. उपायुक्तसो, यांचे आदेशाप्रमाणे इचलकरंजी महानगरपालिके कडील शंकरराव पुजारी ऑलम्पिक साईज जलतरण तलावाचे अस्तित्वातील ४२ लाख लिटर्स क्षमतेचे फिल्टरेशन प्लांट याची दैनंदिन देखभाल करणे व सदर प्लांट चालविणे हे काम मनुष्यबळ नसलेने मिळकत विभागाकडे प्रस्तावित असलेल्या कार्यवाही नुसार खाजगी तत्वावर प्रचलन करणे कामाची पुर्तता होईतोपर्यंत उपरोक्त कामी मुदतवाढ देणेस मंजुरी देणेत येत आहे.

19/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

५५३१७५

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका नळ पाणी पुरवठा योजना, शहरामध्ये नवीन जलकुंभ उभारणे व अनुषांगिक कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्ताव**

संदर्भ :- १. मा.आमदार श्री. प्रकाश आवाडे यांचे दि. २०/०३/२०२३ चे पत्र.

२. मे.समर्थ इन्फ्राटेक यांचे दि.१२/०४/२०२३ चे पत्र.

3. शासन परिपत्रक क्र. अमृत-२०२२ /प्र.क्र./२०३/नवि-३३/ मंत्रालय मुंबई यांचे दि. १६/०९/२०२२

४.अधिक्षक अभियंता (मु)(प्र) यांचे जा.क्र.मजीप्रा/सम/तांशा-४/४७९ दि.०८/०४/२०२१ चे पात्रा मधिल नामावलिनुसार

५. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील Request For Proposal (RFP), Empanelment of Consultant for Project Development & Mangment Support Notice No-2.2020-21

इचलकरंजी शहराची लोकसंख्या हि २०११ च्या जनगनेनुसार २८७५०० लाख इतकी सन २०२४ साली सदर लोकसंख्या हि ३४८४०६ इतकी असणास आहे. सद्यस्थितीत शहरास दैनंदीन पाण्याची गरज ६९ द.ल.लि. असुन भविष्यातील सन २०५४ साली ८९ द.ल.लि. इतकी असणार आहे.

सन १९५७ साली शहरालगत असणाऱ्या पंचगंगा नदीवरून नळ पाणी पुरवठा योजना राबविणेत आली त्यानंतर वेळोवेळी वाढत्या लोकसंखेनुसार पाणी पुरवठा योजनेमध्ये सुधारीत योजना राबविणेत आलेल्या आहेत.

वाढते औद्योगीकरण व औद्योगीकरणामुळे होत असलेले नागरीकरण, त्याचबरोबर नदीमध्ये उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होत असलेने पंचगंगा नदीमधील पाणी प्रदुषित होऊ लागले सबब शहरास पाणी पुरवठा करण्यावर तात्कालिन नगरपरिषदेस मर्यादा येवू लागल्या, याकारणास्तव सन २००१ साली शहरापासून १७.५० किमी अंतरावरून वाहणाऱ्या पंचगंगा व कृष्णा नदीच्या संगमाच्या खालील बाजूस मजरेवाडी गावाजवळ कृष्णा नदीवरून योजना राबविणेत आली. मात्र सदर ठिकाणाहून उपलब्ध होणारे पाणी अपुरे पडत असल्यामुळे महापालिकेमार्फत पंचगंगा नदीतून अतिरीक्त पाण्याचा उपसा केला जातो. या दोन्ही योजनेमधुन शहरास ४० द.ल.लि.इतकाच पाणी पुरवठा करणेत येत आहे. तथापी पंचगंगा नदीचे पाणी दरवर्षी पावसाळा संपलेनंतर डिसेंबर महिन्यानंतर प्रदूषीत होत असलेमुळे दरवर्षी उन्हाळ्यामध्ये सदरचा उपसा अनियमीत कमी व काही वेळा बंद ठेवावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये शहराचा पाणी पुरवठा एक दिवस आड होतो, तर काही वेळा मजरेवाडीकडील दाबनलिकेस गळती लागलेस पाणी पुरवठयामध्ये दोन दिवसाचा खंड पडतो. यामुळे शहराचा पाणी पुरवठा हा आठवड्यात २ते ३ दिवसच होतो. त्यामुळे भविष्यातील लोकसंख्या व पाण्याची गरज लक्षात घेता शहराला स्वच्छ व शास्वत पाण्याच्या उदमवाची आवश्यकता लक्षात घेवून तत्कालिन नगरपरिषदेमार्फत काळम्मावाडी येथून नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे बाबत प्रस्ताव मा. शासनाकडे सादर केला.शासन स्तरावर याचा अभ्यास होऊन काळम्मावाडी धरणावरून पाणी आणणे हि बाब अधिक खर्चिक व देखभाल दुरुस्तीसाठी त्रासदायक होऊ शकते, वारण अथवा दुधगंगा नदीवरून पाणी पुरवठा योजना करता येईल व त्या देखभाल दुरुस्तीस अधिक खर्चीक होणार नाहीत असे सुचीत केले. त्यामुळे दोन पर्यायाचा विचार केलेनंतर वारणा नदीवरून योजना राबविणे हा पर्याय अधिक सोयीचा असलेने वारणा नदीवरून दानोळी गावाशेजारून पाणी आणण्याचा विचार करणेत आला. परंतु वारणा नदीकाठावरील ग्रामस्थानी सदर योजनेस तीव्र विरोध केलेने प्रत्यक्षात योजनेचे काम सुरू करता आले नाही.

सध्या अमृत २.० अभियान अंतर्गत दुधगंगा नदीवरून सुळकुड गावाशेजारून योजना राबविणेचा रुपये १६०.७० कोटी रकमेच्या प्रस्तावास शासनाकडून दि. ०२/११/२०२२रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून योजनेची निविदा प्रक्रिया सुरु करणेत आलेली असून लवकरच योजनेच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. इचलकरंजी शहराच्या सन २०३९ व २०५४ साली असणाऱ्या संभाव्य लोकसंख्येस, पाणी पुरवठा करण्याचे सदर योजनेमध्ये प्रस्तावित आहे. त्यानुसार सन २०३९ साली शहराची पाण्याची मागणी ७८ दलली. प्रती दिन इतकी असणार आहे तसेच २०५४ साली शहराची पाण्याची मागणी ८९ दल ली इतकी असणार आहे. यामध्ये नागरिकांना १३५लि. प्रती दिन प्रती मानसी प्रमाणे पाणीपुरवठा करण्याचे नियोजित आहे. त्याचबरोबर शहराच्या औद्यागिक, संस्थात्मक कारणाराठी तसेच, तरंगत्या लोकसंख्येसाठी लागणाऱ्या पाण्याची तरतूद करणेत आलेली आहे.

सध्याच्या योजनेतील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता १०८ द.ल. ली प्रती दिन इतकी असून सन २०३९ पर्यंत पुरेशी आहे. सध्या शहराच्या विविध भागामध्ये वेळोवेळी बंधाणेत आलेल्या १५ जलकुंभांमधून पाणी पुरवठा करणेत येत आहे. सर्व जलकुंभाची एकत्रित साठवण क्षमता २४९ लक्ष लि. इतकी आहे तथापि शहरास दैनंदिन पाणीपुरवठा करणेकरिता प्रत्यक्षात ३३२.५० लक्ष ली. क्षमतेच्या पाणी साठवण्याची आवशकता आहे. त्यामुळे सध्या ८२.५० लक्ष ली. क्षमतेच्या टाक्यांची उभारणी करणेची आवश्यकता आहे. शहराच्या वाढत्या विस्तारीकरणामुळे, टाकीपासून लांब अंतरावरील रहिवाश्यांना, तसेच लोकसंख्येची जास्त घनता असलेल्या भागातील नागरिकांना अपु-या पाणी पुरवठाच्या समस्येस सामोरे जावे लागत आहे व भविष्यात पाणी उपलब्ध होऊन सुद्धा याची तीव्रता वाढणार आहे. शहाराच्या अशा प्रकारच्या वरील प्रमाणे नमूद भागामध्ये उंच टाक्या बांधून पाणी पुरवठा केलेस शहरातील उंच व सखल भागाच्या ठिकाणी पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करणेस शक्य होणार आहे. सद्य स्थितीत एकूण १४१ लक्ष ली. इतकी शहराच्या लोकसंखेच्या मानाने साठवण क्षमता आवश्यक आहे. परंतु सद्य स्थितीत शहरातील वाढीव भागाकरीता आवशक जलकुंभाच्या क्षमतेपैकी एकत्रित साठवण क्षमतेच्या ६ जलकुंभांची तसेच सदरचे जलकुंभ भरणेकरिता शुध्दजल दाबनलिका टाकणे व पंपिंग मशिनरी उभारणे इत्यादी कामांचा समावेश करून मा.आमदार श्री. प्रकाश आवाडे यांचे दि. २०/०३/२०२३ चे पत्रानुसार महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान महाभियानाअंतर्गत योजनेमधून मा. शासनाकडे सादर करणेबाबत सुचीत केले आहे. त्यानुसार या कामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागर नेमेणे आवश्यक आहे.

**विषयांकीत कामी तांत्रिक सल्लागार यांची नेमणूक करणेकामी खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-**

१.विषयांकीतकामी तांत्रिक सल्लागार नेमणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेकरीता सहसचिव नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे संदर्भिय पत्रान्वये शासनाच्या विविध योजनांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सुचना देणेत आल्या असून त्या सोबत एकूण १६ सल्लागारांची यादी दिली असून त्यापैकी एका सल्लागाराची नियुक्ती प्रदान करणे बाबत शासन परिपत्रक क्र. अमृत- २०२२/प्र.क्र./२०३/नवि-३३ / मंत्रालय मुंबई यांचे दि.१६/०९/२०२२ च्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत पृ.क्र.३४ वर सादर आहे. शासन निर्णय पृ. क्र. ४६ वर सादर आहे.

२. उपरोक्त शासन परिपत्रकान्वये मुद्दा क्र. ०३ प्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणेबाबत मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे खालील पैकी एक पर्याय निवडणेची मुभा दिलेली आहे. सदर शासन निर्णय संचीकेत पृष्ठ क्र. ४२ देणेत आला आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यवस्थपन सल्लागार म्हणून नेमता येईल.

आ) वरील नमूद केले प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या (PMC) एकूण १६ संस्थांच्या नामिकेमधील कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड करणे सूचविले आहे.

इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने विहीत केलेल्या मॉडेल RFP नुसार निविदा प्रक्रिया करून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नेमणूक करण्याची मुभा राहिल.

CamScanner

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे शासनाकडील विविध योजना अंतर्गत जिल्हा परिषद तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजना जलजीवन मिशन यांचे कामकाज जास्त असलेने त्यांचेकडे कार्यबाहूल्य जास्त आहे. त्यानुसार संदर्भ क्र. ०२ अन्वये अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रान्वये नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण कामांच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे पॅनेल नेमणूक करणेत आली असून याअंतर्गत महाराष्ट्रात एकूण सहा प्रशासकीय विभागांमध्ये वरील नमूद कामे करणेसाठी एकूण १६ संस्थांची नामिका (empanelment) तयार करणेत आलेली आहे. त्यामुळे इचलकरंजी महानगरपालिकेच्या कामासाठी वरील तीन मधील अ नुसार म.जी.प्रा.ची नेमणूक करणे ऐवजी त्यांनी नामांकित केलेल्या एजन्सीची PMC म्हणून नेमणूक करणे उचित ठरेल.

तसेच इ प्रमाणे निविदा मागवून उपरोक्त विषयांकीत कामी महानगरपालिका स्तरावर तज्ञ अधिकारी कमी असलेने वेगळी एजन्सी नेमणे उचित ठरणार नाही व मोठा कालावधी ही जाईल. यास्तव तांत्रिक सल्लागार म्हणून संदर्भ क्र. ०२ चे पत्रामध्ये नमूद केले नामिकेमधील एका संस्थेची विषयांकीतकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नेमणूक करण्याची आवश्यकता आहे.

३. वरील "आ" प्रमाणे संदर्भिय पत्र क्र. ०४ नुसार अधिक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा. मुंबई यांनी सल्लागाराची यादी प्रसिध्द केली असून ती पृष्ठ क्र. ३८ वर ठेवणेत आली आहे.

४. उपरोक्त नुसार दिलेल्या यादीत समावेश असलेल्या सल्लागारांना संपर्क साधला असता " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांचा समावेश आहे. सदर सल्लागाराने सदरचे काम करणेस इच्छूक असलेबाबत त्याचे दि. १२/०४/२०२३ च्या पत्रान्यने या कार्यालयास ई-मेल द्वारेकळविले आहे.

५. या सर्व बाबींचा विचार करून व संदर्भात नमूद केलेल्या सर्व शासन निर्णयाचा अभ्यास करून इचलकरंजी शहर पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

६. शासन निर्णय (संदर्भ क्र. ०३) नुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फी ही एकूण योजना रक्कमेच्या २% प्रकल्प सल्लागार सेवा शुल्क अनुज्ञेय आहे.

७. "समर्थ इम्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांनी दिलेल्या पत्रानुसार ते सदरचे काम करणेस इच्छूक आहेत. तसे त्यांनी प्त्रान्वये कळविले आहे.

८. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार (७२) नुसार अधिकाराचा वापर करणे हे महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजूरी देणेचे अधिन असणे-कलम ८६, पोट कलम (२) किंवा कलम ३५५, पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींव्यतिरिक्त कोणताही नगरपालिका प्राधिकारी ज्यात खर्च अंतर्भूत असेल अशा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार त्याला प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्याकडे सोपवलेले कोणतेही कर्तव्य पारपाडताना, पुढील शर्तींच्या अधिन असेल.

(अ) ज्या सरकारी वर्षात अशा अधिकारांचा वापर केला असेल किंवा असे कर्तव्य पार पाडले असेल त्या वर्षात, असा खर्च जितपत करावयाचा असेल तितपत त्या खर्चासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात अशा खर्चाची तरतूद केली असली पाहिजे चालू

ब) अशा अधिकाराचा वापर केल्यामुळे किंवा असे कर्तव्य पारपाडल्यामुळे असे सरकारी वर्ष संपल्यावर कोणत्याही कालावधीसाठी किंवा कोणत्याही वेळी खर्च करावा लागणार असेल किंवा खर्च होण्याचा संभव असेल तर अशा वर्षाचे दायित्व प्तकरण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजूरी घेतली असली पाहिजे.

तसेच दि.१६/०१/२०१२ चे बाब ३ (आ) नुसार शासन परिपत्रकानुसार सल्लागार नेमणेची थेट कार्यवाही करणेचे आपणांस अधिकार प्राप्त आहेत.

त्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांची २% दराने सल्लागार म्हणून नियुक्ती करणेचे प्रस्तावित केले आहे. या कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांना इचलकरंजी महानगरपालिकेच्या पॅनल वरील नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन

CamScanner

सल्लागार यांना मंजूर असलेल्या दरामध्ये म्हणजेच २% प्रमाणे सदर कामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो शासनाकडे मंजुरी करता पाठवून व प्रकल्प मंजुरीनंतर प्रकल्प पूर्ण होईल तोपर्यंत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणे बाबत विचारणा केली ,मात्र सदर " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे "यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे रिक्वेस्ट फॉर प्रपोजल मधील संदर्भ क्रमांक पाच नुसार प्रकल्प किमतीवर २.४३% याप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करायला तयार असलेल्या बाबत कळविले आहे अथवा आम्ही सदर कामी फक्त तांत्रिक मंजुरी तसेच प्रशासकीय मंजुरी घेऊन तो आपणाकडे सादर करीत आहोत व या कामी ०. ५०% इतक्या दराने काम करावयास तयार असलेल्या बाबत सांगितले आहे. नुसार सदर कामी " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तो शासनाकडे तांत्रिक मंजुरी सह सादर करून तो इचलकरंजी महानगरपालिकेत सादर करणे कामी ०.५०% इतक्या दराने देणेस उचित वाटते. याकामी माहाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे Request for Propsal (RFP) संदर्भ क्र ५ नुसार प्रकल्प किंमतीवर २.०% या प्रमाणे अंदाजे र.रु.४८,६४,००० /- इतका खर्च अपेक्षीत आहे. सविस्तर प्रकल्पाची किंमत कमी झालेस त्याचे वरील अ.क्र. १० मध्ये नमूद केले प्रमाणे या खर्चाचे दायित्व पत्करणे व खर्चास मंजूरी घेणे. आवश्यक आहे.

९. तसेच याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूची प्रकरण ५. मधिल बाब - २. विवक्षित संविदासाठी निविदा मागविणे. मधील र.रु. २ लाख रुपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी विहीत करीत अशा त्याहून अधिक रक्कमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल असे कोणतेही काम करणेबाबत संविदा मागविणेच्या कार्यप्रणालीतील पोट कलम (२) च्या परंतूकामध्ये नमूद केले प्रमाणे शासनाचे निर्देश व मान्य नामिकेतील सल्लागार असलेने निविदा न मागविता संविदा करणेस आयुक्तांना देणेत आलेल्या अधिकारांचा वापर करून " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांना विना निविदा कार्यारंभ आदेश देता येणे शक्य आहे. यासाठी प्रशासकीय ठराव घेणे आवश्यक आहे.

वरील सर्वबाबी आपल्या निदर्शनास आणल्यानुसार, पुढील कार्यवाही करणे बाबत " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांना विषयांकीत कामी इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजना विषयांकीत कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेवून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना सविस्तर प्रकल्प अहवालाच्या ०.५०% इतक्या दराने " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे " यांची नियुक्ती देणेबाबत महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्र.क्र. ५.२ (२) कलम ७३. खंड (क) च्या तरतुदीस अधिन राहून विना निविदा कार्यारंभ आदेश देणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २० /२०२३**

दि. १९/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी घेवुन संदर्भ क्र. ३, ४ व ५ मधील तरतुदीनुसार प्रस्तावात नमुद केले कामास महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्र.क्र. ५.२ (२) कलम ७३. खंड (क) च्या तरतुदीस अधिन राहून " समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे, यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन तसेच सदर सविस्तार प्रकल्प अहवालाच्या ०.५०% इतक्या दराने विना निविदा कार्यरंभ आदेश देणेस मंजुरी देणेत येत आहे.

19/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

**प्रस्ताव-**

श्रीमती सुमन युवराज चौगुले, अनुरेखक यांचा दिनांक ०१/०६/२०२३ व श्री. सावकार य. चौगुले, अनुरेखक यांचा दिनांक ०२/०६/२०२३ रोजीचा अर्ज असे दोन अर्ज सोबत आहेत. श्रीमती चौगुले यांनी तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेकडे दिनांक १९/०१/१९९४ पासून ट्रेसर (अनुरेखक) या पदावर कार्यरत असून इचलकरंजी महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधामध्ये मंजूर असलेली दोन आरेखक पदे १०० % नामनिर्देशनाने भरण्यात येणार असल्याचे दिनांक २/०५/२०२३ च्या शासन निर्णयावरून दिसून येत असल्याने व यामुळे त्यांचेवर अन्याय होणार असल्याचे नमुद करून मंजूर आरेखक पदावर पदोन्नती मिळण्यासाठी संवाप्रवेश नियमात योग्य ती दुरुस्ती करणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे. श्री. सावकार चौगुले यांनीही याच आशयाची विनंती केली आहे.

तसेच श्री. बाजीराव आ. कांबळे, प्र. क. अभियंता यांचाही शाखा अभियंता / क. अभियंता (स्थापत्य / पाणीपुरवठा) यांचे सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती / सुधारणा करणेबाबत दिनांक १४/०६/२०२३ चा अर्ज प्राप्त झाला असून तो सोबत सादर केला आहे. महानगरपालिका सेवाप्रवेशनियमात कनिष्ट अभियंता हे पद १०० % नामनिर्देशनाने भरावयाचे आहे. त्याऐवजी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०२३ (शासन नगविकास विभाग दिनांक ३० मे २०२३ अन्वये मंजूर करणेत आलेल्या) नियमातील तरतुदीस अनुसरून सदर पद हे नामनिर्देशन / सरळसेवा ७५% व पदोन्नती २५% अशी सुधारणा करणेची विनंती केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ हे महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०२ मे २०२३ मध्ये प्रसिध्द करण्यात येवून अंमलात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमातील खालील विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे आरेखक या पदाचे नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती यामध्ये उपरोक्त कर्मचारी यांची मागणी विचारात घेता बदल होणे आवश्यक आहे.

| पदाचे नाव | मंजूर सेवाप्रवेश नियम | आवश्यक दुरुस्ती | प्रस्तावित दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| आरेखक | नामनिर्देशन १००%<br>**अर्हता-** अ) उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण, ब)शासनमान्य संस्थेमधील ॲटोकॅड कोर्स पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र, क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक, ड) अनुभव धारकास प्राधान्य | नामनिर्देशन/ सरळसेवा- ६७%<br>**अर्हता-** अ) उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण, ब)शासनमान्य संस्थेमधील ॲटोकॅड कोर्स पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र, क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक, ड) अनुभव धारकास प्राधान्य<br><br>पदोन्नती ३३%<br>**अर्हता-** इचलकरंजी महानगरपालिका आस्थापनेवरील अनुरेखक या पदावर किमान तीन वर्षाची सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता व गणुवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम २०२३ शासन निर्णय दिनांक ३० मे २०२३ मधील परिशिष्ट २ अ. क्र.९२ नुसार दुरुस्ती प्रस्तावित. |
| **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | नामनिर्देशन १००%<br>**अर्हता-** अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी ब)स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेस प्राधान्य क) नेमणूकीनंतर तीन वर्षात कनिष्ट अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. ड) महाराष्ट्र | नामनिर्देशन/ सरळसेवा- ८०%<br>**अर्हता-** अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य / Civil अभियांत्रिकी शाखेची पदवी ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br><br>पदोन्नती २०%<br>**अर्हता-**<br>इचलकरंजी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग -३ संवर्गातील | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम २०२३ शासन निर्णय दिनांक ३० मे २०२३ मधील परिशिष्ट २ अ. क्र.४६ नुसार दुरुस्ती प्रस्तावित. |

CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MSCIT परीक्षा उत्तीर्ण अथवा समकक्ष असलेली एक शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र इ) मराठी भाषा ज्ञान आवश्यक | किमान तीन वर्षांची सेवा पुर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. पदोन्नतीने पद उपलब्ध न झाल्यास नामनिर्देशनव्दारे पदभरती करता येईल. | |

तरी वरील प्रमाणे विवरणपत्रातील रकाना क्र. ४ मध्ये नमुद कारणे अवलोकनी येवून रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या दुरुस्त्या होवून इचलकरंजी महानरगपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ चे शुध्दीपत्रक निर्गमित करण्याबाबत आवश्यक त्या प्रशासकीय ठरावाअंती उचित प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** 29/2023 **दिनांक १९/०६/२०२३**

वरील प्रमाणे विवरणपत्रातील रकाना क्र. ४ मध्ये नमुद कारणे अवलोकनी येवून रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आवश्यक त्या दुरुस्त्या होवून इचलकरंजी महानरगपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ चे शुध्दीपत्रक निर्गमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मंजूरी देणेत येत आहे.

19/06/2023
**(सुधाकर देशमुख)**
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

**विषय:- कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदावर समावेशन करणेस मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ:-१) श्री सुभाष सु. देशपांडेउपअभियंता स्थापत्य यांचा दि. १९/०६/२०२३ रोजीचा मागणी अर्ज.
२) शासन नगरविकास विभागाकडील क्र.इमपा-२०२२/प्र.क्र.९८०/नवि-१८ दि.०७/०२/२०२३ चे आदेश.
३)शासन राजपत्र क्र.इमपा-२०२२/प्र.क्र.९८१/नवि-१८ दि.०२/०५/२०२३.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिका ही नवनिर्मित महापालिका असून ती शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना दिनांक २९ जून २०२२ नुसार स्थापन झालेली आहे.

वरील संदर्भीय नमुद क्र. २ वरील शासन निर्णयाव्दारे इचलकरंजी महानगरपालिकेचे आस्थापनेवरील १७४४ पदांचा आकृतीबंध मंजूर करणेत आला आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील नमुद शासन निर्णयान्वये इचलकरंजी महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ यास मान्यता देणेत आली असून त्याबाबतची अधिसूचना ही प्रसिध्द करणेत आली आहे.

महानगरपालिकेचे मजूर आकृतीबंधात बांधकाम विभागाकरीता कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट अ अभियांत्रिकी सेवा) (वेतनश्रेणी S२३-६७७००-२०८७००) एक पद व पाणी पुरवठा विभागाकरीता एक पद अशी दोन पदे मंजूर करणेत आली असून सेवाप्रवेश नियमात सदर पदाकरीता पदोन्नती १०० % अशी नेमणूकीची पध्दत असून याबाबत अर्हता ही अ) इचलकरंजी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपअभियंता (स्थापत्य) या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा पुर्ण ब) पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध न झाल्यास पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होईतोपर्यंत राज्य शासनाकडून समकक्ष पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल अशी तरतुद करणेत आलेली आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेकडे श्री. सुभाष सुधाकर देशपांडे शाखा अभियंता पदावर दिनांक ०८/१०/१९८६ पासून कार्यरत असून त्यांचे नियुक्तीचे वेळची चौथ्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी १६४०-६०-२६००-७५-२९००, दि. ०९/०५/२००८ ने नगरपरिषदेकडील कनिष्ठ अभियंता यांना सलग पाच वर्षे सेवा पुर्ण झाले तारखेस म्हणजे दि. ०८/१०/१९९१ पासून २००० - ३५०० वेतन श्रेणी लागु करणेत आली. पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. ६५०० - २०० - १०५००, दि. ०८/१०/२००४ रोजी कालबध्द पदोन्नतीच्या पहिल्या लाभानुसार ८००० - १३५०० अशी आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ९३०० - ३४८०० ग्रेड पे. ५४००, कालबध्द पदोन्नतीचा दुसरा लाभानुसार एकाकी पद असल्याने वेतनश्रेणी ९३०० - ३४८०० ग्रेड पे ५४०० समुचीत ग्रेड ८०० अशी देणेत आली. सातव्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक्स मध्ये एस २० - ५६१०० - १७७५०० असून एकाकी पदाची वेतनश्रेणी असलेने नजीकची पे मॅट्रीक्स मध्ये एस २१ - ५७१०० - १८०८०० अशी आहे. जर एकाकी पद नसते तर सदर पदाची वेतनश्रेणी एस २३ - ६७७०० - २०८७०० अशी असती.

सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर ते एकमेव शाखा अभियंता (स्थापत्य ) असलेची बाब विचारात घेवून त्यांना इकडील दिनांक १४/०६/२०२३ चे आदेशाने उपअभियंता स्थापत्य या पदावर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयातील दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या होणाऱ्या निर्णयास अधीन राहून देणेत आलेली आहे.

सध्या श्री. देशपांडे हे महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत असून त्यांना कार्यालयीन सोईस्तव कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग या पदाचा कार्यभार सोपविणेत आला असून ते सक्षमतेने सदर पदाचे कामकाज करीत आहेत. उपरोक्त संदर्भिय नमुद क्र. १ वरील अर्जाव्दारे श्री देशपांडे यांनी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पाणीपुरवठा विभागाकडील मंजूर व रिक्त असलेला कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर समावेशन / नियुक्ती देणेस विनंती केली आहे. ( छायाप्रत संलग्न )

जरी श्री सुभाष देशपांडे यांची सद्याची वेतनश्रेणी एस २१ - ५७१०० - १८०८०० अशी असली तरी शासन निणर्य सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील क्र.निपानि-२०२३/प्र.क्र१३/कार्या १२ मार्च २०२३ मधील सुधारीत सेवांतर्गत

CamScanner

आश्वासित प्रगती योजनेच्या लाभांसाठीच्या वेतनस्तर एस २० च्या मर्यादेमुळे गट अ मधील वेतनस्तर एस २० व पुढील संवर्गाच्या पदोन्नतीमधील कुंठीतता दुर करणेसाठी निवडश्रेणी वेतनस्तर अनुज्ञेय करणेबाबत निर्णय घेणेत आला आहे यामुळे श्री सुभाष देशपांडे यांचा वेतन स्तर एस २१ ऐवजी एस २३ रु. ६७७०० - २०८७०० असा अनुज्ञेय होत आहे ही बाब विचारात घेता श्री देशपांडे उपअभियंता ( स्थापत्य ) हे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पाणी पुरवठा विभागाकरीता मंजूर व रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता स्थापत्य या पदाची वेतनश्रेणी धारण करीत आहेत.

महानगरपालिकेचे आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेकरीता अन्य अभियंता इकडे उपलब्ध नाहीत. पाणी पुरवठा विभागाकडील कामकाज अत्यंत महत्त्वपुर्ण व अत्यावश्यक सेवेतील असलेने सदर विभागाकरीता कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर पुर्णवेळ अधिकारी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे ही बाब विचारत घेता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ तसेच दिनांक ०७/०५/२०२१ चे शासन निर्णय प्रकरणी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून श्री. सुभाष सुधाकर देशपांडे, उपअभियंता (स्थापत्य) यांचे समावेशन पाणी पुरवठा विभागाकडील रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर करणेस शासनाची मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी प्रशासकीय ठराव होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

दि.२२/०६/२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. २२ /२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव वाचणेत आला. तरी महानगरपालिकेचे आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेकरीता अन्य अभियंता इकडे उपलब्ध नाहीत. पाणी पुरवठा विभागाकडील कामकाज अत्यंत महत्त्वपुर्ण व अत्यावश्यक सेवेतील असलेने सदर विभागाकरीता कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर पुर्णवेळ अधिकारी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे ही बाब विचारात घेता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ तसेच दिनांक ०७/०५/२०२१ चे शासन निर्णय प्रकरणी मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून श्री. सुभाष सुधाकर देशपांडे, उपअभियंता (स्थापत्य) यांचे समावेशन पाणी पुरवठा विभागाकडील रिक्त असलेल्या कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर करणेस मा शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देणेत येत आहे.

22/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

**प्रस्ताव-**

इचलकरंजी महानगरपालिका ही नवनिर्मित महापालिका असून ती शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना दिनांक २९ जून २०२२ नुसार स्थापन झालेली आहे.

वरील संदर्भीय नमुद क्र. २ वरील शासन निर्णयाव्दारे इचलकरंजी महानगरपालिकेचे आस्थापनेवरील १७४४ पदांचा आकृतीबंध मंजूर करणेत आला आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील नमुद शासन निर्णयान्वये इचलकरंजी महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२३ यास मान्यता देणेत आली असून त्याबाबतची अधिसूचना ही प्रसिध्द करणेत आली आहे.

महानगरपालिकेचे मजूर आकृतीबंधात वैद्यकीय आरोग्य (रुग्णालय) विभागाकरीता वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (वेतनश्रेणी S-१३-३५४००-११२४००) एक पद मंजूर करणेत आली असून सेवाप्रवेश नियमात सदर पदाकरीता नामनिर्देशन १०० % अशी नेमणूकीची पध्दत असून याबाबत अर्हता ही अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजशास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी / मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजसेवक या विषयातील MSW पदवी ब) शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था व तत्सम रुग्णालयातील ०२ वर्षांचा अनुभव क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक अशी आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेचे प्रधानमंत्री आवास योजना या विभागाकरीता कंत्राटी तत्वावर क्षमता बांधणी / समाज विकास तज्ञ या पदावर श्रीमती शुभांगी दामोदर जोशी या माहे २०१७ पासून कार्यरत आहेत. त्यांना दर ११ महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून सदर विभागाकडे सेवेत कार्यरत ठेवणेत आले आहे. सदर विभागाकडील त्यांचे काम समाधानकारक असून प्रशासनाकडून वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत.

सध्या त्यांनी दिनांक ०८/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल करून परभणी, नवी मुंबई, चंद्रपूर, लातूर आदि ठिकाणी पुर्वी कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समावेशन महापालिकेच्या नियमित पदावर झाले असलेने तसेच त्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या पदाची सेवा प्रवेश नियमात नमुद असलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेने त्यांचे समावेशन उक्त पदावर करणेसंबंधीची मागणी केली आहे. (छायाप्रत संलग्न)

श्रीमती जोशी यांची तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद व सध्याची इचलकरंजी महानगरपालिकेकडे करार पध्दतीने विहीत मार्गाचा अवलंब करून (जाहिरात / मुलाखत इत्यादी) शैक्षणिक अर्हता विचारात घेवून करणेत आली आहे. सध्या त्यांचे वय ४६ वर्षे पुर्ण आहे.

शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. नमुम १२११/प्र.क्र ०७/नवि-२८ दिनांक २७ जूलै २०२१ अनुसार नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील (कंत्राट) तात्पुरत्या स्वरुपात वेतनश्रेणी, किमान वेतन व ठोक मानधनावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे महापालिकेच्या सेवेत नियमित समावेशन करणेस काही अटी शर्तीसह मान्यता देणेत आली आहे. त्याचप्रमाणे परभणी व लातूर महानगरपालिका येथील पदावरही याच पध्दतीने समावेशन करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

२...

वरील बाबीचे अवलोकन करता इचलकरंजी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असणाऱ्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (मेडिकल सोशल वर्कर) या पदावर अटी शर्तीसह त्यांची वयाचे अटीस शिथीलता देवून समावेशन करणेस आवश्यक त्या प्रशासकीय ठरावाअंती उचित प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. २३ दिनांक १९/०६/२०२३

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येवून श्रीमती शुभांगी दामोदर जोशी कंत्राटी क्षमता बांधणी / समाज विकास तज्ञ यांचे इचलकरंजी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त असणाऱ्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता (मेडिकल सोशल वर्कर) या पदावर अटी शर्तीसह त्यांची वयाचे अटीस शिथीलता देवून समावेशन करणेस आवश्यक प्रस्ताव शासनाकडे सादर करणेस मंजूरी देणेत येत आहे.

(सुधाकर देशमुख) १९/०६/२०२३
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड नं. १०,१३,२१ (अंशतः), २२,२३ मधील रस्ते व गटारी सफाई करून गोळा झालेला कचरा न.प.सुचनेप्रमाणे जमा करणेचे काम दि.०१/०१/२०२३ ते दि.३०/०६/२०२३अखेर होणारा खर्च इचलकरंजी महानगरपालिकेस १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त होणा-या अनुदानातुन खर्च करणेस मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्ताव**

इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड नं. १०,१३,२१ (अंशतः), २२,२३ मधील रस्ते व गटारी सफाई करून गोळा झालेला कचरा न.प.सुचनेप्रमाणे जमा करणेचे काम १४ व्या वित्त आयोगातून खर्च करणेस मे.कौ.ठ.नं.६ दि.३१/०५/२०१८ ने मंजूरी मिळालेली आहे. तसेच खालील नमुद मक्तेदारांना मे.स्था.स.ठ.क्र. १०८ दि.१८/०८/२०१८ ने मंजूरी देवून दि.०१/०९/२०१८ पासून एक वर्ष कालावधी करिता काम करून घेणेत आलेले आहे. तद्नंतर मे.कौ.ठ.नं.९४ दि.०२/०८/२०१९ ने एक वर्ष मुदतवाढ देवून काम करून घेणेत आलेली आहे. पुन्हा मे.कौ.ठ.नं.७४ दि.१६/०९/२०२० ने एक वर्ष काम करून घेणेत आलेले आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०८/२०२१ रोजी संपत आहे. तद्नंतर मे.कौ.ठ.नं.८७ दि.०६/०८/२०२१ ने एक वर्ष मुदतवाढ घेवून काम करणेस मान्यता मिळालेली आहे. तथापी सदरचा प्रस्ताव १४व्या वित्त आयोगातून खर्च करून घेणेकामी मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत आला असता दि.२०/०९/२०२१ चे आदेशान्वये प्रस्तावित करणेत आलेल्या ०५ वॉर्डमधील साफसफाई कामाकरिता दि.३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ देवून मंजूरी मिळालेली आहे.

दरम्यानच्या काळात सदर कामाचे नविन अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास मे. कौ.ठ.नं. १६६ दि. २९ /१२/२०२१ ने सदरचा खर्च हा १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतून करणेस मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोल्हापुर, यांचेकडे सादर केलेले आहे. म.जी.प्रा.कडुन कळविलेल्या त्रुटी पुर्ण करुन पुनःश्च प्रस्ताव सादर केला असता म.जी.प्रा.पुणे यांचेकडून दि.२४/०३/२०२२ रोजी तांत्रिक मान्यता मिळालेली आहे. त्यास मा.जिल्हाधिकारीसो कोल्हापुर, यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली असून निविदा प्रसिध्द करणेत आली होती..

त्यामुळे याकामी मंजूर मक्तेदार यांना मंजूर असलेल्या संबंधित वॉर्डचे साफसफाईचे कामाबाबत त्यांना लागु असलेल्या चालु कामाच्या करारातील सर्व अटी / शर्तीमधील तरतुदीस अधिन राहून स्थायी निर्देश ३६ नुसार पुढील एक महिन्याकरिता (०१/०५/२०२२ ते ३१/०५/२०२२ अखेर) मे.प्रशासकीय ठराव नं.०४ दि.२९/०४ /२०२२ अखेर मुदतवाढ मिळालेली आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०५/२०२२ रोजी संपले नंतर मे.कौन्सिल सभा प्रशासकीय ठराव नं. २७ दि. ०७/०६/२०२२ ने सदरकामी दि.०१/०६/२०२२ ते दि.३०/०६/२०२२ अखेर ०१ महिना मुदतवाढ मिळालेली आहे. सदर कामाची मुदत संपलेनंतर मे.स्थायी समिती प्रशासकीय ठराव नं.३ दि.२१/०७/२०२२ ने दि.०१/०७/२०२२ ते ३१/०८/२०२२ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे.

विषयांकित प्रकरणी सदरकामीची ई-निविदा दि.०६/०५/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती तथापि सदर ई-निविदेमध्ये सहभाग घेतलेल्या आठ कंपनीने आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये सादर केलेली नसलेने त्या आठ ही कंपनीच्या निविदा अपात्र ठरलेने सदर कामांची नव्याने जाहिर ई-निविदा प्रसिध्द करणेस काही कालावधी लागणार असलेने उपरोक्त तक्त्यातील नमुद मक्तेदार यांना मंजूर असलेल्या दरानेच दि.०१ /०९ /२०२२ पासुन सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

CamScanner

तसेच खालील नमुद वॉर्डामधील काम करणा-या मक्तेदारांची देयेके हे माहे डिसेंबर २०२२ अखेर अदा केलेली असून खालिलप्रमाणे नमुद जानेवारी २०२३ ते जुन २०२३ अखेर अदा करणे आवश्यक आहे.

| वॉर्ड नं. | मक्तेदाराचे नांव | एस्टीमेंट रक्कम रू. (वार्षिक) | दि.०१/०१/२०२३ ते ३०/०६/२०२३ अखेर |
|---|---|---|---|
| १० | संतोष भुपाल मोने | ६३,९५,६४०/- | ३१,७१,५३६/- |
| १३ | अनिल आबासो शिंदे | ५८,२२,४४५/- | २८,८७,२९५/- |
| २१ (अंशतः) | अनिल नबी शिकलगार | ४८,४१,२६८/- | २४,००,७३८/- |
| २२ | राहूल रोहिदास गायकवाड | ५१,४९,१६०/- | २५,५३,४११/- |
| २३ | शिवाजी सिध्दू धुमाळ | ३८,१०,०३५/- | १८,८९,३८१/- |
| | एकूण | र.रू.२,६०,१८,५४८/- | र.रू.१,२९,०२,३४७/- |

वरील नमुद वॉर्ड क्र.१०,१३,२१ (अंशतः) २२ व २३ या वॉर्डातील मक्तेदारांची माहे जानेवारी २०२३ ते जुन २०२३ अखेर सहा महिन्याची देयेके हे अंदाजे र.रु.१,२९,०२,३४७/- इतके होत असून सदरची देयेके ही १५ व्या वित्त आयोगातील इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त बंधनकारक निधीतुन करणेसाठीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव इकडे सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२४/२०२३** दि.२२/०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन : इचलकरंजी महानगरपालिका प्रशासकीय वॉर्ड नं. १०,१३,२१ (अंशतः), २२,२३ मधील रस्ते व गटारी सफाई करून गोळा झालेला कचरा न.प.सुचनेप्रमाणे जमा करणेचे कामाचे प्रस्तावात नमुद मक्तेदार यांना मंजूर असलेल्या दरानेच दि.०१/०९/२०२२ पासुन सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली असुन प्रस्तावत नमुद मक्तेदार यांची माहे जानेवारी २०२३ ते जुन २०२३ अखेर सहा महिन्याची देयेके हे अंदाजे र.रु.१,२९,०२,३४७/- इतके होत असून सदरची देयेके ही १५ व्या वित्त आयोगातील इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त बंधनकारक निधीतुन आदा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

प्रस्तावः इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरातील वॉर्ड नं.१ ते २६ या वॉर्डमधील घरोघरी कचरा गोळा करणे तसेच रस्ते व गटारी साफसफाई करून निघालेला सर्व प्रकारचा कचरा (जैव वैद्यकिय कचरा व दैनंदिन तसेच आठवडा बाजार वगळून) गोळा करून कचरा डेपोवर वाहतूक करणे अथवा म.पा. सुचनेनुसार टाकणे आणि न.प.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्तीसह सेवा पुरविणे या कामास दि. ०१ /०९/२०२२ पासुन सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत सध्या मंजूर असलेल्या दरामध्ये मुदतवाढ देणेत आलेली आहे व सदर कामी माहे मार्च २०२३ ते जुन २०२३ हया चार महिन्यांचा खर्च हा १५ व्या वित्त आयोगातील इचलकरंजी म.न.पा.स प्राप्त निधीतुन करणेस मान्यता मिळणेबाबत.

## प्रस्ताव

इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरातील वॉर्ड नं.१ ते २६ या वॉर्डमधील घरोघरी कचरा गोळा करणे तसेच रस्ते व गटारी साफसफाई करून निघालेला सर्व प्रकारचा कचरा (जैव वैद्यकिय कचरा व दैनंदिन तसेच आठवडा बाजार वगळून ) गोळा करून कचरा डेपोवर वाहतूक करणे अथवा न.प सुचनेनुसार टाकणे आणि म.न.पा.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्तीसह सेवा पुरविणे हे काम मे.आदर्श फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस,औरंगाबाद यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.४०% कमी दराने मे.स्थायी ठराव नं.४४ दि.२०/१०/२०२० ने मंजूरी दिलेली असून सदर कामाची वर्कऑर्डर दि.१३/११/२०२० रोजी दिलेली आहे. याकामी मक्तेदार कंपनी यांनी प्रत्यक्षात दि.०९/१२/२०२० पासून कामाची सुरूवात केलेली आहे. सदरच्या कामाची मुदत १ वर्षे कालावधी करीता म्हणजेच दि.०९/१२/२०२० पासून दि.०८/१२/२०२१ पर्यंत आहे.

मे.आदर्श फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस,औरंगाबाद यांनी इचलकरंजी शहरातील वॉर्ड नं.१ ते २६ या वॉर्डमधील घरोघरी कचरा गोळा करणे तसेच या वॉर्ड मधील रस्ते व गटारी साफसफाई करून निघालेला सर्व प्रकारचा कचरा (जैव वैद्यकिय कचरा व दैनंदिन तसेच आठवडा बाजार वगळून) गोळा करून कचरा डेपोवर वाहतूक करणे अथवा न.प सुचनेनुसार टाकणे आणि न.प.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्तीसह सेवा पुरविणे याकामी मुदतवाढीची मागणी केलेल्या दि.२४/०९/२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडील मुख्य स्वच्छता निरीक्षक व सर्व स्वच्छता निरीक्षक, इ.न.प. यांचेकडून मे.आदर्श फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस,औरंगाबाद यांचे कामाबद्दलचा वस्तुस्थितीजन्य अहवाल मागविला असता, मे.आदर्श फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस,औरंगाबाद या कंपनीने दि.०९/१२/२०२० पासून काम सुरु केलेले असून त्यांचे काम समाधानकारक असलेचा अहवाल सर्व S.I. व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी दि.२९ /०९ /२०२१ रोजी दिलेला होता.

तथापी नजीकच्या काळात येवू घातलेल्या नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता व सदर कामाचे अंदाजपत्रक संबंधित अभियंता यांचेकडुन तयार करुन घेणे, त्यास मे.कौन्सिलची मान्यता मिळणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रीक मान्यता मिळणे,कामगार आयुक्त कार्यालय,इचलकरंजी यांची मान्यता घेणे आणि मा.जिल्हाधिकारीसो यांची प्रशासकीय मान्यता मिळणे व निविदा प्रक्रिया राबविणे या सर्वांची पुर्तता होणेसाठी यापुढे किमान दोन महिन्यांचा कालावधी लागणेची शक्यता आहे. परंतु मे आदर्श फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस औरंगाबाद यांची मुदत ही ८ डिसेंबर २०२१ रोजी संपत असलेने आणि सदरचे काम हे शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेने मे.आदर्श फॅसिलीटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस,औरंगाबाद यांना दि.०९ डिसेंबर २०२१ पासून दोन महिने सध्या मंजूर असलेल्या दरामध्ये मुदतवाढ देणेस मा. अध्यक्षसो यांनी दि.०७/१२/२०२१ रोजी कार्योत्तर मंजुरी दिलेली होती. त्यास मे.कौ.ठ.नं. १६१ दि. २९ /१२ /२०२१ ने मंजुरी मिळालेली होती.

सदर कामाची मुदत दि. ०८/०२/२०२२ रोजी संपणार असलेने मा.प्रशासकीय ठराव क्र.२३ दि.३१/०१/२०२१ चे मंजूरीने दि.०९/०२/२०२२ ते दि.३१/०३/२०२२ अखेर दुसरी मुदतवाढ मिळालेली असून सदर कामाची मुदत दि.३१/०३/२०२२ रोजी संपलेनंतर मे.प्रशासकीय ठराव नं.४२ दि.३०/०३/२०२२ ने सदरकामी दि.०१/०४/२०२२ ते दि.३०/०४/२०२२ अखेर ०१ महिना मुदतवाढ मिळालेली आहे.

CS CamScanner

सदर कामाची मुदत दि.३०/०४/२०२२ रोजी संपलेनंतर मे.प्रशासकीय ठराव नं.०५ दि.२९/०४/२०२२ ने सदरकामी दि.०१/०५/२०२२ ते दि.३१/०५/२०२२ अखेर ०१ महिना मुदतवाढ मिळालेली असून सदर कामाची मुदत दि.३१/०५/२०२२ रोजी संपलेनंतर मे.स्थायी समिती प्रशासकीय ठराव नं. २६ दि. ०७/०६/२०२२ ने सदरकामी दि.०१/०६/२०२२ ते दि.३०/०६/२०२२ अखेर ०१ महिना मुदतवाढ मिळालेली असून सदर कामाची मुदत संपलेनंतर सदर कामाची मुदत संपलेनंतर मे.कौन्सिल सभा प्रशासकीय ठराव नं. दि.२१/०७/२०२२ ने दि.०१/०७/२०२२ ते ३१/०८/२०२२ अखेर मुदतवाढ देणेत आलेली होती.

विषयांकित प्रकरणी सदरकामीची ई-निविदा दि.०६/०५/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती तथापि सदर ई-निविदेमध्ये सहभाग घेतलेल्या आठ कंपनीने आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये सादर केलेली नसलेने त्या आठही कंपनीच्या निविदा अपात्र ठरलेने सदर कामांची नव्याने जाहिर ई-निविदा प्रसिध्द करणेस काही कालावधी लागणार असलेने मे आदर्श फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि.०१/०९/२०२२ पासुन सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत मुदतवाढ देवुन व येणारा खर्च म.न.पा.फंड घनकचरा व्यवस्थापन या हेड वरुन करणेस व सदरचे काम करुन घेणेकामी मे.प्रशासकिय ठराव क्र.२१/२०२२ दि.१४/१०/२०२२ ने मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरातील वॉर्ड नं.१ ते २६ या वॉर्ड मधील घरोघरी कचरा गोळा करणे व तसेच रस्ते व गटारी साफसफाई करुन निघालेला सर्वप्रकारचा कचरा ( जैव वैद्यकिय कचरा व दैनंदिन तसेच आठवडा बाजार वगळून ) गोळा करुन कचरा डेपोवर वहातुक करणे अथवा म.न.पा. सुचने नुसार टाकणे आणि म.न.पा.ने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्तीसह सेवा पुरविणे हे काम मे.आदर्श फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत सद्या मंजुर असलेल्या दरामध्ये दि.०१/०९/२०२२ पासुन मुदतवाढ देणेत आलेली आहे. सद्या सदर कंपनीची माहे फेब्रुवारी २०२३ पर्यंतची देयेके अदा करणेत आलेली असून सदर कंपनीची माहे मार्च २०२३ ते जुन २०२३ अखेर एकूण चार महिन्यांची देयेके अंदाजे र.रु.२,१४,२२,८८३/- इतकी होत असून सदरची देयेके ही १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त बंधनकारक निधितुन करणेसाठीच्या मान्यतेसाठी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.२५ /२०२३** दि. २२ /०६/२०२३

वरील प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत शहरातील वॉर्ड नं.१ ते २६ या वॉर्डमधील घरोघरी कचरा गोळा करणे तसेच रस्ते व गटारी साफसफाई करून निघालेला सर्व प्रकारचा कचरा (जैव वैद्यकिय कचरा व दैनंदिन तसेच आठवडा बाजार वगळून) गोळा करून कचरा डेपोवर वाहतूक करणे अथवा महानगरपालिकेच्या सुचनेनुसार टाकणे आणि महानगरपालिकेने पुरविलेल्या वाहनांची देखभाल व दुरुस्तीसह सेवा पुरविणे या कामास दि. ०१ /०९/२०२२ पासुन सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत सध्या मंजूर असलेल्या दरामध्ये मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर कंपनीची माहे फेब्रुवारी २०२३ पर्यंतची देयेके अदा करणेत आलेली असून सदर कंपनीची माहे मार्च २०२३ ते जुन २०२३ अखेर एकूण चार महिन्यांची देयेके अंदाजे र.रु.२,१४,२२,८८३/- इतकी होत असून सदरची देयेके ही १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त बंधनकारक निधितुन आदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

22/06/2023

(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका.

प्रस्तावः घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. ६३८ कचरा डेपो येथील ओला व सुका कच-यावर प्रक्रिया करणे कामाचे देयक आदा करणेबाबत.

**प्रस्ताव**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पुणे यांचेकडून प्राप्त तांत्रिक मान्यतेनुसार र.रू. २५,९९,८४,९९७/- कोटी किंमतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत शासन निर्णय क्रमांक :- स्वमअ-२०१८/प्र.क्र.१३१/ नवि-३४ दिनांक : १२ एप्रिल,२०१८ चे मान्यतेने खालील नमूद कामे तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेमार्फत करणेत येत आहेत.

| Sr.No. | Name of Subwork | Estimate Cost (Lakh) |
|---|---|---|
| 1 | Procurement of Vahicles for MSW Collection and transportation (C & T) in the city and for processing work at the site | 5,59,02,920/- |
| 2 | Bio-Mining of already dumped 199120 Tones waste by excavation, sieving,segregation | 8,96,93,604/- |
| 3 | Construction of Scientific Landfill (SLF) at Kachara Depot for Inert of Five Years. | 2,99,64,622/- |
| 4 | Lechate Treatment Plant (75 KLD) | 65,57,000/- |
| 5 | Construction of Internal Road(500m) at the site | 32,98,062/- |
| 6 | Construction of Storm water drain (1000m)along internal road at the site | 31,61,403/- |
| 7 | Construction of Weighbridge at the site | 10,91,768/- |
| 8 | Machineries required at the landfill site | 2,91,11,000/- |
| 9 | Construction of Civil Infrastructure- shed(1500 sq.m)for Wet Waste Processing Facility + Electrical Work for 1500 sq.m shed | 1,31,21,235/- |
| 10 | Construction of two (2) Civil Infrastructure- shed(200 sq.m)for Dry Waste Processing Facility | 39,40,934/- |
| 11 | Procurement of Vahicles for movement of waste within the site | 10,67,500/- |
| 12 | Installation of a 5 TPD biomethanation plant at site | 1,15,00,000/- |
| 13 | Procurement of Personal Peotective Equipments (PPE) and other equipments for manpower working under MSW Collection and transportation (C&T),processing and disposal activities. | 8,04,950/- |
| 14 | Green Belt development at the site. | 7,70,000/- |
| 15 | Information, education and Communication (IEC) activities to be undertaken for spreading awareness of Solid Waste Management in the city throught hoardings, pamphlets, roads shows through the involvement of local NGO, Pathnatya, Focus Group Discussion at Residential Societies, Schools and Public Places. | 1,00,00,000/- |
| | **GRAND TOTAL** | **25,99,84,997/-** |

उपरोक्त नमूद १ ते १५ कामांपैकी १,२,५,६,७,८,१०,११,१२ व १५ ही कामे पूर्ण झालेली असून अ.क्र.३ व ९ ही कामे पूर्णत्वाचे मार्गावर आहेत. तसेच अ.क्र.४ व १४ या कामांचे कार्यादेश दिले असून जुना साठलेला कचऱ्यामुळे जागेअभावी सदरची कामे तुर्तास तातडीने करता येणे तांत्रिक अडचणीमुळे शक्य नाही. तसेच अ.क्र.१३ चे कामी Gem पोर्टलवरून खरेदी करणेची प्रक्रिया सुरू आहे. इचलकरंजी नगरपरिषद हददीतील रि.स. ६३८ कचरा डेपो येथील ओला व सुका कचरा प्रक्रीया प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालिवणेस देणे हे काम करून घेणे आवश्यक असलेने महाराष्ट्रातील अन्य नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा प्रकल्पाची कामे चालू आहेत तेथील

CS CamScanner

माहितीप्रमाणे (Operation & Maintance) देखभाल दुरूस्ती हे काम मशिनरी बसविणा-या अनुभवी मक्तेदाराकडून ओला व सुका कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी त्यामधील अत्याधुनिक सुविधासह परिपूर्ण असलेल्या तांत्रिक बार्बीना सक्षम असलेल्या मशिनरीचा उपयोग करून सदर प्रक्रिया करावी लागणार आहे. सदरच्या प्रकल्पामध्ये इचलकरंजी शहरातील दैनंदिन उठाव होणारा कचरा ओला / सुका विलगीकरण करून प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. यामुळे भविष्यातील कचऱ्याचा विचार करून सदर प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित होणेसाठी अनुभवी मक्तेदाराकडून इकडे प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालु करणे करीता दि.०१/०८/२०२० रोजी जाहीर निवेदनांव्दारे दर मागणीचे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी दिले होते.या कामी अंतीम मुदत दि.०७/०८/२०२० अखेर दिली होती. मुदतीत एकुण ०५ कंपन्यांचे खलील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कंपनीचे /मक्तेदाराचे नांव | प्राप्त प्रती टनास दर |
|---|---|---|
| ०१ | हायड्रोएअर ईंजिनिअरींग कन्संलटन्स,नागपुर | रू.७१०/- |
| ०२ | शशा फॅसिलीटी मॅनेजमेंट प्रा.लि.,ठाणे | रू.७४०/- |
| ०३ | प्रगती स्टील फॅब्रिकेशन &फायबर्स,सोलापुर | रू.९९०/- |
| ०४ | हिंद अॅग्रो & केमीकल्स,कोल्हापुर | रू.९००/- |
| ०५ | अनय फर्टीलायझर्स, इचलकरंजी | रू.७००/- |

या प्रमाणे प्रकल्प चालु करावयाचे झालेस वरील प्रमाणे प्राप्त झालेला कमीत कमी दर पहाता सरासरी प्रति टन रू.७००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता लागणारी सर्व मशिनरी, जागा, शेड व वजनकाटा नगरपरिषदेकडून पुरविणेत येईल. तसेच विद्युत जोडणी, पाणी कनेक्शन नगरपरिषदेमार्फत पुरविले जाईल परंतु त्याचे वापराचे देयक हे प्रकल्प चालविणाऱ्याने भरावयाचे आहे. तसेच सदर प्रकल्पातून तयार होणाऱ्या खताची प्रायोगिक तपासणी (लॅब) ही स्वतः उभारणेची आहे. इतर परवाने हे प्रकल्प चालविणाऱ्यांनी काढावयाचे आहे व खत विक्रीतून होणाऱ्या उत्पन्नामधून ५०% रक्कम नगरपरिषदेस प्रकल्प चालवणाऱ्यांनी दयावयाची आहे. सदर प्रकल्पामध्ये सरासरी प्रती दिन १२० टन ओल्या व सुक्या कच-यावर प्रक्रिया होणार आहे. तरी प्रति टन रू.७०० x १२० = ८४,००० x ३६५ दिवसासाठी रक्कम रू. ३,०६,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्प हा महाराष्ट्रातील इतर ठिकाणी किमान ०५ वर्षे कार्यान्वित करणेसाठी दिले प्रमाणे व टाटा कन्सलटंन्सी कंपनी मार्फत तयार करणेत आलेल्या DPR मध्ये नमूद केलेनुसार तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेकडुन ही किमान ०५ वर्षाकरीता प्रकल्प चालविणेस देता येईल.

सदर खर्चाची तरतूद १४व्या / १५ व्या वित्त आयोगामधून उपलब्ध होणाऱ्या शासन अनुदानातून करून सदर प्रकल्पामधून तयार होणाऱ्या खत विक्रीतून नगरपरिषदेस ५०% उत्पन्न होईल यादृष्टीने प्रयत्न करून सदरचा प्रकल्प कायमस्वरूपी चालवून त्यातून शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचरामुक्त शहर (GFC) ही संकल्पना यशस्वी होणार आहे. या प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असलेने मे.कौ.ठ.नं.७८ दि.१६/०९/२०२० नुसार घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठीच्या र.रू.७००/-प्रति टन दरास अंदाजपत्रक तयार करणेकामी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरकामी पहिल्या वर्षी प्रति टन रू.७०० x १२० = ८४,००० x ३६५ दिवसासाठी रक्कम रू. ३,०६,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असलेने इचलकरंजी शहरातील घनकचरा प्रकल्प अंतर्गत रि.सं.नं.६३८कचरा डेपो येथे मशिनरी खरेदी, RDF प्लॅन्ट बसविणे ,१० कंटेनर्स पुरविणे व ओला व सुक्या कच-यावर प्रक्रीया करणेस व देखभाल दुरूस्तीसह प्रकल्प ०५ वर्षासाठी चालविणे (O&M). याकामी दिनांक २८/१२/२०२० इ.रोजी आरोग्य विभागाकडून दै. महासत्ता / राष्ट्रगीत /लोकमत मध्ये दि. ०९/०४/२०२१ इ. रोजी जाहीर निवीदा प्रसिध्दी केलेल्या निविदा मधील ,प्राप्त निवीदाधारकांचा लिफाफा क्र.०२ उघडणेत आला त्यामधील पात्र निवीदा धारकांच्या लिफाफा क्र.२ बाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | प्राप्त निवीदा दर | | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | AADARSH BHARAT ENVIRO Pvt.Ltd | मशिनरी पुरविणे व बसविणे | र.रू.२,५९,९०,९५५/- | सर्वात कमीचा दर |

CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | O&M दर | प्रती टन रू.६९९/- | |
| २ | NEPRA RESOURCE MANAGEMENT Pvt Ltd. | मशिनरी पुरविणे व बसविणे | र.रू.३,१५,५५,०००/- | - |
| | | O&M दर | प्रती टन रू.७५७/- | |
| ३ | PRADIP HANUMANT JADHAV | मशिनरी पुरविणे व बसविणे | र.रू.३,२५,५०,०००/- | - |
| | | O&M दर | प्रती टन रू.७७५/- | |

वरील प्रमाणे उघडणेत आलेल्या लिफाफा क्र.०२ मधील सर्व निवीदाधारकांचे निवीदेतील दर पहाता AADARSH BHARAT ENVIRO Pvt.Ltd यांची अंदाजपत्रकीय पेक्षा कमी दराने निवीदा प्राप्त झाली आहे .मा.संचालक ,न .प. प्रशासन संचलनालय यांचेकडील स्थायी निर्देश ३६ मधील तरतुदी नुसार सर्वात कमी दराचे निवीदाकार यांना त्यांनी दिले दरापेक्षा कमी दरात काम करणे विषयी दि. ०९/०४/२०२१ चे ई-मेलव्दारे विचारणा केली होती सदर बाबत मक्तेदार AADARSH BHARAT ENVIRO Pvt.Ltd यांनी दि. ०९/०४/२०२१ चे ई-मेलव्दारे निविदा भरलेल्या दरानेच काम करणेस तयारी दर्शविली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा प्रती टन रू १/- कमी म्हणजेच रू.६९९/- प्रति टन दराची निवीदा मंजुर करणेबाबत मे.स्थायी समीतीकडे शिफारस करणेत आलेनुसार महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक अधिनियम व लेखासंहितेतील विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.४५/नवि-१४ दि.२७/९/२०१८ चे शासन निर्णयातील परि २ (अ) अधिनियम व लेखा संहीतेतील तरतुदींनुसार विहीत पध्दतीने मागविणेत आलेल्या निविदा या अंदाजपत्रकीय किंमती इतक्या अथवा त्यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्या असल्यास अशा संविदाना नगराध्यक्ष व मुख्यअधिकारी यांचा समावेश असणारी समिती मान्यता देईल.

उपरोक्त निविदा ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा प्रती टन रू १/- कमी म्हणजेच रू.६९९/- प्रति टन दराची असलेने तत्कालीन नगराध्यक्ष व मुख्यअधिकारी यांचे समितीने दि.१६/०४/२०२०-२०२१ रोजीच्या मान्यतेनुसार संबंधित मक्तेदार कंपनी AADARSH BHARAT ENVIRO Pvt.Ltd यांना दि.०४/०५/२०२०-२०२१ रोजी काम सुरू केलेपासून ०५ वर्षासाठी तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेच्या घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे व प्रकल्पाचे देखभाल व व्यवस्थापन करणेसाठी १५व्या वित्त आयोगातील प्राप्त होणाऱ्या निधीतून खर्च करणेस कार्यादेश देणेत आलेले आहेत.

कार्यादेशानुसार संबंधित मक्तेदारांने विहीत वेळेत सुरूवातीस निविदेनुसार DPR मधील नमूद मशिनरी बसविलेल्या आहेत. कचराडेपोवर उपलब्ध असलेल्या १०० KV विद्युत कनेक्शनवर संबंधित मक्तेदार कंपनी AADARSH BHARAT ENVIRO Pvt.Ltd यांनी इचलकरंजी शहरातील निर्माण होणाऱ्या व कचरा डेपो येथे टाकणेत येणाऱ्या ओल्या व सुक्या घनकचऱ्यावर दि.०१ मार्च २०२२ पासून प्रक्रिया करणेस सुरूवात केलेली असून त्यानंतर कचराडेपोवर ५००KV विद्युत कनेक्शन हे दि.२६ डिसेंबर २०२२ पासून उपलब्ध झालेनंतर ओल्या व सुक्या घनकचऱ्यावर पुर्वीपेक्षा जास्त क्षमतेने देनंदिन प्रक्रिया आजअखेर सुरू असलेने मक्तेदाराने दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ या १२ महिन्याच्या कालावधीतील बिलाची मागणी दि.१७/०३/२०२३ रोजी आरोग्य विभागाकडे केलेनुसार कचराडेपोवर कार्यरत संबंधित स्वच्छता निरीक्षक यांचे दैनंदिन अहवालानुसार संबंधित अभियंता यांनी तयार केलेल्या MB अहवालाप्रमाणे सदर इचलकरंजी शहरातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेच्या कामाचे(O&M) बिल एकूण बिल हे र.रू.१९२०९२१९/- ( र.रू.एक कोटी ब्यान्नव लाख नऊ हजार दोनशे एकोणीस फक्त ) इतके झालेले असून सदरचे देयक मक्तेदार कंपनीस इचलकरंजी महापालिकेमार्फत देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाच्या पहिल्या वर्षीच्या कामाची प्रथम रनिंग बिलाप्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रू. रू.१९२०९२१९/- ( र.रू.एक कोटी ब्यान्नव लाख नऊ हजार दोनशे एकोणीस फक्त ) ही १५व्या वित्त आयोगातून किंवा इचलकरंजी महानगरपालिका फंडातून खर्च करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे. कारण कार्यादेश देताना १५ व्या वित्त आयोगातून इचलकरंजी महापालिकेस १४व्या वित्त आयोगाच्या धर्तीवर भरीव निधी मिळेल अशी अपेक्षा धरणेत आलेली होती. परंतु प्रत्यक्षात

CamScanner

१५व्या वित्त आयोगातून इचलकरंजी महानगरपालिकेस १४व्या वित्त आयोगाच्या तुलनेने कमी निधी सध्या उपलब्ध हात असलेने सदरचे काम हे १५वा वित्त आयोगातील महापालिकेस प्राप्त होणारा निधी किंवा इचलकरंजी महानगरपालिका फंड यातून खर्च करणे आवश्यक बनले आहे.

त्यामुळे ०५ वर्षासाठी सदरचे घनकचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम (O&M) कंपनीमार्फत सध्या सुरू असलेने तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषदेने संबंधित कंपनीसोबत केलेल्या करारपत्र व कार्यादेशाप्रमाणे ०५ वर्षासाठीच्या इचलकरंजी शहरातील कचराडेपोवर जमा होणाऱ्या ओला व सुका असा एकूण कचरा सरासरी प्रति दिन १२० टन व दरवर्षी १०% प्रति टन दरवाढ गृहीत धरलेस खालील नमूद प्रमाणे ०५ वर्षासाठीचा अंदाजीत खर्च येणार आहे.

| वर्ष | दर | गणना (Calculation) | अंदाजपत्रकीय खर्च र.रू. |
|---|---|---|---|
| प्रथम वर्ष (१ले रनिंग बिल) | र.रू.६९९/- प्रति टन | केलेल्या कामाचे MB प्रमाणे | १,९२,०९,२१९/- |
| दुसरे वर्ष | र.रू.७६८.९/- प्रति टन | १२० टन x ७६८.९/-x३६५दिवस | ३,३६,७७,८२०/- |
| तिसरे वर्ष | र.रू.८४५.७९/- प्रति टन | १२० टन x ८४५.७९/-x३६५दिवस | ३,७०,४५,६०२/- |
| चौथे वर्ष | र.रू.९३०.३७/- प्रति टन | १२० टन x ९३०.३७/-x३६५दिवस | ४,०७,५०,२६२/- |
| पाचवे वर्ष | र.रू.१०२३.४०/- प्रति टन | १२० टन x १०२३.४०/-x३६५दिवस | ४,४८,२४,९२०/- |
| एकूण ०५ वर्षासाठीचा अंदाजपत्रकीय खर्च | | | र.रू.१७,५५,०७,७२३/- |

सदरकामी वरीलप्रमाणे नमूद कचरा डेपोवर येणारा एकूण कचरा ०५ वर्षासाठी सरासरी १२० टन प्रति दिन गृहीत धरलेस एकूण र.रू. १७,५५,०७,७२३/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे १५व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतून किंवा इचलकरंजी महानगरपालिका फंडातून सदरकामी खर्च करणेस सदर अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस व त्याप्रमाणे ठराव करणेस तसेच सदर कंपनीने केलेल्या कामाचे दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ या कालावधीचे बिल र.रू.१,९२,०९,२१९/- अदा करणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २६ /२०२३**

दि. 30/06/2023

वरील प्रस्ताव अवलोकनी घेवून इचलकरंजी शहरातील दैनंदिन निर्माण होणा-या कच-यावर रि.स.न. ६८ येथे दैनंदिन प्रक्रिया करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कंपनीने केलेल्या कामाचे दि. ०१/०३/२०२२ ते दि. २८/०२/२०२३ या कालावधीचे देयक र.रु. १,९२,०९,२१९/- आदा करणे आवश्यक आहे. सदरकामी १५ व्या वित्त आयोगात पुरेसा निधी उपलब्ध नसलेने व सदर कामाचे दर मंजुर होवुन उक्त कालावधीत काम पुर्ण करुन घेतले असलेने करारनाम्यानुसार देयक आदा करणे आवश्यक आहे. मुळ कामास व खर्चास तत्कालीन नगरपरिषद ठराव क्र. ७८ दि. १६/०९/२०२० अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तथापि हा खर्च १४ व्या / १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन खर्च करण्यास मान्यता देणेत आली असुन संबंधीत लेखाशिर्षाखाली पुरेसा निधी उपलब्ध झालेला नाही व होणारही नाही त्यामुळे यासाठी सदरकामी रक्कम रु. १,९२,०९,२१९/- या सन २०२२-२०२३ मधील देयका इतक्या खर्चास सुधारीत कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी देणेत येत असुन सन २०२२-२०२३ चे प्राप्त देयक हे सन २०२३-२०२४ चे घनकचरा व्यवस्थापन म.न.पा. फंडातुन आदा करणेत यावे तसेच सन २०२३-२०२४ साठी म.न.पा. निधी मध्ये घनकच-यापासुन खतनिर्मीती करणे या लेखाशिर्षात सुधारीत अंदाजपत्रकामध्ये पुरेशी तरतुद करणेत यावी. यापुढे वेळोवेळी निधी उपलब्धतेनुसार प्रत्येक वर्षासाठी सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता घेण्याची विभागप्रमुखांनी खबरदारी घ्यावी.

30/06/2023
(सुधाकर देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

प्रशासकीय ठराव क्र. २७/२०२३

दि.13/07/2023

विषय :- प्रारूप विकास योजना, इचलकरंजी महानगरपालिका (तत्कालीन नगरपरिषद) जि.कोल्हापूर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम २६ (१) अन्वये प्रारूप विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत...

इचलकरंजी महानगरपालिका (तत्कालीन नगरपरिषद) ची प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेने (तत्कालीन नगरपरिषद) दि.21/07/2021 चे महाराष्ट्र शासन राजपत्रात इरादा जाहीर केलेला असून, दि.29/09/2021 चे आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना / नगररचनाकार, कोल्हापूर शाखा कोल्हापूर यांची "नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने, "नगररचना अधिकारी" यांनी अस्तित्वातील जमीन वापर नकाशा दि.08/06/2022 चे पत्रान्वये महानगरपालिकेकडे (तत्कालीन नगरपरिषद) हस्तांतरीत केलेला असून प्रारूप विकास योजना तयार करण्यात आली असून उक्त प्रादेशिक विकास योजना या कार्यालयास दि.07/06/2023 (प्राप्त दि.14/06/2023) रोजी प्राप्त झाली आहे.

अधिनियमातील तरतूदीनुसार प्रारूप विकास योजना कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्याची मुळ मुदत, इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात घोषित झाल्याच्या दिनांकापासून, दोन वर्ष म्हणजेच दि.20/07/2023 पावेतो आहे.

तथापी, खालील नमुद कारणामुळे उक्त प्रारुप विकास मुळ मुदतीत विकास योजना प्रसिध्द करणे शक्य होणार नाही.

1) विकास योजना सुधारीत करणेच्या ठरावावेळी म्हणजेच दि.30/06/2021 रोजी इचलकरंजी ही नगरपरिषद होती पण दि.29/06/2022 रोजीच्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या अधिसुचनेनुसार सदरची नगरपरिषद ही महानगरपालिकामध्ये रुपांतरीत झाल्याने उक्त प्रारुप विकास योजनेमध्ये महानगरपालिकेच्या अनुषंगाने भौतिक व मुलभुत गरजांचा प्रारुप आराखडयांमध्ये समावेश होणे आवश्यक आहे.

2) सद्यस्थितीत इचलकरंजी महानगरपालिकेमध्ये लोकनियुक्त सर्वसाधारण महासभा अस्तित्वात नसून महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पार पाडत आहेत.

त्यामुळे, प्रारूप विकास योजनेचे महानगरपालिकेच्या अनुषंगाने काम करण्यासाठी 6 महिने इतका कालावधी लागण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम २६ (१) मधील तरतूदीनुसार 6 महीने मुदतवाढीचा प्रस्ताव, मा. संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचेकडे सादर करणेची कार्यवाही करावी.

प्रशासक,
इचलकरंजी महानगरपालिका.





CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

विषय : केंद्र पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० इचलकरंजी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पअंतर्गत रि.स.नं.६३८ कचरा डेपोवरील साठलेल्या कच-यावर प्रक्रीया करणेचा प्रकल्प अहवाल (DPR) म.जी.प्रा.कोल्हापूर यांचेकडे सादर करणेबाबत.

प्रस्ताव –

केंद्र पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० इचलकरंजी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंतर्गत रि.स.नं.६३८ कचरा डेपो येथील साठलेल्या कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने Bio remediation & Biomining प्रक्रीया करणेकरीता Mars Planing & Engineering Pvt.Ltd. या फर्मची नेमणूक पीएमसी कामासाठी MUDM / SMM /१४१० दि.२४/२/२०२३ अन्वये स्टेट मिशन डायरेक्ट यांचेमार्फत झालेली आहे.त्यांचे Empanelment Order मध्ये इचलकरंजी महानगरपालिकेसाठी रु.२३.३० कोटीचे अंदाजपत्रक तरतुद करणेत आली आहे.

त्याअनुषंगाने या कामाकरीता र.रु.२३.३० कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेत आला आहे.त्या प्रकल्प अहवालास (DPR) तांत्रिक मान्यता घेणेकामी प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडे सादर करणेत आला आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे दि.१४ फेब्रुवारी २०२३ चे परिपत्रकानुसार केंद्र पुरस्कृत महाराष्ट्र अभियान नागरी (२.०) अंतर्गत प्रकल्पाचे अंमलबजावणीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार इचलकरंजी शहरातील घनकचरा व्यवस्थापन संबंधी प्रस्तावित प्रकल्पाबावत सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करणेकामी व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी सदर परिपत्रकात नमूदप्रमाणे तीनपैकी एका प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची म्हणजे MaRs Planing & Engineering Pvt .Ltd. यांची नियुक्ती करणेत आलेली असून त्यांचेद्वारे सादर केलेल्या प्रकल्पास (DPR) प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक असलेने सदर कामी प्रशासकीय ठराव होणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुसार याकामी सादर केलेल्या प्रकल्पामध्ये Biomining (Ligacy West) रु.२२.०० कोटी कामाचा समावेश असून इतर कामामध्ये अनुक्रमे खालिल कामांचा समावेश आहे.

१) Wet Waste Plant Capacity – Compost – र.रु.२,९१,८२,८८६.३५/-
२) Dry Waste Plant Capacity – MRF – र.रु. ६२,३९,०३७.९३/-
३) SLF र.रु. २,३८,४२,४९८.६२/-

**प्रशासकीय ठराव क्र. २८ /२०२३** **दि. ९ /८/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येऊन महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे दि.१४ फेब्रुवारी २०२३ चे परिपत्रकानुसार केंद्र पुरस्कृत महाराष्ट्र अभियान नागरी (२.०) अंतर्गत प्रकल्पाचे अंमलबजावणीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार इचलकरंजी शहरातील घनकचरा व्यवस्थापन संबंधी प्रस्तावित प्रकल्पाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करणेकामी व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार MaRs Planing & Engineering Pvt .Ltd. यांनी तयार केले प्रकल्प अहवालास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत असून सदर प्रकल्प अहवालास तांत्रिक मंजुरी घेणेसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग कोल्हापूर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

विषय - महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका नळ पाणी पुरवठा योजनेमध्ये नविन जल कुंभ उभारणे व अनुशंगीक कामे या प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळणे व निधी मंजुर होणे बाबत.

संदर्भ – १) मा.आमदार श्री.प्रकाशआण्णा आवाडे यांचे दि.२०/०३/२०२३ रोजीचे पत्र.

२) मे.प्रशासकीय ठराव क्र.२०/२०२३, दि.१९/०६/२०२३ नुसार या कामी समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांना विना निविदा कार्यारंभ आदेश देणेस देण्यात आलेली मंजुरी.

३) जा.क्र.इमनपा/पापु/१०२२/प्र.क्र.०१/१११८/२०२३, दि.२१/०६/२०२३ रोजी समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांना देण्यात आलेली कामाची समज.

४) जा.क्र.इमनपा/पापु/१०२२/प्र.क्र.०१/१११८/२०२३, दि.२१/०६/२०२३ रोजी समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांना देण्यात आलेला कार्यारंभ आदेश.

प्रस्ताव :

इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेमधील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा आणणे कामी नव्याने जलकुंभ उभारणे व अनुषंगीक कामे करणे याकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव तयार करणेसाठी संदर्भ क्रमांक २ नुसार समर्थ इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांना आदेशीत केले आहे सदर ठरावास अनुसरुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सध्या अस्तित्वातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचा अभ्यास करुन आवश्यक जलकुंभांच्या क्षमतेपैकी एकत्रित साठवण क्षमतेच्या ६ जलकुंभांची तसेच सदरचे जलकुंभ भरणेसाठी शुध्द जलदाब नलिका टाकणे व पंपींग मशिनरी उभारणे इत्यादी कामाचा समावेश करुन र.रु ३२,२१,९०,०००/- इतक्या रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे.

सदर कामाची निकड पाहता योजना तातडीने होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्तावास तांत्रिक मंजुर घेणे व उक्त प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत निधी उपलब्ध होणे कामी मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडे त्वरीत सादर करणे आवश्यक आहे.याकामी योजना मंजुर होणे कामी शासन मान्य वित्तीय आकृतीबंधानुसार अनुज्ञेय असलेला मनपा स्व हिस्सा र.रु.९,६६,५७,०००/- १५ वा वित्त आयोग / महापालिका स्व निधी अथवा तत्सम योजनेतुन भरावयास लागणार आहे.

तरी याकामी तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता होणे कामी सदर प्रस्तावास मंजुरी होणेस व निधी उपलब्धता असले बाबत प्रशासकीय ठराव होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २८ /२०२३** दि. ८/८/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजनेमधील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा आणणे कामी नव्याने जलकुंभ उभारणे व अनुषंगीक कामे करणे याकामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत र.रु.३२,२१,९०,०००/- इतक्या रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक मंजुर घेणे व उक्त प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत निधी उपलब्ध होणे कामी मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडे सादर करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत असून, योजना मंजुर होणे कामी शासन मान्य वित्तीय आकृतीबंधानुसार अनुज्ञेय असलेला मनपा स्व हिस्सा र.रु.९,६६,५७,०००/- १५ वित्त आयोग / महापालिका स्व निधी अथवा तत्सम योजनेतुन भरणेसही प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

(ओमप्रकाश दिवटे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : मा.उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग हातकणंगले यांनी खालिल विकास कामे महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचे विकास कामासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गत करणेसाठी विविध प्रमाणपत्रे , हमीपत्रे, देखभाल दुरुस्ती दाखला मागणी केला आहे.

| अ.क्र. | कामांची नांवे |
|---|---|
| १ | इचलकरंजी (ता.हातकणंगले जि. कोल्हापूर) महानगरपालिका क्षेत्रातील मुक्त सैनिक सोसायटी श्री.काशिलिंग बिरदेव मंदिर परिसर सुशोभिकरण करणे. |
| २ | इचलकरंजी (ता.हातकणंगले जि. कोल्हापूर) महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ शहापूर येथील गट नं.४७१ ड येथे श्री.सदगुरु बाळू मामा मंदिर समोर सभामंडप बांधणे. |

वरील नमूद जागांकामी मिळकत पर्यवेक्षक यांचा दि. १०/०८/२०२३ रोजीच्या अभिप्रायाप्रमाणे अ.क्र. १) मुक्त् सैनिक सोसायटी श्री. काशिलींग बिरदेव मंदिर परिसर रि.स.न. ६०१ ए पैकी सि.स.न. १०९७४ क्षेत्र अंदाजे १४ आर या इतकी जागा कब्जेपटटीदवारे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेने या जागेवर श्री. काशिलींग बिरदेव मंदिर परिसर सुशोभिकरण करणे, व अ.क्र. २) इचलकरंजी (ता.हातकणंगले जि. कोल्हापूर) महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ शहापूर येथील गट नं.४७१ ड येथे श्री.सदगुरु बाळू मामा मंदिर समोर सभामंडप बांधणे ही कामे नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे बंधनकारक राहील या अटीवर कार्यान्वीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापुर यांचेकडुन करणेस महानगरपालिकेचा हरकत नसलेबाबत व काम पुर्ण होवुन दोष दायित्व् कालावधी पुर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करीत असलेबाबत दाखला देणेस हरकत नाही.

तरी वरीलप्रमाणे ना हरकत दाखला व इतर आवश्य्क ती कागदपत्रे देणेस आपली मान्यता मिळावी. व याप्रमाणे मान्यतेचा प्रशासकीय ठरावास मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.30 /२०२३** दि. ११/८/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येवून **अ.क्र.** १) इचलकरंजी (ता.हातकणंगले जि. कोल्हापूर) महानगरपालिका क्षेत्रातील मुक्त् सैनिक सोसायटी श्री. काशिलींग बिरदेव मंदिर परिसर रि.स.न. ६०१ ए पैकी सि.स.न. १०९७४ क्षेत्र अंदाजे १४ आर या इतकी जागा कब्जेपटटीदवारे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेने या जागेवर श्री. काशिलींग बिरदेव मंदिर परिसर सुशोभिकरण करणे, व **अ.क्र.** २) इचलकरंजी (ता.हातकणंगले जि. कोल्हापूर) महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१ शहापूर येथील गट नं.४७१ ड येथे श्री.सदगुरु बाळू मामा मंदिर समोर सभामंडप बांधणे ही दोन कामे कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांचेकडून करणेस महानगरपालिकेची हरकत नसलेबाबत तसेच काम पूर्ण होवून दोष दायित्व कालावधी पूर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती महानगरपालिका करीत असलेबाबतचा नाहरकत व इतर आवश्यक ती कागदपत्रे देणेस व सदर कामास नगररचना व अन्य लागू असलेल्या सर्व अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील या अटीसह ना हरकत दाखला देणेस मंजुरी देणेत येत आहे.

11/08/2023

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त् तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर योजनेचे बळकटी करणे. शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटराचे जाळे तयार करणेचा प्रस्ताव केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत शासनाकडे दाखल करणे.

संदर्भ : १) मा. सदस्य सचिव महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे दि.२४/०६/२०२१ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स आढावा बैठकीमध्ये प्राप्त सूचना.

२) क्रमांक-बैठक-२०२३/प्र.क्र.२६२/नवि-१६ दि. ०७/०७/२०२३ नुसारचे मा. मुख्यमंत्री यांच्या दि. १७/०४/२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त्

३) जा.क्रं इमनपा/पापूवि/प्र.क्र./२१६५/२०२३दि.२८/०२/२०२३ रोजी यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि. नवि मुंबई प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून देणेत आलेला कार्यारंभ आदेश.

**प्रस्ताव**

इचलकरंजी शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या घरगुती सांडपाण्यावरती प्रक्रिया करणे कामी आज अखेर खालील दोन टप्यांमध्ये शासनामार्फत योजना राबविण्यात आलेल्या आहेत-

१. टप्पा क्रं.०१ (Phase- I )

सदरचा टप्पा हा सन १९९८ मध्ये कार्यान्वीत करणेत आला आहे. या योजनेमध्ये सन २००३ साला करीता २,५०,००० इतकी अंदाजीत लोकसंख्या गृहित धरून प्रस्ताव करणेत आला. सदर प्रस्तावामध्ये गावभागाकरीता जवळपास ८१ कि.मी. भुयारी गटर जाळे विकसित करणेत आले होते व २० द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वीत करणेत आला.

२. टप्पा क्रं.०२ (Phase- II )

UIDSSMT योजने अंतर्गत इचलकरंजी शहर वाढीव कबनुर व शहापूर भागाकरीता सन २०१४ साली याकामीचा प्रथम कार्यारंभ आदेश देणेत आलेला होता. सदर योजने अंतर्गत एकूण ९१ कि.मी. भुयारी गटर जाळे विकसित करणे व १८ द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. सदर मक्तेदार यांनी एकूण ९१ कि.मी. भुयारी गटर जाळ्या पैकी ६१ कि.मी भुयारी गटर जाळे टाकले आहे. तदनंतर मक्तेदार यांनी सदरचे काम करणेस अकार्यक्षमता दाखवलेने मक्तेदार यांना देणेत आलेला मक्ता रदद करून याकामी दि.०२/०६/२०२२ रोजी इकडील विभागामार्फत नव्याने मक्तेदार नियुक्त करणेत आलेला आहे. सध्या या मक्तेदारमार्फत १८ द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणेचे काम सुरू आहे व उर्वरित ३० कि.मी भुयारी गटर जाळ्यामधील मुख्य गुरुत्ववाहीनी टाकणेचे काम सुरु आहे. सदरच्या कामाची अंतिम मुदत ही जुन २०२४ अखेर पर्यंत असुन सदरचे काम पुर्ण झाले नंतर शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या एकुण ३८ द.ल.लि घरगुती सांडपाण्यावरती प्रक्रिया करणेत येणार आहे.

इचलकरंजी शहराचे वाढत जाणारी लोकसंख्या, शहरामध्ये कालानुरुप होणारी औद्योगिक प्रगती, शहरामध्ये वाढत्या तरंगत्या लोकसंख्येचे प्रमाण, अस्तित्वातील भुयारी गटर योजनेची कालापरत्वे कमी झालेली कार्यक्षमता, अस्थित्वातील भुयारी गटरांच्या जाळयामध्ये वारंवार होणारे लिकेजेस व चोकअप, इचलकरंजी शहराला भेडसवणारा पंचगंगा नदी प्रदुषण प्रश्न, सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी शासना मार्फ़त वेळोवेळी सुधारित करणेत आलेली नियमावली या सर्व बाबींचा विचार करुन अस्तित्वातील भुयारी गटारींचे बळकटीकरण करणे, UIDSSMT अंतर्गत सुरु असलेल्या कामामध्ये निधीच्या कमतरते मुळे काम होवु न शकणा-या पाईप लाईन टाकणे, शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटारीचे जाळे विकसित करणे इत्यादी गोष्टी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.१ व २ मधील बैठकीमध्ये विस्तृत चर्चेअंती पारीत केलेल्या आदेशानुसार इचलकरंजी शहराकरिता भुयारी गटर योजना (टप्पा ३-Phase- III ) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी संदर्भ क्र.३ चे आदेशान्वये यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि, नवि मुंबई यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेत आली आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर जाळे, UIDSSMT टाकणेत आलेले व प्रस्तावीत भुयारी गटारीचे जाळे, शहराची भौगोलिक परिस्थिती, शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या सांडपाण्याची गुणवत्ता. भविष्यात शहरामध्ये वाढणारी लोकसंख्या व विस्तार व त्या अनुशंगाने सांडपाणी व्यवस्थापना करिता करावयाच्या कार्यवाहीस अनुसरुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालील प्रमाणे.

| अ.क्र | तपशील | प्रस्तावीत |
|---|---|---|
| १ | लोकसंख्या | |
| | सन २०११ | २,८७,५०० |

| | | |
|---|---|---|
| | सन २०२५ | ३,५२,९०३ + २०,०००(धावती लोकसंख्या) |
| | सन २०४० | ४,१७,१३२ + २५,०००(धावती लोकसंख्या) |
| | सन २०५५ | ४,७५,३१२ + ३०,०००(धावती लोकसंख्या) |
| २ | दैनंदिन दर डोई पाणी पुरवठा | १३५ लिटर |
| ३ | दैनंदिन निर्माण होणारे घरगुती सांडपाणी | |
| | सन २०२५ | ४३.४६ द.ल.लि |
| | सन २०४० | ५१.३२ द.ल.लि |
| | सन २०५५ | ५८.४३ द.ल.लि |
| ४ | सांडपाणी व्यवस्थापन करणेसाठी भोगोलिक दृष्ट्या शहराची झोन निहाय विभागणी | एकुण ३ झोन |
| ५ | प्रस्तावीत पंपींग स्टेशन | ०१ अस्तित्वातील + ०२ प्रस्तावीत = एकुण ०३ |
| ६ | झोन निहाय भुयारी गटारीचे जाळे | कमीत कमी २०० मी.मी ते जास्तीत जास्त ९०० मी.मी RCC पाईप |
| | झोन – १ | ६३.४०० कि.मी |
| | झोन – २ | १३५.९९० कि.मी |
| | झोन – ३ | १३९.५३७ कि.मी |
| | एकुण | ३३८.९६४ कि.मी |
| ७ | मल शुध्दीकरण केंद्र | |
| | जुना चंदुर रोड नाल्याजवळ | क्षमता – १५ द.ल.लि |
| | बुध्द विहार टाकवडे वेस | क्षमता – १३ द.ल.लि |
| | बुध्द विहार टाकवडे वेस | क्षमता – १९.५ द.ल.लि |

सविस्तर प्रकल्प अहवाला मध्ये कंटूर सर्वे द्वारे शहराचा भौगोलिक उतार लक्षात घेऊन शहराची एकूण तीन झोन मध्ये विभागणी केली असून प्रत्येक झोन निहाय भुयारी गटाराचे जाळे प्रस्तावित केले आहे. तसेच वरील कोष्टकामध्ये नमूद अ.क्र.०७ नुसार एकुण ०३ मलशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित केले आहेत. वरील सर्व बाबींकरिता सविस्तर प्रकल्प अहवाला प्रमाणे एकुण र.रु.४९३.७४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रकरणी इकडील विभागामार्फत यापूर्वी ढोबळ अंदाजपत्रक र.रु. २६० कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव अमृत २.० च्या संकेतस्थळावरती दाखल केला आहे या कामी सध्या सविस्तर प्रकल्प अहवाल प्राप्त झाला असल्याकारणाने संकेतस्थळावर दाखल केलेल्या रकमेमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

सदरचा प्रस्ताव सत्वर शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवण्यापूर्वी या कामी तांत्रिक मान्यता घेणे तसेच या कामी शासनाने अमृत २.० अंतर्गत केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा स्व हिस्सा प्रकल्प रक्कमेच्या ३०% प्रमाणे र.रु.१४८.१२२ कोटी इतक्या रक्कमेची तरतुद करणे (प्रशासकीय मान्यतेस अधिन राहुन स्व हिस्स्यामध्ये बदल होऊ शकतो) तसेच याकामी तांत्रिक मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे पाठविणे आवश्यक असून प्रकल्प रक्कमेच्या १ % प्रमाणे रु.४,१३,९२,३८२/- इतकी फी भरणे आवश्यक असून त्यासही मंजुरी मिळणेबाबत कार्यालयालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ३१/२०२३** दि.१४/८/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयीन प्रस्ताव अवलोकनी येवून इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर योजनेचे बळकटी करणे, शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटाराचे जाळे तयार करणे अंदाजपत्रकीय र.रु.४९३.७४ कोटी यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे, या कामी शासनाने अमृत २.० अंतर्गत केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा स्व हिस्सा प्रकल्प रक्कमेच्या ३०% प्रमाणे तरतुद करणेस तसेच याकामी तांत्रिक मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे पाठविणेसाठी प्रकल्प रक्कमेच्या १ % प्रमाणे रु. ४,१३,९२,३८२/- इतकी फी भरणेस व तांत्रिक मंजुरीनंतर प्रस्ताव केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत शासनाकडे सादर करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

(ओमप्रकाश दिवटे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner